
# अग्रपर्णे

विद्याधर गोखले

खंड ४



खंड ४

# अष्टपैलू

■

निवडक सामाजिक
अग्रलेख

विद्याधर गोखले

मा न स न्मा न प्र का श न

मानसन्मान ॥ २९ वा ॥
अष्टपैलू : खंड ४ : निवडक सामाजिक अग्रलेख
लेखक : विद्याधर गोखले
■
प्रकाशक-मुद्रक :
रवींद्र कुलकर्णी
मानसन्मान प्रकाशन
४/४० चंद्रप्रकाश, कर्वे रस्ता, पुणे ४११००४
■
© सर्व हक्क सुरक्षित
■
मुखपृष्ठ :
चंद्रमोहन कुलकर्णी
■
सजावट :
'रचना' पुणे
■
प्रथमावृत्ती :
२३ जुलै १९९३
॥ नागपंचमी ॥
■
टाइपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२०, सदाशिव पेठ, पुणे ३०
■
मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ३०.
■
**मूल्य ऐंशी रुपये**

विद्वान्, परखड

पत्रकार-मित्र

**श्री. गोविन्दराव तळवलकर यांना**

सप्रेम –

**– विद्याधर गोखले**

## *श्री. विद्याधर गोखले ह्यांचे सामाजिक अग्रलेख*

बऱ्याच वेळा संपादकांचे लक्ष राजकीय वा आंतरराष्ट्रीय घडामोडींकडेच जास्त असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकारणाने भारततही सर्वग्रासी व्हायचे ठरवलेले. साहजिकच बऱ्याच वृत्तपत्रांचे अग्रलेख राजकीय घाण्याभोवती फिरणारे. त्यामानाने विद्याधरपंतांना सामाजिक स्थित्यंतरांची जाण जास्तच. साहजिकच शतमुखांनी आपल्या समाजाचे होत असलेले अधःपतन त्यांना चांगलेच बोचत असणारे. विद्यार्थी, महिला, राज्यकर्ते, समाजप्रणेते सर्वांमधे ही कीड लागलेली— अस्वस्थ करणारी. विद्याधर गोखले ह्यांना राष्ट्रीय घडामोडींबरोबरच इतर देशांतील बातम्याही बारकाईने वाचण्याची सवय. अशा बातम्या आठवडाभरात टिपून रविवारच्या सकाळी चहाच्या कपाबरोबर खुसखुशीत न्याहरीच्या पद्धतीने अग्रलेखांत मांडण्याचे कसब त्यांना चांगलेच साधलेले. अवतरणे, सुभाषिते, शेरोशायरी ह्यांनी लीलया नटवून त्यांनी हे वाचकांना दिले. ह्या खंडातील अग्रलेखांच्या मुळाशी बहुशः एखादी छोटी वाटणारी बातमी आहेच. आणि त्यावर आहे रसाळ उद्‌बोधन !

नुसत्या अग्रलेखांची शीर्षकेच हा अग्रलेखांचा पसारा किती विविध विषयांवरचा आहे हे दाखवू शकतात. कुठे 'शूर वाघिणीचे बलिदान', 'आधुनिक पद्‌मिनी', 'अरबी प्रेम कहाणी', 'प्रीत पतंगाची खरी', तर समोर ठाकताहेत 'उच्चभ्रू समाजसेविका', 'महिलांचे मद्यपान !' येथे वाळवीग्रस्त विद्यार्थी आहेत, वासनाकांडातील बळी आहेत, वेश्या आहेत, न्यायालये नि विलंबित न्यायदान आहे, पदव्यांचे अधःपतन आहे, शपथबद्ध चोरांना वंदन आहे. वाघ, सिंह, गाढवे, बैल, जादूगार साऱ्यांची वेगवेगळ्या संदर्भात हजेरी आहे. पाखरे आहेत, कपोतप्रीती आहे आणि काक-महोत्सवही आहे !

गंभीर विवेचनाला गमतीशीर शैलीची सुंदर झालर आहे. चटकदारपणा आहे, पण उथळपणा नाही. अंतःकरणात बोच आहे आणि शीर्षकांत खोच आहे. म्हणूनच श्री. गोखले लोकसत्तेतून निवृत्त झाल्याला सात-आठ वर्षे लोटली, पण त्यांचे अग्रलेख आजही वाचावेसे वाटतात.

हे ग्रथित होऊन समोर यायला हवेच होते. संकलन-संपादन काळ उलटून गेल्यामुळे अधिक तटस्थतेने झालेले आढळेल आणि वाचक चांगले स्वागत करतील ही खात्री आहे.

**श्री. म. जोशी**
संपादक

## अनुक्रम


१. शिवरायांची भवानी / १
२. शिवरायांची आकाशवाणी ? / ३
३. शिव-नामाचा हक्क ! / ६
४. शिवाजी-पुतळ्याची दैना ! / ८
५. हे पराक्रमाचे स्मारक दिल्लीतही व्हावे / ११
६. भारतीय युद्ध-नौका / १४
७. आधुनिक पद्‌मिनी ! / १६
८. सतीचे वाण ! / १९
९. शूर वाघिणीचे बलिदान / २२
१०. अरबी प्रेम-कहाणी ! / २५
११. प्रीत पतंगाची खरी ! / २८
१२. उच्च-भ्रू समाज-सेविका ! / ३१
१३. महिलांचे मद्यपान / ३४
१४. लेडीची लफडेबाजी ? / ३७
१५. रतिरंग-लॉटरी ! / ४०
१६. वासनाकांडातील बळी ! / ४३
१७. अरसिक किती हा मेला ! / ४८
१८. प्रामाणिक वेश्या ! / ५१
१९. वेश्या-ग्राम ! / ५४
२०. वारांगनेचा आरोप ! / ५७
२१. मद्यपी विद्यार्थी ! / ६०
२२. विद्यार्थ्यांना वाळवी जडली ! / ६३
२३. कॉपी-बहाद्दर / ६६
२४. फाशीचा इशारा ! / ६८
२५. अदालतीची इन्सानियत ! / ७१
२६. न्यायालयाचा आसूड ! / ७४
२७. न्याय-कथा ! / ७७
२८. विलंबित न्यायदान ! / ७९
२९. शब्दांचे बुडबुडे ! / ८२
३०. प्रतिष्ठित शब्द ! / ८४

३१. पदवीचे लांगूल ! / ८६
३२. पदच्युत पदव्या ! / ८९
३३. पदवीदान : हे आणि ते ! / ९२
३४. गंगेचे पाणी / ९५
३५. जय गंगे भागीरथी ! / ९७
३६. कौटुंबिक सुख-दु:ख ! / १०१
३७. ताजमहालांना धोका / १०४
३८. उडत्या हत्तीचा प्रश्न ! / १०७
३९. भविष्य-शौकिन देश ! / ११०
४०. काय म्हणावे या वेड्याला ? / ११३
४१. होराभूषण हादरले ! / ११६
४२. वचन-पूर्ती / ११९
४३. जगन्नाथ नि जॅक पॉट / १२१
४४. पुणेरी पगडी झिंदाबाद ! / १२३
४५. चौकशा आणि चौकशाच ! / १२५
४६. टकल्यांची आत्म-वंचना ? / १२७
४७. शपथ-बद्ध चोरांना वंदन ! / १३०
४८. चावणारी गुलबक्षी / १३४
४९. टोनी ग्रेग बेहद्द खूश / १३७
५०. आंतरिक उमाळा हवा / १४०
५१. धिक्कार मन साहिना !... / १४३
५२. नकली जीभ ! / १४६
५३. ह्या शोधावर बंदी घाला ! / १४९
५४. निद्रादेवीची नाराजी का ? / १५२
५५. ओ रिन्द, छुप ना जाना ! / १५५
५६. एकेकीचे नशीब ! / १५८
५७. झटपट जमाना ! / १६०
५८. प्रसाधनांवर कराघात ! / १६३

---

संपादन करताना कालानुक्रम न घेता, विषयसमुच्चय लक्षात घेतला आहे.

॥ १ ॥

# शिवरायांची भवानी

*२८ एप्रिल १९६८*

उद्या शिवजयंती; महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली शिवरायांची पवित्र जन्मतिथी. तिच्या निमित्ताने ठिकठिकाणी सप्ताह साजरे झाले; ठाणे येथील व्याख्यानमालेत 'महाराष्ट्राची दुर्गस्थळी' या विषयावर श्री. गो. नी. दांडेकर यांचे व्याख्यान झाले. या माहितीपूर्ण भाषणात दांडेकर म्हणाले– "शिवाजी महाराज अत्यंत गुणग्राही होते. चांगल्या प्रथा, चांगल्या गोष्टी कोठूनही मिळाल्या तरी त्या ते स्वीकारीत. उदाहरणार्थ, त्यांची सुप्रसिद्ध भवानी तलवार. ही मूळची पोर्तुगीज तलवार होय. खेम सावंतांनी त्यांना ती नजर केली. शिवरायांनी ती स्वीकारली आणि तिचे 'भवानी' असे नामकरण केले."

आणि काय नवल, त्या तलवारीला ताबडतोब अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. भाविक जनतेला तर असेच वाटले की, ही तलवार श्रीभवानी देवीनेच महाराजांना कृपाप्रसाद म्हणून दिली आहे ! या तलवारीभोवती दिव्यत्वाचे, अद्भुतरम्य आख्यायिकांचे तेजोवलय उभे राहिले. ही तलवार महाराष्ट्राचा एक मानबिंदू बनली; जतन करून ठेवण्याजोगती पवित्र राष्ट्रीय वस्तू ठरली. म्हणूनच, लोकमान्य टिळक जेव्हा विलायतेला जायला निघाले त्या वेळी 'गोविंदाग्रज' गडकरी यांनी लिहिलेल्या शुभेच्छादर्शक कवितेत म्हटले–

*एक सांगणे, एक मागणे,*
*तेच लाखवार ।*
*मागुनी घ्यावी श्रीशिवबांची*
*भवानी तलवार ॥*

*स्वदेशभूषा, स्वराज्य-जननी*
*सकळिं दाखवावी ।*
*चहु मुलखांतुन, नव खंडातून*
*मिरवित आणावी ॥*

भवानी तलवारीला हे असे ऐतिहासिक माहात्म्य प्राप्त झाले, याचे कारण काय? पोर्तुगीज कारागिरांनी केलेली तिची जडणघडण उत्तम, तिचे पोलाद उच्च दर्जाचे, तिची धार तीक्ष्ण, तिची मूठ मजबूत हे सारे खरेच आहे. पण एवढ्याच गुणांच्या बळावर तिची महनीयता अवलंबून नव्हती. पोर्तुगीज बनावटीची अशी अनेक शस्त्रे त्या काळात मराठ्यांनी खरीदली होती. पण त्यांपैकी कोणत्याही शस्त्राला भवानी तलवारीचा मंगल महिमा लाभला नाही.

कारण उघडच आहे. तलवारीला मोल प्राप्त होते, ते वीर पुरुषाच्या हातामुळे. शिवरायांसारख्या पुण्यप्रतापी युगपुरुषाच्या हाती ती 'फिरंगी' येताच, तिला एखाद्या विद्युल्लतेचे तेज चढले! तिची तीक्ष्ण धारा गंगेच्या धारेप्रमाणे, जगदाधारा ठरली! अहो, 'तलवार तलवार' म्हणजे तरी काय? तर पोलादाची एक धारदार पट्टी! ती अगदी रत्नजडित मुठीने सजली नि मखमली म्यानात जाऊन बसली, तरी तेवढ्याने तिची किंमत कितीशी वाढणार? परंतु शिवरायांसारख्या पुरुषसिंहाने; समर-धुरंधर धर्मवीराने; अवतारी युगंधराने तिचे 'कर-ग्रहण' करताच. राष्ट्राच्या प्रतापसूर्याला खग्रास ग्रहणातून मुक्त करणारी ती 'शिवशक्ती' ठरली! 'आसुरी उन्मत्तपणाला कंठस्नान घालणारी 'देवी भवानी' म्हणून वंद्य झाली!

प्रतिपदेच्या चंद्रलेखेप्रमाणेच शिवरायांची ती तलवार बाकदार, तेजस्वी नि वंदनीय होती. प्रतिदिन तिचे तेज वाढत जाणारे होते! महाराष्ट्रातील दुरितांचे तिमिर तिने नष्ट केले!

तलवारींचे युग केव्हाच मागे पडले– अण्वस्त्रांचा जमाना आता चालू आहे. पण या जमान्यातही भवानी तलवारीचा संदेश, तिच्या पराक्रमामागील चिरंतन तत्त्वज्ञान, मानवतेची महनीय मूल्ये कायमच आहेत. ती शिवरायांची असिलता साऱ्या जगाला सांगत आहे, "शस्त्रसज्ज व्हा; पण 'आर्तत्राणाय नः शस्त्रः न प्रहर्तुमनागसि' हे विसरू नका. मानवतेची प्रतिष्ठा राखण्यासाठीच शस्त्र वापरावयाचे असते. नाहीतर पवित्र खड्गाला खाटकाच्या गळेकापू सुऱ्याची हीन दशा प्राप्त होते! शस्त्र हवेच. पण ते 'आनंदवन भुवन' निर्माण करण्यासाठी. मानवतेला सुखकारक होणारी शास्त्रे समृद्ध व्हावीत, म्हणूनच शस्त्रांची अपरिहार्य गरज आहे. अशिवाच्या हाती नव्हे, तर शिवाच्या हातीच भवानी शोभते!"

□

॥ २ ॥

# शिवरायांची आकाशवाणी ?

*२ जून १९७४*

महाराष्ट्रात गेले आठ-दहा दिवस अधूनमधून पाऊस पडत आहे, मेघगर्जना होताहेत, विजा लखाखत आहेत ! अर्थात हा वळवाचा पाऊस आहे, खऱ्या पावसाळ्याचा शुभारंभ नव्हे, असे वायुमान-तज्ज्ञ सांगतात. . . पण हे कविमनाला कसे पटावे ? जे न देखे रवी ते देखे कवी ! आमचा एक कविमित्र म्हणाला— "शिवराज्याभिषेकाच्या त्रिशताब्दिमहोत्सवानिमित्त, मेघांच्या अभिषेक-पात्रातून महाराष्ट्र-रूप शिवरायांना हा अभिषेकच चालला आहे ! गगनाच्या 'अंबर'खान्यातून मेघांचेच मृदंग कडाडत आहेत ! विजांची निरांजने अधूनमधून झळाळत आहेत !". . . इतक्यात मेघांचा प्रचंड गडगडाट झाला. त्यासरशी आमचा दुसरा एक कविवर्य उदगारला— "हा मेघांचा ध्वनी नव्हे. स्वर्गाच्या आकाशवाणी केंद्रातून छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे संदेश प्रक्षेपित होत आहेत ! आणि ह्या ज्या पर्जन्य-सरी कोसळत आहेत, त्या आहेत शिवरायांच्या अश्रूंच्या— काही आनंदाश्रूंच्या, काही दुःखाश्रूंच्या ! ऐका ऐका ही महाराजांची आकाशवाणी. शिवाजी राजे दाटलेल्या कंठाने घनगंभीर स्वरात बोलताहेत. ."

"माझ्या प्रियतम मराठी वत्सांनो ! माझी— माझ्या राज्यारोहण समारंभाची— तुम्ही एवढ्या निष्ठेने आठवण ठेवलीत, याबद्दल मला होणारा आनंद शब्दांनी कसा व्यक्त करू ? त्यासाठी 'आनंदवनभुवनी'— सारखे द्रष्टे काव्य रचणारे, महाराष्ट्र-धर्माचा उद्‌घोष करणारे, समर्थ 'शब्दसृष्टीचे ईश्वरू'च पाहिजेत. आपल्या प्राचीन पूर्वजांच्या पराक्रमाकडे अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या अन् स्फूर्तीसाठी परकीयांच्या मुखाकडे पाहणाऱ्या ह्या जमान्यात आपण माझेच नव्हे, तर माझ्या मर्द मावळ्यांचेही कृतज्ञ स्मरण करावे, ही केवढी

आशादायक घटना आहे ! हा केवळ माझा स्मृति-गौरव नसून त्या महत्कार्याचा, 'हिंदवी स्वराज्या'च्या प्राणभूत तत्त्वांचा, त्या राष्ट्रसंजीवक ध्येयाचा गौरव आहे, असे मी मानतो. म्हणूनच कृतज्ञ बालकांनो, माझे तुम्हाला शतशः आशीर्वाद ! मायभवानी तुमचे सदैव कल्याण करो. मलाच नव्हे, तर त्या तेजस्वी कालखंडाला काव्यपुष्पे, शिल्पपुष्पे, नाट्यपुष्पे, चित्रपुष्पे मोठ्या भक्तिभावाने अर्पिणाऱ्या माझ्या वंशजांनो, महाराष्ट्रातील सारी जागृत दैवते नि तीर्थक्षेत्रे तुम्हाला सदैव वैभवाच्या अभेद्य दुर्गांवर घेऊन जावोत !. . .

पण ज्याला तुम्ही भक्तिभावाने अद्भुत-रम्यतेच्या सोनेरी देव्हाऱ्यात नेऊन बसविले, त्याचा कडक कर्तव्यकठोर स्पष्टवक्तेपणा तुम्ही विसरला नाहीत ना? 'शिवरायांचा आठवावा साक्षेप' हे समर्थ-वचन तुम्हास ठाऊक आहे ना? 'दिलेरखानाबरोबर राजपुत्र शंभू राजे चालून आले म्हणून काय झाले? तुम्ही त्यांच्यावरही भडिमार का केला नाही?' असे वाक्ताडन निष्ठावंत किल्लेदाराला करणाऱ्या ह्या शिवाजीने काही कटुबोल तुम्हाला ऐकविले, तर तुम्ही रागावणार नाही ना? नाही? तर मग ऐका— अरे, मानवी उत्सवप्रियता मला समजू शकते, पण तिलाही काही मर्यादा असावी. निश्चित ध्येय असावे. मीही माझ्यापुढे नि महाराष्ट्रापुढे थोर पूर्वजांचे आदर्श ठेवले होतेच. पण शालिवाहनापासून शहाजीराजापर्यंतच्या कोणत्याही पराक्रमी पूर्वजांच्या स्मृति-गौरवासाठी असे जंगी कुंभमेळे; अशी प्रचंड प्रदर्शने; अशी ठायीठायी पुतळे-उभारणी मी केली नाही ! एवढा पैसा कार्यउभारणीवर खर्च करणेच मला श्रेयस्कर वाटले. बाळांनो, व्यक्तींच्या स्मृति-गौरवार्थ संगमर्मरी भव्य वास्तू उभारणे मोगलांना परवडणारे होते; गरीब महाराष्ट्राला डोंगरी किल्ले बांधण्याची तेव्हा गरज होती !. . . थोर पूर्वजांची चरित्रे केवळ प्रदर्शनीय नसतात, तर आचरणीय असतात. त्यांच्यासारखे आचरण हेच त्यांचे सर्वोत्तम स्मरण !

म्हणूनच म्हणतो, माझ्या जीवनावरील नाटके, चित्रपट, प्रदर्शने, शिल्पकृती ह्यांना महत्त्व असलेच तर ते अत्यंत मर्यादित आहे. अरेरे, भारतीय सैन्यात मराठी तरुण फारच थोड्या प्रमाणात उच्चपदावर आहेत; अणुशक्ती-प्रकल्पातही मराठी माणूस आघाडीवर नाही; भारतीय राजकारणावर त्याचे प्रभुत्व नाही; व्यापार-उदिमात नाही ! 'भारताच्या आरमाराचा पाया घालणारा राष्ट्रपुरुष' म्हणून माझा गौरव तुम्ही करीत आहात. धन्यवाद ! पण त्या आरमारातही मायनाक भंडाऱ्याची वा सावळ्या तांडेलाची औलाद अग्रभागी नाही ! माझ्या मनाची ही खंत तुम्ही जाणली नाही काय? ज्या माझ्या महाराष्ट्रात प्रत्येक दुर्ग म्हणजे एक सैनिकशाळा होती, त्यांत अवघ्या तीनच सैनिकी शाळा असाव्यात का? आपापल्या विभागात विद्यापीठे असावीत म्हणून तुम्ही केवढे वादरण माजविता? मग प्रत्येक विभागात एकेक सैनिक विद्यालय स्थापण्यासाठी शासनाची नि समाजाची का

सिद्धता असू नये ?. . . मुलांनो, बखरवजा इतिहास नि 'इतिहास-वजा' नाटक-कादंबऱ्या तर खूप प्रसिद्ध करीत आहात; पण माझ्या अस्सल ऐतिहासिक पत्रांचे संग्रह स्वस्त दरात नि सुबोध शैलीत तुम्ही गावोगाव प्रसारित केले तर किती बरे होईल ! पण छे, प्रसिद्धीची झळाळी नसलेले कार्य अंगिकारण्याचे तुमचे सामर्थ्य तर कमी झाले नाही ? 'पुनश्च शिव-राज्य स्थापन व्हावे' अशी प्रार्थना तुम्ही करीत आहात. पण त्यासाठी किती कडक पथ्य पाळावे लागते ह्याची तुम्हाला कल्पना का नाही ? मी सर्व जातींच्या गुणीजनांना जवळ केले; जातीयवाद गाडला. अपराध्यांना देहदंड केला— टकमक टोक दाखविले; कुणाचा ब्राह्मण म्हणून मुलाहिजा ठेवला नाही अन् मराठा म्हणून— फार काय सांगू, नातेवाईक म्हणूनही— मुलाहिजा बाळगला नाही; परस्त्रीला मातेसमान मानण्याची उच्च नीतिमत्ता रूढ केली— तेव्हा कोठे माय भवानीने लहानगे स्वराज्य स्थापण्यात मला यश दिले !. . . असे काही देशकालपरत्वे आचराल तरच

*बुडाले सर्वही पापी*
*दैत्य-संहार-जाहला*
*अभक्तांचा क्षयो झाला*
*आनंदवनभुवनी*

असे स्वप्न पुन्हा महाराष्ट्रात साकार होईल ! हे व्हावे ऐसे श्रींच्या मनात आहे !. . ."

□

॥ ३ ॥

## शिव-नामाचा हक्क !

*९ जून १९७४*

ज्ञानयोग, कर्मयोग नि भक्तियोग ह्या तिन्ही योगांत भक्तियोग सर्वांत सोपा, असे सर्व भारतीय संतांनी व विद्वानांनीही सांगितले आहे. आणि या भक्तिमार्गातही नामस्मरण, नामजप, नामघोष अतिशय सुलभ नि परिणामकारक ! म्हणूनच जन्मभर अनेक पातके केलेल्या महाभागाने मृत्युसमयी देवाचे नाव घेतले, तरी स्वर्गातील त्याची 'सीट रिझर्व' होते, अशी श्रद्धा आहे. संतांच्या वाङ्मयात जागोजागी नाममुद्रा ठसठशीत उमटलेल्या दिसतात. 'येई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे' अशी त्यांची फर्माईश आहे ! देहूच्या त्या श्रेष्ठ वाण्याने– तुकोबाने– 'आम्ही घ्यावे तुझे नाम । तुम्ही आम्हां द्यावे प्रेम ॥" असा गोड व्यापारी करार परमेश्वरापाशी केला आहे आणि 'नामाचिया नौका करीन सहस्त्रवरी । माजवीन पेठा कीर्तनाच्या' अशा भव्य योजना मुमुक्षू जनतेसाठी मांडल्या आहेत ! मोरोपंतादी अनेक कवींनीही देवाहूनही त्याच्या नावालाच अधिक 'मार्क्स' दिले आहेत. संतांच्या शिकवणीने प्रभावित झालेले आमचे प्रेमवेडे शायरही बुलंद नामघोषाचे महत्त्व सांगताना म्हणतात–

*हमसे तो अच्छे है नाले हमारे ।*
*है उनके दरतक उनकी रसाई ॥*

(आम्हाला त्यांच्या घरात तर राहोच, पण दरवाजांपर्यंतही पोचता येत नाही. पण आमच्याहून आम्ही त्यांच्या नावे केलेला आक्रोश अधिक भाग्यवान ! तो त्यांच्यापर्यंत सहज पोहोचतो.)

नामघोषाचे हे महत्त्व पटण्यासाठी भाबड्या भक्तिमार्गात वा मोहब्बतीच्या माशुक

मुलखात पाय टाकण्याची जरुरी नाही. दैनंदिन रूक्ष व्यवहारातही थोरामोठ्यांचा नामघोष कसा फलदायी होतो, ते आपण पाहतोच. स्वातंत्र्यपूर्व काळात 'महात्मा गांधी की जय' ह्या उच्च घोषाने अनेक इरसाल बनियांना देशभक्तांचे मोल प्राप्त झाले होते; अनेक कृष्ण कृत्यांवर पांढरे पांघरूण पडले होते; तर आता इंदिरा गांधींचा नामघोष अत्यंत फलदायी ठरला आहे. हा घोष करताच काही कंगालांच्या जीवनात नवी रोशनी आली असून त्यांची गरिबी हटली आहे; त्यांच्या गडगंज इस्टेटी समाजवादी वैभव मिरवताहेत ! हे सारे ठाऊक असूनही महाराष्ट्राचे ख्यातनाम बुद्धिवादी चरित्र-लेखक श्री. धनंजय कीर ह्यांनी शिवाजीमहाराजांचे नाव घेण्यासही काही मंडळींना बंदी घालावी, ह्याचे आश्चर्य वाटते. कीर म्हणाले— "गेल्या २५ वर्षांत जे झपाट्याने श्रीमंत झाले; मंत्रिमंडळात अधिकारपदी राहून ज्यांनी राज्य लाचलुचपतखोर केले; पुढील तीन पिढ्यांना पुरेल इतकी इस्टेट कमावली त्यांना शिवाजीमहाराजांचे नाव घेण्याचाही अधिकार नाही". . . वा रे वा ! त्या समतावादी नसलेल्या युगातही नामघोषाचे दरवाजे महापातक्यांनाही संतांनी उघडे करून दिले आणि आता धनंजय कीर ह्या समतावादी-समाजवादी युगात नामघोष-स्वातंत्र्यावर गदा आणताहेत !

रामनामाने दगड तरले, तर शिवनामाने आमचे पुढारी का तरू नयेत? शिवनामाच्या जयघोषासाठी शासनाने २॥ कोटी रुपये मंजूर केले आहेत, हा भक्तिभाव कीरांना का खटकावा? शिवनामाचा जे जे कंठरवाने उद्‌घोष करतील त्यांच्या त्यांच्या सभा टाळ्यांच्या कडकडाटाने गाजतील, त्यांना टोलेजंग प्रदर्शने भरविण्यासाठी; जुलूस नि उरूस संपन्न करण्यासाठी, डॉक्युमेंटरी नि सिनेमे काढण्यासाठी, संगीत बाऱ्या गावोगावी फिरविण्यासाठी लक्षावधी रुपयांची खिरापत मिळेल; त्यायोगे महाराष्ट्राचा व्यापार-धंदा वाढेल, बखरवजा भारदस्त ग्रंथांना उत्तेजन मिळेल; अनेक मतदार संघांतील घोषणापटू 'पब्लिक वर्कर्स' तेजीत येतील ! आणि हे सारे समाजकल्याण ज्यांच्या कृपा-प्रसादाने घडायचे त्यांनाच म्हणे 'शिवाजीचे नाव घेण्याचाही हक्क नाही ! !' घेऊ द्या, साऱ्यांना शिव-नामाचा घोष नि जल्लोष जोरात करू द्या. ज्यांचा लाभ होईल ते पुण्यवान अन् ज्यांचा होणार नाही त्यांची पूर्वपुण्याईच कमी पडली असे समजा ! पंचवीस वर्षांत श्रीमंत होणे, हा काय अपराध झाला? ही तर कर्तबगारीची निशाणी ! श्रीमंतांचा असा उपमर्द करणे योग्य नव्हे. श्री शिवरायांनादेखील 'श्रीमान योगी' असे रामदासांनी (आणि रणजित देसायांनी !) म्हटले नाही का? महाराजांसारखे थोर पुरुष कर्मयोगात श्रीमंत असतात, तर काही महाभागांना श्रीमंत होण्याचा योग साधायचा असतो, एवढाच काय तो फरक !

□

॥ ४ ॥

## शिवाजी-पुतळ्याची दैना !

*१० ऑक्टोबर १९८२*

कोणतीही गोष्ट सांगोपांग विचार न करता घडल्यास, तिच्या प्रीत्यर्थ वेचलेली संपत्ती नि श्रमशक्ती वाया जाते– आणि कधी कधी तर अपेक्षित फळाच्या ऐवजी विपरीत फळ पदरी पडते. म्हणूनच आपल्या शहाण्या पूर्वजांनी 'कोणतीही क्रिया पूर्ण विचाराशिवाय एकदम करू नये' (सहसा विदधीत न क्रियाम्) असा दंडक घालून दिला. पण हा दंडक आपल्या उद्दंड बालिश लोकशाहीत अनेकदा पाळला जात नाही. 'शासनाने काय केले?' 'प्रगतीच्या दहा वर्षांत अथवा शंभर दिवसांत काय घडले?' अशा प्रकारच्या भारदस्त शीर्षकांच्या सरकारी पुस्तिका साजऱ्या व्हाव्यात, विरोधकांच्या टीका-शिडातला वारा काढला जावा आणि येन केन प्रकारे मतदार खूष व्हावा म्हणून अर्धकच्च्या विचारांच्या पायावर अनेक उपक्रमांचे डोलारे शासन उभारीत असते.

उदाहरणार्थ 'जेथे शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेथे सिंहासनाच्या जागेवर ब्रॉन्झ धातूची मेघडंबरी महाराष्ट्र शासनातर्फे बसविण्यात यावी' असा निर्णय झाला. माजी मुख्यमंत्र्यांच्या– अंतुल्यांच्या– कारकीर्दीत जी 'सर्व-धर्म-समन्वय समिती' स्थापन झाली तिच्या बैठकीत ही सूचना प्रथमत: मांडण्यात आली आणि ती सर्वसंमत झाली. कारण महाराजांचा– त्यांच्या सिंहासन-स्थळाचा– आदर राखणारे एक नवे स्मारक नि कलाकृती ह्या नात्याने या 'मेघडंबरी'चे महत्त्व वादातीत होय.

तथापि, रायगडावरील शिवस्मारकाच्या अग्रक्रमाच्या (प्रॉयरिटीच्या) संदर्भात ह्या 'मेघडंबरी'चा विचार करता, आम्हास जे आढळून आले, ते तज्ज्ञांच्या विचारार्थ येथे मांडले पाहिजे. आम्ही कोणी गाढे इतिहास-पंडित नव्हे, पण इतिहासाचे चोखंदळ वाचक

खास आहोत. आम्हास त्या परममंगल राज्याभिषेक प्रसंगाचे दोन अव्वल दर्जाचे साक्षीदार दिसतात. एक कृष्णाजी अनंत सभासद व दुसरा हेन्री ऑक्सीन्डन. सभासदाच्या बखरीत 'सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या स्थानी अष्ट प्रधानांनी उभे रहावे' असा उल्लेख आहे. 'छत्र जडावाचे मोतीलग झालरीचे करून मस्तकावर धरिले' असेही म्हटले आहे. यावरून सिंहासनाला लागून आठ खांब असावेत हे स्पष्ट होते. पण ज्या अर्थी महाराजांच्या डोक्यावर 'जडावाचे छत्र मोतीलग करून धरिले' असे सभासद म्हणतो त्या अर्थी सिंहासनावरील समारंभ-प्रसंगीचे वैभवशाली छत्र डोळ्यांपुढे येते. पण 'मेघडंबरी' या शब्दाने अभिप्रेत होणारी कायम स्वरूपाची वास्तू डोळ्यांपुढे उभी राहत नाही. ऑक्सिन्डन्चा अहवाल काय म्हणतो? त्याच्या अहवालात, त्या भव्य सिंहासनाच्या पायथ्याशी संभाजी राजे इत्यादी बसल्याचा उल्लेख आहे. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस सोन्याच्या मुलाम्याच्या भाल्यावर मत्स्य-चौऱ्या-तराजू इ. राजचिन्हांच्या वस्तू असल्याचा बारीक तपशीलही हेन्री ऑक्सिन्डन कथन करतो. पण 'मेघडंबरी'चा उल्लेख तो करीत नाही !. . . असे असले तरी मेघडंबरी उभारण्याचा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागतो. मेघडंबरीचे जे मॉडेल आता तयार झाले आहे, ते महाराष्ट्रीय कलापरंपरेशी इमान राखणारे नि सर्वांगसुंदर असल्याचे कळते. ह्या मेघडंबरीसाठी ५-७ लाख रुपये तरी खर्च होतील. पण खर्चाकडे पाहण्याची ही बाब नव्हे !

लक्षात घेण्यायोग्य बाब आहे ती मघाशी म्हटल्याप्रमाणे अग्रक्रमाची. आमच्या जागरूक वाचकांना हे आठवत असेलच की, १९७४ साली रायगड येथे, नगारखान्याच्या बाहेर होळी-मैदानावर शिवाजी महाराजांच्या भव्य सिंहासनाधिष्ठित पुतळ्याचे शानदार अनावरण झाले. शिल्पकार श्री. सहस्रबुद्धे ह्यांनी मोठ्या कौशल्याने नि कष्टाने तयार केलेल्या ह्या पुतळ्याची तेव्हा विधिवत प्रतिष्ठापना झाली. पण हाय! इकडे सिंहासनस्थळावर मेघडंबरी उभारण्याची योजना कार्यान्वित होत असताना तिकडे प्रत्यक्ष महाराजांच्या भव्य पुतळ्यावर, एखादी मेघडंबरी राहोच, सर्व पुतळ्याला झाकेल अशी छत्रीही नाही, इकडे गेल्या ८ वर्षांत कोणाचे लक्ष गेले नाही. छत्रपतींचा छत्र-विहीन पुतळा दीडशे इंच पावसात नि वाऱ्या-वादळात उघड्यावर ! ह्यामुळे ह्या पुतळ्याचा खालचा भाग ढासळण्याच्या बेतात असल्याचे कळते !. . . म्हणूनच आम्ही म्हणतो की, पुतळ्याच्या संरक्षणाचे काम ताबडतोबीने अग्रक्रमाने व्हावयास पाहिजे. सिंहासन-स्थळाच्या चौथऱ्यावर मेघडंबरी स्मारक म्हणून उभारणे अयोग्य नव्हेच. पण आधी शिवरायांच्या पुतळ्याची काळजी नंतर सिंहासन-स्थळाची, असाच क्रम लावणे उचित आहे. शक्य असल्यास दोन्हीही कामे एकसाथ नि सत्वर सुरू व्हावीत. मेघडंबरीसाठी ५-७ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे. आणि पुतळ्याला

संरक्षक छत्री नि आडोसा उभारण्यासाठीही २-३ लाख रुपये खर्च येईल. एकूण दोन्ही कार्यासाठी १० लाख रुपये खर्ची पडतील. महाराष्ट्राच्या परम वंदनीय दैवताच्या इज्जतीसाठी हा खर्च करताना खळखळ करण्याचे काहीच कारण नाही ! येथे आमच्या स्थापत्य-शिल्पविशारदांनी हेही लक्षात घेतले पाहिजे की आज जसा शिवप्रभूंचा पुतळा उघड्यावर आहे, तसाच सिंहासनाचा चौथराही उघड्यावर आहे. पुतळा तेथे चौथऱ्यावर हलविण्याची सोय नाही. आणि दीडशे इंच पर्जन्याच्या माऱ्याने जशी ब्रॉन्झ पुतळ्याची दैना घडली, तशीच ब्रॉन्झ मेघडंबरीचीही दैना होऊ शकते ! ह्या साऱ्या अडी-अडचणींचा आधींच विचार करून आणि त्यातून योग्य तो मार्ग काढून, उभय स्मारके उभी राहिली पाहिजेत.

कदाचित त्यासाठी अपेक्षित खर्चात आणखी २-२ लाखांची वाढ होईल. ती खुशाल होवो. वाटल्यास इतर खर्चास कात्री लावून महाराष्ट्र शासनाने पुरेसे द्रव्य ह्या कामी वेचलेच पाहिजे– तरच ह्या शासनास 'भोसले-शासन' म्हणता येईल. ह्या संदर्भात आम्हांस करवीरच्या संस्थापिका वीरांगना महाराणी ताराबाई यांचे निर्धाराचे शब्द आठवतात. . . चाफळ येथे राममंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आणि नदीला दरड घालण्यासाठी केशव गोसावी उंबरजकर खटपटीत होते. समर्थशिष्य दिवाकर गोसावी ह्यांच्यापाशी ह्याच कामासाठी काही रक्कम होती. म्हणून केशवस्वामींनी त्यांच्याकडे अर्थसहाय्याची याचना केली. पण तेव्हा दिवाकर गोसावींनी पैसे देण्यास खळखळ केली. हे कळताच महाराणी ताराऊ ह्यांनी दिवाकरस्वामींना खरमरीत पत्र लिहून या सत्कार्यास रक्कम देण्याची सक्त ताकीद दिली. त्या पत्रातील ताराराणीचे संस्मरणीय वाक्य असे आहे–

'देवालयास ठाव नसता, इतर खर्च कोण कामाचे ?'

– आमचे महाराष्ट्र शासनास सांगणे आहे की, 'रायगडावरील शिवप्रभूंच्या प्रतिमेचे संरक्षण होत नसल्यास, इतर खर्च कोण कामाचे ?'. . .

□

॥ ५ ॥

# हे पराक्रमाचे स्मारक दिल्लीतही व्हावे

१६ मे १९७१

शिवाजी महाराजांच्या खालोखाल ज्याला युगप्रवर्तक ही पदवी शोभून दिसते; शिवाजी महाराजांच्या ध्येयधोरणांचा वारसा ज्या धैर्यमेरूने सर्वाधिक पराक्रमाने पुढे चालविला; महाराष्ट्राच्या विजिगिषु विक्रमाचा डंका आसेतु हिमाचल गाजवला असा मराठेशाहीतील महापुरुष म्हणजे थोरला बाजीराव— छत्रपती शाहू महाराजांच्या आपत्काली त्यांच्या पाठीशी उभे राहून, चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा दिल्लीहून घेऊन आलेल्या बाळाजी विश्वनाथाचा सुपुत्र— पहिला बाजीराव !. . . त्यांची पुण्यतिथी पुण्य-पत्तनात नुकतीच यथोचित गांभीर्याने पार पडली. बाजीरावाच्या महत्तम कार्याचे यथार्थ मूल्यमापन करणारे पंडित सेतुमाधवराव पगडी यांचे व्याख्यान या समारंभात होऊन, 'थोरले बाजीराव स्मारक समिती'तर्फे त्यांचा अश्वारूढ पुतळा शनिवारवाड्यापुढे उभारण्याचा पवित्र संकल्प सोडण्यात आला. साताऱ्याच्या महाराणी सुमित्रादेवी भोसले ज्या स्मारक-समितीच्या अध्यक्ष असून मिरजेचे श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन, नामदार राजाराम बापू पाटील, पुण्याचे महापौर नामदेवराव मते, म.म. दत्तो वामन पोतदार, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, जयंतराव टिळक, कॅप्टन बेलवलकर, उद्योगपती म. स. पारखे इत्यादी मान्यवर व्यक्ती जिच्यात समाविष्ट आहेत, ती समिती हा संकल्प खचित सिद्धीला नेईल. या स्मारकाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या तरुण पिढीसमोर श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे स्फूर्तिदायक कर्तृत्व उभे करण्याचा स्मारक-समितीचा हेतू स्तुत्यच आहे. कारण, शिवरायांचे अपुरे राहिलेले स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण करण्यासाठी ज्या बाजीरावाने जिवाचे रान केले आणि म्हणूनच वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी जो कर्तव्याच्या कुरुक्षेत्रावर निधन

पावला, त्याच्याकडे आपल्या समाजाने आजवर पाहिजे तेवढे लक्ष दिलेले नाही.

शिवरायांप्रमाणेच बाजीरावालाही अत्यंत कठोर नि खडतर परिस्थितीला तोंड द्यावे लागले. आणि म्हणूनच त्याचे महान कर्तृत्व उठून दिसले. घनघोर अंधारातच विजेचा लोळ खुलून दिसतो; तुफान दर्यातच नाविकाचे धैर्य व चातुर्य उठावदार दिसते ! १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथाचा मृत्यू झाल्यानंतर निजामुलमुल्कच्या कारस्थानांना अधिकच जोर वढला. शिवशाहीच्या उदात्त ध्येयाला पारखे होऊन, जहागिरी नि वतने हेच सारसर्वस्व मानणाऱ्या मराठी सरदारांवर धूर्त निजामाने आपले मायाजाल फेकण्यास पुन्हा प्रारंभ केला. दखखनच्या सहा सुभ्यांच्या चौथाई-सरदेशमुखीची शाहूला मिळालेली सनद त्याला बोचत होती. ही चौथाई-सरदेशमुखी म्हणजे दिल्लीच्या मोगल-सत्तेने मांडलिकांना दिलेले अनुदान आहे; त्यांचा सार्वभौम अधिकार नव्हे, ही त्याची भावना होती. आणि म्हणूनच शाहूचे सामर्थ्य खच्ची करण्यासाठी त्याने साम-दाम-दंड-भेद हे सारे उपाय ध्येयशून्य मराठी सरदारांवर योजले. चंद्रसेन जाधव, सुल्तानजी निंबाळकर, चिमणाजी दामोदर मोघे इत्यादी सरदारांना त्याने आपल्याकडे ओढले. कोल्हापूरच्या संभाजीराजांचा पक्ष उचलून धरून शाहूला पेचात आणले. दाभाडे, कंठाजी कदमबांडे इत्यादींना चिथावणी दिली. श्रीपतराव प्रतिनिधी, नारोराम मंत्री, आनंदराव सुमंत इत्यादींची आपणास अनुकूल असलेली 'लॉबी' शाहूच्या दरबारात निर्माण केली ! कान्हाजी भोसले, उदाजी चव्हाण ह्यांसारख्या सरदारांना आपल्या नोकरीत ओढण्याचा प्रयत्न केला. जंजिऱ्याच्या सिद्दीशी मराठ्यांविरुद्ध हातमिळवणी केली. आणि या सर्व प्रकारे, मराठा-मंडळांत दुफळी माजवून मोठी बिकट परिस्थिती निर्माण केली. इतकी की, 'वीस हजारांचे सैन्य उभे करून आपण बाजीरावाचा मोड करू' असे आश्वासन सुल्तानजी निंबाळकराने निजामास दिले. श्रीपतराव प्रतिनिधीने निजामासाठी भागानगरची चौथाई शाहूकडून माफ करून घेतली. असे न केल्यास आपण निजामाला जाऊन मिळू, अशी धमकीही देण्यास त्याने कमी केले नाही !

परंतु, अशा घोर विपत्काळात छत्रपतींच्या सिंहासनाशी एकनिष्ठ राहून, बाजीरावाने निजामाचा सारा व्यूह ढासळून पाडला. मराठामंडळांतील घरभेद्यांचा नि निजामाचा नक्षा उतरविण्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे 'रणांगणातील विजय' हे त्या बुद्धिमान रणमर्दाने ओळखले आणि सतत सहा महिने गनिमी काव्याने निजामाच्या फौजेला जेरीस आणून, पालखेड येथे कोंडी करून, त्याचा धुव्वा उडविला ! शाहू-दरबारातील जुनाट कूप-मंडुकांच्या भरोशावर मराठी राज्य बळकट करणे सुतराम शक्य नाही, हे ओळखून बाजीरावाने पिलाजी जाधव, राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर ही युयुत्सू नि इमानदार मराठा मर्दांची नवी पिढी निर्माण केली. आपल्या लक्ष्मणतुल्य बंधूला— चिमाजी

आप्पाला– सिद्दी, पोर्तुगीज नि निझाम यांच्या उरावर ठेवून त्याने उत्तरेकडे झेप घेतली ! 'चलो दिल्ली' हा विजिगिषु मंत्र महाराष्ट्राला शिकविणारा पहिला महापुरुष पहिला बाजीरावच होय ! न्यूनगंडातून निर्माण झालेल्या दुबळ्या तडजोडवादाला तडाखा मारून निजामाला– (पर्यायाने मोगलसत्तेला) नमविणारा हा पराक्रमी पेशवा, मराठेशाहीच्या विस्तारवादी पर्वाचा आद्यप्रवर्तक होय ! " 'निजाम' 'निजाम' काय घेऊन बसलात? वृक्षाच्या मुळावर घाव घातला की फांदी आपोआप मोडून पडेल", अशी प्रतिभाशाली प्रभावी घोषणा करून, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर मराठी सत्तेचा झेंडा रोवण्याची जिद्द महाराष्ट्रात निर्माण करणारा पहिला समरधुरंधर थोरला बाजीरावच होय ! बाजीरावाच्या कारकीर्दीतच शिद्दीची सद्दी संपली; आणि चिमाजी अप्पाने उद्दाम पोर्तुगीज-सत्तेची हाडे वसईला खिळखिळी केली. बाजीरावाच्या कारकीर्दीतच गुजरात-माळवा भागांतून यावनी सत्तेची उचलबांगडी झाली. शिवरायांच्या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्याच्या नव्या पर्वाचा प्रारंभ झाला ! थोरल्या बाजीरावाने जेव्हा पेशवेपद स्वीकारले त्या वेळी स्वराज्याचा रथ न्यून-गंडाच्या नि दुफळीच्या दलदलीत रुतून बसला होता. तो त्याने अवघ्या १५-२० वर्षांत पराक्रम-पथावरून इंद्रप्रस्थापर्यंत नेला.

अशा या युगप्रवर्तक मर्द मराठ्याचा 'अश्वारूढ' पुतळा उभारण्याचे समितीने योजले आहे, ते योग्यच आहे. कारण 'अश्वदळाचा अतुलनीय अधिपती' असा त्याचा गुणगौरव सर यदुनाथ सरकारांनी केला आहे. पण अश्वारूढ पुतळा शनिवारवाड्यापुढेच का? तसाच पुतळा दिल्लीच्या तालकटोरा गार्डनमध्येही उभा केला पाहिजे. कारण, १७३७ साली मथुरेजवळ जमा झालेल्या १ लक्ष मोगल सैन्याला खुषीची गाजरे खात ठेवून, बाजीरावाने दिल्लीवर विद्युतवेगाने धडक मारून आपल्या अपूर्व रणचातुर्याचे, धक्का-तंत्राचे नि विजीगिषु विक्रमाचे जेव्हा प्रात्यक्षिक दाखविले, त्या वेळी त्याच्या सैन्याचा तळ तालक्टोरा-बागेतच पडला होता ! म्हणूनच, त्या महत्त्वाच्या प्रसंगाची नि पर्यायाने महाराष्ट्रीय पौरुषाची याद म्हणून ताल-क्टोरा गार्डनमध्येही या महान सेनानीचा नि देशभक्ताचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याचे आणि 'तालक्टोरा-गार्डन'ला 'बाजीराव उद्यान' हे नाव देण्याचे काम दिल्लीत वास्तव्य करणाऱ्या आमच्या मराठी खासदारांनी नि नामदारांनी अंगिकारले पाहिजे. पुणे येथील स्मारकाप्रमाणेच दिल्ली येथील स्मारकालाही महाराष्ट्राचा सक्रीय पाठिंबा मिळेल, यात आम्हांस तीळमात्र शंका नाही !

॥ ६ ॥

## भारतीय युद्ध-नौका

*२७ ऑक्टोबर १९६८*

जो नियम रंगभूमीवरील नाटकाला तोच जीवन-नाट्यालाही लागू पडतो. संघर्षाविना ते खुलत नाही; उजळत नाही. राष्ट्रजीवनाचा विकास संघर्षातून— संघर्षजन्य संक्टांतूनच होत असतो. १९६२ सालच्या चिनी आक्रमणाने हेच सनातन सत्य सिद्ध केले. हजारो व्याख्यानांनी जी राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली नसती, ती त्या संकटाने निर्माण केली. भारताचे पौरुष जागृत केले. सैनिकी सिद्धतेचे महत्त्व पटविले. त्यामुळेच भूदल-हवाई दलाच्या विस्ताराला अग्रक्रम मिळाला. . .

पण नौदल सापेक्षतः मागेच होते. त्याच्या शक्तिशाली अद्ययावत संवर्धनाची आवश्यकता पाकिस्तानी आक्रमणाने पटवून दिली. सुमारे ३००० मैलांचा सागर-किनारा लाभलेला हा देश ! त्याच्या संरक्षणासाठी— विशेषतः दीव-दमण ते गोवा या टापूच्या संरक्षणासाठी— 'विक्रांत' नौकेप्रमाणे शेकडो युद्धनौका सज्ज पाहिजेत, नाविक विमाने पाहिजेत, लढाऊ पाणबुड्या पाहिजेत, सागरी युद्धाचे शिक्षण देणारी शिक्षण-केंद्रे पाहिजेत, ही जाणीव निर्माण झाली. अर्थात या गोष्टी काही चुटकीसरशी होणाऱ्या नाहीत. तथापि, आमचे नौदल सुसज्जतेच्या दिशेने वाटचाल करीत असल्याची प्रसादचिन्हे जनतेच्या दृष्टीस पडू लागली आहेत. काही महिन्यांपूर्वी रशियापासून विकत घेतलेली 'कत्वारिस' पाणबुडी हे पहिले प्रसादचिन्ह, तर गेल्या सप्ताहात दिवाळीच्या मंगलमुहूर्तावर जलावतरण केलेली 'नीलगिरी' हे दुसरे— आणि अधिक महत्त्वाचे प्रसादचिन्ह !

नीलगिरी ! निळ्या निळ्या दर्यावर एखाद्या बळकट गिरीप्रमाणे शोभणारी नीलगिरी ! भारतीय कारागिरांनी रात्रंदिवस कष्ट करून उभारलेली पहिली भारतीय

समर-नौका नीलगिरी ! गेल्या बुधवारी इंदिराजींच्या शुभहस्ते जेव्हा तिचे जलावतरण झाले, तेव्हा मध्यान्ह-सूर्याने तिच्यावर आपल्या तेजस्वी सुवर्ण-किरणांचा आनंदाने अभिषेक केला— आणि सूर्यमाता 'आदिती'चा आशीर्वाद मागणाऱ्या मंगल ऋचांनी तिला सामर्थ्याचे वरदान दिले ! हरिद्राकुंकुमाने या सागरी रणचंडीचा मळवट भरण्यात आला; ब्राम्हणांनी मंत्रोच्चार केला; नौदलाच्या वाद्यवृंदाने गगनभेदी रणघोष केला.

*'स घोषः राष्ट्रशत्रूणां हृदयानि व्यदारयत्' !*

पण त्याच घोषाच्या ध्वनिलहरींवर आरूढ होऊन, भारताच्या पहिल्या युद्धनौकेची मंगलवार्ता जेव्हा दशदिशांत दुमदुमली, तेव्हा सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जंजिरा इत्यादी महाराष्ट्राचे जलदुर्ग आनंदाने उजळले; त्यांची जराजीर्णता काही काळ लुप्त होऊन त्यांच्या बुरजाबुरजांत नवतारुण्य संचरले; आणि त्यांच्या परिसरात घुटमळणाऱ्या मऱ्हाटी दर्यासारंगांच्या आत्म्यांना परमसंतोष झाला ! पूर्णतः भारतीय बनावटीची युद्धनौका आपल्या महाराष्ट्राच्या राजधानीत प्रथमतः घडली, याचा त्यांना अभिमान वाटला !

पण भावनेचा पहिला भर ओसरल्यानंतर दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांचा आत्मा हळहळून म्हणाला— 'नुसत्या युद्धनौका बांधून उपयोग काय ? त्या तर पाहिजेतच. पण रणझुंजार नौ-सैनिकांशिवाय त्यांचा प्रभाव पडणार नाही. युद्धनौकांची खरी शोभा म्हणजे त्यांच्यावरील ध्वज-पताका नव्हे, तर अटीतटीने झुंजणारे बलसागर सैनिक ! माझ्या महाराष्ट्रातून फारच थोडे तरुण नौ-दलात भरती होत आहेत. माझा वंशज म्हणविणारा समाज तर नाविक म्हणूनही अभावानेच तळपत आहे ! महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे नाविक दलाचे एक प्रमुख प्रशिक्षण केन्द्र.—त्यात 'हमला', 'कुंजाली' नि 'अश्विनी' इत्यादी प्रशिक्षण-नौकाही आहेत ! पण या केंद्राचा फायदा मऱ्हाटी तरुण कितपत घेत आहेत ? अरे, जन्मभर कारकुनी किंवा हमाली करण्यातच तुम्ही जीवनाची इतिकर्तव्यता मानणार काय ? ज्यांनी आपल्या रुधिराचे कुंकुम या पवित्र निळावंतीला वाहून, तिचे सौभाग्य राखले त्या रणमर्दांचे तुम्ही छावे आहात, याचा विसर पडला काय ?'

□

॥ ७ ॥

# आधुनिक पद्मिनी !

*११ एप्रिल १९७१*

कोणत्याही युद्धात मानवातील दानव जसा उफाळून येतो, तसाच मानवी मनातील देवही प्रकट होतो. युद्धामुळे सारा समाज-सागर तळापासून घुसळला जातो आणि मग त्या सागर-मंथनातून जसे अधमवासनांचे हलाहल प्रकट होते, त्याचप्रमाणे उदात्त भावनांचे अमृतही बाहेर पडते ! पूर्व बंगालमध्ये भडकलेले यादवीयुद्धही या नियमाला अपवाद नाही. पापवासनेने वखवखलेल्या याह्याखानी गिधाडांचा, माणुसकीच्या मुडद्यांवरील रक्तरंजित नंगानाच जसा या युद्धात दृष्टीस पडला; तसाच स्वातंत्र्य, लोकशाही इत्यादी पवित्र तत्त्वांच्या अस्मानात भरारी मारणाऱ्या नि अन्याय-भुजंगांवर आवेशाने तुटून पडणाऱ्या गरुडांचा पराक्रमही दिसून आला ! माणुसकीला बट्टा लावणारे अत्याचार जसे या युद्धात शतशः घडले, तसेच माणुसकीचे मुखमंडल दैवी तेजाने उजळणारे हौतात्म्यही शेकडो ठिकाणी व्यक्त झाले ! त्या दिव्य हौतात्म्यांच्या मालिकेतील एक कथा डाक्का-विद्यापीठाच्या 'रॉकी हॉल' वसतिगृहातील ५० तरुण विद्यार्थिनींच्या रक्ताने रंगली आहे !

## पाकिस्तानी गिधाडे

अल्लाउद्दीन खिलजीच्या हाती पडून शीलभ्रष्ट होण्याऐवजी 'जय हर, जय हर' अशी निर्भय गर्जना करीत अग्निकुंडात उडी घेणाऱ्या सती पद्मिनीचा आत्मा, त्या मुस्लीम तरुणींची कुर्बानी पाहून आनंदाने उद्गारला असेल– 'शाबास ! शीलवतींनो शाब्बास !' हजारो राजपूत-रमणींच्या जोहाराने ज्यांचे अणुरेणू पवित्र झाले आहेत ते

अरवलीपर्वतावरील दुर्ग, तसेच हौतात्म्य पाहून, मनोमन म्हणाले असतील- 'डाक्क्याच्या कुलीन कुमारींनो शाब्बास !' दोन दशकांपूर्वी नोआखलीत जातीय गुंडांच्या हाती पडण्याऐवजी ज्यांनी हसत हसत मृत्यूला मिठी मारली त्या हिंदू तरुणींचे पुण्यात्मे एकसाथ ललकारले असतील— "शाब्बास ! वंग-भगिनींनो शाब्बास !' पाकिस्तानी सैनिकांच्या पाशवी विटंबनेला बळी पडण्याऐवजी, ज्या 'रॉकी हॉल' वसतिगृहातील कुमारिकांनी वरच्या मजल्यावरून मृत्युमुखात उडी मारून आपले शीलरक्षण केले त्या मरूनही अमर झाल्या ! त्यांच्या हृदयातील उदात्त भावनेच्या गरुडाने पाकिस्तानी गिधाडांचा पाडाव केला. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्या भगिनींनी आपल्या 'डाक्का विद्यापीठा'चे, कुळाचे नि 'बांगला देशा'चे नाव रोशन केले !

या तरुणी सुशिक्षित होत्या; म्हणून तर त्यांचे विशेषच कौतुक वाटते. कारण, आधुनिक शिक्षणानेही त्यांच्या सात्त्विक भावना बोथटल्या नव्हत्या ! आपला ३ ॥ हातांचा अस्थिचर्ममय देह वाचविण्यासाठी, सत्त्वशील भावनांची— अंतरात्म्याची— विटंबना सहन करणारा फसवा युक्तिवाद त्यांनी अंगिकारला नव्हता ! चित्तशुद्धीच्या ढालेखाली आपला कातडीबचावू भोगवाद शाबूत ठेवण्याचा दंभ त्यांना स्पर्शला नव्हता ! एरव्ही, आपल्या भेकडपणाला व्यावहारिक शहाणपणाचा मुलामा फासून त्यांनी पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे रंगमहाल आपल्या विलासी-शय्यांनी सजविले असते; 'आत्मानं सततं रक्षेत्' असे व्यवहारवादी सुभाषित पुढे करून आपले मनोदौर्बल्य झाकले असते ! शरीर-भोगावर नीति-अनीती अवलंबून नाही, असे पायघोळ समर्थनही त्या विद्यार्थिनींना करता आले असते. जेथे मोठमोठे पुढारीही स्वार्थ-साधनासाठी सोयिस्कर तत्त्वाचे मुखवटे चढवतात; वारांगनेहून अधिक चंचलता स्वीकारून घडीघडीला पगडी फिरवतात; तेथे त्या कोवळ्या कुमारिकांनी केवळ जीवदान मिळवण्यासाठी आपखुषीने शरीरदान केले असते, तर कोणी मोठे नवल मानले नसते !

## वज्रकठोर निर्धार

पण नवल हे की, यौवनाच्या ऐन बहरात असतानाच त्या कोमलांगींनी एका शाश्वत मूल्यासाठी, क्षणभंगुर शरीराचा मोह सोडला; वज्रकठोर निर्धार धारण केला; आणि जेथे त्यांच्यावर कोणीही पापी नजर रोखू शकणार नाही, बलात्कार करू शकणार नाही, अशा अज्ञाताच्या अथांग प्रदेशात त्या निघून गेल्या. एका पवित्र भावनेला जपण्यासाठी घडलेले त्यांचे बलिदान व्यवहार-कोविदांच्या दृष्टीने वेडेपणाचे ठरेल कदाचित. पण अशा दिव्य वेडांनीच जगाचा इतिहास घडला आहे; राष्ट्रे उभारली गेली आहेत ! ज्यांची नावे-गावेही

अद्यापि आम्हास कळलेली नाहीत अशा त्या वेड्या तरुणींना– त्या आधुनिक पद्मिनींना–

*मुहूर्तं ज्वलितं श्रेयो*
*नच धूमायितं चिरम्*

या बाण्याने क्षणात विद्युल्लतांप्रमाणे जळून, मदांध लष्करशहांचे डोळे दिपवून, अंतर्धान पावलेल्या त्या 'बांगला देशा'च्या सुकन्यांना आम्ही आदराने अभिवादन करितो !

□

॥ ८ ॥

## सतीचे वाण !

*२२ जुलै १९७३*

खरेखुरे प्रेम अत्यंत उत्कट असते, निःस्वार्थ असते, व्यवहारपांडित्य नि हिशोबीपणा ह्यांच्या भिती उल्लंघून जान कुर्बान करण्याची प्रेरणा जातिवंत प्रेम देत असते. ज्यात समर्पणाची भावना नाही ते प्रेम कसले ? ज्यात सर्वस्वाची होळी करण्याची ताकद नाही ते प्रेम कसले ? अर्थात असे विशुद्ध बावन्नकशी प्रेम म्हणजे शुद्ध पागलपणा, असेच व्यवहारी जग मानणार ! म्हणून तर त्याने लैलाखातर बरबाद झालेल्या 'कैस'ला मजनू (म्हणजे वेडा) ही पदवी बहाल केली !. . . परंतु जरा थांबा. जगातील सुप्रसिद्ध 'शहिदे मुहब्बत' आपण कल्पना करता तितके काही पागल नसतात, असे एका विख्यात शायराचे म्हणणे आहे. तो म्हणतो—

> ***कौन दिवाना कहें***
> ***इश्कके दीवानेको ।***
> ***गिरते देखा न बुझी***
> ***शमापे परवानेको ॥***

(प्रेम-दिवाण्याला 'दिवाना' कोण म्हणेल ? कारण तोदेखील जान कुर्बान करताना थोडासा तरी व्यावहारिक विचार करतोच की ! पहा— जगात पतंगाची प्रीती अत्युत्कट मानतात. पण तोदेखील विझलेल्या दीपज्योतीवर झेप घेत नाही, मृत व्यक्तीसाठी जीव देत नाही !)

परंतु एक विख्यात फारसी कविवर्य जेव्हा भारतात आला आणि त्याने मृत पतीच्या चितेत आपखुषीने उडी घेणारी, भारतीय पतिव्रता पाहिली, तेव्हा तो अत्यंत आदराने

उद्गारला– "अहो, धन्य धन्य ह्या भारतीय नारी! पतीला परमेश्वर मानणाऱ्या, सर्व सुखांचा होम करणाऱ्या, सहगमन करणाऱ्या! पतंगांहूनही त्यांची प्रीती उत्कट नि वंदनीय!"

भारतीय सतीचा ह्याहून मोठा गौरव कोणता असू शकेल? प्राचीन काळी, एक नव्हे दोन नव्हे, हजारो भारतीय स्त्रियांनी जिवंतपणी अग्निकाष्ठे भक्षण करून, पातिव्रत्याचा उच्च आदर्श जगापुढे ठेवला होता. पण कालांतराने 'सती जाणे' हा उत्स्फूर्त आत्मत्यागाचा आविष्कार न राहता, त्याला जबरदस्तीच्या रूढीचे विकृत रूप येऊ लागले. मारून मुटकून सती जाण्याचे (अथवा सतीत्व लादण्याचे) प्रकारही घडू लागले आणि म्हणूनच लॉर्ड बेंटिंकने सती जाण्याची चाल कायद्याने बंद पाडली, हे योग्यच झाले. . . आणि तरीही अधूनमधून, साऱ्या जगाचे डोळे दिपवणारे सतित्वाचे उत्स्फूर्त आविष्कार भारतात घडतच असतात. गेल्या १७ तारखेला कोपरगावी असेच एक सहगमन घडले. तेथे गोदावरी नदीच्या पुलावर भीषण मोटार अपघातात मारुती गंगाधर पाटील ह्या युवकाचे जागच्या जागी निधन झाले. ही वार्ता वाऱ्यासारखी आसमंतात पसरली अन् सुमारे ४ हजारांचा प्रचंड जनसमुदाय अपघात-स्थळी लोटला. ह्या समुदायातच मारुती पाटलाची 'पतीच हे दैवत हो सतीला' हे मूल्य मानणारी पत्नी प्रयागबाईही उपस्थित होती. अनेकांप्रमाणेच तीही अपघात पाहायलाच केवळ कुतूहलाने आली होती. मृत व्यक्ती कोण हे इतरांप्रमाणेच तिलाही ठाऊक नव्हते. पण तिच्या नजरेस पतीचे छिन्न-विच्छिन्न शव दिसताच तिने पाषाणालाही पाझर फोडील, असा करुण हंबरडा फोडला, त्याला मिठी मारली, आणि स्फुंदून स्फुंदून ती रडू लागली. उत्कट प्रेमातून जन्मलेला तो तिचा आर्त विलाप, 'रति-विलाप' रचणाऱ्या कालिदासालाही यथार्थ वर्णन करता आला नसता. कारण तो फार फार तर म्हणाला असता–

*विललाप विकीर्ण-मूर्धजा*
*समदुःखामिव कुर्वती स्थलीम्*

सारा समुदाय समदुःखी झाला असतानाच ती निर्धाराने उठली. आपल्या तान्हुल्याला तिने जनताजनार्दनाच्या हवाली केले अन् डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ती पुलाच्या कठड्यावर उभी राहिली. गोदामाईला अखेरचा प्रणिपात करून ती उद्गारली– "आई, मला पोटात घे." आणि त्या अवाक समूहाला काय होते हे नीट उमजण्याच्या आतच तिने आपला देह दक्षिण गंगेच्या खोल पात्रात झोकून दिला. पतीचा आत्मा स्वर्गंगेच्या किनारी जाण्याच्या आतच तिने त्याला गाठले!. . .

प्रयागबाईचे हे 'हौतात्म्य' बेकायदाच नव्हे, तर 'बेव्यवहारी'ही आहे. पण उत्कट भावनांचा व्यवहार वेगळा, कायदा वेगळा! पतीविणा क्षणभरही जिवंत राहणे हेच त्या

साध्वीच्या उत्कट अंतःकरणाला मरण वाटत होते ! हीच उत्कटता कायम ठेवून प्रयागबाई जिवंत राहिली असती, तर किती बरे झाले असते ! कारण या रूक्ष हिशेबी जमान्यात अशा भावनामय 'दिला'ची अतिशय टंचाई आहे ! हे युग दीपज्योतीवर बेहोशीने झेप घेणाऱ्या त्यागी पतंगांचे नसून या फुलावरून त्या फुलावर रेंगाळणाऱ्या मधुलोलुप मतलबी मधुकरांचे आहे. या युगात 'सतीची चाल' (तिच्या विकृतींसह) बंद झाली त्याचा खेद नाही. पण चवचाल सुखवादापायी, ग्राम्य उपयुक्ततावादापायी निष्ठावंत प्रेमाची चाल नष्ट होत चालली हे दुःखदायक आहे ! म्हणूनच, प्रयागबाई ! मरणाला कवटाळून नव्हे, कठोर वास्तवाला टाळूनही नव्हे, तर खडतर जीवन अंगिकारूनच तू सतित्वाचे मूल्य सांभाळले असतेस, तर तो अधिक उच्च आदर्श ठरला असता, असाही विचार मनाला चाटून जातो !

□

॥ ९ ॥

## शूर वाघिणीचे बलिदान !

*११ डिसेंबर १९७७*

मानव जातीत स्त्री-पुरुष संबंधात किती विविधता आढळते, प्रणयाराधनेचे किती प्रकार आढळतात ! आपला सुंदर पिसारा उभारून लांडोरीचे चित्त आकर्षित करणाऱ्या मोराप्रमाणे, आपल्या नेत्रसुखद वैभवाचे नि शरीर-सौंदर्याचे प्रदर्शन करून नारीला आकृष्ट करणारे नरोत्तम जसे मानवांत आहेत, तसेच केवळ आवाजाच्या बळावर मादीच्या दिलात इश्काच्या लहरी पैदा करणाऱ्या मंडुकाप्रमाणे, फक्त गानकल्लोळाच्या जोरावर स्त्रीहृदयात प्रणयकल्लोळ निर्माण करणारे कुरूप पण आवाजबहाद्दर गायकही आहेत ! निष्ठावंत हत्तिणींचा जनानखाना बाळगणाऱ्या हत्तीप्रमाणेच 'भार्या मज बहु असती' असे अभिमानाने सांगणारे बहुभार्यिक बहाद्दर जसे मानवजातीत आहेत, तसेच बहुपतित्व (Poliandry) पाळणाऱ्या दणकट स्त्रियाही काही वन्य जमातींत दृष्टीस पडताहेत ! फार काय सांगावे, लैंगिक संबंधात कोणताही विधिनिषेध न पाळता कालक्रमणा करणाऱ्या अनेक टोळ्या आजही आफ्रिकाखंडात अस्तित्वात आहेत.

तथापि, अनिर्बंध लैंगिक संबंध समाजधारणेस नि प्रगतीस उपकारक नाहीत, हे शहाण्या मानवांनी फार प्राचीन काळीच ओळखले. पती-पत्नीची, प्रियकर-प्रेयसीची परस्परांवरील अनन्य निष्ठाच प्रशंसनीय आहे, हे आपल्या बुद्धिवान पूर्वजांनी जाणले आणि समाजापुढे शिव-पार्वती, राम-सीता, लैला-मजनू, रोमिओ-जूलिएट इत्यादी निष्ठेचे आदर्श उभे केले. मानव कितीही सुधारला नि सुसंस्कृत झाला, तरी त्याची स्वाभाविक प्रवृत्ती त्याला स्वैराचारी पशु-वृत्तीकडेच खेचत असते, हे ओळखून आपल्या थोर महाकवींनी नि विचारवंतांनी उपदेश केला— 'अरे, पशूंचाच आदर्श डोळ्यांपुढे ठेवायचा

असेल तर कुत्र्यांच्या— ग्रामसिंहांच्या— लैंगिक स्वैराचाराचा आदर्श डोळ्यापुढे न ठेवता सिंह-सिंहिणींचा कित्ता गिरवा ! मांजरबोक्याप्रमाणे वा शूकर-शूकरीप्रमाणे कामजीवन न जगता, वाघ-वाघिणींच्या दांपत्यजीवनाचा नमुना नजरेपुढे असू द्या !'. . . काय? सिंह-सिंहिणींत नि वाघ-वाघिणींत एकनिष्ठ काम-भावना असते?— होय, बहुशः असतेच असे प्राणिशास्त्रज्ञ सांगतात. त्यांच्या ह्या सांगण्याचा पडताळा आणून देणारी एक रोमांचकारक घटना गेल्या सप्ताहात, वन्य प्राणिसप्ताहात, भर दुपारी मुंबईच्या राणीच्या बागेत घडली, 'कोयना' नामक वाघिणीने एकनिष्ठ प्रेमाचा ज्वलंत आदर्श आपल्या हौतात्म्याने सिद्ध केला !

गेल्या दहा वर्षांपासून 'कोयना' जिजामाता उद्यानात होती. 'टिटो' नामक व्याघ्र तिचा दिलप्यार. तो गेले काही दिवस उद्यानाच्या रुग्णालयात होता— आहे. त्याच्या विरहाने 'कोयना' तळमळत होती. तिच्या जिवाची तळमळ अधिकाऱ्यांना पाहवेना. त्यांनी 'पांड्या'नामक वाघाला तिच्या पिंजऱ्यात सोडले. तिची जवानी नि खूबसूरती पाहून पांड्या चेकाळला, कामुक चेष्टा करू लागला. परंतु 'एकलेपणाची आग जाळिते हृदया' अशी गत झालेली असूनही ती इमानदार वाघीण पांड्याच्या कामलंपट लीलांना दाद देईना ! लिंग-पिसाट नराधमाप्रमाणे त्या व्याघ्रधमाचाही विवेक लोपला, संयम संपला आणि त्याने 'कोयने'वर झेप घेतली. तरीही ती शूर निष्ठावंत वाघीण डगमगली नाही. तिने प्रतिकार केला. त्यामुळे पांड्याचा कामानल अधिकच भडकला, तो बेभान झाला, सारे पुरुषी बळ एकवटून त्याने त्या साध्वीच्या नरडीचा घोट घेतला. पाच मिनिटांच्या ह्या प्राणांतिक झटापटीतच कोयना गतप्राण झाली— पण 'एकनिष्ठे'चे उच्च मूल्य जिवंत ठेवून !. . .

दौर्बल्याचे वा दोषांचे तत्त्वज्ञानात रूपांतर करण्याची किमया साधलेली एखादी अत्याधुनिक चतुर पुरंध्री, त्या वाघिणीला सल्लामसलतीसाठी उपलब्ध झाली असती तर? तर कदाचित त्या वाघिणीची उत्कट भावना बोथट झाली असती आणि तिला प्राणास मुकावे लगाले नसते ! कारण, 'धर्मासाठीच जगावे वा मरावे' ह्याऐवजी 'जगणे-कसेही करून शिर सलामत राखणे— हाच धर्म होय,' हे त्या पुरंध्रीने तिला पटवून दिले असते. 'नीतिमत्तेच्या जुन्या कल्पना आता ह्या विज्ञानवादी युगात कालबाह्य झाल्या असल्याने, पांडोबाची 'ऑफर' नाकारू नकोस' असा व्यवहारी सल्ला तिने त्या झुंजार वाघिणीला दिला असता ! देहाची भूक वेगळी, आत्म्याची वेगळी ! तेव्हा देहाची भूक कशीही शमविली, तरी नैतिक वा आत्मिक अधःपात होत नाही. 'योनिपावित्र्य' म्हणजेच शील-रक्षण, ही जुनाट कल्पना आता उपयोगाची नाही' इत्यादी युक्तिवादाचे डोस पाजून त्या वाघिणीचा जीव वाचविला असता आणि 'पांड्या'चेही काम-शमन निर्वेध पार पडले असते ! पण असे काही झाले नाही. घडले ते बलिदान. ज्वलंत निष्ठेच्या— एका

जगन्मान्य उच्च नैतिक मूल्याच्या– यज्ञवेदीवरील बलिदान. मानवजातीतील पतिव्रतेला शोभेल असे वाघिणीचे बलिदान !

जिजामाता उद्यानातील ती वाघीण 'जिजामाता' ह्या पुण्यनामाला शोभेल असे शूरत्व गाजवून परमोत्कट प्रेमाखातर शहीद झाली. आपल्या देहाला पर-पुरुषाचा पुसटसाही स्पर्श होऊ नये म्हणून, वेळप्रसंगी अग्निकुंडात जोहार करणाऱ्या राजपूत रमणींचे पुण्यात्मे तिला धन्यवाद देतील. चितोडगडच्या पद्मिनीचा नि मांडवगडच्या रूपमतीचा आत्मा, तिच्या आत्म्याचे नंदनवनात स्वागत करील ! 'सूर्य गगनाचा राजा असला तरी कौमुदी चंद्राला सोडून सूर्याशी शय्यासोबत करीत नाही, विद्युल्लता कितीही अवखळ असली तरी ती मेघाची संगत सोडत नाही !

*शशिना सह याति कौमुदी ।*
*सह मेघेन तडित् प्रलीयते ॥'*

हा कालिदासीय दृष्टांत त्या वाघिणीनेच उत्तम जाणला, असे म्हटले पाहिजे ! 'चंद्र तेथे चंद्रिका । हर तेथे अंबिका ।' हा ज्ञानेश्वरी-वर्णित अद्वैतभाव आपल्या प्रियकराबाबत तिने विरहातही सोडला नाही ! न मागता चालून आलेले रतिसौख्य तिने केवळ प्रियकराच्या निष्ठेपायी स्वीकारले नाही, ती जघन-चपला होऊन मोहाच्या आहारी गेली नाही ! ह्या देशात सत्यवानाची सावित्री होऊन गेली. यमराजाने दाखविलेल्या अनेक प्रलोभनांना ठोकरून ती त्याला स्पष्टपणे म्हणाली–

*'न कामये भर्तुविनाकृता सुखम्'*

ही पतिव्रतेची बाणेदार वृत्ती त्या राणीच्या बागेतील वाघिणीने मरणाचे मोल देऊन उजळली !

– रायगडला शिवाजी महाराजांच्या इमानदार 'वाघ्या' कुत्र्याची स्मारकसमाधी आहे. तशीच ह्या शहीद वाघिणीची समाधी जिजामाता उद्यानात उभारली गेली पाहिजे ! आणि दरवर्षी 'वन्य पशु सप्ताहा'त त्या एकनिष्ठेच्या स्मारकावर फुले उधळण्यात आली पाहिजेत !

□

॥ १० ॥

## अरबी प्रेम-कहाणी !

*२१ जाने. १९७८*

मानव-जातीचा विज्ञान-रथ हजारो मैलांचा अंतराळ प्रवास करून चंद्र-मंगळावर वैज्ञानिक विजयाचा ध्वज फडकवीत असतानाच, अद्यापि मध्ययुगीन अंधश्रद्धाळू सरंजामशाहीत रेंगाळणारे अनेक देश नि समाज, ह्या भूतलावर मागास जिणे जगताहेत ! 'सौदी अरबस्तान' हा असाच एक देश आहे. खनिज तेलाच्या रूपाने लक्ष्मी प्रसन्न झाली असली, तरी ह्या देशावर सरस्वती अद्यापि रुसलेलीच दिसत आहे ! ह्या देशाला भरपूर तेल-साठे उपलब्ध झाले, त्यांमुळे तैल-तंत्रज्ञान येथे आले, अजस्र यंत्रसामग्री आली, व्यापार-उदीमाच्या निमित्ताने जेटविमाने आली, आलिशान हॉटेले नि वातानुकुलित कार्यालये उभी राहिली, टी.व्ही. सेटस् आले. . . पण ही बहिरंगी सुधारणा झाली, तरी आंतरिक सुधारणा— खरीखुरी आधुनिकता — प्रागतिक वैचारिकता येथे फारशी अवतरली नाही ! येथे मामुली चोरीमारीच्या गुन्ह्यासाठीही, प्राचीन काळच्या हातपाय तोडण्याच्या, सार्वजनिक चव्हाट्यावर फटके मारण्याच्या वा दगडांच्या वर्षावाने डोके फोडण्याच्या शिक्षा अद्याप चालूच आहेत !. . . ह्या वाळवंटी मुलखातील दुःख-तप्तांवर प्रेमाची, कारुण्याची, बंधुतेची नि समतेची पवित्र चंद्रिका बरसणाऱ्या महंमद पैगंबराच्या खऱ्या धर्माचा अर्थच जणू काही हा देश विसरला आहे आणि 'इश्क तौफीक है, गुनाह नहीं' हे साधे सत्य, कर्मठपणाच्या काळोखात हरवून बसला आहे !

अशा ह्या समाजात 'राजधर्मा'च्या नावाखाली एक शहारे आणणारी क्रौर्य-कथा अलीकडेच घडली. सौदी अरेबियाची राजकन्या (प्रिन्स महंमद इब्न अब्दुल अझीझ ह्यांची नात) मिशा हिचे प्रेम एका सामान्य तरुणावर बसते. 'सामान्य' तरी कसे म्हणावे ?'

सौदी अरेबियाच्या बैरूट येथील राजदूताचा तो भाचा होता ! त्याचेही ह्या राजकन्येवर जिवापाड प्रेम होते. ह्या प्रेमालाच प्रेमविवाहाचे फूल आले. . . पण ते सौदी अरबस्तानाच्या राजघराण्याच्या कुलाचाराला मंजूर नव्हते, राजघराण्याच्या आचार-धर्माला (Royal Code ला) राजकन्येचे लग्न 'सामान्य' माणसाशी होणे अधर्म्य वाटले, निंद्य वाटले. ह्या 'निंद्य कर्मा'ला प्रायश्चित एकच— भर चव्हाट्यावर वधू-वरांना दगडांनी ठेचून ठेचून ठार मारणे !

. . . परंतु राजकन्येच्या पितामहांची विनंती मान्य करून हे 'प्रायश्चित' सौम्य करण्यात आले, 'दयाळूपणा' दाखविण्यात आला ! म्हणजे इतकेच की राजकन्येला भर बाजारात गोळी घालण्यात आली आणि त्याच वेळी तिच्या नवऱ्याचा शिरच्छेद करण्यात आला !— अमेरिकेच्या अध्यक्षापासून तो एखाद्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षापर्यंत सर्वत्र मूलभूत मानवी हक्कांचे नि स्वातंत्र्याचे ढोल जोरजोरात बडविले जात असताना, ही कर्मठ क्रूरता घडून आली— आणि तीही 'घरंदाजपणा'चा, धर्माचा आक्रोश करीत ! 'लैलामजनू'च्या भावनोत्कट प्रेमाविषयी जगप्रसिद्ध असलेल्या अरबी समाजातच, भरदिवसा ढवळ्या त्या तरुण दांपत्याचाच नव्हे, तर शुद्ध प्रेमाचा मुडदा पडला !. . .

हल्लीच्या हिशेबी दुनियेत असे, मृत्यूच्या बोहल्यावर लग्नाच्या मुंडावळ्या बांधू धजणारे प्रेम क्वचितच दृष्टीस पडते. प्रेमलग्नाची इतकी जबरदस्त किंमत चुकती करण्यास, ह्या वास्तववादी 'समंजस' जमान्यातील प्रियकर तयार नसतो, प्रेयसीही तयार नसते ! जिवाची परवड करणाऱ्या प्रेमापेक्षा परवडणारे प्रेम करण्याचा ह्या युगाचा शिरस्ता आहे ! तो सुरक्षित शिरस्ता मोडून, निष्ठावंत प्रेमात पडून अखेर बरबाद होणाऱ्या त्या युग्माला, कोण्या व्यवहारपंडिताने वेळीच सावधानतेचा इशारा दिला नसेल काय ?

*कहर है, मौत है, कजा है इश्क*
*सच तो ये है– बुरी बला है इश्क*

असे कटू सत्य आप्तेष्टांनी सुनावले नसेल काय ? 'निष्ठावंत प्रीती— त्यातही अंध रूढीला मान्य नसलेली प्रीती— म्हणजे प्रलयाची सौदामिनी, जीव घेणारी ज्वालानदी, मधाने माखलेली जहरी सुरी ! म्हणूनच वत्सांनो, ह्या इश्काच्या खतरनाक फंदात फसू नका' असा उपदेश मित्रमंडळींनी केलाच नसेल काय ? जरूर केला असेल. पण त्या प्रणयपंढरीच्या वारकऱ्यांच्या दिलात फडकलेला इश्काचा अंगार, त्या उपदेशाच्या जल-धारांनी जराही विझला नसावा. कारण, उत्कट प्रीतीची अग्निज्वाला कोणाच्याही सांगण्याने पेटत नसते, अथवा कोणाच्या हितोपदेशाने विझत नसते ! म्हणूनच सौदी अरेबियाची ती राजकन्या, प्रियकराच्या सुरात सूर मिसळून ललकारली असेल—

*क्षण एक पुरे प्रेमाचा*
*वर्षाव पडो मरणांचा– त्यापुढे !*
*निष्प्रेम चिरंजीवन ते*
*जगि दगडालाही मिळते धिक् तया !*

कोणी म्हणतील, जर तेथील जिवावर बेतणारा 'राजधर्म' अशा प्रेम-विवाहाच्या आड येणारा आहे, तर त्या तरुण जोडप्याने देशांतर करून लग्न का केले नाही? अरबस्तानातून गुपचूप पलायन करून आपले बहुमोल प्राण नि पृथ्वीमोल प्रेम का वाचविले नाही? प्रस्तुत अरबी प्रेमकहाणीचे संपूर्ण वृत्त हाती आल्याशिवाय ह्या प्रश्नाचे उत्तर देता येणे कठीण आहे. परंतु, अशीही शक्यता आहे की त्या निष्कपट नि उत्कट प्रेमाला अशी 'पलायन-पॉलिसी' स्पर्शलीच नसेल; अथवा मनात आली तरी मानवलीच नसेल! किंवा आंधळ्या रूढीतून का होईना, आपल्या देशात निर्माण झालेला कायदा चुकविणे त्यांना अशोभनीय वाटले असेल! ते काहीही असो, मध्ययुगीन इतिहासातच शोभून दिसेल, अशी निरागस प्रेमाची अमानुष पारध सौदी अरबस्तानच्या राजधानीत ह्या विसाव्या शतकात– ह्या प्रागतिक विज्ञान युगात– घडून आली !

— प्रेमाची पारध? छे, कोणत्याही शस्त्राने शुद्ध प्रेमाची पारध होऊच शकत नाही. अरबी राजकन्या नि तिचा तो 'सामान्य' प्रियकर ह्यांची ही प्रेम-कहाणी अनेक शायरांच्या काव्याचा विषय बनेल आणि त्या शहीद राजकन्येच्या शाही थडग्यावर कदाचित अक्षरे कोरली जातील–

*शमाभी कम नहीं कुछ*
*इश्कमें परवानेसे ।*
*जान देता है अगर वह*
*यह अपना सर देती है ॥*

(प्रेमातील असीम त्यागाच्या बाबतीत दीपज्योती पतंगाहून बिलकुल कमी नाही. तो आपला जान कुर्बान करतो, तर ही आपले शिर-कमल कुरबान करते !)

□

॥ ११ ॥

## प्रीत पतंगाची खरी !

*१ मे १९८२*

निसर्गतःच मानवी मन चंचल आहे, सुख-लोलुप आहे, कर्तव्यलोलुप नव्हे. म्हणूनच समर्थ रामदासस्वामींसारख्या संतालाही 'अचपळ मन माझे नावरे आवरीतां' अशी प्रांजळ कबुली विशिष्ट अवस्थेत द्यावी लागली. तथापि, हे मानवी मन म्हणजे प्रचंड शक्तीचे कोठार असल्यामुळे; माणसाच्या बंधनाचे वा मुक्तीचे ते आद्य कारण असल्यामुळे त्याला वळणावर तर आणलेच पाहिजे. ह्यासाठीच आपल्या साधुसंतांनी 'मनोबोध' लिहिले; 'मनावर योग्य नि अखंड संस्कार केले, तर ते उच्च मूल्यांचे निष्ठावंत संरक्षक होऊ शकते' असे आत्मविश्वासाने सांगितले. इतकेच नव्हे, तर आपल्या शिष्य-प्रशिष्यांची चंचल मने सुस्थिर नि नैष्ठिक केली. कोणत्याही क्षेत्रांतील निष्ठावंतपणा हा वंदनीय गुण होय. हा विचार समाजमनांत रुजविला. भाऊ-भाऊ असोत, पिता-पुत्र असोत, मित्र-मित्र असोत, पुढारी-अनुयायी असोत, गुरू-शिष्य असोत, जर त्यांच्यात परस्पर-निष्ठा नि प्रेम नसेल, तर त्या त्या नाते-संबंधाला काहीच अर्थ उरणार नाही. इतकेच नव्हे, तर समाजाचे गाडे एक तसूभरही पुढे जाणार नाही. पति-पत्नीत तर अत्यंत अतूट परस्परनिष्ठा नि प्रीती ह्यांची जरुरी आहे. तसे नसेल तर कुटुंबसंस्थेचा बाजा वाजेल आणि संसाराचे वाळवंट होईल !

आपली समाजरचना प्रायः पुरुषप्रधान असल्यामुळे म्हणा, अथवा स्त्रीच्या निसर्गदत्त बलस्थानांचा नि मर्मस्थानांचा विचार करून म्हणा, आपल्या समाजधुरीणांकडून स्त्रीवरच निष्ठावंतपणाचा भार अधिकाधिक टाकला गेला ! त्यांना वाटे, 'पुरुष हा कुटुंबसंरक्षक म्हणूनच प्रमुख असला, तरी कुटुंबाची सुस्थिरता नि मुलाबाळांवर संस्कार करण्याची

क्षमता, स्त्रीच्या ठायीच असल्यामुळे 'गृहिणी गृहमुच्यते !' म्हणूनच कुटुंबस्वास्थ्याची जबाबदारी तिच्यावरच अधिक. जबाबदारीबरोबर बंधने आलीच !' . . . परंतु हाय हाय, हळूहळू ह्या 'गृहदेवते'च्या निष्ठावंत सोशिकपणाचा अंत पाहणाऱ्या जुलमी रूढी बोकाळू लागल्या, देवतेला दासीची अवकळा येऊ लागली. भारतातील बहुसंख्य स्त्रियांच्या नशिबी हाल-अपेष्टा, मारहाण, सासुरवास, जुलूमजबरदस्ती ह्यांचा ससेमिरा मध्ययुगीन नरपुंगवांनी लावला. कारण मूळचा सद्हेतू दूर सरकला आणि पती-पत्नींमधील एकनिष्ठपणा हा 'वन वे ट्रॅफिक' ठरला! प्रभुरामचंद्राच्या एकपत्नीव्रताचा आदर्श पुराणांतच राहिला आणि प्रत्यक्ष जीवनात रंगेल विलासी पुरुषांना वाटेल तेवढे 'शरीरसंबंध' जोडण्याचे वा 'पाखरे' बाळगण्याचे स्वातंत्र्य ! साहजिक, मूलतः उज्ज्वल असलेली सतीची रूढीही विकृत होत गेली. . . तथापि सतित्वामागची ज्वलंत एकनिष्ठेची उदात्त कल्पना लोप पावली नाही. त्या काळी एक परमोच्च धर्मकार्य म्हणून राजीखुषीने सती गेलेल्यांची संख्याही उपेक्षणीय नाही. त्या वंदनीय स्त्रियांची 'सतीची वृंदावने'आजही महाराष्ट्रात जागोजागी (पण बहुशः उपेक्षित अवस्थेत—) आढळतात !. . . त्या काळी समाजातील सर्वच स्त्रिया सती जात असे नाही. पण एखाद्या गावातील एक सतीदेखील त्या पंचक्रोशीतील हजारो नारींच्या मनावर एकनिष्ठतेचा संस्कार गहिरा करीत असे.

आता जुलूमजबरदस्तीलादेखील वाव देणारी सतीची चाल अस्तित्वात नाही. पण बहुजनसमाजातील (उच्चभ्रू वर्गातील नव्हे) कोट्यवधी स्त्रियांना सतित्वाचे—पातिव्रत्याचे आकर्षण जरूर आहे. दूर खेड्यापाड्यांत क्वचित एखादी जरी स्त्री सती गेली, तरी त्या परिसरातील हजारो नारी तिचे चिताभस्म ललाटी लावण्यास जमा होतात ! कारण,

> ***जीवति जीवति नाथे***
> ***मृते मृता या मुदा युता मुदिते***
> ***सहज-स्नेह-रसाला***
> ***कुलवनिता केन तुल्या स्यात् ?***

हा आदर्श ह्या समाजात खोलवर रुजला आहे.

पण आमच्या मॉडर्न नरपुंगवांची गत काय आहे ? पूर्वीची वरिष्ठ वर्गातील धेंडे बाहेरख्यालीपणा करीत, हिरव्या माड्या चढत, रक्षा बाळगत, 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' अशा वचनांचा आधार घेऊन पददलित वर्गातील देखण्या नारींना भोगदासी बनवत. तरीही त्यांना काही ना काही जनलज्जा असे, त्यांना मनातल्या मनात अपराधित्वाची टोचणी लागे !. . . परंतु आता ? मॉडर्न पुरोगामी मंडळी आपल्या स्वैराचाराचे उघड उघड 'तात्त्विक' नि 'शास्त्रीय' समर्थन करताना आढळतात. ज्यांनी सुशिक्षितांतील अनेक भग्न

संसाराचा अभ्यास केला आहे, त्या तज्ज्ञांचा अभिप्राय असा आहे की, आजच्या मॉडर्न समाजातही स्त्रियांच्यापेक्षा पुरुषच जास्त निष्ठाशून्य नि बाहेरख्याली बनले आहेत. . . आता पुरुषांची समर्पणभावना नि एकनिष्ठ प्रीती केवळ स्वप्नरंजनी 'हिंदी फिल्म'मध्येच काय ती प्रकर्षानि दिसून येते ! अत्याधुनिक मंडळींत लैंगिक स्वातंत्र्याची लाट दृष्टिगोचर होत असतानाच, फतेहगढ येथे एक 'आक्रित' घडले. तेथे ह्या महिन्याच्या २ तारखेला अंबरीशसिंग कटियार ह्या नावाच्या एका तिशीतील डॉक्टराने सती जाण्याचा प्रयत्न केला. त्याची २३ वर्षांची तरुण पत्नी मंजुबाला ही कपडे पेटून मरण पावली. तेव्हा स्मशानात तिचे अंत्यसंस्कार आटोपल्यावर डॉ. अंबरीशसिंग ह्यांनी चिता पेटविली, तीन प्रदक्षिणा घातल्या आणि एकदम आपला देह त्या धडधडत्या चितेवर झोकून दिला !. . . डॉक्टरांना आजूबाजूच्या लोकांनी बाहेर खेचले आणि फतेहगढ रुग्णालयात नेले. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

— डॉक्टरांचे हे कृत्य बेकायदा आहे यात शंकाच नाही. पण त्याबरोबरच हेही खरे की 'जगी म्हणती प्रीत पतंगाची खरी' हे वचन सार्थ करणारी अत्यल्प माणसे आजही भूतलावर आहेत, हे त्यांनी सिद्ध केले. पतंग झाला तरी तो विझलेल्या (मृत) दीपज्योतीवर झडप घेत नाही. पण येथे तर मृत पत्नीच्या चितेवर उडी घेण्याचा, अधिक भावनोत्कट प्रयत्न झाला !

□

॥ १२ ॥

## उच्च-भ्रू समाज-सेविका !

*२७ जून १९७६*

पाश्चात्त्य देशांच्या तुलनेने मागास असलेल्या आपल्या देशात अशिक्षितपणाचे प्रमाण बरेच मोठे आहे. विशेषतः स्त्रियांत. सार्वत्रिक नि सक्तीच्या शिक्षण-योजना पुरेशा सफल न झाल्याने अद्यापि कोट्यवधी भारतीय नारी निरक्षरच राहिल्या आहेत. पण त्यांना अक्षर-ओळख नाही ह्याचा अर्थ संस्कृतीचीही ओळख नाही, असा बिलकुल नाही. परंपरांच्या पवित्र शाळेत त्यांचे सांस्कृतिक शिक्षण, त्यांना नकळत, झालेच आहे ! 'शुद्ध जिचे शीलही उजळवी गृहां गृहा' अशी गृहिणी भारतात शहरोशहरी, गावोगावी नि घरोघरी आहेत ! डोळियांचा दिवा नि तळहातांचा पाळणा करून त्या 'भावी आधारस्तंभां'ना जपत असतात, दिवसभर काबाडकष्ट करून आपल्या चंद्रमौळी घरात सुखाची चंद्रिका खुलविण्याची यातायात यथामती करीत असतात ! आपल्या सुखांचा होम करून कुटुंबसंस्था चालविणाऱ्या ह्या कोट्यवधी कष्टाळू श्रमिक-कन्या अनामिक समाजसेविकाच नव्हेत काय ? कठीण कटू परिस्थितीत सेवाधर्माचे बाळकडू प्यायलेल्या ह्या कष्टकरी कुटुंबियांना शिक्षणाची नि फुरसतीची जोड मिळून, त्यांच्यांतून खऱ्याखुऱ्या सुविद्य समाज-कार्यकर्त्या निर्माण झाल्या तर ? तर सावित्रीबाई फुल्यांचा हा देश धन्य होईल !

परंतु हाय, आज तरी परिस्थिती अशी आहे की, या वर्गातील नारी कष्टांच्या कर्दमात रुतल्या असून, उच्च-भ्रू वर्गातून आलेल्या अहंमन्य अंगना महिला-चळवळीत अग्रभागी तळपत आहेत ! म्हणूनच, नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या सुवर्ण महोत्सव-प्रसंगी श्रीमती रघुरामय्या ह्यांनी 'विशाल महिला'— मेळाव्यात केलेले

भाषण म्हणजे 'वृथा वृष्टिः समुद्रेषु। वृथा तृप्तस्य भोजनम् ॥' असेच काहीसे झाले! भाषण तसे छानच होते. त्यात श्रीमती रघुरामय्या म्हणाल्या, "परंपरेच्या बंधनामुळे अनेक क्षेत्रांत भारतीय महिला अद्यापि मागासच राहिल्या आहेत. त्यांनी आपल्यातील न्यूनगंड काढून टाकून समाजसेवा करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे." . . . वस्तुस्थिती अशी आहे की, परंपरेच्या बंधनापेक्षा बिकट आर्थिक स्थितीच्या मर्यादांनी आमच्या गरीब मध्यमवर्गीय नि कनिष्ठवर्गीय श्रमिक कन्या पिचून निघाल्या आहेत, प्राथमिक वा उच्च शिक्षणाला वंचित झाल्या आहेत. ह्या वर्गातील 'न्यूनगंड' नाहीसा होऊन तो 'समाज-सेवे'ची धुरा केव्हा नि कशी सांभाळणार?—

*गमे रोजगारने गरीब*
*निकम्मा कर दिया*

अशा परिस्थितीत, गरीब वर्गातील स्त्रियांच्या 'न्यूनगंडा'पेक्षा उच्च-भ्रूवर्गातील अहंमन्य 'सोशल वर्कर्स'कडे— फॅशनेबल समाजसेविकांकडे— श्रीमती रघुरामय्या यांनी आपल्या भाषणाचा मोर्चा वळविला असता, तर फार बरे झाले असते! ह्या 'श्रीमंत पतीच्या राण्यां'त न्यूनगंडाने नव्हे, तर अहंगंडाने थैमान घातले आहे. एखाददुसरा अपवाद वगळता, ह्या 'परिसंवादातील पऱ्यांच्या' बोलण्या-चालण्यात 'आपण काही विशेष आहोत' असा दर्प दरवळत असतो. अर्थात ह्या त्यांच्या अहंगंडाला केवळ उच्च सामाजिक दर्जाचे अन् सांपत्तिक सुस्थितीचे वरदानच कारणीभूत आहे असे नाही, तर गोंडाघोळ 'पुरोगामी' पुरुषांची चाटुकारीही तेवढीच जबाबदार आहे!

एखादी प्राथमिक-शिक्षिका घरचे कष्ट उपसून, आपले अध्यापनकार्य नीट सांभाळून सेवावृत्तीने शेजारधर्म पाळत असली, तरी ती 'सोशल वर्कर' ठरणार नाही. पण ह्या उच्चभ्रू 'सेमी-नार' ललनांच्या 'सोशल वर्क'चे कोण कौतुक! त्या परिसंवादांत मिरवितात, 'कॉन्फरन्सेस' गाजवितात, गुळगुळीत मासिकांची मुखपृष्ठे आपल्या तुळतुळीत मुख-मंडलांनी सजवितात! त्यांच्या बिंदुस्रावी समाजसेवेचे सिंधुतुल्य अहवाल छापले जातात, त्यांच्या छब्या या ना त्या कारणाने वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतात! रेडिओ-केंद्रावरून त्यांचा मुख-रेडिओ व्याख्याने प्रसवतो. आणि 'दूरदर्शना'च्या (T.V. च्या) कांचपडद्यावर त्यांचे चारू-दर्शन अनेकदा घडते!. . . हरेक बाबतींत पुरुषांशी बरोबरी करू पाहणाऱ्या ह्या उच्चभ्रू वावदूक समाज-सेविका! नवऱ्याच्या लठ्ठ पगाराच्या वा मिळकतीच्या बळावर 'ना काम धाम आणि चिंता' अशा या पुरंध्री! कधी कधी केवळ वेळ जाण्याचे साधन म्हणून एखादा बिनकष्टाचा 'जॉब' ही त्या सहज मिळवितात आणि आलिशान ऑफिसच्या शानदार केबिनी 'फ्लॉवर पॉट'प्रमाणे भूषवितात! 'सोशल वर्क'साठी वारंवार रजा घेऊन वा दांड्या मारून पुरुष-कर्मचाऱ्यांचा कामाचा बोजा वाढवितात!

एखाद-दुसरा अपवाद वगळता ह्या फॅशनेबल नखरेल नि नाजूक 'समाज-सेविकां'ना समाजपरिवर्तनाची ज्वलंत तळमळ नसते, तर एक फॅशन, एक प्रतिष्ठित हौस, एक पब्लिसिटीचे साधन म्हणून त्या 'सोशल-वर्क'चे वर्कशॉप' चालवीत असतात ! मग त्यात क्रांतिकारी चैतन्य कसे येणार ? तळमळीचा जाळच नाही, तर कर्माला कढ कसा येणार ?. . . ज्वलंत निष्ठा नसलेल्या अशा नाजुक-साजुक नि माषुक समाज-सेविकांचे वर्णन करताना कोणी शायर म्हणतो—

*रंगत है, नजाकत है,*
*लताफत है मगर हैफ !*
*इक बुए वफा ये*
*गुलेरआन नही रखते ।*

ह्या नटरंगी फुलात रंगत आहे, नजाकत आहे, रुचिरताही आहे. फक्त उणीव आहे, एकाच गोष्टीची ! निष्ठेचा सुगंध ह्या फुलात नाही !

निष्ठेच्या सुगंधाऐवजी अहंगंडाचा उग्र दर्प अंतरी असलेल्या ह्या समाजसेवा-सुंदरींची बरीच पैदास आधुनिक भारतात झालेली आहे. त्यांच्यापैकी निदान काही जणी तरी आपल्या सौंदर्य-प्रसाधित मुखाने जनतेला दृष्टिसुख देऊ शकतात ! पण नाही, — त्या मुखाला प्रायः वाचाळतेचा दोष जडलेला ! त्यांची रसीली नजर सुंदरतेचा नजराणा देण्याऐवजी कोणत्यातरी सरकारी कमेटीच्या अध्यक्षपदावर टपलेली ! एखाद्या 'पद्मश्री'साठी (अर्थात पदवीसाठी) ह्या गजगामिनी सचिवालयाचे उंबरठे सतराशे वेळा झिजवितील, पण झोपडपट्टीतील पदयात्रा एखादेवेळीच आणि तीही केवळ वृत्तपत्रांत छापून येणाऱ्या फोटोसाठी !. . .

बाकी ह्या अहंमन्य समाजसेविकांना तरी का दोष द्या ? पुरुषांशी स्पर्धा करता करता त्यांनी भंपक पुरुषांच्या तथाकथित समाजसेवेचेच अनुकरण केले आहे. आमच्या उच्चभ्रू-समाजातील आराम-खुर्ची-स्थित समाजकार्य करणाऱ्या श्रीयुतांचाच पॅटर्न ह्या श्रीमतींनी उचलला आहे. जशी त्यांची दलितोद्धाराची, पतितोद्धाराची, अबलोद्धाराची भाषा क्रियाशून्य वाचाळतेची तशीच त्यांच्या सहधर्मिणींची ! जसा अहंगंड मिस्टरात, तसाच तो मिसेसमध्ये !. . .

— श्रीमती रघुरामय्या ह्यांनी बिचाऱ्या मागास वर्गातील निरक्षर स्त्रियांच्या 'न्यूनगंडां'ऐवजी, ह्या आगाऊ वर्गातील नकली समाजसेविकांच्या अहंगंडाचीच दखल घेणे जरुरीचे होते !

□

॥ १३ ॥

## महिलांचे मद्यपान

*२० जून १९७६*

हे आहे समस्या-युग ! ह्या युगात बिकट सामाजिक समस्या आपल्या भारतापुढेच आहेत, आणि इतर देशांपुढे त्या नाहीत, असे मुळीच नाही. (काही समस्यांनी तर पुढारलेल्या देशांतच अधिक उग्र रूप धारण केले आहे.) उदाहरणार्थ, मद्यपानवृद्धीची समस्या. मद्यपानाचे व्यसन आपल्याच देशात बोकाळले आहे आणि रशियात मात्र ते वाढीस लागले नाही, असे नाही. स्त्री-पुरुष समानतेच्या भ्रामक कल्पनांनी आपल्याच मॉडर्न महिलांची डोकी फिरली आहेत, आणि आधुनिक रशियन रमणी मात्र ह्या विकारापासून अगदी अलिप्त आहेत, असे नाही ! रशियासारखी कम्युनिस्टांची पुण्यभूमी स्वर्गभूमीदेखील समस्यामुक्त नाही, चिंतामुक्त नाही. समानतेच्या खोट्या कल्पनांच्या आहारी जाऊन, पुरुषांच्या अवगुणांचेही अनुकरण करणाऱ्या आधुनिक अंगना रशियन विचारवंतांची डोकेदुखी होऊन बसल्या आहेत. रशियन मॉडर्न महिला म्हणू लागली— 'आम्हीही पुरुषांप्रमाणेच अनिर्बंध होणार ! जी चैनचंगळ नरांना ती नारींनाही मिळालीच पाहिजे. मदिरासक्तीची मजा मर्दांनीच लुटावी आणि आम्ही मात्र कोरडे राहावे, अथवा माफक मद्यपान करावे, ही विषमता का ?'...

रायटर्स युनियनच्या लिटररी गॅझेट या साप्ताहिकात म्हटले आहे, 'स्त्रियांचे— विशेषतः तरुण स्त्रियांचे—वाढते मद्यपान ही आता उपेक्षेची गोष्ट राहिलेली नाही. यामुळे हृदयविकार नि कॅन्सर ह्यांच्या खालोखाल मद्यपान हे मृत्यूचे एक प्रमुख कारण ठरू लागले आहे. मद्यपानाच्या व्यसनाला आळा घालण्याचे प्रयत्न रशियात १८ व्या शतकापासून चालू आहेत. मद्यप्यांच्या गळ्यात वजनदार लोखंडी पदके घालण्याची

सक्ती 'पिटर दि ग्रेट'ने केली होती. पण तेव्हापासून आजतागायत नशाबाजी रोखण्याचे जे जे प्रयास सरकारने केले ते बहुतांशी निष्फल ठरले. १९७० ते ७४ या कालखंडात 'व्होडका'चा खप १८ टक्क्यांनी वाढला. देशातील निम्मे गुन्हे आणि ३३ टक्के अपघात व्होडका-सेवनामुळेच घडतात, असे दृष्टीस आले आहे. दारू पिऊन स्त्रियांना मारहाण करणाऱ्या मद्यश्रींची संख्याही वाढली आहे. . . या मदिरा-भक्तीच्या शर्यतीत रशियन रमणी अधिकाधिक पुढे येत आहेत ! स्त्रियांतील वाढत्या मद्यासक्तीच्या समस्येचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञसमितीला असे दिसून आले आहे की, 'पुरुषांपेक्षा स्त्रियांवर मद्याचा अधिक खतरनाक परिणाम होतो. पत्नी आणि माता ह्या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास मंदिरासक्त स्त्रिया अधिकाधिक असमर्थ होत जातात. वारुणीच्या यमपाशाला तरुणी तर चटकन बळी पडतात !'

. . . अनेक देशांना हीच समस्या भेडसावू लागली आहे. आपल्याकडेही मद्यपानात भूषण मानणाऱ्या, मापुक मॉडर्न मैना कमी नाहीत ! नको त्या बाबतीत पुरुषांशी बरोबरी करू पाहणाऱ्या ह्या मदहोश महिला, आमच्या 'पुरोगामी पुरुषोत्तमां'च्या कौतुकाचा विषय होतात हे विशेष, त्यांच्या सहवासात 'गेट टुगेदर'ला अधिक रंगत येते म्हणतात !

प्राचीन काळीही वरिष्ठ वर्गात तुरळक का होईना, विलासी पुरुषांच्या मांडीला मांडी लावून मदिरापानाच्या मैफली ('पानगोष्ठी') रोशन् करणाऱ्या रमणी होत्याच. अशा विलासिनींच्या मद्यपानाचे कौतुक करताना त्या काळचा कोणी रसिकराज उद्गारतो—

*दृश्यते पानगोष्ठीषु*
*कान्ता-मुख-गतं मधु*
*स्मरं सहायमासाद्य*
*ग्रस्तो राहुरिवेन्दुना*

(या मद्यपान-मैफलीत चंद्रमुखीच्या मुखांत मद्य शिरलेले पाहून असे वाटते की, मदनाचे साहाय्य घेऊन चंद्रानेच राहूचा (पापग्रहाचा) ग्रास घेतला आहे !)

*"पि पि प्रिय ! स स स्वयं*
*मुखासवं देहि मे ।*
*त त त्यज दु दु द्रुतं*
*भ भ भ भाजनं कांचनम् ॥"*

(अरे मा मा माझ्या पि पि प्रियकरा ! ता ता ताबडतोब सुवर्ण-च च चषक दूर कर आणि अ अ अधरांना अधर लावून, मला तुझ्या मुखातील म म मद्य दे !) अशी फर्माइश करणाऱ्या, भरपूर मदिरासेवनाने 'टेर' झालेल्या, रंगेल नारी संस्कृत काव्याच्या मधुशाळेत अधूनमधून नजरेस पडतात ! मध्ययुगीन भारतात मूठभर वरिष्ठ वर्गीय स्त्रियांप्रमाणेच

रंगेल वारांगना नि गणिकाही—

*'पिये हुए है, पिला रहे है'*

हे वर्णन सार्थ करीत असत, मदनाच्या विक्रमाला मद्यधुंदीची साथ देत असत !. . . परंतु, असे असूनही महिलांचे मदिरापान चिंतेचा विषय बनण्याइतपत अमर्याद झाले नव्हते आणि त्याला प्रतिष्ठा लाभलेली नव्हती. . . परंतु, आता हे व्यसन कॉलेजातील पोरीसोरींपर्यंत पोहोचले आहे. हातभट्ट्या ठायी ठायी लागल्याने कनिष्ठ कंगाल वर्गांतील स्त्रियांतही दारूबाजीने प्रवेश केला आहे.

वस्तुतः नारींना मद्य घेण्याची जरुरीच काय ? मद्य न घेताही त्या मादक असतात ! देखण्या मदिराक्षींनी तर मदिरा घेण्याची काहीच जरुरी नाही ! त्यांच्या गालांवरून शराब ओघळत असते, रसाळ नाजूक अधरांवर रेंगाळत असते, विशाल सुंदर नेत्रांतून ओसंडत असते, गात्रागात्रांतून उसळत असते ! हजारो व्हिस्कीच्या बाटल्यांची धुंदी त्यांच्या एका दिठीत अथवा एका मिठीत सामावलेली असते ! त्यांचे मधुर हसणे मादक, मंजुळ बोलणे मादक, त्यांचे गोड गोड रुसणेही मादक ! त्यांचे मीलन तर मनाला मदहोश करतेच, पण त्यांचा विरहदेखील एक प्रकारची लज्जतदार बेहोशी देऊन जातो ! त्यांच्या आधीच धारदार असलेल्या नेत्रबाणांना काजळाचे कालकूट फासण्याची जशी जरुरी नाही— जशी त्यांच्या रसाळ अधरांना 'लिपस्टिक'कडे गहाण पडण्याची जरुरी नाही— जशी त्यांच्या उरोजवैभवाला 'ब्रेसियर्स'च्या कृत्रिम उठावाची गरज नाही, तशीच त्यांच्या निसर्गदत्त उन्मादक लावण्याला मदिरेचे साह्य घेण्याची आवश्यकता नाही ! किंबहुना, विधात्याने नारींना जी चित्तवेधक नजाकत नि मंदमधुर हास्याची—भाषणाची करामत बहाल केली आहे ती दारूची लत नि लज्जत फिकी पाडून, पुरुषांना मद्यपानाच्या खतरनाक मिठीतून मुक्त करण्यासाठीच ! स्त्रीच्या कोमल हृदयात परमेश्वराने जी उत्कट प्रीतीची गंगा निर्माण केली ती पुरुषांच्या पुरुषार्थाला पावन करण्यासाठी आणि त्यांच्या व्यसनांचा धगधगीत अंगार विझवण्यासाठीच !

— आपले हे निसर्गदत्त वैशिष्ट्य रशियन वा अमेरिकन नारी, खुल्या समानतेच्या नादात खुशाल विसरोत, भारतीय महिलांनी तरी ते विसरू नये, आपल्या अधरांतील निसर्गदत्त अमृताला मद्याचा स्पर्शही होऊ देऊ नये ! मदिरापानाचा पुरुषी पागलपणा शहाण्या भारतीय नारींनी शतयोजने दूरच राखावा !

□

॥ १४ ॥

# लेडीची लफडेबाजी ?

*३१ ऑगस्ट १९८०.*

शरीराची भूक भागविण्याची, आहार-निद्रा-भय नि मैथुनेच्छा ह्यांनी ग्रस्त होण्याची सहज-प्रवृत्ती मानवांत आढळली, तर त्यात नवल नाही. कारण मानव हा मूलतः पशूच असतो, प्राणी असतो. पण हा प्राणी अत्यंत बुद्धिवान-संवेदनाक्षम आणि महत्त्वाकांक्षी ! म्हणूनच त्याने आपल्या सहज प्रवृत्तींवर संस्कार करून, निसर्गदत्त क्षुधांचे नि विकारांचे नियमन करून, एक संस्कृती निर्माण केली, नराचा नारायण होण्याची आकांक्षा बाळगली, जंगलाचे कायदे बाजूस सारीत मंगलांचे कायदे निर्माण केले ! केवळ 'नर-मादी' ही अवस्था केव्हाच उल्लंघन करून, आपल्या स्वच्छंद, स्वैर प्रकृतीला आळा घालून, समाजस्वास्थ्यासाठी विवाह-संस्था निर्माण केली. कुटुंब-संस्था आकारास आणली. ह्या संस्थांत कितीही बदल होवो, —युगमानानुसार रीति-रिवाजांत कितीही बदल घडोत, —नीति-अनीतीचे परिवर्तनशील नियम गरजेनुसार कितीही शिथिल होवोत —कोणत्याही काळात एकनिष्ठा हा सद्‌गुण नि चंचलता हा अवगुणच मानला जाणार ! ह्या स्वैराचारी गणल्या जाणाऱ्या जमान्यातदेखील 'जेथे राघव तेथे सीता' हाच आदर्श मानमान्यता पावणार ! कुटुंब-संस्थेचा मुख्य आधार असलेल्या गृह-स्वामिनीकडून निष्ठेची अधिक अपेक्षा सदैव केली जाणार !

आणि म्हणूनच भारताचे अखेरचे ब्रिटिश व्हॉइसरॉय अर्ल माऊन्टबॅटन ह्यांची पत्नी एडविना हिचे कैक पर-पुरुषांबरोबर 'निकटचे संबंध' होते, ह्या वृत्ताने खळबळ माजली— एखाद्या सनातनी सदाशिव पेठेत नव्हे, तर प्रगत गणल्या जाणाऱ्या साहेब लोकांच्या इंग्लंडमध्येदेखील ! श्री. रिचर्ड ह्यू ह्या विख्यात नौदल

इतिहास-लेखकाने 'माउन्टबॅटन : हीरो ऑफ द अवर' नामक जो चरित्र-ग्रंथ गेल्या २७ तारखेला प्रसिद्ध केला आहे, त्यात लेडी माउन्टबॅटनच्या विवाह-बाह्य 'जवळिके' ची अनेक उदाहरणे नमूद केली आहेत. वृद्ध पतीच्या तरण्याताठ्या बायकोचे 'परराष्ट्र-संबंध', (आपण क्षम्य मानीत नसलो तरी) समजू शकतो! पण प्रस्तुत लेडी माउन्टबॅटनच्या बाबतीत असे समर्थन करता येणार नाही. लॉर्ड माउन्टबॅटन तरुण होते, तेव्हाही ह्या लेडीचे पर-पुरुष-संबंध (प्राकृत भाषेत लफडी!) चालूच होते, असे ह्या ग्रंथात म्हटले आहे. मात्र ह्या संबंधात अगदी प्रारंभापासून (१९२२ सालापासून) चोखंदळपणा होता, निवड-कौशल्य चांगले होते, असे दिसून येते! असेही कळते की, लॉर्ड माउन्टबॅटन ह्यांना प्रारंभी प्रारंभी तरी ह्या स्व-भार्या-विक्रमाचे (किंबहुना मर्यादा-अतिक्रमाचे) फार फार दुःख होत असे. पण करतात काय बिचारे? 'तस्मात् अपरिहार्येर्थ न त्वं शोचितुम अर्हसि' (जे अपरिहार्य आहे, त्याचा व्यर्थ शोक कशासाठी?) अशी त्यांनी स्वतःच्या खिन्न आणि छिन्न मनाची समजूत घातली! रिचर्ड ह्यू ह्यांनी तर असे म्हटले आहे (की चिखलफेक केली आहे), —'नंतर नंतर एडविनाच्या ह्या संबंधाच्या कथा ते आवडीने ऐकत. कदाचित, ते तिला पूर्ण समाधान देण्यास असमर्थ असल्यामुळे, त्यांना कधी कधी तिच्या या मोहिनी-सामर्थ्याचा अभिमानही वाटत असे!. . .'

हर हर! थोरा-मोठ्यांच्या घराण्यांतही असे प्रकार घडावेत? मदन-महाराजांच्या वाकड्या वाटा त्यांच्या बंगल्याशी जाऊन भिडाव्यात? पण आपल्या शुचिर्भूत भारतातही (प्रत्येक अपकर्ष-काळात) तुरळक का होईनात, असे पर-पुरुष-संबंध राजमंदिरातही घडले आहेतच. उदाहरणादाखल राज-तरंगिणीतील काही राण्यांची साहसी नि कुटिल चरित्रे वाचा. केवळ ज्वलंत पति-निष्ठेपायी पतीच्या चितेवर उडी घेणाऱ्या ह्या सती-साध्वींच्या देशातही, राजमहालापासून झोपडीपर्यंत विवाहबाह्य संबंधाचा समंध अधूनमधून डोकावलाच आहे! जुन्या वाङ्मयात त्याच्या खुणा अनेक ठिकाणी आढळतात. 'शुक बहात्तरी' सारखी पुस्तके तर अशाच लफड्यांनी काठोकाठ भरली आहेत! गाथा-सप्तशतीतील एक गाथेतील नायिका सांगते— "महिलांच्या ठिकाणी सहसा आढळणार नाही असे माझे साहस आणि त्या पर-पुरुषाचे सद्भाग्य ही दोन्ही गोदावरीच्या पुराला नि वर्षाऋतूतील मध्यरात्रीलाच माहीत!" . . . 'बाहेर कडी नि आत सवंगडी' असे प्रकार पूर्वी (नि हल्लीही!) घडले आहेत. विंचू चावल्याचे ढोंग करून, पर-पुरुषाला विष-वैद्याच्या वेषात सखीच्या साहाय्याने घरी आणणाऱ्या चतुर नारीची कथा शुकबहात्तरीत आहे. तिची आठवण करून देणाऱ्या ह्या ओळी—

*पति-पुरत एव नीयते*
*वृश्चिक-दष्टेति जार-वैद्य-गृहम् ।*
*निपुण-सखी-करधृता*
*भुज-युगुलान्दोलन-शीला बाला ।*

विंचू चावल्याचे ढोंग करवून, निपुण सखीने ती दोन्ही दंडांना झटके देणारी बाला, नवऱ्याच्या डोळ्यांदेखत जार-वैद्याच्या घरी हात धरून नेली !...

अशा ह्या पर-पुरुष-संगाच्या कथा कितीही रंजक असल्या तरी, केवळ घटकाभराची करमणूक ह्यापलीकडे त्यांना ह्या देशाने किंमत दिलेली नाही. कारण, येथे विवाहबाह्य संबंध दूषणास्पदच मानले गेलेत. —आणि आजही काही निलाजरे नव-नीति-नंदन वगळता, ते समाजाला निंदनीयच वाटतात. जेथे स्वातंत्र्याचा अतिरेक झाला आहे अशा पाश्चात्त्य देशांतही पति-पत्नीतील एकनिष्ठा ही प्रशंसनीयच असून, तिचा अभाव स्पृहणीय तरी खासच मानला जात नाही. असे नसते तर रिचर्ड ह्यू ह्यांच्या पुस्तकाने इतकी खळबळ माजलीच का असती ? अर्ल माउन्टबॅटनच्या नातेवाइकांनी ह्या पुस्तकावर बंदी आणण्याचा प्रयास का केला असता ? आता श्री. फिलीप झिंगलरनामक लेखक, माउन्टबॅटन ह्यांचे 'खरे' 'अधिकृत चरित्र' लिहीत असून, ते प्रसिद्ध होताच रिचर्ड ह्यू ह्यांनी केलेल्या नालस्तीला समर्पक उत्तर मिळणार आहे, असे म्हणतात. तसेच होवो आणि लेडी एडविना ह्यांची प्रकरणे मिथ्या ठरोत, हीच आमची इच्छा !

□

॥ १५ ॥

# रतिरंग-लॉटरी !

२६ मे, १९७४.

लक्षावधी लोकांच्या ललाटरेषांना आव्हान देणारी लॉटरी ! एका क्षणात भिक्षाधीशाला लक्षाधीश करू शकणारी जुगारवल्ली ! पण शासनानेच सनाथ केल्यामुळे तिला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली असून, लाखो आबालवृद्धांना ती चांगलीच परिचित झाली आहे. त्यांना आता मिर्झा गालिबप्रमाणे 'हम कहाँ किस्मत आजमाने जाये ?' असा हताश सवाल विचारण्याचे कारण नाही. कारण, नशीब आजमविण्यासाठी या मोहिनीशी सूत जमविणे आता कुणालाही सहज शक्य झाले आहे— खिशात किमानपक्षी एक रुपया असला म्हणजे झाले ! या लॉटरीत अचानक नि अफाट धनलाभ होताच एखाद्या भाग्यवंताला चैन-चंगळीत पैसा उडविण्याचा मोह होणे साहजिक आहे. तो मग मद्य नि त्याहून मादक असलेली मदनिका ह्यांची संगत-रंगत लुटण्यात मश्गुल न झाला तरच नवल !

पण अशा या लॉटरीहूनही अधिक सनसनाटी, अधिक 'थ्रिल' अर्पण करणारी, चैनबाजीलाच 'डायरेक्ट' आवाहन करणारी एक रंगेल 'लॉटरी' निघाली आहे. जिची नुसती जाहिरात वाचताच साताजन्माच्या दारिद्र्यालाही 'शयनेषु रंभा' मिळाल्याचे 'टेक्निकलर' स्वप्न पडावे; कुरूप अष्टवक्रालाही भूलोकीच्या सुंदर अप्सरांचा थवा मिठीत आल्याचा भास व्हावा ! फार तर महिला मंडळांतील परि-संवादात बकवास करणेच ज्याच्या नशिबी, त्या लेखणी-ढकल्या प्राध्यापकाच्या दिलात परी-सहवासाची आशा अंकुरित व्हावी, अशी एक लॉटरी पॅरिसमध्ये जाहीर झाली आहे ! उल्लू नि उद्दाम रंगेलपणाविषयी विख्यात असलेल्या पॅरिसमधील या लॉटरीला 'रतिरंग-लॉटरी' हेच नाव

शोभून दिसेल. ‘उफ् तेरी काफिर जवानी जोशपर आयी हुई’ अशी ललकारी ठोकीत आमच्या उर्दू शायरांनी ह्या लॉटरीचे आव्हान स्वीकारले असते ! ‘रुंद छातीवर बुंद गेंद जणु’ अशा लावण्या गुणगुणत आमच्या मराठी शाहिरांनी ह्या लॉटरीचे ताबडतोब तिकीट काढले असते !

पॅरिसमध्ये जाहीर झालेल्या ह्या ‘लॉटरी’त लाखो रुपये मिळणार नसून; ‘लाखो स्त्रियांत अशी देखणी’ कामिनी बक्षीस म्हणून मिळणार आहे. या लॉटरीच्या आकर्षक छापील जाहिरातीत म्हटले आहे— ‘रसिकहो, त्वरा करा. फक्त एका डॉलरचे तिकीट घ्या अन् यशस्वी झालात तर ‘अंगी तारुण्याचा बहर’ अशा टंच लावण्यवतीचा एकांत तब्बल दोन तास मनमुराद लुटा ! पहिले पारितोषिक म्हणून ठेवलेली ही परी ‘लॉन्ड’ म्हणजे ‘सुवर्ण-केशा’ नि ‘नीलकमलनयना’ आहे.’ तिचे वय आहे अवघे १९ वर्षांचे. अन् लुसलुशीत शराबी ओठ इतके काही कामोत्तेजक आहेत की, त्यांच्या अधर मद्याच्या अर्ध्या पेगनेही आपण तर्र व्हाल !. . .’ हे झाले पहिल्या पारितोषिकाचे वर्णन. अशा प्रकारची पारितोषिके एकूण पाच आहेत— थोड्याफार फरकाने सारीच सुंदर, मदनमस्त ! आपल्या भारतीय पद्धतीने पद्मिनी, हरिणी, चित्रिणी इत्यादी नावे त्यांना बहाल करण्यास हरकत नाही. या रंगेल लॉटरीने जणू काही अनंगरंगाचे पंच-महालच उभे केले आहेत !. . . या पंचमहालातील पाच रेखीव नौबहारेनाज पाच प्रदीर्घकामा गुलबदनी,— पाच नितंबिनी— ज़ोबनवंती— विलासिनी,— म्हणजे मदनाचे ५ बाणच म्हणाना ! त्या सुंदरींना आपल्या पक्षाच्या झुंझार साहाय्यकारिणी मानून, मदनमहाराजांनी त्यांच्या घाटदार स्तनांना, विशाल नयनांना, रसाळ मनाला नि घनवर्तुळ नितंबांना बढती (इन्क्रिमेन्टस्) दिली आहे. आणि त्याही काही कमी कृतज्ञ नाहीत. लावण्यजलाने काठोकाठ भरलेल्या सु-वर्ण कुचकुंभांतून, हृदयासनावर बसलेल्या मदनाला त्या दिनरात्र अभिषेक करताहेत !

आपल्या अनुकरणपारंगत देशात अशा प्रकारची रतिरंग—लॉटरी सुरू होईल काय? देशाच्या विकास-क़ार्याशी अशा रतिविलासाची सांगड घातली जाईल काय? ज्या दांभिक समाजात सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून नंगा नाच अन् समाधीकडे नेणारा राजमार्ग म्हणून संभोग प्रतिष्ठा मिळवितो; जेथे १०० टक्के वास्तवतेचे कुंकू लावून गल्लेभरू बिछानेबाजी गनिमी काव्याने रंगमंचावर डोकावते, तेथे ‘लॉटरी’च्या नावे हे फ्रेंच-स्टाईल रति-जुगार आगमन करतील काय? प्रश्न थोडे नाजूक आहेत. आणि त्यांची निश्चित उत्तरे मिळणे अवघड. . . पण. . . पण संभव आहे की ह्या ‘रतिरंग लॉटरी’ला जबरदस्त विरोध दोन कारणास्तव होईल. एकतर रतिविलासाला अवघ्या दोन तासांची मर्यादा घालणे भारतीय परंपरेला मान्य होणार नाही. येथे घड्याळाबरहुकूम ऑफिस नि मीटर-बरहुकूम टॅक्सीही कधी चालत नाही ! मग मदनरंगाला दोन तासांचे बंधन कसे

मानवेल ? येथे 'अविदित-गत-यामा' रात्र व्यतित करण्याची दमदार परंपरा आहे !. . . दुसरे असे की, कामपिसाट हिंदी चित्रपट नि काही तथाकथित 'पुरोगामी' नाटके ह्यांच्या उत्पन्नावर या लॉटरीचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे !. . . अशा लॉटरीला येथील परंपरेनुसार बहुशः कायदेशीर 'बंदी'ही घातली जाईल. (पण कल्पक गल्ला-नवाझ अशा रतिरंगजुगाराचा 'अंडरग्राउन्ड' मटका सुरू करतील, असाही जबरदस्त संभव आहे !)

□

॥ १६ ॥

# वासनाकांडातील बळी !

*८ मार्च १९८०*

मुंबईपासून काही तासांच्या अंतरावर असलेल्या पालघर तालुक्यामध्ये नुकतीच एक भीषण घटना घडली. तेथील चहाडा ह्या आदिवासींच्या गावातील मंजुळा ह्या ऐन पंचविशीतील विवाहित महिलेवर अज्ञात गुंडांनी सामुदायिक बलात्कार केला व नंतर तिचा खून केला. मंजुळा ही पाच महिन्यांची गरोदर होती. बुधवार दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता 'पालघरच्या दवाखान्यात तपासून घ्यायला जाते' असे सासूला सांगून ती निघाली आणि अर्ध्या तासात ती बसने पालघर गावी पोचली. तेथल्या दोन्ही दवाखान्यांमध्ये मंजुळेने तपासून घेतल्याची नोंद नव्हती. त्यानंतर ती बेपत्ता झाली. दुसऱ्या दिवशी एका आंबराईत तिचे प्रेत झाडाला बांधलेल्या अवस्थेत सापडले. विशेष म्हणजे ही आंबराई रेल्वेमार्गाच्या पश्चिमेला पालघरपासून अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे, तर मंजुळा राहते ते चहाडा आणि पालघर गाव ही दोन्ही रेल्वेच्या पूर्व बाजूला आहेत. म्हणजे मंजुळेला सदर आंबराईत एवढ्या दूरवर आपण होऊन जाण्याचे कोणतेच कारण नव्हते. मंजुळेच्या प्रेताजवळच किमती परदेशी दारूच्या तीन बाटल्या सापडल्या. निधनोत्तर तपासणीत पोलिसांना बोटांचे ठसे किंवा खुनी इसमांनी टाकलेल्या वस्तू आदी पुरावा काही सापडला नाही, परंतु त्या तीन बाटल्यांवरून पोलिसांचा असा कयास आहे की, मंजुळेला गुंगी आणण्यासाठी मद्य पाजण्यात आले असावे व तिला आंबराईत नेऊन भीषण बलात्कार आणि नंतर खून करण्यात आला असावा. शवचिकित्सेमध्ये मंजुळेवर सामुदायिक बलात्कार झाला असावा, आणि नंतर गळा दाबून तिचा खून

करण्यात आला असावा, असे आढळून आले आहे. शवाशेजारच्या त्या किमती परदेशी मद्यावरून पोलिसांनी असा कयास बांधला आहे की, खून करणारे नराधम सधन, 'सुशिक्षित' कुळातील असावेत. मंजुळेसारख्या एका निष्पाप अबोल तरुण विवाहितेच्या जीवनाचा चुथडा करणऱ्या नराधमांना कायमची अद्दल घडावी अशी कडक शिक्षा होणार आहे काय? आणि मंजुळेला न्याय मिळणार आहे काय?

### आठ वर्षे न्याय नाही!

वास्तविक अशीच घटना आठ वर्षांपूर्वी ह्या महाराष्ट्रात मथुरा नावाच्या मागासवर्गीय किशोरीबाबत घडली होती. पण तिला कोठे न्याय मिळाला? मथुरा चौदा-पंधरा वर्षांची. तिला एकाने पळविल्याची तक्रार पोलिस ठाण्यात २६ मार्च १९७२ रोजी करण्यात आली आणि पोलिसांनी मथुरेला पोलिस-चौकीत बोलवून घेतले. रात्रौ तेथल्या दोघा पोलिसांनी मथुरेवर बलात्कार केला. पुढे ह्या पोलिसांवर खटले भरले गेले खरे. पण सेशन्स कोर्टात 'बलात्कार' व 'समागम' ह्या दोन्ही भिन्न क्रिया आहेत, ह्या कायद्याच्या मुद्द्यावर हे पोलिस सुटले. तथापि, मुंबई हायकोर्टाच्या नागपूर पीठाने आरोपींना प्रदीर्घ कारावासाची सजा ठोठावली. आश्चर्य असे की, आरोपींनी त्यावर सर्वोच्च न्यायालयात अपील केले आणि तेथे आरोपींना पुरेशा पुराव्याअभावी दोषमुक्त करण्यात आले! हा निर्णय प्रसिद्ध होताच भारतातील कायद्याच्या चार नामवंत प्राध्यापकांनी १८ सप्टेंबर ७९ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांना अनावृत पत्र पाठवून आश्चर्य व्यक्त केले आणि मथुरेबाबतचा खटला पुन्हा सुरू करावा, अशी मागणी केली. सरन्यायाधीश चंद्रचूड ह्यांनी इंडियन लॉ इन्स्टिट्यूटमध्ये केलेल्या भाषणात ह्या मागणीचा उल्लेख केला, निकालपत्रावरील टीकेचे त्यांनी स्वागतही केले. पण 'आपण पेचात सापडलो असल्याचे' जाहीर केले. आता ह्या मथुरेला तरी न्याय मिळणार का?

### विकृत पुरुषी दृष्टिकोन

मंजुळा काय, मथुरा काय, दोन्हीही अशिक्षित, दारिद्र्यपीडित भारतीय स्त्रिया. अशा कितीतरी अबला आज शेतांतून, रानावनांतून, कारखान्यांतून, कंपन्यांतून आणि मंत्रालयासारख्या शासकीय कचेऱ्यांतून राबताहेत आणि मोलमजुरी-नोकरी टिकवण्यासाठी वरिष्ठांच्या वासनेच्या बळी होत आहेत. "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" असा उठताबसता ढोंगी गजर होणाऱ्या या भारतात, महिलांची स्थिती केवढी दयनीय आहे, ते कोठल्याही सुज्ञ माणसाला वेगळे सांगण्याची आवश्यकता

नाही. ह्या संदर्भात प्रगत आणि अप्रगत देश अशी तुलना करण्याचेही कारण नाही.

पुरुष हा स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणूनच पाहत असतो, हीच कटू वस्तुस्थिती बहुशः सर्वत्र दिसून येते. मानवाने वैज्ञानिक प्रगती खूप साधली. चंद्रावर पाऊल ठेवले आणि मंगळ-गुरू-शनिभोवती परिभ्रमण करण्याएवढी अंतराळात झेप घेतली. पण मनाने मात्र तो पशूच राहिला. विपन्नावस्थेतील व्यक्तीला सहाय्यहस्त देण्याऐवजी तिच्या विपत्तीचा जास्तीत जास्त लाभ कसा उठविता येईल, हीच आसुरी आकांक्षा कैक नरपुंगवांत दिसून येत आहे ! अशा दुर्दैवी व्यक्तींमध्ये स्त्रियांचा भरणा, त्यांच्यातील शारीरिक दौर्बल्यामुळे अधिक असतो. पुरुषांच्या ह्या विकृत दृष्टिकोनात बदल व्हावा नि त्यांनी महिलांना समान भूमिकेवरून वागवावे हा उद्देश बाळगून, गेली सत्तर वर्षे जागतिक महिला दिन पाळले जात आहेत. आजचा आठ मार्च हा सत्तरावा वार्षिक दिन. दरम्यान आंतरराष्ट्रीय महिला वर्षही पाळले गेले. पण त्यामुळे जगामध्ये आवश्यक तो सुसंस्कृतपणा निर्माण झाला काय, ह्या प्रश्नाचे उत्तर फारसे समाधानकारक देता येत नाही.

**जिवंतपणी यमयातना**

स्त्रियांवर बलात्कार करणाऱ्या नरपशूंचा पुरता बंदोबस्त व्हायला हवा, अशी मागणी देशोदेशींच्या महिला आजच्या महिलादिनी करणार आहेत. भारतीय स्त्रियांची तर त्यादृष्टीने एक विशेष मागणी आहे. ब्रिटिश काळापासून चालत आलेला बलात्कारविषयक कायदा एवढा ढोबळ आहे की कुप्रसिद्ध गुंडही, साक्षीपुरावा असूनही, कायद्याच्या पळवाटातून सहीसलामत सुटून जाऊ शकतात, असे दिसून आले आहे. हा गुन्हा सिद्ध करणे मुळातच किती कठीण होऊन बसते, कायद्यातील पळवाटांचा आणि स्त्रीसुलभ लज्जा-स्वभावाचा गैरफायदा आरोपींचे वकील कसे करून घेत असतात, ह्यावर प्रकाशझोत टाकणारा लेख आम्ही कालपरवाच ह्याच पानावर प्रसिद्ध केला होता. त्या लेखातील उदाहरणे एवढी बोलकी आहेत की, त्यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. आरोपी मोकळे सुटतात आणि बलात्कारित स्त्रीला मात्र, जिवंतपणीच बलात्काराहून असह्य अशा यम-यातना भोगाव्या लागतात. जिथे जाती-जमातींतील संघर्षामधून सामुदायिक बलात्कार केले जातात तिथे अशा स्त्रियांविषयी शासकांना अपार कळवळा वाटला पाहिजे आणि बलात्कार करणाऱ्यांबद्दल कमालीची घृणा निर्माण व्हावयास हवी. 'जंगली कायदा'च शिरोधार्य मानणारे हे मध्ययुगीन सरंजामशाही प्रवृत्तीचे गुन्हेगार आजच्या सुसंस्कृत जगात जगायलाही फारसे लायक नसतात, पण तरीही ते जगतात. हिटलरच्या किंवा

स्टॅलिनच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पसारख्या छावण्या काढून अशा कामपिसाट नराधमांना त्यामध्ये डांबून ठेवणे व त्यांच्याकडून कालवे खोदण्यासारखी समाजोपयोगी कामे करून घेणे अधिक योग्य होईल. परंतु सध्याच्या भारतातील तकलुपी लोकशाहीत असे 'ज्ञातिगुंड' पोसणे अधिक फायदेशीर होत असल्यामुळे त्यांना शिक्षा करण्याचा विचारदेखील कोणाला सहसा शिवत नाही, हे ह्या देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल.

**कायदा– अंमल कडक हवा**

पण मग ह्या परिस्थितीवर उपाय कोणता? पहिला उपाय हा की, संबंधित कायद्यातील त्रुटी नाहीशा करून तो जास्तीत जास्त निर्दोष केला पाहिजे.सुदैवाने ह्या देशाची पंतप्रधान एक कर्तृत्वसंपन्न महिलाच आहे. तरीही हे कार्य गेल्या काही वर्षांत का झाले नाही, तेच कळत नाही! देशाचा बाह्य विकास घडवून आणण्याच्या घाईगर्दीत ह्या आंतरिक विकासाकडे लक्ष द्यावयास कोणाला सुचले नसण्याची शक्यता आहे. असे गुन्हे हुडकून काढण्याचे काम खास महिला पोलिसांकडे सोपवावे आणि महिला न्यायमूर्तींसमोर हे खटले चालवावेत, ही एका महिला कार्यकर्तीची सूचनाही विचारात घेण्यासारखी आहे. स्त्रीची दुःखे स्त्रीलाच कळू शकतात, ही ह्या सूचनेमागची भूमिका. अमेरिकेतील कायद्यांत पत्नीच्या इच्छेविरुद्ध समागम करणाऱ्या पतीलाही बलात्काराखाली शिक्षा करण्याची तरतूद आहे आणि तशी शिक्षा ठोठावल्याची घटना नुकतीच तेथे घडूनही आली आहे. आपल्याकडे एवढी प्रगती झाली नाही, तरी वासनेने लडबडलेल्या आणि आपले भक्ष्य हुंगीत हिंडणाऱ्या नराधमांना भीती वाटण्याएवढा कायदा कडक व्हायला हवा व त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा कार्यक्षम व्हायला हवी. नाहीतर ह्या देशातील वासनेच्या बळींची कहाणी 'आंखोमे पानी' अशीच राहणार आहे.

**नैतिक शिक्षण**

अर्थात, केवळ कायदेशीर सुधारणांच्या मलमपट्ट्यांनी नाहीशी होणारी ही व्याधी नव्हे. स्त्रियांवर ह्या देशांत होणारे अत्याचार, सार्वत्रिक नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचे निदर्शक आहेत. कोणत्याही नीति-तत्त्वांचे सोयरसुतक नाही, कोणाचाही धाक नाही, जन-निंदेची पर्वा नाही, अशी अवस्था आज समाजाच्या सर्व थरांत दृष्टीस पडते. ही अवस्था बदलण्यासाठी शाळा-शाळांतून, कलाविष्कारांतून आणि सर्व प्रचार-माध्यमांतून समाजाला नैतिक शिक्षण (म्हणजे कोरड्या उपदेशाचे डोस नव्हेत) देण्याची नितांत आवश्यकता आहे. ही मुख्यतः आमच्या नेत्यांची–

समाजधुरीणांची— जबाबदारी होय. पण त्यांचेच वागणे जर 'मुखमें राम और बगलमे छुरी' असे दांभिकपणाचे असेल तर? तर समाजावर माणुसकीचे संस्कार होणार कसे? म्हणूनच, प्रत्येक सुज्ञ प्रामाणिक माणसाने, पुढाऱ्यांची वाट न पाहता, आपण होऊन ह्या महत् कार्याला हातभार लावला पाहिजे, तरच ह्या देशातील गुंडसत्ता नाहीशी होऊन नीतिमत्तेचे अधिराज्य प्रस्थापित होईल.

□

## ॥ १७ ॥ अरसिक किती हा मेला !

*१३ डिसेंबर १९७०*

ब्रम्हचर्य, अपरिग्रह, अस्तेय, अहिंसा इत्यादींचा निष्ठेने पुरस्कार करणाऱ्या महात्मा गांधींचा जयजयकार आमचे राजकारणी पुढारी नि राज्यकर्ते कितीही करोत; साधुसमाज नि सर्वोदयी सोवळेपणा यांचा कितीही गुणगौरव करोत; ते इंद्रियनिग्रहवादी तापस धर्माचे पुरस्कर्ते खचित नाहीत. इंद्रिय-सुखवादी राज(स) धर्माचे पाईक आहेत ते, असेच काही अपवाद वगळता, म्हणावे लागेल ! अन्यथा, आमदार-निवासांतील मदिरापान नि अन्य रंगतदार कार्यक्रम यांचे पडसाद विधान-सभेत उमटलेच नसते; आणि गेल्या आदितवारी आमदार-निवासांत मध्यरात्री जो 'कामिनींचा मनोभंग' हे नाव सार्थ करू शकणारा; चटक चांदण्यांचा चटकदार प्रवेश घडला, तो घडलाच नसता !

### संशय का मनी आला

काय म्हणावे त्या स्त्री-दाक्षिण्यविन्मुख पोलिसांना अन् त्या जाहिद लिफ्टमनला? त्यांच्या फाजिल कर्तव्यदक्षतेमुळे त्या फॉकलंड रोडनिवासिनींना— त्या दोन पाहुण्या रिद्धि-सिद्धींना— आमदार निवासाच्या दिवाणेखासमध्ये प्रवेश मिळाला नाही ! महामूर्ख कुठले ! म्हणे त्यांना संशय आला ! कोण्या जिल्हा-परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी आमंत्रित केलेल्या त्या गुलजार पाहुण्यांविषयी संशय? यजमानांची नि पाहुण्यांची कोण ही बे-अदबी ! आज या यूसलेस होपलेस कर्मचाऱ्यांनी पाहुण्यांविषयी संशय घेतला, उद्या मेहुण्यांविषयी घेतील ! आज जिल्हा परिषदेच्या एका पदाधिकाऱ्याचा अपमान केला, उद्या एखाद्या आमदाराचा मानभंग करतील ! त्यांना कडक शासन झाले पाहिजे. किमानपक्षी

त्यांची बदली कोठेतरी दूर आदिवासी प्रदेशांत करून टाकली पाहिजे !...

## चातक व सैयाद

मध्यरात्रीच्या निळ्याशार अस्मानात तारका लुकलुकत आहेत, त्यांच्या मंद किरणांची तलम वस्त्रे पांघरून 'सचिवालया'च्या उद्यानातील फुले झोपली आहेत; गुलजार थंडीच्या गोड गारव्याने अस्वस्थ होऊन कोणी जिल्हा-परिषद पदाधिकारी आपल्या शयन-मंदिरात फेऱ्या घालीत आहे; "ओहो, यावे यावे तृषित चातक मेघमाले यावे" असे आश्विनशेठप्रमाणे म्हणण्याचे भाग्य केव्हा लाभेल या विवंचनेत तो चूर झाला आहे; आणि इकडे तळमजल्याला—

*थंडगार ही हवा !*
*हवेत गोड गारवा*
*अशा सुरेख संगमी*
*जवळ तू मला हवा !*

असे गीत गुणगुणत दोन पाहुण्या (फॉकलंड रोडच्या ?) यजमानांना भेटण्यासाठी आल्या आहेत ! या साऱ्या प्रसंगातील काव्यमयता त्या मुजोर नि मग्रूर लिफ्टमनला कळू नये, हे त्या रसील्या रात्रीचे अन् ती साजरी करू इच्छिणाऱ्या रसिकवर्गाचे केवढे दुर्भाग्य ! त्यानेच पोलिसांना सक्त ताकीद दिली म्हणतात— "खबरदार ! या मंचक-मावश्यांना मुळीच वर जाऊ देऊ नका. ह्यांनी दिवसभर कॅब्रेचा धिंगाणा घातलाय् ! आता रात्री तरी तो नाचरंग नको !" हे त्याचे कठोर बोल ऐकून त्या मध्यरात्रीच्या पाहुण्या, बोटे (आणि डोळे) मोडून म्हणाल्या असतील, "अरसिक किती हा मेला !"

## हा काय गुन्हा केला ?

या साऱ्या प्रकारामुळे आमदार निवासात (मत्सरग्रस्त ?) खळबळ माजली म्हणतात ! काहींनी पोलिस कमिशनर नि मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रारही केली म्हणतात ! अरे वेड्यांनो, पण यात तक्रार करण्याजोगते काय आहे ? जिल्हा परिषदेचा पदाधिकारी असो, आमदार असो, खासदार असो वा नामदार असो,— अखेर तो राज्यकर्ताच ! जनतेच्या हिताचा भार डोक्यावर घेतलेला; सेवा करून करून थकलेला, त्याने श्रमपरिहारार्थ कोण्या सुंदर पाहुण्यांना बोलावले तर काय महत्पाप झाले ?— मृगया, मदिरा नि मदिराक्षी यांच्याबाबत प्राचीन क्षत्रियांना— राज्यकर्त्यांना काही खास सवलती होत्या. राजे-रजवाडे तर चक्क नाटकशाळा बाळगत ! एवढी राजरोस सवलत या समाजवादी जमान्यात शक्य नाही. पण निदान थोड्या क्षमाबुद्धीने तर पाहाल की नाही ?

संस्थानिकांचे बाद केलेले हे असे विशेषाधिकार नि सवलती, या आधुनिक समाजवादी संस्थानिकांकडे ट्रान्स्फर करण्यास काय हरकत आहे ?— असे हे प्रकार दिवसेंदिवस वाढू लागले की आज ना उद्या, विधानसभेत बिल मांडून राजकारणी मंडळींसाठी अथवा सत्ताधीशांसाठी 'मध्यरात्र-श्रम परिहार सवलत विधेयक' पास करून घ्यावेच लागेल ! ! कारण आपणा सामान्य भिक्षाधीशांचा धर्म वेगळा आणि सत्ताधीशांचा धर्म वेगळा ! आपण आपली नीतिमत्ता या सबळ सत्ताधीशांच्या डोक्यावर लादणे, हे अत्यंत अन्यायकारक आहे ! 'यत्र यत्र सत्तामद-क्रम तत्र तत्र मदनस्य विक्रमः' हे लक्षात ठेवून आपण गप्प बसावे हेच बरे !

□

॥ १८ ॥

# प्रामाणिक वेश्या !

'वेश्याहुनि अति नीच तुम्ही रे, स्वार्था मांजरसे टपतां !'

*११ ऑगस्ट १९७४*

जोपर्यंत विवाह-संस्था आहे, तोपर्यंत वेश्या-संस्थाही असायचीच ! कुलांगना कुलांगनाच राहाव्यात यासाठी वारांगना-वर्ग आवश्यकच आहे. आणि जर ही सामाजिक आवश्यकता मान्य केली, तर गणिकांना अगदीच हीन लेखणे योग्य नाही; त्यांना केवळ 'शारीरिक क्षुधाशांति– भवन' मानणे न्याय्य नाही; त्यांच्या ठायी सद्भावनांचा नि सद्विचारांचा खडखडाटच असतो ही समजूत इष्ट नाही, हा समंजस दृष्टिकोण आपल्या समाजात अभावानेच आढळतो. अगतिक, दारिद्र्यपीडित, अवमानित नारींना केवळ कुंटणखान्याची कवाडेच उघडी ठेवणारा लब्धप्रतिष्ठित वर्ग जेव्हा

*'वेश्याःश्मशानघटिका इव*
*वर्जनीयाः'*

(वेश्या स्मशानातील मडक्यांप्रमाणे वर्ज्य होत) असे म्हणतो, तेव्हा संवेदनाशील मनाला विषाद वाटल्यावाचून राहत नाही.

## 'वरिष्ठतागंडा'चे बळी

शतकानुशतके 'निंद्य जीवनक्रम तुमचा' असे हा समाज वेश्यांना बजावत आहे, आणि त्याही तसेच मानताहेत. 'सदभावो नास्ति वेश्यानाम्' ही आपली हजारो वर्षांची दृढ धारणा आहे. हजारो गरिबांची धूर्तपणाने पिळवणूक नि फसवणूक करणाऱ्या धनमत्तांच्या गळ्यात गौरवाचे हार घालणारे कैक महाभाग गणिकांवर निंदाप्रहार करताहेत ! खोटे

दस्तऐवज करणारे, खोटी वचने देणारे, खोटे सौजन्य दाखवून खरे दौर्जन्य आचरणारे व्यवहार-पंडित थोडे का आहेत? परंतु खोटेपणा, लोभीपणा, लुच्चेगिरी ह्याची सारी जहागीर जणू केवळ वेश्यांनीच बळकाविली आहे, या समजुतीने आमचे सुभाषितकार म्हणतात—

'पर्वतमाथ्यावर जशी कमळे फुलत नाहीत; घोड्यांची धुरा जशी गाढवे वाहू शकत नाहीत; जंव पेरून जसे तांदूळ उगवत नाहीत त्याचप्रमाणे काहीही उपाय योजले तरी वेश्या कधीही पवित्र होणे नाही! 'न वेशजाताः शुचयः तथांगना'! त्या कायमच्या नापाक!. . . वारांगना कितीही तारुण्याने नि लावण्याने फुलली असली, तरी ती पातकांचीच वेल— जिच्यावर मोर चढून बसतो, सरडा सरसर चढतो नि कावळाही उड्या मारतो! संध्याकालीन मेघांच्या मोहक रंगाप्रमाणेच त्यांचा अनुराग अल्पजीवी! त्या वाऱ्याप्रमाणे चंचल; सुऱ्याप्रमाणे घातक! आणि पैसा लुबाडून झाला की त्या पिळून घेतलेल्या अळित्यांप्रमाणेच कफल्लक पुरुषाला फेकून देतात— त्यांना माणुसकी नाही; दयामाया नाही!'

पोटाची खळगी भरण्याखातर देह-विक्रयाच्या खतऱ्यात पडणाऱ्या नि कामपिसाट प्रतिष्ठितांचे बाजार वसविणाऱ्या ह्या रूपजीवा सोडाच; ह्याच तथाकथित अकुलीन वर्गातून उदय पावलेल्या नृत्य-गान-निपुण कलावतींबाबतही आपल्या समाजात एक प्रकारची तुच्छतेची भावना दिसून येते. महानंदा, कान्होपात्रा, पिंगला इत्यादी गणिकांची उदात्त भावनांची पुण्यचरित्रे कीर्तनात कितीही रंगोत; कलावतींच्या कलानंदांत आपल्या सांसारिक व्यथांचा कितीही विसर पडो; आपल्या वरिष्ठतागंडाचा नि त्यांच्या कनिष्ठतेचा आपणास सहसा विचार पडत नाही. ह्या समाजवादी, समतावादी युगातदेखील समाज कलावंतिणींना बहुशः हीनच लेखतो; अप्रामाणिक समजतो.

## 'चॅरिटीचा शो'

परंतु, श्रेष्ठतागंडाने पछाडलेल्या महाभागांचा मुखभंग करणारी एक वार्ता नुकतीच मिरतहून प्रसिद्ध झाली आहे. तिथल्या प्राप्तिकर खात्याने केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, ज्यांना समाज पतित म्हणून हिणवतो त्या वेश्याच डॉक्टर्स-वकील-व्यापारी-कंत्राटदार इत्यादी लब्धप्रतिष्ठितांहून अधिक प्रमाणात प्रामाणिक आहेत! कारण, ह्या प्रतिष्ठित मंडळींपैकी बहुतेकांनी आपल्या दहा टक्के उत्पन्नावरही प्राप्तिकर भरलेला नाही. पण बहुसंख्य वेश्यांनी मात्र प्राप्तिकर चोख भरलेला आहे. अक्षरशः देह झिजवून नि घाम गाळून मिळविलेल्या उत्पन्नावरचा 'इन्कम् टॅक्स' वेश्यांनी व्यवस्थित भरावा आणि ह्या बड्या धेंडांनी मात्र 'इन्कम् टॅक्स' चुकविण्याच्या

कारवायांतच आपली बुद्धिमत्ता खर्च करावी, हे चित्र पुरेसे बोलके नाही काय? हे बोलघेवडे बहाद्दर 'चॅरिटी शो'मध्ये 'चॅरिटींचा शो' करण्यात तरबेज असले तरी, ' चॅरिटी बिगिन्स अॅट होम' (प्रामाणिकपणाची सुरवात. स्वतःपासून– स्वतःच्या घरापासून– होते) हे साधे सत्य विसरतात. त्यांनी वेश्यांच्या रंग-महालात अप्रामाणिकपणा-खोटेपणा नि लबाडी ह्यांचा शोध घेण्याआधी; स्वतःच्या शानदार 'चेंबर्स'मध्ये, 'केबिन्स'मध्ये नि 'कन्सल्टिंग रूम्स'मध्ये हे दुर्गुण शोधले, तर समाजावर केवढे उपकार होतील ! अन्यथा–

"वेश्याहुनि अति नीच तुम्ही रे । स्वार्थी मांजरासम टपता' असेच ह्या करचुकव्यांबाबत म्हणावे लागेल !

□

॥ १९ ॥

# वेश्या-ग्राम !

*१५ एप्रिल, १९७९.*

ताजमहाल (की तेजोमहालय?) सुंदर आहेच; पण त्याच्या भोवतालचे उदात्त कल्पनेचे वलय त्याहून अधिक सुंदर आहे. ती उदात्त कल्पना ही की- 'संगमर्मरी ताजमहालची वास्तू म्हणजे उत्कट मोहब्बतीची निशाणी; शाही प्रेमाची शानदार कहाणी; शाहजहानच्या मुमताजवरील इश्काची दिलकश जबानी !' ऐतिहासिकदृष्ट्या साधार असेल वा नसेल; परंपरेने ह्या स्फटिकशुभ्र राजस इमारतीला राजस कल्पनेचे लेणे अर्पण करून तिचे सौंदर्य दुणावले आहे, ह्यात शंका नाही. ताजमहालच्या सुंदरतेला यमुनेच्या काठाने आणि यमुनेच्या सुंदरतेला ताजमहालने शोभा आणली आहे. परंतु यमुना नदीने जशी ताजमहालाची भव्य शुभ्रता आणि भगवान श्रीकृष्णाच्या प्रीतीची तेजोधवलता पाहिली, तशीच मोहब्बतीचा मुखवटा चढवून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली काळी कामुकताही पाहिली!. . . हाय! केवढे विचित्र हे कलिंदकन्येचे– यमुनेचे– विधिलिखित ! जिने अग्रेश्वर महादेवाच्या मंदिरातील घंटानाद शतकानुशतके ऐकला; राधेची निर्मळ भक्तिभावाची गीते ऐकली; भगवंताच्या बासरीचे अमृताहून गोड आलाप श्रवण केले; तिच्याच नशिबी वारांगनांच्या विषयासक्त पैंजणांचे छुमछुमाट ऐकणेही आले ! वेश्या-व्यवसायासाठी बदनाम झालेले 'बसाई खुर्द' नावाचे वारांगनांचे गाव उभे राहिलेले नि भरभराटलेले तिने पाहिले !

काही इतिहास-संशोधक सांगतात की, जसजसा ताजमहाल उभारला जात होता, तसतसा हा 'वेश्याग्राम'ही उभा राहत होता. 'बिहाडिया' नावाची गुन्हेगार जमात आग्र्याला यमुनेच्या काठी राहत होती. तिने चोऱ्या-माऱ्या-दरोडे सोडले आणि ताजमहाल

बांधणाऱ्या कारागिरांची व बांधकाम-अधिकाऱ्यांची कामवासना तृप्त करण्याचे काम अंगिकारले. — कारण ह्या कामी थोड्या श्रमांत भरपूर पैसा मिळत होता, मोलमजुरी करून उन्हातान्हात देह झिजविण्यापेक्षा छिनालगिरीच्या शय्येवर देह विकणे भरपूर किफायतशीर होते ! स्त्रियांनी शरीर विकण्याचा नि पुरुषांनी दलाली करण्याचा हा धंदा प्रारंभी प्रस्तुत जमातीच्या चंद्रमौळी झोपड्यांत, दरिद्री पालांत होत होता. पण लवकरच हे चित्र पालटले आणि दगडा-विटांच्या वेश्या-गृहांचे एक गाव (बसाई खुर्द) आकारास आले— दिवसा पेंगुळणारे अन् रात्री जागे होणारे ! सूर्यनारायण उगवला की चंद्रविकासी कमळांप्रमाणे ह्या गावातील ललनांची मुखकमले कोमेजत असत, आणि तो अस्ताला गेला म्हणजे त्यांचे रंगरंगोटीने सजलेले चेहरे प्रफुल्लित होत ! येथील हरेक रात म्हणजे कामवासनेची रंगीत संगीत वरात ! येथील कामिनींच्या गात्रा-गात्रांत अनंग आणि घराघरांत अनंग-रंगाने रंगलेले छपरी पलंग ! ताजमहालपासून थोड्याच अंतरावर असलेल्या ह्या वेश्या-ग्रामावर मुमताजमहालच्या एकनिष्ठ प्रेमाचा प्रभाव सहसा पडलाच नाही. येथे दर रात्री चंचल विषयलंपटतेचा चवचाल बाजार भरत असे. आणि येथील हरेक दिवाणखान्यात रंगलेला मुखडा गिऱ्हाइकाला विचारत असे—

*"बोलो जी तुम क्या खरीदोगे ?*
*यहाँ हर चीज बिकती है !"*

किंमत मोजा आणि पाहिजे तो माल विकत घ्या ! काय हवे ते मागा— तिरप्या नजरेचे तीर हवेत, की उंचावलेल्या बांकदार भुवयांचे धनुष्य हवे ? खळीदार गुलाबी गाल हवेत की नाजुक शराबी ओठांचे जाम हवेत ? चुंबनांची खैरात हवी की सुखशय्येची साथ हवी ? नुसता मिष्ठास मिठीचा मेवा हवा, की रतिसौख्याचा निःशेष ठेवा हवा ?...'

जुन्या जमान्यात ह्या गावी आजूबाजूच्या जहागीरदारांचे-जमीनदारांचे पुत्र कामयात्रेस येत असत, तर अलीकडील काळात बडे बडे हपीसर 'वीकएन्ड' सहलीसाठी येथे गुपचूप येऊन जात ! जो मोठी बोली बोलेल, त्या धनवंताबरोबर 'पहिली रात्र' साजरी करून आपल्या नव-तारुण्याचे भांडार लुटविण्यासाठी येथील कैक ताज्या कळ्या सिद्ध असत— आणि या अनाघ्रात कलिका बिछान्यावर चिरडण्यासाठी शेकडो उल्लू श्रीमंत येथे वारंवार पायधूळ झाडीत असत ! ह्या गावच्या वेश्याव्यवसायाचे अन्यत्र न आढळणारे वैशिष्ट्य म्हणजे सहजता— स्वाभाविकता. कारण, येथे जन्मापासूनच वेश्यावृत्तीचे बाळकडू मुला-मुलींना मिळत असे. येथील मुलींना गिऱ्हाइकांशी कसे वागावे नि मुलांना मध्यस्थगिरी कशी करावी, हे लहानपणापासून आपोआप अवगत होत असे. वेश्या-व्यवसाय हा आपला पिढीजात जन्मजात धर्मच आहे, अशी ह्या गावातील

स्त्री-पुरुषांची, मुलामुलींची धारणा! येथील वेश्या सहसा खऱ्याखुऱ्या प्रेमाच्या फंदात पडतच नसत. कारण 'जो आपल्या सभ्यतेशी अथवा पत्नीशी इमान राखू शकत नाही, तो वेश्येशी कसे इमान राखील?' असा त्यांचा ठाम युक्तिवाद!

असे हे वेश्या-ग्राम अलीकडेच उखडले गेले. इंदिरा-राजवटीतही येथील वेश्यावस्ती नि व्यवसाय उठविण्याचा अनेकदा प्रयत्न झाला होता, पण त्याला ह्या गावाने दाद दिली नव्हती! तथापि आता, आग्ऱ्याच्या पोलिस अधिकाऱ्यांनी शर्थीचा प्रयत्न करून धाडीपाठोपाठ धाडी घालून, येथील व्यवसाय बंद पाडला आहे. त्यासरशी येथील बहुतेक वारांगना निघून गेल्या. येथील नूपुर-झंकार खामोश झाले, गझल-ठुमऱ्या, नाच-गाणे बंद पडले!

. . .असे एखादे वेश्या-ग्राम, एखादी 'बदनाम' वस्ती पोलिस रेडस् घालून उठवू शकतील. पण अशी वरवरची मलमपट्टी समाजाच्या नैतिक आरोग्यास कितपत उपयुक्त ठरणार? वेश्यांचे गाव हटविता येईल अथवा गावोगावींच्या वेश्या-वस्त्यांवर कडक नियमांचे निर्बंधही कदाचित लादता येतील; पण नैतिक मूल्यांचा सार्वत्रिक ऱ्हास झालेल्या या जमान्यात गावोगावी (प्रतिष्ठित थरांतही!) झिरपलेली वेश्यावृत्ती कशी नष्ट होऊ शकेल? जेथील राजकारणात नि सार्वजनिक जीवनातदेखील 'वेश्याहून अति नीच' अशा सौदेबाजीचा— अप्रामाणिकपणाचा— संधिसाधूपणाचा सुळसुळाट झाला आहे; पैसा हेच सर्वश्रेष्ठ दैवत बनले आहे, अशा देशात हीन वेश्यावृत्तीचे निर्मूलन अशक्य आहे!

□

॥ २० ॥

# वारांगनेचा आरोप !

*१६ डिसेंबर १९७९*

एकंदरीत हा जमाना एकाधिकारशाहीचा धिक्कार करून लोकशाही स्वातंत्र्याचा पुकार करणारा आहे. पूर्वी कधीही लाभले नव्हते एवढे भाषण-लेखनाचे आविष्काराचे स्वातंत्र्य लोकांना लाभले आहे. पण त्याचा सदुपयोग वा दुरुपयोग करून, कोण कोणावर कसला आरोप जाहीररीत्या करील ह्याचा भरोसा उरला नाही ! ह्या युगात ग्राम-सिंह वा सर्कस-सिंह मुक्त वनराजांवर भेकडपणाचा बेछूट आरोप करू शकतील ! विती-दीड वितीची वळवळणारी गांडुळे शेषावर क्षुद्रतेचा आरोप करू शकतील ! नसानसांत जातीयवाद भरलेली, अथवा ठायी ठायी भ्रष्टाचारांचे उकिरडे फुंकणारी, लीडरे इतरांवर जातीयता नि भ्रष्टाचार ह्यांचे आरोप करू धजतील. . .

पण अशा जमान्यातदेखील, एखादी वारांगना एखाद्या प्रतिष्ठित सरकारवर 'धनलोभी दलाल' असा गलिच्छ आरोप करण्याचे धाडस करू शकेल काय ? 'शकेल काय' म्हणून काय विचारता ? 'पॅरीस' मधील एका पण्य-परीने—वेश्येने— अगदी हाच दलालगिरीचा (Pimp बनल्याचा) सनसनाटी आरोप फ्रेंच सरकारवर, न्यायालयाच्या कट्ट्यावर केला आहे. ही खट-नट उद्धट वारांगना आहे फ्रान्समधील स्ट्रासबर्ग ह्या नगरातील. ती रसिक-मनमोहिनी 'मखमली तारुण्य माझे' असा गर्व बाळगणारी असावी ! म्हणूनच ती स्वतःला 'इसा दि स्वेड' असे म्हणविते. गहिऱ्या तिरप्या नजरेची, बारीक कंबरेची, भरदार उरोजांची देणगी लाभलेली ही वार-ललना, कामयज्ञांत छटेल बाजिंद्यांच्या चित्तांची आहुती घेऊन, त्यांच्या वित्ताची राखरांगोळी करण्यात तरबेज असावी, असे तिच्या (न भरलेल्या) इन्कमटॅक्सवरून दिसून येते ! तिची सात वर्षांची

प्राप्तीकराची थकबाकी ५ लक्ष ७६ हजार फ्रॅन्क (म्हणजे सुमारे १२ लक्ष रुपये) आहे. म्हणजेच तिने वर्षाला सरासरी १ लाख ७० हजार रुपये इन्कम टॅक्स भरावा, ही अपेक्षा ! इन्कम्‌टॅक्स इतका, तर 'इन्कम' किती असेल ? फ्रान्सचा कायदा असा आहे की, वेश्या कोणत्याही पुरुषाबरोबर (त्याचीच रक्षा वा अंगवस्त्र म्हणून कायम) राहत नसेल अन् प्राप्तीकर रीतसर भरत असेल, तरच तिला आपला व्यवसाय करण्यास परवानगी मिळते. पण ह्या 'इसा दि स्वेड' नामक वारांगनेने सात वर्षांचा सुमारे १२ लाख रुपयांचा प्राप्तीकर धाब्यावर बसविला. आणि हा कर ताबडतोब भरण्याचा हुकूम तिजवर जेव्हा बजावण्यात आला, तेव्हा तिने 'हा करभार सोसणे मला शक्य नाही' असे न्यायाधीशांना सांगितले. इतकेच नव्हे, तर तिने बेधडक युक्तिवाद केला की, 'वेश्येच्या द्रव्यावर जगणे ही जर दलालगिरी असेल, तर ही निंद्य दलालगिरी करणाऱ्या सरकारला 'पिंप' म्हणजे दलालच म्हटले पाहिजे. आम्हा वारांगनांच्या उत्पन्नांतून, प्राप्तीकराची दलाली घेणारे फ्रेन्च शासन 'दलाल'च नव्हे तर काय ?'...

हर हर ! मोठमोठ्या विरोधी-पक्ष नेत्यांनाही अशी चिखलफेक सरकारवर करता आली नसेल; पण त्या पॅरिसच्या स्वैरिणीने, साधासुधा नव्हे, तर 'पिंप-गिरी'चा आरोप सरकारवर करावा ना ? वारांगना कोणाच्या अब्रूवर केव्हा वार करतील ह्याचा नेम नाही, म्हणूनच त्यांच्या वाऱ्यालाही उभे राहू नये, असा जो उपदेश आपल्या बाळबोध पूर्वजांनी केला आहे, तो उगाच नव्हे !

पण सरकार तरी काय करणार ? जेथे जेथे अतिरिक्त प्राप्ती आहे, तिथे तिथे प्राप्तीकर बसविणे आधुनिक सरकारांना क्रमप्राप्तच आहे. मग ही प्राप्ती वारांगनावृत्तीने विपुल संपदा जमा करणाऱ्या बड्या व्यापाऱ्यांची असो अथवा खुद्द वारांगनांची असो ! म्हणूनच, त्या धंदेवाईक मदनिकेचा प्राप्तीकर वसूल करण्याची कारवाई फ्रेन्च शासनाला करणे भागच होते. परंतु तो टाळण्यासाठी त्या उद्धट वार-वनितेला बेछूट आरोपाचाच अवलंब करणे भाग होते काय ? तिचा हा आरोप न्यायालयात क्षणभर तरी टिकेल काय ? त्यापेक्षा प्राप्तीकर कसा चुकवावा, ह्याचे पद्धतशीर शिक्षण तिने आमच्या इन्कम टॅक्स-एक्सपर्टांकडून अथवा काही राजकीय पुढाऱ्यांकडून का घेतले नाही ? जिथे लक्षावधी रुपयांचे आर्थिक भांडवल गुंतलेले असते, अशा व्यवसायांत बडे उद्योगपती खोटे दस्तऐवज करून व न झालेले खर्च दाखवून प्राप्तीकर घटवू शकतात, तिथे त्या गुलबदनीला बराच मोठा प्राप्तीकर गुल करून दाखविणे अशक्य होते काय ? कारण, तिच्या व्यवसायाचे मुख्य भांडवल द्रव्यसंपदा नसून, देह-संपदा, रूप-संपदा हेच होय ! म्हणून तर संस्कृतात वेश्यांना रूपाजीवा म्हणतात ! एका विनोदी लेखक-महाशयाने त्यांना 'सेक्स टॅक्स कलेक्टर' म्हटले आहे. म्हणजे त्या स्वतःच कामक्रीडा-पटू

शौकिनांकडून करमणूककर वसूल करतात ! अशा ह्या वर्गाकडून सरकारने कर-वसुली करणे 'इसा दि स्वेड'ला मंजूर नसावे. ईश्वराच्या अथवा निसर्गाच्या बँकेकडून सुंदर देहाचे भांडवल लाभलेल्या ह्या वर्गाच्या व्यवसायावर कर लादण्याचा मानवी सरकारला अधिकारच नाही, असे तिचे म्हणणे दिसते ! पण ते म्हणणे, सभ्यतेने मांडण्याऐवजी सरकारलाच 'द्रव्यलोभी दलाल' म्हणून शिवी हासडण्याचे काही प्रयोजन नव्हते !

ही शिवी असभ्य तर आहेच, पण तर्कदुष्टही आहे. तथापि, आमच्या एका जहाल मित्राच्या दृष्टाने 'जगातील अनेक सरकारे (वारांगनांची नव्हे, तर—) बड्या बड्या व्यापाऱ्यांची नि भांडवलशाहांची 'दलाल' च होत ! काही सन्मान्य अपवाद वगळता, तोंडाने समाजवादाचा घोष करीत असतानाच, सरकारातील कैक महाभाग भांडवलदारांचीच दलाली करीत असतात. एरवी, ५-१० वर्षांतच एखादा आमदार वा नामदार रंकाचा राव कसा होतो? नाइलाजाने का होईना, निवडणूक जिंकण्यासाठी पुंजीपतीकडून काही साहाय्य घेतल्यानंतर, त्याची 'दलाली' करणे त्याला भागच असते". . . पण सरकारात उच्चासनी बसलेले काही नरपुंगव केवळ भांडवलशहांचीच दलाली करतात असे नाही. ज्या जातीच्या-जमातीच्या आंधळ्या पाठिंब्याने ते निवडून आलेले असतात, त्या जाती-जमातींची दलाली करण्यासही ते मजबूर होतात. मग ते तोंडाने जातीयवादाचा कितीही निषेध करोत ! सारांश, जेथे खरी लोकशाही नि खरी समाजवादी समाज-रचना रुजलेली नाही, अशा देशांत सरकार काहीना काही प्रमाणात कोणाची ना कोणाची तरी दलाली करीतच असते !

□

॥ २१ ॥

# मद्यपी विद्यार्थी !

*१७ डिसेंबर १९७२*

काकासाहेब खाडिलकरांनी तरुणांपुढे ज्याचा उदात्त आदर्श ठेवला त्या कचाचा आत्मा कळवळला असेल; 'देवयानी, ठेव तो प्याला खाली ! तुझ्या विमल अधरांना त्याचा स्पर्शही होता कामा नये' असे म्हणणाऱ्या त्या आदर्श विद्यार्थ्याचा अंतरात्मा तळमळला असेल; शुक्राचार्यांच्या संतापाची पर्वा न करता ज्याने देवी सरस्वतीपुढील मद्य-घट लत्ताप्रहाराने फोडले तो तेजस्वी बृहस्पति-पुत्र 'धिक्कार धिक्कार' म्हणून स्वर्गातून ओरडला असेल— ती विद्यार्थी-मद्यपानाची वार्ता ऐकून ! अधिकृत शैक्षणिक-गोटांतून चिंताजनक बातमी बाहेर आली आहे की, भारतात— विशेषतः केरळ, पंजाब, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगाल ह्या भागांत विद्यार्थ्यांमधील मद्यपानाची प्रवृत्ती झपाट्याने वाढते आहे. केरळमधील विद्यार्थ्यांत ज्या चकमकी झाल्या, त्यांत भाग घेणारे विद्यार्थी त्या वेळी नशेत होते. पतियाळा, लुधियाना, मोगा येथे हिंसाचार करणारे विद्यार्थी अटक होण्याच्या वेळी झिंगलेले होते. कानपूर, अलाहाबाद, वाराणसी, गाझियाबाद, कलकत्ता याही शहरांतून विद्यार्थ्यांनी दारूच्या नशेत गैरवर्तन व गुंडगिरी केल्याच्या बातम्या आहेत. पंजाबमध्ये तर आमच्या कॉलेजकुमारांनी मद्यपानाचा कहर केलाय ! इतर कोणत्याही आशियाई देशापेक्षा पंजाबमधील मद्यपी विद्यार्थ्यांचे प्रमाण (१५ टक्के) अधिक आहे. आपल्या महाराष्ट्रातील कॉलेजांवरही मदिरादेवीने कृपाकटाक्ष टाकलाच नाही, असे नाही ! आमच्या एका प्राध्यापक मित्राने एका विद्यार्थी-तळीरामाला याबाबत खडसावले असता तो विद्यार्थी उद्गारला, "काय बिघडलं दोन-चार पेग ठोकून कॉलेजात आलो तर ? हाय कंबक्त ! तुम्हाला काय मदिरेची लज्जत कळणार ? तुम्ही कधी

प्यायलाच नाहीत ! आमची गोष्ट तशी नाही–

*पी लिया करते है*
*जीने की तमन्ना मे कभी*
*डगमगाना भी जरुरी है*
*संभलने के लिये. . ."*

### लज्जा वाटत नाही !

मदिरा-पानाचे समर्थन करणारे असे शेकडो शेर आज विद्यार्थ्यांच्या जिव्हाग्री नाचत आहेत. पूर्वी एखाद्या कॉलेजात एखादा विद्यार्थी पिणारा असे, पण त्याची त्याला शरम वाटत असे. आपण मोठे 'पुरोगामी' कर्म करीत आहोत, असे त्याला बिलकूल वाटत नसे. परंतु, आज विद्यार्थ्यांत मदिरा-पान वाढीस लागले आहे. एवढेच नव्हे, तर त्याबद्दल लाज-लज्जाही वाटेनाशी झाली आहे ! बरे, आर्थिक दुःस्थितीने गांजल्यामुळेच हे छात्र, आपला दुःखी दिल शांत करण्यासाठी मधुबालेच्या कृपाछत्राखाली जातात, असेही निखालस म्हणता येणार नाही. कारण, अमली पदार्थ-सेवनाची चटक श्रीमंत-वर्गातील विद्यार्थ्यांनाच अधिक लागल्याचे आढळून येते. मग मानसिक-बौद्धिक ताण नि वैफल्य हे या व्यसनाधीनतेचे कारण असेल काय ? असेल, असू शकेल. पण ते केवढ्या प्रमाणात ? साऱ्या आशियाई देशांचा आमच्या मद्यपी विद्यार्थ्यांनी रेकॉर्ड ब्रेक करावा इतके वैफल्य त्यांच्यात खरोखरच माजले आहे का ?

### पुरोगामी टूम !

प्रत्येक व्यसनाचे, सामाजिक दुर्गुणाचे वा अनैतिकतेचे खापर आर्थिक दारिद्र्याच्या अथवा 'वैफल्या'च्या बोडक्यावर फोडण्याची एक 'पुरोगामी' टूम आमच्या बुद्धिजीवी वर्गात बोकाळली आहे. जणू काही 'पोट लागले पाठीशी, हिंडविते देशोदेशी' असे म्हणणाऱ्या तुकारामांच्या काळी दारिद्र्य वा वैफल्य नव्हतेच ! 'काय करावे, कोठे जावे ? नुमजे मजला की विष खावे' असे उद्गारणाऱ्या केशवसुतांच्या जमान्यांत सारी आबादीआबादच होती ! आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय तरुणांच्या मस्तकावरच निष्ठुर नियतीने वैफल्याचा सारा बोजा ठेवून दिला !

### दोषाचे खरे धनी

आम्ही आमच्या उन्मार्गगामी अजाण तरुणांना तेवढासा दोष देत नाही. दोषाचे खरे धनी आहेत (१) विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे न शिकविता आपल्या पक्षस्वार्थासाठी

भडकविणारे राजकीय पुढारी, आणि (२)'हर हर न हिंदुः न आंग्लः' अशी उठवळ संस्कृति जोपासणारा नवा उच्चभ्रू वर्ग !. . . या दोघांनाही नैतिक मूल्यांचे वा सामाजिक शिस्तीचे फारसे सोयरसुतक उरलेले नाही. 'बर्थ डे-पार्टी' असो वा एखादा ग्रंथ प्रकाशन समारंभ असो, २-४ हजार रुपयांची दारू उडविणे ज्यांना भूषणावह वाटते, त्यांनी मदिरापानाला प्रतिष्ठा आणून दिली आहे. दारू न पिणे हे मागासलेपणाचे अरसिकतेचे लक्षण ठरू लागले आहे ! अशा समाजातील 'डॅडी' चे वा 'पप्पां'चे चिरंजीव कॉलेजच्या कुंजात जर अंगूरबालेचे दोस्त बनले तर नवल कसले? विद्यार्थी उपदेशाने शिकत नसतात, तर उदाहरणानेच शिकतात !

□

॥ २२ ॥

# विद्यार्थ्यांना वाळवी जडली !

*१५ जुलै १९७३*

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन हे केवळ 'वॉटर गेट' प्रकरणामुळेच परेशान झाले आहेत असे नाही, तर अमेरिकन तरुणांत— विशेषतः विद्यार्थ्यांत— जी व्यसनाधीनता झपाट्याने बोकाळत चालली आहे, तिच्यामुळेही सचिंत झाले आहेत. अमेरिकन तरुणांचे मद्यप्राशन आता तसे मागे पडले आहे. कारण, मद्याहूनही अधिक धुंदी (आणि तीही ताबडतोब) आणणाऱ्या अमली पदार्थांवर त्यांची मुहब्बत जडली आहे ! एका दमातच वैफल्याच्या गर्तेतून धुंदीच्या दिलखुष स्वर्गात घेऊन जाणारे अफीमबाज नि गांजेकस विद्यार्थी बेछूटपणे वडीलधाऱ्यांना विचारतात—

***वो चीज जिसे आप कहते हो बहिश्त***
***सिवाए 'मारिजुआना-हाशिश्' क्या है ?'***

(ज्याला आपण 'स्वर्ग स्वर्ग' असे म्हणून गौरविता, तो 'मारिजुआना नि हशिश' याहून अधिक वेगळा का आहे ?)

कोणताही धरबंध नाही, कोणतेही ध्येय नाही; कोणतीही ठाम तात्त्विक भूमिका नाही, अशा या तरुण-वर्गातील अमली द्रव्यांचा जबरदस्त अंमल पाहून निक्सन अलीकडेच उद्गारले— "ही व्यसनाधीनता म्हणजे आमच्या विद्यार्थिवर्गाला नि संस्कृतीला लागलेली वाळवी आहे !" इतर अनेक भयावह गोष्टींप्रमाणेच ही वाळवीही आमच्या देशात; किती झपाट्याने 'इंपोर्ट' झाली, हे आपण पाहतोच आहोत ! संस्कृतीला वाळवी जडविण्यात आमचे पुरोगामी नौजवान अमेरिकन तरुणांना लवकरच चारी मौढे चीत करतील यात शंका नाही.

पण ह्या वाळवीहूनही एक भयानक वाळवी आमच्या विद्यार्थ्यांना जडली आहे आणि ती म्हणजे राजकारण-ग्रस्त भंपकपणाची ! ह्याचे प्रत्यंतर गेल्या शनिवार-रविवारी येथे पार पडलेल्या 'नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया' च्या राजेशाही परिषदेत पाहावयास मिळाले. 'राजकारणापासून विद्यार्थी चळवळ अलग ठेवावी', असा गोंडस उपदेश सर्वच राजकारणी मुखंड करतात– पण तो आचरणात आणतील तर शपथ ! म्हणूनच रजनी पटेल ह्यांच्या मार्गदर्शनाखालील 'मुंबई युवक काँग्रेस'ने भरविलेल्या एका भाषणबाज राजकीय कुंभमेळयाचे स्वरूप, या तथाकथित अ.भा.परिषदेला प्राप्त झाले. एकूण सर्वच कार्यक्रमावर सत्तारूढ पक्षाची घनदाट सावली पडली होती. येथे विद्यार्थ्यांना आदरणीय वाटणारे शिक्षण-तज्ज्ञ नि प्राचार्य यांच्याहून केंद्रीय नि प्रांतीय मंत्री-गणांचीच गर्दी अधिक उसळली होती ! संरक्षण उत्पादनखात्याचे मंत्री विद्याचरण शुक्ल; उद्योग विकासमंत्री सी. सुब्रमण्यम्; रेल्वेमंत्री, श्री. एल. एन. मिश्रा इत्यादी महाभागांचा विद्यार्थी शिक्षण-क्षेत्राशी साक्षात संबंध नसताना 'बीचमें मेरा समाजवाद' करण्याचा चान्स त्यांना या परिषदेत भरपूर मिळाला. पण त्या घोषणाबाज लेक्चरबाजीतून विद्यार्थ्यांना कसले मार्गदर्शन मिळाले खुदा जाने !

**भपकेबाज थाट**

इंदिराजींच्या व्याख्यानाचा कार्यक्रम वगळल्यास अन्य कार्यक्रमांत प्रतिनिधींना फारसा रस नव्हता. बरेचसे प्रतिनिधी सिनेमागृहे, हॉटेल, आलिशान दुकाने ह्यांना उदार आश्रय देऊन 'जिवाचीच मुंबई' करण्यात मशगुल होते ! विदर्भातून आलेले अनेक प्रतिनिधी तर आमदार निवासातच तळ ठोकून होते म्हणतात ! प्रतिनिधी ज्या 'मुसाफिरखान्यां'त उतरले होते, तेथे गाद्या-गिर्द्या, लोड, तक्के इत्यादी सुखसोयींची रेलचेल होती. आणि तरीही राष्ट्राच्या कैक 'भावी आधारस्तंभां'चा दिल तेथे रमत नव्हता. म्हणूनच करमणुकीचा कार्यक्रम– त्यावरही १०-१२ हजार रुपये बरबाद झाले म्हणतात ! सारांश, ही परिषद विद्यार्थ्यांची वाटतच नव्हती. एखाद्या ए.आय.सी.सी अधिवेशनाचा भपकेबाज थाट नि घाट या राजकारण-ग्रस्त विद्यार्थी परिषदेला आला होता. आणि त्याखातर किमान ३-४ लक्षांची चांदी उडाली असावी ! महाराष्ट्रातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ही उधळपट्टी पाहून एखाद्या तरी नेत्याने परिषदेच्या संयोजकांना सुनावणे आवश्यक होते–

*ही इष्ट नव्हे दारिद्र्यात बहाली ।*
*नाच-रंग दीप्त महाली ! ॥*

याहूनही उद्वेगजनक गोष्ट म्हणजे, राजकीय पक्षाच्या अधिवेशनांप्रमाणेच येथेही भांडण-तंट्यांना ऊत आला होता. मधु पाटील-गटाविरुद्ध खूप काहूर उठले आणि 'पी. के. सावंत हटाव' मोहिमेचाही नारा दुमदुमला !. . . विद्यार्थ्यांच्या परिषदेला असे राजकीय कोंबडे-झुंजीचे ग्राम्य स्वरूप प्राप्त होणे इंदिराजींनाही रुचले नाही. म्हणूनच त्यांनी आपल्या भाषणात 'पक्षीय नि पक्षांतर्गत भांडणापासून अलिप्त राहण्या'चा परखड उपदेश केला. पण ही राजकारणाची वाळवी केवळ उपदेशाच्या फवाऱ्याने नाहीशी होईल काय? त्याकरिता आमचा विद्यार्थि-चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोणच आमूलाग्र बदलला पाहिजे ! विद्यार्थि संघटनांनी राजकीय नेत्यांना चार हात दूर ठेवले पाहिजे. एरव्ही त्यांच्या संसर्गाने राजकारणाची वाळवी लागून, गटबाजीला ऊत येऊन, भंपक भाषणबाजीची आदत जडून, विनायकाचा वानर झाल्याविना राहणार नाही !

□

॥ २३ ॥

## कॉपी-बहाद्दर

*१२ एप्रिल १९७४*

भोपाळ येथील मोतीलाल सायन्स कॉलेजातील कॉपीबहाद्दर विद्यार्थ्यांनी कॉपी-प्रतिबंधाचा निषेध म्हणून पुकारलेला बहिष्कार, आणि आग्रा येथील इक्रसानंद-कॉलेजच्या उपप्राचार्यांचा कॉपी-बहाद्दर छात्रांनी केलेला भीषण खून, या दोन्ही घटनांनी कोणत्याही माणसाची बुद्धी सुन्न आणि मन खिन्न झाल्याविना राहणार नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या असमर्थनीय गुन्हेगारीचे कठोर परीक्षण आम्ही 'दैनिक लोकसत्ते'च्या दि. ८ एप्रिलच्या अग्रलेखात सविस्तर केलेच आहे.

परंतु, आवारा कॉलेज कुमारांना कठोर वाक्ताडन करीत असतानाच आपल्या समाज-जीवनाच्या अन्य क्षेत्रांतील कॉपी-बहाद्दरांचे जथे नजरेपुढे उभे राहिले ! मौज ही की, कॉपी करणारा विद्यार्थी दंडनीय ठरतो, तर अन्य क्षेत्रांतील हे नक्कल-नारायण लब्धप्रतिष्ठित अक्कलवान ठरतात ! इंग्लंड-अमेरिकेचा कित्ता डोळ्यांपुढे ठेवून आमच्या या लीडर मंडळींनी लोकशाहीची कॉपी केली. पण तीही नीट साधेल तर शपथ ! लोकशाहीचा मुखवटा धारण करून भंपक पुढाऱ्यांची झुंडशाही नि गुंडशाही अवतीर्ण झाली ! कोणताही प्रश्न हिंसाचाराचे थैमान घालून रस्त्यावर सोडविण्याची प्रवृत्ती या लब्धप्रतिष्ठित झुंड-गुंडांनी वाढीस लावली. — आणि विद्यार्थ्यांनी पहिली कॉपी केली ती या बेछूट पुढाऱ्यांचीच ! यथा नेता, तथा जनता ! मग यौवनमत्त कॉलेज-कुमारांनी कॉपीचा हक्क बजावण्यासाठी आपल्या प्राचार्यांचा खून करण्याचा क्रांतिकारक मार्ग अनुसरला तर नवल ते कसले ? पाश्चात्त्यांच्या लोकशाहीचीच नव्हे, 'समाजवादा'चीही कॉपी आमचे 'पुरोगामी' पुढारी करू पाहत आहेत. एवढ्यावरच ही नक्कलबाजी थांबत नाही, तर

भारतातले सर्वच राजकीय पक्ष संधिसाधूपणा, पक्षांतर, जनता- अनुनयतंत्र आणि भ्रष्टाचार या विषयांत एकमेकांची कॉपी करीत आहेत !

परंतु, 'राजकीय क्षेत्रांत सर्व गुन्हे माफ' म्हणून या क्षेत्रातील उथळ नक्कल-नवाझांना सोडून दिले तरी काय? इतर क्षेत्रांतही नक्कल-बाजीने धुमाकूळ माजविला आहे. आईबापांना पप्पा नि ममी म्हणणारी बालके वाढदिवसाचे पेढे वाटण्यापेक्षा 'बर्थ डे केक' कापण्याचा साहेबी सोपस्कार अधिक पसंत करीत आहेत. आणि तसे का न व्हावे? कारण, आता मुलांकडून 'शुभंकरोति' म्हणून घेणारी मातृदेवता झपाट्याने लुप्त होत असून, मिस्टरांबरोबर नटून थटून शॉपिंगला निघालेली स्नो-पावडर चर्चिता 'मड्डम' ठायी ठायी निर्माण होऊ लागली आहे ! पाश्चात्त्य वेशभूषेची, केशभूषेची नि रंगरंगोटीची 'कॉपी' आधी आमच्या सिनेनट्या करतात आणि त्या नट्यांच्या फॅशन्सची नक्कल नखरेल पुरंध्री हुबेहूब वठवितात ! अंग-प्रत्यंगाचे उठावदार दर्शन घडविणारी अर्धनग्न वेशभूषा, मदनरंगी मेकपची कारागिरी; 'हेअर स्टाइल्स'च्या आहारी गेलेले केशकर्तन; मस्तकी आरूढ झालेले नाना प्रकारचे केशकिरीट इत्यादी सर्व बाबतींत लवकरच आमच्या कॉपी-बहाद्दर ललना पॅरिसच्या पऱ्यांनाही मागे टाकतील !

साहित्य-क्षेत्रातही कॉपी-कौशल्याने सपाटून प्रगती केली आहे. आमचे डझनावारी नाटककार, कथाकार नि कवी कॉपी-लोलुप डोळे पश्चिमेकडे लावून बसले आहेत. रॉबर्टचा रामराव, सॅम्युअलचा शामराव, पर्ल व्हाइटची मुक्ता ढवळे, सेंट थॉमसचा संत तुकाराम असे 'शुद्धीकरण' करून हे महाभाग मराठीचिये नगरी 'युगप्रवर्तकत्वाचा' सुकाळू करीत आहेत ! कोणी निंदा कोणी वंदा, यांचा कॉप्या करण्याचा धंदा अबाधित चालूच आहे.

म्हणूनच कॉलेजच्या प्राचार्यांनो ! कशाला रे विद्यार्थ्यांच्या कॉपी-कौशल्याला हरकत घेऊन, आपले प्राण धोक्यात घालता? कशाला एवढी शिस्तीची नि सभ्यतेची चाड बाळगता? हा कॉपी-बहाद्दरांचा कंगाल देश आहे, हे तुम्हांस ठाऊक का नाही?

□

॥ २४ ॥

# फाशीचा इशारा !

*७ एप्रिल १९७९*

अखेर मुंबई उच्च न्यायालयानेही पुणे जिल्हा न्यायालयाच्या निर्णयावर एकमताने शिक्कामोर्तब केले. राजेंद्र जक्कल, दिलीप सुतार, शांताराम जगताप, मुन्वर शा ह्या चौकडीला पुणे येथे फर्मावण्यात आलेली 'मरेपर्यंत फाशीची सजा' कायम केली. दहा निर्घृण खून केल्याच्या आरोपावरून झालेली ही देहान्त शासनाची शिक्षा ! १९७६ च्या मकर संक्रांतीपासून खुनांची जी संक्रांत ह्या चौघा तरुण गुन्हेगारांनी पुण्यावर आणली, ती २३ मार्च १९७७ पर्यंत साऱ्या पुण्यालाच नव्हे, तर महाराष्ट्रालाही भयचकित करीत होती. ह्या हत्याकांडात पहिला बळी पडला ह्या चौघांच्या तथाकथित मित्राचा— प्रकाश हेगडेचा. आणि अखेरचा बळीही मित्राचाच म्हणजे अनिल गोखलेचा ! दोघांनाही अमानुषपणे ठार मारून जलसमाधी देण्यात आली. परंतु ह्या आदि-अंतापेक्षाही ह्या हत्याकांड कथेचा मधला कळस-अध्याय (क्लायमॅक्स) फारच भयानक नि अंगावर शहारे आणणारा होता. विधिज्ञ अच्युतराव जोशी, उषाताई जोशी नि त्यांचा मुलगा आनंद ह्यांचे गळफास लावून झालेले खून ही त्या नीचतम कळसाची— अभ्यंकर कुटुंबियांच्या हत्येची— जणू किळसवाणी नि क्रूर नांदी होती ! संस्कृतचे प्रकांडपंडित, महाभारताचे संशोधक महामहोपाध्याय काशीनाथशास्त्री अभ्यंकर ह्यांना गळफास लावताना साक्षात यमदूताचे हात थरथरले असते, पण ह्या 'सुशिक्षित' गुन्हेगारांचे सराईत हात जराही थरथरले नाहीत ! इतकेच नव्हे, तर काशीनाथशास्त्र्यांसह त्यांच्या पत्नी इंदिराबाई, नातू धनंजय, नात जाई नि वृद्ध मोलकरीण सखूबाई ह्यांनाही ह्या चौकडीने मृत्यूच्या जबड्यात विनादिक्कत लोटून दिले ! ह्या एकाहून एक अमानुष कृत्यांची दुर्गंधी इतकी

शिसारी आणणारी आहे की, प्रस्तुत चौकडीने वापरलेल्या सुगंधी द्रव्याच्या लक्षावधी बाटल्या फोडल्या तरी ती लोपणारी नाही !

साहजिकच न्यायालयाने त्यांना ह्या घोर खुनाबद्दल देहान्त शासन दिले. 'खुनी गुन्हेगार हा अखेर माणूसच असतो, त्याचा भूतकाळ कलंकित असला तरी भविष्य काळात तो सुधारू शकतो, म्हणूनच झुल्फिकार अली भुट्टो असो, की जोशी-अभ्यंकर-हत्याकांडाची चौकडी असो, फाशीची शिक्षा कुणालाही होता कामा नये,' असा महामानवतावादी दृष्टिकोण काही महाभाग धारण करतात ! पण हा दृष्टिकोण लोकव्यवहाराच्या नि लोकधारणेच्या कसोटीवर टिकणारा नाही— प्रचलित कायद्यालाही तो मंजूर नाही. आणि म्हणूनच न्यायालयाने अपराध जेवढा मोठा तेवढीच शिक्षाही मोठी— म्हणजे देहान्ताचीच— फर्माविली ! ह्या चारीही गुन्हेगारांचे वय अवघे विशी-पंचविशीतले, शिवाय ते 'सुशिक्षित', म्हणून सजेची तीव्रता कमी करावी, असेही न्यायालयाला वाटले नाही. कारण ह्या सुशिक्षित तरुणांकडून घडलेले खून गफलतीने, गैरसमजुतीने अथवा अजाण भाबडेपणाने किंवा 'भावनाप्रक्षोभाने' झालेले नव्हते, तर पूर्ण 'विचारांती' झालेले होते. आणि ते 'साधी भोली शक्लवाले होते है जल्लाद भी !' हीच उक्ती सार्थ करीत होते ! ते सुशिक्षित असल्यामुळे तर, त्यांच्यावर संस्कृतीला काळिमा न लावण्याचे बंधन अधिकच असावयास हवे होते ! पण ह्या गुन्हेगार वृत्तीच्या तरुणांनी आपल्या 'सुशिक्षित'पणाचा उपयोग खून सफाईदारपणे करण्यात केला. त्यांनी केलेले सर्व खून कोणालाही संशय येऊ नये अशा वेळी— रात्री आठ-साडेआठच्या बेसावध वेळी— केले. श्वान पथकांना सुगावा लागू नये म्हणून त्यांनी सुगंधी द्रव्ये वापरली, हाताचे ठसे उमटू नयेत म्हणून हातमोजे घातले, रक्ताचा थेंबही न सांडता त्वरित खून व्हावा म्हणून दोऱ्यांचे गळफास वापरले, खुनांपूर्वी टेलीफोनच्या तारा कापण्याची खबरदारी त्यांनी घेतली ! त्यांनी गुन्हेगारीच्या वाङ्मयाचा अभ्यास केला होता.

हाय हाय ! ह्या तरुणांची हीच बुद्धिमत्ता नि साहसी वृत्ती सत्कार्याकडे वळली असती तर ? हेच तरुण स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवादी वातावरणात जन्मले असते तर ? तर ह्यांच्यातून मदनलाल धिंग्रा— भगतसिंग निर्माण झाले असते ! पण ही आयुष्याला कोणतेही उदात्त तत्त्वाचे अधिष्ठान न लाभलेली युवाशक्ती गुन्हेगारीच्या नरकाकडे वळली. ही खुनी गुन्हेगार चौकडी 'कला महाविद्यालया'त कलेचे शिक्षण घेतलेली होती, चित्रकलेत हुशार होती. जगतापने नाटकांत काम केले होते. सुतार व्यायामपटू होता, शारीरिक शिक्षण त्याने घेतले होते. आणि ह्यांचा म्होरक्या राजेन्द्र जक्कल छायाचित्रणातच नव्हे, तर प्रणयातही कुशल होता ! पण त्यांच्यांतील कलात्मा समाजोपयोगी होऊच शकला नाही, त्याचा विकास झाला नाही. हे कलात्मे मोहात्मे बनले,

दुरात्मे बनले. आकाशातील तेजाळ तारकापुंजांत रमण्याऐवजी गुन्हेगारीच्या चिखलात लोळणेच त्यांनी पसंत केले !

म्हणूनच ह्या तरुणांची भयानक कृत्ये आणि त्यांचे त्यांना प्राप्त झालेले कठोर शासन, हे आजच्या समाजव्यवस्थेवरील विदारक भाष्य ठरते. 'सन्मार्गाने वागल्यास सुख-वैभव लाभत नाही; मोठमोठी तत्त्वे केवळ सोनेरी मुलाम्यासारखीच वापरावयाची असतात, जोपर्यन्त गुन्हा शाबीत होत नाही तोपर्यन्त सर्वच साव असतात; आयुष्याचे वास्तव नि खरे 'ध्येय' म्हणजे येन केन प्रकारे (पण अल्प श्रमात-) भरपूर पैसा मिळवावा नि खाना-पीना-मौज उडाना !' अशी जी वैफल्यग्रस्त तरुणवर्गाची विकृत विचारसरणी बनली आहे, तिच्यातूनच भीषण गुन्हेगारीचा जन्म होऊ शकतो. तरुणांच्या साहसाला, काहीतरी 'थ्रील' जीवनात असावे, ह्या स्वाभाविक आकांक्षेला वेळीच योग्य वाट मिळाली नाही की, महाविद्यालयाचे विद्यार्थीही अट्टल खुनी होऊ शकतात, हाच ह्या चौघांना झालेल्या फाशीचा इशारा आहे. तो विचारवंतांनी नि नेत्यांनी लक्षात घेतला पाहिजे !

॥ २५ ॥

# अदालतीची इन्सानियत !

*५ नोव्हेंबर १९८३*

'काय ? माझी फिर्याद हा न्यायाधीश पाहत नाही ?. . . काही चिंता नाही. पालकराजा माझा मेव्हणा आहे. त्यास विनंती करून, भगिनीला भीड घालून, दुसरा न्यायाधीश आणवितो !'

— मृच्छकटिक नाटकातील शकार

'बळी तो कान पिळी' हाच खाक्या जिथे असतो, तिथे माणुसकी कुठली ? न्याय-देवतेचे अस्तित्व कोठले ? 'एकाने दुसऱ्यास गिळावे' हाच तिथे एकमेव न्याय ! तिथे न्यायदेवता गुंड-पुंडांची, धनमत्तांची वा सत्ताधीशांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे बटीक झालेली असते, एकतंत्री राजेशाहीत वा हुकूमशाहीत न्याय-संस्थेला हे असे स्वरूप अपरिहार्यपणे प्राप्त झाल्याचे इतिहास-अभ्यासकांना दिसून येते. अशा राजवटीत न्यायदेवता न्याय देतच नाही असे नाही. पण सत्ताधीशांच्या राजकारणास बाधा येणार नाही, अशा चतुराईने 'न्यायदान' होत राहते !. . . अर्थात, पुण्यश्लोक नळराजा, हरिश्चंद्र, दाशरथी राम इत्यादी पुराणप्रसिद्ध राज-राजेश्वर, आणि 'तुला देहान्त शासनाखेरीज दुसरे प्रायश्चित्त नाही' असे रघुनाथराव पेशव्यांना ठणकावून सांगणारे न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे, इत्यादी थोर न्यायोपासक त्या जुन्या राजेशाही-युगातही चमकून गेलेच. पण एकंदरीत न्यायदेवतेचे शहाणपण राज-सत्तेपुढे फिक्कट पडते, असाच त्या युगाचा कौल आहे ! म्हणूनच चोर सोडून संन्याशाला सुळी देणाऱ्या बेबंद राजांच्या लोककथा शतकानुशतके प्रचलित आहेत ! याच संदर्भात 'मृच्छकटिक' नाटकातील न्यायसभेचे ते दृश्य आजही उद्बोधक ठरावे. . . 'अरे ए शोधनका, जा. न्यायाधीशाला कळव की, राजशालक

संस्थानक फिर्यादी म्हणून आले आहेत,' ह्या उर्मट शकारोक्तीने सुरू होणारा तो अंक,

*अधम किति पालका असशि भूपा*

*न्यायपथ सोडसी पाप-कूपा !*

ह्या चारुदत्ताच्या सात्त्विक संतापाच्या उद्रेकाने समाप्त होता !. . . पण तो शकारांचा नि चारुदत्तांचा जमाना उलटला, अनेक शतके उलटली आणि भारतात ब्रिटिश राजवट आली ! प्रगत ब्रिटनची ती राजवट ! तिच्यातील न्यायदान एकंदरीत चोखच होते. तथापि त्या गोऱ्या साहेबाच्या राजवटीतही न्यायदेवता पूर्णतः दबावमुक्त होती काय? राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार— स्वार्थानुसार न्याय-निवाडा होत नव्हता काय? तसे नसते तर लोकमान्य टिळकांना 'राजद्रोहा'च्या आरोपावरून मंडालेच्या कराल कारावासात बद्ध व्हावेच लागले नसते, स्वराज्याच्या जन्मसिद्ध अधिकाराच्या प्राप्तीसाठी हजारो देशभक्तांना कारावास घडला नसता !

त्याच ब्रिटिशांपासून आपण न्याय-दानाची पद्धत उचलली, कोर्ट - हायकोर्टे - ट्रायब्यूनल्स - सुप्रीम कोर्ट - ह्यांच्याद्वारां ब्रिटिशांप्रमाणेच आपण न्याय-यंत्रणा सुरू केली. . . काय? ब्रिटिशांप्रमाणेच ?. . . छे छे छे ! त्यांच्याहूनही उत्तम प्रकारे ! साहेबांनीही 'व्हेरी गुड ! वेल डन ! मार्व्हलस' अशी शाबासकी द्यावी, अशा शिताफीने भारतातील न्याय-संस्था कार्यरत झाली !

. . . ते बेटे इंग्रज. त्यांच्या न्यायदानात नुसता कायद्याचा कीस, कायद्याचाच हृदयशून्य विचार ! त्यांची न्यायदेवता फार करडी आणि कर्तव्यदक्षतेपायी आंधळी— कायद्याची जाड पट्टी तिच्या डोळ्यांवर बांधलेली ! पण गोरगरिबांचा विचार करणारी 'सामाजिक बांधिलकी' तिजपाशी फारशी नव्हतीच !

*नियमन मनुजासाठी, मानव—*

*नसे नियमनासाठी जाणा ।*

हा नव-विचार तिच्या अंगवळणी पडला नव्हता !. . . पण आपल्या भारतीयांनी संतांचा दयाळूपणा नि महामानवतावाद त्या ब्रिटिश पद्धतीत 'मिक्स' करून न्यायदेवतेच्या नेत्रांवरील कायद्यांचे कडक पटल जरासे किलकिले केले. असेच अलीकडील न्यायालयांच्या (विशेषतः सर्वोच्च न्यायालयाच्या—) निर्णयावरून प्रत्ययास येते. उदाहरणार्थ, मुंबईची संगदिल महापालिका फूटपाथवरील बेकायदा झोपडपट्ट्या जेव्हा धडाधड पाडू लागली, तेव्हा नागरिक स्वातंत्र्याचे काही उच्चभ्रू कनवाळू कैवारी सर्वोच्च न्यायालयाकडे धावताच तेथील गरीब नवाझांनी झटकन स्थगिती देऊन, झोपडीवासीय 'वीकर सेक्शन'चा दुवा घेतला !. . . ब्रिटिशांच्या रूक्ष न्यायदान-पद्धतीत हे असे, महापालिकेबाबत वज्र-कठोर पण गरिबांसाठी 'मृदुनि कुसुमादपि,' वर्तन घडले असते काय?

मुंबईच्या 'साईबाबा औद्योगिक वसाहती' विरुद्ध म्हणजेच तिच्या बेकायदा बांधकामाविरुद्ध, महापालिकेच्या जुलमी जाहिदांनी कठोर कृती करताच, अखेर सर्वोच्च न्यायालयाने ह्या पुण्य-वसाहतीला दोन वर्षांचे जीवदान दिले !. . . महा-मानवतावादी कारुण्य-जलाचा शीतल शिडकावा सर्वोच्च न्यायालयाने ह्या दीनदुर्बळांच्या वसाहतीवर सहजगत्या केला ! ही वसाहत 'गलिच्छ वस्ती' म्हणून १९७१ सालीच जाहीर झाली होती. तिजवर बेकायदा बांधकाम सुरू होताच महापालिकेने रीतसर नोटिसा बजावल्या, तेव्हा लगेच—

*मृदु सबाह्य नवनीत*
*तैसे सज्जनाचे चित्त*

ही उक्ती सार्थ करणाऱ्या काही महाभागांनी हायकोर्टाकडे धाव घेतली. पण हायकोर्टाने ह्या सज्जनांचा अर्ज फेटाळला. खंडपीठापुढेही त्यांची मानवतावादी डाळ शिजली नाही. राज्य-सरकारलाही मानवतेचा पाझर फुटला नाही ! कोठेही प्रस्तुत बांधकाम कायदेशीर असल्याचे शाबीत होऊ शकले नाही. फार काय सांगावे, खुद्द दयाघन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पाठक नि ठक्कर ह्यांनीही ही वसाहत अवैध आहे, असेच मानले ! पण. . . वसाहत अवैध असली म्हणून काय झाले, उच्च न्यायालयाने वा खंडपीठाने स्थगिती-अर्ज फेटाळले म्हणून काय झाले? न्यायमूर्ती पेंडसे ह्यांनी हायकोर्टाच्या उच्चासनावरून साईबाबा वसाहतवाल्यांचे अर्ज फेटाळताना उद्‌गार काढले होते की, "मुंबईत बेकायदा बांधकामे अहर्निश उभारली जात आहेत आणि ती तशीच अबाधित राखण्यासाठी सर्रास कायद्याचाच आश्रय घेण्यात येत आहे ! ह्यामुळे जनतेत कायद्याविषयीच अनादर उत्पन्न झाल्यास नवल नाही. अर्जदार श्रीमंत आहेत आणि ते कायद्याच्याच आधारे, बेकायदा बांधकामे चालू ठेवण्याची कोशीस करताहेत !". . . पण एका न्यायमूर्तींनी असा शुद्ध कायदेशीर विचार व्यक्त केला म्हणून काय बिघडले ?. . . सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक बांधिलकीला शोभणारी दयार्द्रता धारण केली. म्हटलेच आहे की 'दया धर्मका मूल है !'

— आता ह्या निर्णयामुळे, जेथे जेथे अशी 'साईबाबा वसाहती'सारखी अनधिकृत बांधकामे उभारली गेली असतील, तेथे तेथे किमान दोन वर्षांचे जीवदान प्राप्त होऊ शकेल. त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांचे काम अधिकच अवघड होईल, ह्यात शंका नाही. ! पण चालायचेच. ह्या दुनियेत अवघड काय नाही ?

□

॥ २६ ॥

## न्यायालयाचा आसूड !

*१९ डिसेंबर १९६८*

'जेथे जेथे वळती सुंदर हरिणाक्षींचे डोळे। तेथे तेथे विक्रमशाली मदनाचे फुलझेले ॥' असे महाकवी कालिदास म्हणून गेला. पण गेले काही दिवस या महानगरात गाजत असलेल्या नाडकर्णी-खटल्याने या सुभाषिताला आणखी पुस्ती जोडली गेली। जेथे जेथे हरिणाक्षींचे वास्तव्य आहे तेथे तेथे मदनाचेच नव्हे, तर पोलिस-शासनाचेही विक्रम घडू शकतात !

नाडकर्णी-खटल्याला प्रारंभापासून जी रोमॅन्टिक रंगत प्राप्त झाली तिचे कारण या खटल्यात सुंदर सिने-कलावती आशा नाडकर्णी ही मध्यवर्ती व्यक्ती बनली होती; आणि तिच्याभोवती काही प्रतिष्ठित नावे हळूहळू गुंफली गेली. एरव्ही कुंटणखान्याबाबतचे खटले या शहरात अधूनमधून चाललेलेच असतात. पण या खटल्याला जशी श्रोत्यांची तोबा गर्दी उसळली होती, तशी क्वचितच कोठे उसळली असेल ! आशा नाडकर्णींची भूमिका असलेल्या कोणत्याही सिनेमाला कधीही झाली नसेल एवढी प्रेक्षकांची गर्दी, या 'नृत्य-नाट्य निपुण कलावती'ची दुर्धर जीवननाट्यातील भूमिका बघण्यास, कोर्टाच्या रूक्ष आवारात उपस्थित असे. कोठे ललितकलांच्या कमनीय कुंजात रंगलेली तरुण रमणी; आणि कोठे कोर्टाचे न्यायनिष्ठुर रूक्ष रिंगण ! पण विचित्र विधिघटनेने या आत्यंतिक टोकांची सांगड घालून, जे उत्कंठापूर्ण नाट्य निर्माण केले, ते हजारो नेत्रांचा नि कानांचा विषय बनले होते !

अखेर या नाट्याचे भरतवाक्य काल न्यायमूर्तींनी म्हटले; आणि श्रीमती कुसुम गजानन नाडकर्णी व मुख्य आरोपी अनिल गजानन नाडकर्णी निर्दोष ठरले. कारण फिर्यादी

पक्षाने उभारलेले हे कुंटण-खान्याचे प्रकरणच भुसभुशीत पायावर उभारलेले खोटे इंद्रजाल आहे; तकलादू गारुड आहे; नाडकर्णी कुटुंबीयांच्या बदनामीस कारण झालेले गलिच्छ भारूड आहे; असे न्यायमूर्तींचे मत पडले. न्यायमूर्तींच्या निकालपत्रातील सर्वांत महत्त्वाचा भाग या मताच्या पुष्ट्यर्थच खर्ची पडला आहे. आणि ज्याअर्थी फिर्यादी पक्षाची सारीच कथा कपोल-कल्पित आहे, त्याअर्थी बचाव पक्षाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा सविस्तरपणे परामर्ष न घेताही नाडकर्णी-खटल्यातील आरोपी पूर्णतः दोषमुक्त आहेत, असा निर्णय त्यांनी जाहीर केला. हा निर्णय जाहीर करताना जणू काही आरोप करणारेच आरोपी ठरल्यागत झाले ! कारण, न्यायमूर्तींनी अत्यंत कडक शब्दांत पोलिस खात्याच्या 'जागरूकता-शाखे'ला (व्हिजिलन्स ब्रँचला) ताडन केले आहे. 'सध्याच्या अधिकारी मंडळींच्या हाती असलेल्या या व्हिजिलन्स ब्रँचला वस्तुतः जगण्याचा अधिकारच नाही' (Vigilance branch has no right to exist with this group of officers) या तिखट शब्दांचा आसूड न्यायालयाने पोलिस-खात्याच्या पाठीवर ओढून, या शाखेच्या कार्यपद्धतीची पुनर्घटना केली पाहिजे, असा इशारा दिला आहे. पोलिस अधिकारी— विशेपतः सब इन्स्पेक्टर मेहता— यांनी असत्य भाषणाचा कहर करून साऱ्या पोलिसखात्याला दुष्कीर्तीचा डाग लावला आहे, असे जळजळीत उद्‌गार त्यांनी काढले आहेत, आणि आशा व शोभा नाडकर्णी यांना रात्री अटक झाल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी मॅजिस्ट्रेटपुढे हाजीर न करता, दुपारी २ वाजेपर्यंत डांबून ठेवणे; पंचनाम्यांतील वयांत 'फिरवाफिरव करणे;' आशा-शोभाच्या वैद्यकीय तपासणीचा आग्रह धरून कौमार्य-भंगाचा अप्रस्तुत प्रश्न उपस्थित करणे; इत्यादी पोलिसखात्याच्या विचित्र व बेकायदा लीलांची न्यायनिष्ठुर चिरफाड केली आहे !

न्यायमूर्तींच्या या निकालपत्राने आमच्या पोलिस खात्याच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. जे कायद्याचे रक्षक तेच असे शिस्तीचे व सारासार विचारांचे भक्षक झाले तर केवढा अनर्थ माजू शकेल, याचे चित्र डोळ्यांपुढे उभे राहून कोणाचेही मन व्यथित होईल. समाजातील अनीतीचा नि दुराचाराचा बीमोड करणे हे पोलिस-खात्याचे आद्य कर्तव्य खरे; पण हे करीत असताना त्यांनी स्वतःच कर्तव्यभ्रष्ट होणे हाही एक अनाचार आहे. तो त्वरित थांबला पाहिजे.

प्रस्तुत खटल्यात प्रतिष्ठितांची व बड्या बड्यांची नावे गुंतली असल्याने बचाव पक्षावर नि अदालतींवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण येईल की काय, अशी शंका अनेक संशयात्म्यांना चाटून गेली असेल. पण आमच्या न्यायमंदिराला (आणि शासनालाही !) हे भूषणावह आहे की, त्यांनी कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता, एका सिनेनटीच्या कुटुंबीयांनाही न्याय दिला; 'पेशव्यांचा न्यायाधीश पुराव्याशिवाय बोलू शकत नाही,' हा

रामशास्त्री बाणा सिद्ध केला ! भारतात लोकशाही शासनात न्यायालये निर्भीड आहेत, हेच न्यायमूर्तींच्या या निकालपत्राने पुन्हा सिद्ध केले. प्रस्तुत खटल्याच्या निकालामुळे, अधिकारारूढ व्यक्तींवर निष्कारण चिखलफेक करण्याची व वडाची साल पिंपळाला लावण्याची, काही राजकारणपटू मंडळींची संधी हुकली हाही एक फायदाच म्हणावा लागेल !

— रघुवंशांतील आदर्श राज्याचे वर्णन करताना कालिदासाने म्हटले आहे—

*यस्मिन् मही शासति वाणिनीनां निद्रां विहारार्ध-पथे गतानां ।*
*वातोपि नास्त्रंसयदंशुकानी को लंबयेत् आहरणाय हस्तम् ?*

(तो आदर्श राजा राज्य करीत असताना, रात्री विहार करता करता रस्त्यावरच झोपलेल्या कलावंतिणींचा पदर, वाराही ढळवू शकत नव्हता ! मग त्यांचे अपहरण करण्यासाठी हात पुढे करण्याची हिंमत कोण करणार ?)

इतकी आदर्श व्यवस्था राखणे हे आमच्या शासनाचे ध्येय असले पाहिजे; पोलिसखात्याचे ब्रीद असले पाहिजे, हाच या खटल्याचा खरा बोध होय.

□

॥ २७ ॥

## न्याय-कथा !

*१२ जुलै, १९७०*

हॅम्बुर्ग येथील न्यायालय. त्याच्या प्रशस्त धीरगंभीर दालनात, धीरगंभीर न्यायमूर्ती स्थानापन्न झाले होते. आणि आरोपीच्या पिंजऱ्यात विशीची वेस ओलांडलेली एक तरतरीत तरुणी थरथर कापत उभी होती ! तिच्यावर चोरीचा आरोप होता. इतक्या 'स्मार्ट' युवतीने ज्या वयात तरुणांच्या दिलाचीच काय ती चोरी करायची असते, अथवा प्रियकराकडे चोरटे कटाक्ष टाकावयाचे असतात; त्या वयात तिने 'रेडिमेड कपड्यां'च्या दुकानातून एक शर्ट चोरला होता. चोरी क्षुल्लक होती. पण न्यायदेवतेला तिला शासन करणे क्रमप्राप्त होते. म्हणूनच पोलिस-अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या खटल्याची कागदपत्रे न्यायमूर्तींनी काळजीपूर्वक पाहिली आणि कामकाज सुरू करण्यापूर्वी तिच्याकडे आपली तल्लख शोधक नजर टाकली !

न्यायमूर्तींच्या धीरोदात्त चेहऱ्यावर उमटलेली कारुण्याची छटा, त्यांच्या मनातील कोलाहल व्यक्त करीत होती– 'हिने चोरी केलीय् हे उघडच आहे. पण कदाचित आर्थिक प्रतिकूलतेमुळे हतबुद्ध होऊन हिने हा शर्ट चोरला असावा– बहुधा आपल्या भावासाठी ! तिचा हा पहिलाच गुन्हा असावा. प्रश्नांच्या दोन-तीन फैरी झडताच बहुशः ती अपराधाची कबुलीही देईल. पण... पण तरीही हिला लागणारा गुन्हेगारीचा डाग टळणार नाही. शिक्षा काहीशी सौम्य होईल इतकेच ! आणि एकदा का खटला चालून रीतसर शिक्षा झाली की समाज हिच्याकडे शंकास्पद नजरेने पाहू लागेल. —कुणी सांगावे, याचा विपरीत परिणाम होऊन, ही तरुणी गुन्हेगारीचीच वाट वारंवार चालू लागेल ! 'पतित एकदा पतित का सदा ?' हा तिचा आर्त पुकार अरण्यरुदन ठरेल. 'काडी चोर तो माडी

चोर, आणि माडी चोर तो माडी चालविणारा चोर' ह्या धोपट तर्कशास्त्रानुसार-सहस्त्राक्ष, सहस्त्रमुख, सहस्त्रपाद समाजपुरुष वाटेल ते कुजबुजू लागेल ! अन्—

*मलिन मातीचा दिधला देह*
*मग तो करिल कसे ना पाप ?*
*'इडन' च्या उद्यानी देवा !*
*निर्मिला तूच पातकी साप !*
*अशा तव कृतींनीच आम्ही*
*कलंकित होतो आपोआप !*

अशी फिर्याद हिने हंबरडा फोडून केली, तरी देवांच्या बधिर कानामनावर तिचा काहीच परिणाम होणार नाही !. . .

म्हणूनच त्या विचारी न्यायमूर्तींनी मुलखावेगळा मार्ग चोखाळला. तो दयाघन धीरगंभीर पण वत्सल आवाजात तिला म्हणाला, "मुली ! तू गुन्हा केला, हे स्पष्टच आहे. मी तुला लहानशी शिक्षा देतो, अन् ती कबूल असेल तर हा खटला काढून घ्यायला सांगतो."

त्या तरुणीने मानेनेच होकार दिला.

"तुला तुझ्या अपराधाचा पश्चात्ताप होत असेल, तर अनाथ बालकाश्रमासाठी फक्त दोन शर्ट शिवून दे. कापड, सुई-दोरा ह्यांची सोय आम्ही करू ! या कोर्टाच्या आवारातच तुला जागाही देतो या शिवण-कामाला !" न्यायमूर्तींच्या ह्या प्रेमळ उद्गारांना तिने कृतज्ञतेच्या अश्रूंनीच उत्तर दिले. जगातील माणुसकीचा मंगल स्पर्श तिला प्रथमच होत होता !

असा हा माणुसकीचा, डोळस दयाळूपणाचा स्पर्श या टोकळेबाज रूक्ष यंत्रयुगात दुर्मिळ होत चालला आहे. नियम, घटना, कोर्ट-कचेऱ्या, पोलिस, शासनयंत्रणा या साऱ्या गोष्टी माणसासाठी आहेत, माणुसकी चिरडण्यासाठी नाहीत, याचा आपणास विसर पडला आहे. म्हणूनच हॅम्बुर्ग-न्यायालयातील ही तशी मामुली वाटणारी घटना, वैराण-वाळवंटातील हरित भूमीप्रमाणे, अथवा निबिड अंधकारातील चिमुकल्या प्रकाश-किरणाप्रमाणे मन वेधून घेते !. . . पण अशी कितीशी पवित्र किरणे, या आपल्या देशातील अजस्त्र शासन-तिमिरात जनतेच्या डोळ्यांना सुखावतात? येथे न्यायमंदिरापासून मंत्रि-महालापर्यंत महात्माजींचा फोटो झळकतो; पण महात्म्यांची माणुसकी सहसा झळकत नाही ! 'दया क्षमा शांती-तेथे देवांची वस्ती ।' ही अभंगअक्षरे येथे दुमदुमतात, पण त्यांचा अर्थ मात्र दरवळत नाही !

□

॥ २८ ॥

## विलंबित न्यायदान !

*२५ डिसेंबर, १९८३*

ह्या असार संसारात अशाही थोड्या गोष्टी आहेत की, ज्या नाहीशा होऊच नयेत, —किमानपक्षी दीर्घकाळ रेंगाळत राहाव्यात असे मानवी मनाला वाटते. उदाहरणार्थ— खुबसूरत मापुकांचा मदहोश सहवास, प्रियतम व्यक्तींची प्रेमळ याद, भावमधुर गीतांची सुरावट, सुग्रास भोजनाची रुची आणि दिव्यत्वाची प्रचीती ! पण हाय, केशवसुत म्हणाले तेच खरे 'भिकार या जगी ! इच्छित न मिळे काही !' 'जे हवेहवेसे वाटते ते जीवनात रेंगाळत नाही आणि जे नकोनकोसे वाटते तेच लोचटासारखे रेंगाळत राहते. सुखाचे अमृत-मधुर क्षण पटकन उडून जातात एखाद्या 'सेन्ट' सारखे आणि 'दुःखके दिन बीतत नाही.'— दुःखाचे दिवस संपता संपत नाहीत. कुणाच्या अध्यात-मध्यात न पडता, माणसाने 'इश्का' च्या मुलखात सुखाचा शोध घेण्यासाठी पडावे, तो काय ? तेथे हवेहवेसे वाटणारे मीलन घडत नाही, आणि घडलेच तर ते फार काळ टिकत नाही. उलटपक्षी, प्रदीर्घ काळ रेंगाळतो तो विरह— तो मनास बेजार करणारा इन्तजार ! निष्फळ प्रतीक्षेचे दुःख वर्णन करणारा एक शायर म्हणतो—'

***"मरने पे भी बन्द न हुई***
***चष्मे मुन्तजिर !***
***अब इन्तजार की कोई***
***मुद्दत नहीं रही !***

मरण पावल्यावरही प्रतीक्षा-पटु आशिकाचे डोळे उघडेच राहिले. प्राण डोळ्यांवाटे गेल्यामुळे, डोळे बंद होऊच शकले नाहीत. जणूकाही निधनानंतरही ते प्रेयसीची प्रतीक्षा

करीत राहिले ! खरोखर, ह्याहून बेमुदत बेहद्द इन्तजार कोणता असू शकेल ?". . . इश्कात प्रतीक्षा-व्यथाच अशी रेंगाळत राहिली, तर ती मोठी शिक्षाच म्हटली पाहिजे.

परंतु, इश्कियार पागलांची बात सोडा, दैनंदिन व्यवहारातही नको त्या गोष्टी किती रेंगाळत राहतात, आणि मानवी जीवन दुःखी करतात. गुंडपुंडांच्या त्रासातून सुटका व्हावी, अन्यायाचे लवकर निराकरण व्हावे, याच इच्छेने सामान्य माणसे न्यायालयाची पायरी चढत असतात. पण तेथे सत्वर न्याय मिळण्याऐवजी खटल्याचे तापदायक रेंगाळणेच बहुशः नशिबी येते. मॅजिस्ट्रेट कोर्ट-हायकोर्ट-सुप्रीम कोर्ट ह्यांच्या फेऱ्यांत एखादा खटला सापडला म्हणजे तर विचारूच नका ! मूळ अन्यायापेक्षा काही (सर्व नव्हे) बिलंदर वकिलांच्या फीचे जबरदस्त तडाखेच जीव नकोसा करतात ! काही दुर्भागी जीवांची सारी जिंदगीच न्यायाची प्रतीक्षा करण्यात गुजरते. बहादुरशाह जफरप्रमाणेच त्यांनाही म्हणावे लागते—

*उम्रेदराज मांग कर*
*लाए थे चार दिन ।*
*दो आरजूमें कट गये ॥*
*दो इन्तजार मे ॥*

म्हणजे 'न्याय मिळेल' ह्या अभिलाषेत अर्धे आयुष्य निघून गेले आणि उरलेले अर्धे आयुष्य न्यायाची वाट पाहण्यात व्यतीत झाले !. . . काही उदाहरणे तर अशी आहेत की, माणसांना न्याय मिळाला-पण तो निधनोत्तर ! असा विलंबाने मिळणारा न्याय हा न्यायच नव्हे. 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाइड', हे सुभाषित सर्वमान्यच आहे. आणि तरीदेखील आपल्या भारतीय न्यायालयात सहस्रावधी खटले दीर्घकाळ खोळंबून पडले आहेत. धूळ खात पडले आहेत. गोरगरिबांना जणू काही जुन्या म्हणीची याद देताहेत— 'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये.'

म्हणूनच, चारच दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील पुणे मुक्कामी मोठ्या तळमळीने म्हणाले, 'कोणत्याही खटल्याच्या सुनावणीला व निकालाला एका आठवड्यापेक्षा जास्त कालावधी लागता कामा नये. . . खटल्याची सुनावणी जास्तीत जास्त दोनच आठवडे पुढे ढकलली जावी आणि त्यानंतरच्या तिसऱ्या आठवड्यांत न्यायालयाने कोणताही खटला निकालात काढावा'. . . दादा इतकेच म्हणून थांबले नाहीत, तर त्यांनी उपस्थित वकिलांना सवाल केला, "खटल्याची सुनावणी पुढे ढकलली तरी दरवेळी कोर्टात हजर राहण्यासाठी काही वकील २ ॥ ते ८ हजार रुपये घेतात तरी कशासाठी ?". . . वसंतदादांच्या ह्या अभिनंदनीय परखड प्रतिपादनाची दखल कर्तव्य-जागृत वकील नि न्यायाधीश घेतील, अशी उमेद आम्ही बाळगतो. बाकी,

कर्तव्यतत्पर वकिलांची संख्या आजच्या भारतात फार कमी आहे, हे न्यायालयात फेरफटका मारणाऱ्या कोणाही चौकस माणसाच्या लक्षात येईल. काही दिवसांपूर्वीच आम्ही दिल्लीच्या काही द्रव्यलोभी वकिलाधमांवर जो अग्रलेख लिहिला होता, तो या संदर्भात आमच्या वाचकांना सहज आठवेल. अशिलांना आकृष्ट करण्यासाठी त्यांना मिठाई खिलविणारे आणि नंतर ते जाळ्यात अडकताच तासागणिकच नव्हे तर मिनिटागणिक फी-ची सुरी चालविणारे हे विधिज्ञकुलकलंक ! जागरूक वकील-संघटनांनीच त्यांचा समाचार घेतला पाहिजे. 'सामाजिक बांधिलकी' च्या लंब्याचौड्या गप्पा ठोकणारे काही वकीलही आपल्या जबरदस्त फीवर मात्र कोणतेही नियंत्रण घालण्यास तयार नाहीत !

—भारतात सर्वच चांगल्या गोष्टींप्रमाणे न्यायदानही खूप महागडे बनले आहे. वकील-सॉलिसीटर्स मंडळींची रॅक्टे शहरोशहरी उदयास आली आहेत. किमानपक्षी, खालच्या न्यायालयात तरी भ्रष्टाचाराने घुसखोरी केल्याच्या कथा कानी पडताहेत !. . . वर्षानुवर्षे खटले चालवून प्रतिपक्षाला हैराण करण्याचे व बेकायदा कृत्यांना कायदेशीर स्वरूप देण्याचे एक धनमत्त 'टेकनिक' आपल्या गब्बर उद्योगपतींनी परिणत केले आहे. परिणामी न्यायदेवतेचे संरक्षण गरिबांना मिळणे महामुश्किल झाले आहे. ह्यासाठीच न्यायदान-पद्धतीत नवचैतन्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे. . . पण स्वतःच दीर्घसूत्री विलंबित न्यायदान-पद्धतीचा गैरफायदा घेणारे राजकारणी हे काम कितपत करू शकतील ?

□

॥ २९ ॥

# शब्दांचे बुडबुडे !

*२९ मार्च १९५९*

कोणताही मोठा पुढारी घ्या, कोणत्याही महापुरुषाचे चरित्र अवलोकन करा; त्याच्या अंगी नानाप्रकारचे गुण एकवटलेले आढळतात. कित्येक लहान-मोठ्या गुणांचे ओहळ एकत्र मिळूनच, महान पुढाऱ्याची जीवनसरिता निर्माण होत असते. नवकाव्याच्या भाषेत सांगायचे झाल्यास असेही म्हणता येईल की, 'महापुरुषांचे जीवन असते विविध चिजांची टेसदार मिसळ !'

प्राचीन चरित्र-ग्रंथांत तर, चरित्रनायकाच्या अंगी असलेल्या १६ विद्या नि ६४ कला यांची यादीच दिलेली असे. शेकडो गुणांचे वस्तुसंग्रहालय बनलेल्या थोर पुरुषांच्या चरित्राचे यथार्थ वर्णन करताना, मोठमोठे महाकवीही हात टेकतात आणि हताशपणे उद्‌गारतात— 'वज्राहूनही कठोर आणि फुलांहूनही कोमल असलेल्या लोकोत्तर पुरुषांचे हृदय कोण बरे जाणू शकतील ?' सारांश, महापुरुषांच्या अंतरी इतक्या नाना प्रकारच्या कळा असतात की, त्यांचे कोणतेही वर्णन अ-व्याप्तीच्या दोषापासून सुटू शकत नाही. फार दूर कशाला जा; परवाच उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी केलेले नेहरूंचे वर्णन विचारात घेऊ. राधाकृष्णन् उवाच— 'महान व्यक्तींमध्ये नेहमीच पुरुष, स्त्री आणि बालक या तिघांच्याही गुणांचा मधुर मिलाफ झालेला असतो, आणि आपले पंतप्रधान पं. नेहरू हे या त्रिगुणांचे 'पूर्ण प्रतीक' आहेत." राधाकृष्णन् यांनी केलेले हे वर्णन बहुतांशी खरेच आहे. पण बहुगुणमंडित पंडित नेहरूंचे चरित्र केवळ 'त्रिगुणां' नी मर्यादित केल्याने, उपरोक्त वर्णनात अव्याप्तीचा दोष निर्माण होतो, परंतु त्याला इलाज नाही. राधाकृष्णन् झाले तरी काय, शब्दांचे तोकडे सामर्थ्य त्यांनाही दगा दिल्यावाचून कसे राहील ? शब्दांचे बुडबुडे

विभूति-वर्णनाच्या खडकावर फुटून जाणे साहजिकच नाही काय?

## अलंकारिक वर्णनातील धोका

नेहरूंचे वर्णन करताना 'बाई, बाप्या व बालक' अशी 'ब' कारयुक्त त्रिपुटी राधाकृष्णन् यांनी वापरली. अशा अनेक त्रिपुटी महापुरुषाचे वा महान पुढाऱ्याचे वर्णन करताना वापरल्या गेल्या आहेत. नेहरूंचे गुरू महात्मा गांधी यांचे वर्णन करताना एका नामवंत काँग्रेस पुढाऱ्याने काहीशा विनोदाने नि कौतुकाने म्हटले होते– 'बापूंमध्ये बुवा, बनिया नि बॅरिस्टर यांचा मिलाफ झालेला आहे." आणि हे वर्णन मार्मिक असले तरी, महात्माजींचे हे संपूर्ण वर्णन नव्हे, असेच कोणाही विचक्षण माणसाचे मत पडेल. एकदा अशा प्रकारच्या आलंकारिक नि अनुप्रासयुक्त विभूति-गौरवाची टूम सुरू झाली की, गावोगावीचे राधाकृष्णन् विलक्षण विनोद-गीता निर्माण करू लागतात, हे आपल्या अनुभवाचे आहे. एकदा एका वक्त्याने प्राणि-मात्रातील 'त्रिपुटी' वापरून एका थोर पुढाऱ्याचे असे वर्णन केले होते– 'दे. भ. अमुक अमुक यांच्यात गेंडा, गजराज नि गजारि (सिंह) यांचे गुण एकवटले आहेत. गेंड्याप्रमाणे त्यांची कातडी कडक असल्याने त्यांना टीकेचे भाले बोचू शकत नाहीत; गजराजाप्रमाणे ते कठीण समस्येचा दरवाजा फोडतात नि कुत्र्यांच्या भुंकण्याकडे लक्ष देत नाहीत; आणि सिंहाप्रमाणे ते पराक्रमी आहेत !' अर्थात हे वर्णन पुष्कळच ठीक झाले. तथापि, त्यात विनोद-निर्मितीची बीजे किती खच्चून भरली आहेत, हे सुज्ञास सांगणे नलगे. पुढारी खरोखरीच थोर असला तर अशी आलंकारिक वर्णने खपून जातात. एरव्ही ती हास्यास्पद होतात. गेंड्याप्रमाणे कातडी कठीण आहे, गजराजाप्रमाणे आहार मोठा आहे अथवा ते लंबोदर आहेत, आणि सिंहाप्रमाणे ते गर्जण्यातच अग्रेसर आहेत, असे उपरोक्त वर्णनाचे विडंबन होऊ शकते. एकदा एका किरकोळ अंगयष्टीच्या व मुलायम आवाजाच्या मामुली पुढाऱ्याचा 'हे आपल्या प्रांताचे केसरी आहेत' असा गौरव त्यांच्या भक्ताने करताच, श्रोत्यांतून आवाज आला "हां, केशरियाप्रमाणे सिंहकटी आहेत खरे !" पुढारी खरोखरीच तितकासा थोर नसेल तर अलंकारिक स्तुतीने त्याला शोभा येण्याऐवजी, त्याची शोभाच होते. आणि अशी अतिशयोक्त स्तुती करणाऱ्यावर भाटगिरीचा आरोप येतो.

□

॥ ३० ॥

# प्रतिष्ठित शब्द !

*३० ऑगस्ट १९५९*

'कोणताही व्यवसाय हलका मानण्याचे कारण नाही. जो व्यवसाय आपण स्वीकारू तो प्रामाणिकपणे, सचोटीने व मनःपूर्वक करणे हेच माणसाचे कर्तव्य आहे. आणि अशा कर्तव्यतत्परतेने कोणताही धंदा करावयास हरकत नाही. अमूक एक धंदा हलका आणि अमूक एक धंदा उच्च, असा भेदभाव करणे इष्ट नाही. जगरहाटीला सर्वच व्यवसायांची या ना त्या प्रकारे आवश्यकता असते. घोडा उपयुक्त, तसाच घोड्याचा क्षुद्र वाटणारा नालही उपयुक्त ! त्या नालाची उपेक्षा केल्यास घोडा निकामी होईल आणि घोडा निकामी झाल्यास लढाईत घोडेस्वाराला अपयश येऊ शकेल. तात्पर्य, या जगात ज्याप्रमाणे 'अयोग्यः पुरुषः नास्ति' त्याचप्रमाणे 'अयोग्या वृत्तिः नास्ति'— कोणताही व्यवसाय अयोग्य मानण्याचे कारण नाही. तेव्हा बापहो, आपापला व्यवसाय निष्ठेने करा, त्याला जग कमी मानत असले तरी तुम्ही तसे मानू नका. 'स्वे स्वे कर्मण्यभरतः संसिद्धि लभते नरः' हा भगवंतांचा उपदेश सदैव लक्षात ठेवा' अशा प्रकारचे प्रवचन आपणास नवीन नाही. उच्चपदस्थ लोक गोरगरिबांना असा हितोपदेश नेहमीच करीत असतात. आणि त्यात तत्त्वतः चूक असे काहीच नाही. म्हणूनच म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. जत्ती यांनी अशाच थाटाचा उपदेश बिचाऱ्या वैद्य लोकांना केलेला आहे. 'सध्या वैद्य म्हणवून घेण्यास वैद्यांना लाज वाटत आहे. आयुर्वेद शास्त्राचा अभ्यास करून वैद्यमंडळी 'डॉक्टर' अशी पाटी लावत आहेत. ही स्थिती नामुष्कीची आहे.' असे उद्गार जत्ती महाशयांनी बेळगाव मुक्कामी काढले. ठीक आहे. जत्ती म्हणतात ते काही खोटे नाही. पण जेथे सरकारच आयुर्वेद चिकित्सेला गौण स्थान देत आहे, तेथे वैद्यांनी 'डॉक्टर' या स्वयंभू कुबडीचा

आधार घेऊन प्राधान्य मिळविण्याचा प्रयत्न केला, तर त्यात अस्वाभाविक असे काय आहे?

जोपर्यंत समाजात, काही व्यवसाय प्रतिष्ठितपणाचे मानले जातात आणि काही अप्रतिष्ठितपणाचे अथवा हलक्या दर्जाचे मानले जातात (आणि असे होणे अगदी साहजिकच आहे !) तोपर्यंत ते तथाकथित हलक्या दर्जाचे व्यवसाय करणारे लोक आपापल्या धंद्यांना प्रतिष्ठित नावे देण्याचा प्रयत्न करणारच. वैद्यांचेच कशाला, छत्रीची रिपेरी करणारा कारागीरदेखील 'छत्रीचा डॉक्टर' अशी पाटी लावून आपल्या व्यवसायाला प्रतिष्ठा आणण्याचा दुर्बळ प्रयत्न करीत असतो. आपल्या व्यवसायात खरेखुरे समाधान लाभले नाही की, माणसे असे दुबळे समाधान शोधीत असतात. 'मी कारकून आहे' असे सांगण्याऐवजी 'मी स्टेनो आहे' असा परिचय करून देणे, अनेकांना प्रशस्त वाटते. बेकार लेखकही जिथे स्वतःला 'फ्री लान्सर' म्हणवून घेतो, आणि 'प्रूफ रीडर' जेथे पत्रकार या प्रतिष्ठित (?) पदवीने संबोधिला जातो, तिथे बिचाऱ्या वैद्यांनीच काय घोडे मारले? माणसाला निदान 'नाममात्र' तरी उदात्तीकरण करावेसे वाटते.

पण याबाबत बिचाऱ्या सर्वसामान्य व्यावसायिकांनाच काय म्हणून दोष द्यावयाचा? आमचे पुढारीही प्रतिष्ठित शब्दांचे बुरखे घेत नाहीत काय? सरळ सरळ 'ब्राह्मणेतर' असे म्हटले तर जातीयतेचा वास येतो, म्हणूनच 'बहुजन समाज' असा शब्दप्रयोग कधी कधी खुबीने वापरला जातो ! दंगाधोपा असे न म्हणता 'जनतेचा उत्स्फूर्त उठाव' असे उठावदार नाव राजकारणी लोक आपणास अनुकूल असलेल्या हुल्लडबाजीला बहाल करीत असतात ! नग्नप्राय नृत्यांना 'सांस्कृतिक कार्यक्रम' — कल्चरल प्रोग्राम— अशा भपकेबाज नावाची पाटी लावून हवा तो धुडगूस घालणारे लब्धप्रतिष्ठित लोक, समाजात उजळ माथ्याने वावरत असतात. विचित्रांच्या तत्त्वशून्य शय्यासोबतीला 'एकजूट', 'एकच आघाडी' अशी नावे देण्याची जेथे प्रथा आहे, आणि सुईच्या अग्रावर मावेल इतकीही माती देणार नाही, अशा हट्टीपणाला जेथे 'खंबीर तत्त्वनिष्ठा' म्हणतात, त्या ठिकाणी जत्ती महाशयांनी बिचाऱ्या वैद्यांनाच इतके धारेवर का धरावे?

□

॥ ३१ ॥

## पदवीचे लांगूल !

*९ फेब्रुवारी १९६९*

आमच्या देशाची जी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील, त्यांपैकी 'पदवीपटुत्व' हे एक वैशिष्ट्य आहे. शिवी द्यावी तर ती भारतीयांनीच, ओवी गावी तर ती भारतीयांनीच, आणि पदवीदान करावे ते भारतवर्षीयांनीच ! अगदी जुन्या संस्कृत राजांनी स्वतःस लावून घेतलेल्या आणि इतरांच्या मागे लावलेल्या त्या लफ्फेदार पदव्या पहा— कोणत्याही 'हिज हायनेस' नि 'हिज एक्सलन्सी'ला त्या सहज आऊट करतील ! आमचे त्या काळचे 'महामंडलेश्वर,' 'अखिल दक्षिणापथेश्वर,' 'महाराजाधिराज सामंतचुडामणि' पदव्यांच्या बाबतीत कोणत्याही पाश्चिमात्य राजाला हार जाणारे नव्हते. आणि त्यांच्या नंतर आलेले इस्लामी राज्यकर्ते— विशेषतः मोगल? वाहवा, क्या कहने जनाब ! त्यांची एकेक पदवी म्हणजे दिलकश दणकेबाज शब्दांची दणदणीत पलटणच ! पदव्यांचे पायघोळ मखमली झगे त्यांनी स्वतःच्या अंगाखांद्यांवर तर मिरवलेच, पण आश्रितांना आणि गुणीजनांना पदव्यांच्या आलिशान पालख्यांत बसविण्याच्या बाबतीत कोणत्याही 'जहांपन्हा'ने कद्रूपणा केला नाही. रणझुंजार सुभेदारांना नि मुत्सद्दी वझिरांना तर त्यांनी भर्जरी किताबतींचे किनखापी झगे बहाल केलेच, पण कविजनांनादेखील पदव्यांची फर्मास पागोटी चढविली !

प्राचीन राजांची ही पदवीपटुता ब्रिटिशांनीही गिरवून पाहिली. देशात रावसाहेब, रावबहादूर, दिवाणबहादूर इत्यादी पदवी-बहाद्दरांच्या पलटणी उभ्या केल्या. आणि आता गेल्या २१ वर्षांत आमच्या लोकशाही सरकारांनीदेखील

रावसाहेब-रावबहादूरांचा एक नवा वर्ग निर्माण करण्यात बरेच यश संपादन केले आहे! दरवर्षी २६ जानेवारीला आमचे पदवीदानपटू सरकार शेकडो पदवी-पिपासितांची प्यास शमविण्याचे पुण्यकर्म करीत असते! पदवीपिपासित? हो, बरेच गब्रू पदवीसाठी तळमळत असतात. २६ जानेवारीला पदवी-भूषितांच्या यादीत आपले नाव झळकलेले पाहिले की, या महाभागांना दिल्लीच्या यमुनेत आकांक्षागर्दभ नाहल्याचा आनंद होतो. 'अरे, त्या पदवीच्या शेपटीसाठी का एवढा जीव पाखडतोस,' असा प्रश्न या वशिलेबाजांना विचारला तर, ते तुम्हाला सुनावतील—

*लुत्फे-किताबत् तुझे क्या कहूं*
*अय् जाहिद!*
*हाय कंबख्त!*
*तू 'जे. पी.' भी नहीं॥*

अशा या जमान्यात 'नॅशनल हेरॉल्ड'चे संपादक श्री. एम. चलपतिराव यांनी पद्मभूषण सनद आणि पदक परत करावे, ही घटना विशेष उठून दिसते. ही सनद आणि पदक परत करताना चलपतिराव म्हणाले आहेत, "इतरांपासून आपण कोणी तरी निराळे आहोत अशी भावना या सनदेमुळे निर्माण होते. शिवाय असे की, पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर थोडेदेखील आक्रमण जेणे करून होईल, असा बहुमान स्वीकारणे मला इष्ट वाटत नाही." कित्येक व्यवहार-कोविदांना चलपतिरावांची ही विचारसरणी वेडगळपणाची नि जादा सोवळेपणाची वाटेल. पण आम्ही या 'व्यवहारशून्य'तेचेही अभिनंदन करतो. कारण, त्यामागे, पत्रकाराने बिलकुल सरकारजमा न होण्याची, थोडाही मिंधेपणा येऊ न देण्याची, कळकळ आहे. आणि तीच निःसंशय कोणत्याही पदवीहून तोलामोलाची ठरते; मग पदवी-पागल साहित्य-नवाझ, कला-कैवर्तक नि तथाकथित 'सोशल वर्कर्स' काहीही म्हणोत!

या पदवी-पिसाटांना हेच कळत नाही की, पदवी-पुच्छाने त्यांचा अहंगंड सुखावत असला तरी, सामाजिक प्रतिष्ठा त्या पदवीवर अवलंबून नाही. सरकारी पदवीदानाचा हेतू केवळ खुषीकरण एवढाच नसून कृतज्ञता नि गुणज्ञता-प्रदर्शन हाही असतो, हे आम्हास मान्यच आहे. पण केवळ पदवीच्या बळावर गाढवाचा गोपाळशेठ नि लंबकर्णाचा श्यामकर्ण होऊ शकत नाही, हे पदवीपिपासूंनी लक्षात घ्यावे एवढेच आमचे म्हणणे! जनतेने गुणांवर लुब्ध होऊन दिलेल्या पदव्याच दीर्घकाळ टिकणाऱ्या, अधिक शोभिवंत, आणि अधिक अभिमानास्पद होत. उदाहरणार्थ, टिळकांना जनतेने बहाल केलेली 'लोकमान्य' ही पदवी! गांधीजींना सत्यअहिंसेच्या पूजनामुळे प्राप्त झालेली 'महात्मा' ही पदवी! नारायणराव राजहंस

यांना टिळकांनी उत्स्फूर्तपणे दिलेली 'बालगंधर्व' ही पदवी! गुणलुब्ध जनतेने दिलेल्या या सहजसुंदर पदव्यांची फुले वर्षानुवर्षे आपल्या सुगंधाने दरवळत राहतात!

आणि समजा एखादी गुणी व्यक्ती सरकारच्या अथवा जनतेच्या पदवी-दानातून निसटली तरी काय बिघडले? तिचा गुण-प्रभाव नष्ट करणे तर ब्रह्मदेवालाही शक्य नाही ना?

□

॥ ३२ ॥

## पदच्युत पदव्या !

*१७ जानेवारी १९७७*

जे त्रिकालाबाधित आहे, शाश्वत आहे, चिरतरुण आहे तेच सर्वभक्षक काळाच्या जबड्यातून वाचते. अस्सल असते तेच प्रदीर्घ काळ वा सदैव टिकून राहते; जे जे नकली ते ते लवकरच नाश पावते. बलाढ्य दिसणाऱ्या राजसत्ताही जमाना बदलताच पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे धडाधड कोसळतात; वज्राहून बलिष्ठ भासणारे मजबूत राजदंडही वाळलेल्या गवताच्या काड्यांप्रमाणे सहज मोडून पडतात ! आणि मग त्या राजसत्तांच्या आधारे डौल मिरविणाऱ्या शेकडो गोष्टी होत्या की नव्हत्या अशा होऊन जातात. पहा ना- इंग्रजी राजवटीत रुबाबात वावरणारे कैक रावसाहेब-रावबहादूर तर कालवश झालेच, पण त्या मिजास मिरविणाऱ्या 'रा. सा.' 'रा. ब.' इत्यादी पदव्याही इंग्रजी शासनासह केव्हाच अस्तंगत झाल्या. परंतु, पदव्यांचे पट्टे लब्धप्रतिष्ठितांच्या गळयांत अडकवून त्यांना आपलेसे करण्याची धूर्त राजनीती चालूच राहिली. इंग्रजीनंतर जी काँग्रेसी राजवट आली तिनेही रावसाहेब-रावबहादूरांचा नवा नर्ग निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. 'राष्ट्रीय सन्मान' म्हणून जुन्या पदव्यांच्या जागी नव्या पदव्या काँग्रेस शासनाने आणल्या. राज्यकर्ते गुणग्राहक नसतातच असे नाही. गुणीजनांची कदर करावी असे सत्ताधीशानांही वाटतेच. पण ही कदर बहुशः निरपेक्ष नसते. जेव्हा राज्यकर्ते पदव्या-पारितोषिके नि पुरस्कार ह्यांची खैरात करतात, तेव्हा साहित्यिक-विद्वान-कलाकार-तंत्रज्ञ इत्यादींच्या प्रतिष्ठित वर्गात, राजमान्यतेची लालसा निर्माण करून, राजनिष्ठांची एक पलटण उभारण्याचाही हेतू असतोच. काँग्रेस शासनाने हेच परंपरागत धोरण अंगिकारले होते.

आणि मग ह्यांतूनच 'भारतरत्न,' 'पद्मविभूषण,' 'पद्मभूषण,' नि 'पद्मश्री' इत्यादी

पदव्या संपादन करण्याचा हव्यास आमच्या समाजातील खऱ्या वा खोट्या प्रतिष्ठितांत निर्माण झाला. 'अमक्या तमक्याला पद्मभूषण करावे'. . . 'अमक्याला केवळ 'पद्मश्री'च पदवी का? याहून मोठी का नाही?' अशा आशयाची पत्रे वृत्तपत्रांतून झळकविणे; नामदार-आमदार-खासदार ह्यांचे उंबरठे झिजविणे, सरकारी धोरणांची स्तुती करणे; सरकारच्या 'विधायक कार्यात' तथाकथित 'निस्वार्थ' हिरिरीने भाग घेणे इत्यादी पदवी-पिपासू प्रकार सुरू झाले. वशिलेबाजीला ऊत आला, लाचारीला बहर आला, बडीबडी धेंडेही मंत्रीगणांपुढे गुपचूप गोंडे घोळू लागली! साहजिकच, ज्यांनी ही अश्लाघ्य वाट कधीच चोखाळली नाही, असे कैक प्रथम श्रेणीचे गुणवंत ह्या पदव्यांचे धनी होऊ शकले नाहीत; उलटपक्षी, दुय्यम वा तिय्यम दर्जाची कैक तट्टे पदव्यांच्या शेपट्या हलवीत मिजासीने वावरू लागली! सर्वच पदवीधर अयोग्य होते असे नाही; कित्येक पदवीविभूषित माणसे आदरणीयच होती नि आहेत. परंतु, ह्या वशिल्याच्या तट्टांमुळे त्यांच्याही पदव्यांचे आपोआप अधोमूल्यन झाले. विशेषतः 'पद्मश्री' ही पदवी तर इतकी 'चीप,' इतकी स्वस्त झाली की, एके काळच्या 'दे. भ.' (म्हणजे देशभक्त) ह्या बिरुदाचीच आठवण यावी!

ह्या 'दे. भ.' वरून बरी आठवण झाली. स्वातंत्र्योत्तर काळात जसे दरवर्षी शे-दीडशे 'पद्मश्री' पैदा होत होते, तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात प्रतिवर्षी शेकडो 'देशभक्त' उगवत असत. कोणीही सूत कातणारा, प्रभातफेरी काढणारा, लेक्चर ठोकणारा मामुली आदमीही स्वतःला 'दे. भ.' ही शेपटी लावून घेत असे. त्या काळात खऱ्या 'सिंहा'प्रमाणेच खोटे पेंढा भरलेले 'सिंह'; खऱ्याखुऱ्या 'त्यागमूर्तीं'च्या बाजूलाच खोटे 'त्यागवीर' ठायी ठायी मिरविले! परंतु सुदैवाने, त्या काळच्या त्या 'त्यागवीर', 'अमुक अमुक सिंह', 'क्रांतिकेसरी', 'प्रदेश-गांधी', 'जिल्हा नेहरू', 'राष्ट्रसंत' इत्यादी पदव्या आता क्वचितच ऐकू येतात!. . . आणि मोठ्या संतोषाची गोष्ट ही की, आता 'भारतरत्न', 'पद्मविभूषण', 'पद्मभूषण' नि 'पद्मश्री' हे राष्ट्रीय सन्मान देण्याची प्रथा बंद करण्याचा अभिनंदनीय निर्णय केंद्रीय जनता सरकारने नुकताच जाहीर केला आहे. राज्यघटनेच्या ज्या १८व्या कलमान्वये ही सुधारणा जनता सरकारने केली त्याचे आभार मानावे तेवढे थोडेच! विशेष हे की, ज्या महाभागांना ह्या पदव्या पूर्वीच चिकटल्या आहेत, त्यांनाही त्या अजागल-स्तनांप्रमाणे निरर्थक वाटणार आहेत! छे, छे, तसेही नाही! बोकडाला ते कुचकामी कंठ-स्तन जाहीरपणे मिरविता तरी येतात; पण ह्या दुर्दैवी महाभागांना ते 'पद्मश्री' इत्यादी किताब नामफलकावर वा लेटरहेडवरही वापरता येणार नाहीत!. . . हाय, हाय, ह्या पदवीपायी ज्यांनी ज्यांनी मंत्रिगणांपुढे उघड वा गुप्तपणे आरती ओवाळली असेल; ज्यांनी खटपटीलटपटी केल्या असतील, त्यांच्या त्या प्रयासांवर ह्या

१८व्या कलमाने बोळा फिरविला ! मात्र एक फायदा असा की, ह्यापुढे यदाकदाचित 'आणीबाणी' आलीच नि तिच्याविरुद्ध आंदोलन उभे राहिले, तर 'तुम्ही तुमची पदवी परत का केली नाही ?' असा अडचणीचा सवाल कोणीही विचारू शकणार नाही !

ह्या सरकारी पदव्या (अथव्या भंपक पुढाऱ्यांनी भगतगणांकडून लावून घेतलेल्या पदव्या) काळाच्या ओघात वाहून गेल्या तरी, काही पदव्या नि काही पदवीधर अजरामर आहेत. विक्रमादित्याचे सिंहासन कालवश झाले, पण त्याच्या लाडक्या कालिदासाला समस्त कविजनांनी मनापासून दिलेली 'कवी कुलगुरू' ही मानाची पदवी कोण हिरावून घेऊ शकतो ? त्या स्वराज्यमंत्र-द्रष्ट्या टिळकांना लोकांनी उत्स्फूर्तपणे बहाल केलेली 'लोकमान्य' ही पदवी कोणती सत्ता काढून घेऊ शकते ? त्या ज्वलंत विज्ञाननिष्ठ क्रांतिकारकाची— वि. दा. सावरकरांची— 'स्वातंत्र्यवीर' ही पदवी हरण करणे साक्षात काळाला तरी शक्य आहे काय ?. . . चित्तरंजन दासांची 'देशबंधू'; सुभाषचंद्र बोसांची 'देशगौरव', गोपाळ हरि देशमुखांची 'लोकहितवादी,' विष्णुशास्त्री चिपळूणकरांची 'मालाकार', कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांची 'नाट्याचार्य,' नारायणराव राजहंसांची 'बालगंधर्व', लता मंगेशकरांची 'स्वरलता'. . . ह्या आणि अशा अनेक पदव्या, अस्सल कर्तबगारीला अस्सल भक्तिभावाने बहाल केल्या आहेत आणि म्हणूनच त्या कधीही नष्ट होणे नाही. खऱ्याखुऱ्या गुणवंताकडे ह्या जनता-पदव्या आपण होऊन चालून आल्या आहेत; हे जातिवंत गुणीजन पदव्यांच्या मागे धावत गेलेले नाहीत. त्यांचे मोठेपण स्वयंभू. म्हणूनच—

*नाभिषेको न संस्कारः*
*सिंहस्य क्रियते मृगैः ।*
*विक्रमार्जित-सत्वस्य*
*स्वयमेव मृगेन्द्रता ।*

असा त्यांचा बाणा ! कोणतेही सरकार वनातील पशूकडून सिंहाला राज्याभिषेक करत नाही; पदवी देत नाही. पण म्हणून काय झाले ? त्याची 'मृगेन्द्रता' स्वयंसिद्धच असते ! आणि अशा स्वयंसिद्ध श्रेष्ठतेच्या मस्तकी जनताजनार्दन आपखुषीने शाश्वत पदवीचा मुकुट चढवीत असतो !

□

॥ ३३ ॥

# पदवीदान : हे आणि ते !

*२९ जानेवारी १९८४*

कितीही शतके उलटली तरी मूलभूत मानवी स्वभाव आणि मानवी व्यवहार तत्त्वतः बदललेला नाही. उदाहरणार्थ , सण-समारंभ-उत्सवप्रियता जशी जुन्या जमान्यात होती, तशीच आधुनिक युगातही कायम आहे. सण-समारंभाचे ठराविक कर्मकाण्ड नि ठराविक साचा तयार करण्याची मानवी प्रवृत्ती पूर्ववत विद्यमान आहे. म्हणूनच, जसे दसरा-दिवाळीचे तसेच गणराज्यदिनाचे विशिष्ट आन्हिक सिद्ध झाले आहे. २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन म्हटला की राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री ह्यांचे (बहुशः ठराविक ठशाचे) शुभसंदेश प्रसृत व्हायचेच ! राज्यपालांच्या निवासस्थानावरील लब्ध-प्रतिष्ठितांचे संमलेन, सैनिकी संचलन, ध्वजवंदन, शासकीय इमारतींची रोषणाइ इत्यादी सर्व उपचार घडायचेच ! ह्या सर्व ठराविक उपचारांमध्येच विविध क्षेत्रांतील गुणीजनांना शासनातर्फे पदव्या नि पुरस्कार देणे, हे एक महत्त्वाचे कलम असते. जनता राजवटीच्या अल्पजीवी कालखंडात हे कलम रद्द झाले होते. कारण त्या जनताशासनाला असे वाटले होते की, ही सरकारी पदवीदान-पद्धती आधुनिक काळाला शोभणारी नाही. ब्रिटिश आमदानीतील 'रावसाहेब रावबहादूर'— निर्मितीशी तिचे साम्य आहे ! शिवाय, नानाविध दडपणे नि वशिले ह्यांच्या बळावर काही सरकारी पदव्या कधी कधी इतक्या अस्थानी पडतात की, त्यामुळे पदवी-धारकांचे मूल्य वाढण्याऐवजी पदव्यांचे मात्र अवमूल्यन होते ! . . तथापि, पुनश्च इंदिरा काँग्रेस सत्तेवर येताच पदवीदान-पद्धतीचे पुनरुज्जीवन झाले. ठीक आहे. कारण, ह्या पदवीदानात काही दोष असले, तरी गुण-पूजनही आहेच आहे !

ह्या वर्षीही पदवीदान यथासांग घोषित झाले. 'भारतरत्न' आणि 'पद्म-विभूषण' ह्या सर्वोच्च पदव्या जरी या वर्षी सनाथ होऊ शकल्या नाहीत, तरी तदितर 'पद्म-भूषण'—'पद्मश्री' ह्या किताबांचे तुरे अनुक्रमे १३ नि ६७ गुणवंत— भाग्यवंत भारतीयांच्या मस्तकी विराजमान झाले !. . . महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करता, आमचे एकेकाळचे सहकारी (लोकसत्तेचे भूतपूर्व सह-संपादक) नि भारत-विख्यात नाटककार श्री. विजय तेंडुलकर 'पद्मभूषण' ह्या किताबाने, तर 'पुढारी'कार गणपतराव जाधव नि त्रिवेन्द्रम अवकाश-संशोधन-केंद्राचे प्रमुख डॉ. वसंतराव गोवारीकर हे 'पद्मश्री' ह्या पदवीने, सन्मानित झाले. आम्ही ह्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे सर्वश्री धनंजय कीर, वा. रा. कान्त, य. दि. फडके, शिवाजीराव सावंत, विजया राजाध्यक्ष, केशव मेश्राम, अनिल बर्वे, अनिल अवचट इत्यादी गुणी ग्रंथकारांना वाङ्मयपुरस्कार मिळाल्याबद्दल तेही अभिनंदनास पात्र आहेत. . . सरकारदरबाराने साहित्यिकांना वा कलाकारांना पुरस्कार नि पदव्या देण्याची परंपरा फार प्राचीन आहे. त्यासंबंधी काही संकोचही जुन्या काळच्या प्रांजळ पंडितांना वाटत नसे. कारण—

*"विनाश्रया: न शोभन्ते*
*पंडिता: वनिता: लता:"*

ही त्या काळची धारणाच होती !. . . आणि त्या काळचे शासकीय पदवीदानही जास्त घरंदाज नि कलात्मक होते. डझनावारी मंडळींना एकाच छापाच्या पदव्या देण्याऐवजी, हरेक गुणी जनाला त्याच्या त्याच्या वैशिष्ट्यानुसार वेगळी किताबत देण्यात येत असे. नुसते कविजन घेतले तरी कोणाला, 'कविराज', कोणाला 'कवीन्द्र', कोणाला 'कवि कुलगुरू', कोणाला 'काव्य-केसरी' अशा भिन्न भिन्न अर्थछटांच्या पदव्या मिळत ! आमच्या जगन्नाथ पंडिताला तर, शाहजहानने 'पंडितराज राजतिलक' अशी दशाक्षरी लफ्फेदार पदवी दिली होती ! अंतराळ संशोधक 'पद्मश्री', पत्रकारही 'पद्मश्री' आणि एखादा अभिनेता वा अभिनेत्रीही 'पद्मश्री'च.

परंतु, ह्या शासकीय पदव्यांहून श्रेष्ठ पदव्या कोणत्या ? तर रसिकांनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या आणि जनता जनार्दनाने मान्य केलेल्या पदव्या. उदाहरणार्थ, दिनकर ढेरे ह्या अस्सल नटाने भावबंधनातील 'कामण्णा'ची भूमिका इतकी काही लाजबाब केली की त्याला 'दिनकर कामण्णा' म्हणू लागले. त्याला रसिक जनतेने दिलेल्या 'कामण्णा' ह्या पदवीची सर 'पद्मश्री' ला येईल काय ? 'वा:, हा तरुण मुलगा अगदी बालगंधर्वासारखा गोड गातो' अशा आशयाचे कौतुक लोकमान्य टिळकांनी जाहीरपणे केले असता, ते रसिकांना इतके रुचले की, नारायण राजहंसाचा उत्स्फूर्तपणे 'बालगंधर्व' झाला ! नारायणरावांना मिळालेली 'बालगंधर्व' ही लोकमान्य-पदवी जशी कायम टिकली तशीच

सौदागर नागनाथ गोऱ्हे ह्यांना मिळालेली 'छोटा गंधर्व' ही पदवी चिरस्थायी झाली. 'भूगंधर्व'ही रहिमतखानांना, 'कुमार गंधर्व' ही कुमार कोमकली ह्यांना, 'सूरश्री' ही केसरबाईंना, 'बालकवी' ही त्र्यंबक बापूजी ठोमरे ह्यांना, 'नाट्याचार्य' ही खाडिलकरांना, 'यमक्या वामन' ही वामन पंडितांना मिळालेली अशासकीय पदवी ! अशा रसिक-दत्त पदव्यांची रुची नि योग्यता काही न्यारीच असते. 'शिशुपालवध' ह्या महाकाव्याचा लेखक माघ ह्याने रैवतक पर्वताला एक बहारदार उपमा दिली. 'ह्या रैवतकाच्या एका बाजूने सूर्य उगवत आहे आणि दुसऱ्या बाजूने चंद्र अस्तास जात आहे. अशा वेळी— ज्याच्या पाठीवरून एका बाजूस सोन्याची नि दुसऱ्या बाजूस चांदीची घंटा लोंबत आहे, अशा गजराजाची शोभा ह्या पर्वताला प्राप्त होते (वहति गिरिरयं विलंबि— घण्टा-द्वय परिवारित वारणेन्द्र शोभा !)' हीच ती उपमा. ह्या एका उपमेवर बेहद्द फिदा होऊन रसिकांनी 'घण्टा माघ'अशी पदवी त्या कविवर्याला दिली ! त्याचप्रमाणे—

*संचारिणी दीप-शिखैव रात्रौ*
*यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।*
*नरेन्द्र मार्गाट्ट इव प्रपेदे*
*विवर्ण भावं स स भूमिपातः ।*

ह्या श्लोकात स्वयंवर मंडपातील इंदुमतीला 'दीपशिखे'ची अत्यंत सुंदर उपमा कालिदासाने दिली. त्याच कालिदासाला विक्रमादित्याने दिलेल्या रत्नहारापेक्षा उत्स्फूर्त पदवी शतपट मौल्यवान वाटली असेल, यात काय संशय ?

□

॥ ३४ ॥

# गंगेचे पाणी

*६ एप्रिल १९६१*

भव्य, उदात्त नि उत्तुंग स्वप्न केवळ कवीच पाहू शकतात असे नाही. आपल्या देशाच्या आर्थिक नियोजनाचे निर्मातिही एखादे भव्य दिव्य स्वप्न डोळ्यापुढे आणू शकतात ! पंचवार्षिक योजनांच्या रूक्ष आकडेमोडीत दंग झालेले आपले नियोजक, एखादे अशक्यप्राय वाटणारे सुंदर नि महन्मंगल स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचा मनसुबा रचू शकतात ! कशावरून ? गत सप्ताहात जलविद्युत-मंत्री डॉ. के. एल. राव यांनी जलसिंचन आयोगाचे जे एक ध्येय कथन केले त्यावरून. डॉ. राव म्हणाले, "गंगेचे पाणी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतात सर्व प्रदेशांत पोहोचविण्याची योजना सरकारच्या डोळ्यापुढे आहे. यासाठी उत्तर नि दक्षिण भारतातील प्रमुख नद्या, अनेक कालवे खोदून, गंगेला जोडाव्या लागतील. अर्थात हे काम चुटकीसरशी होणारे नाही. पण या शतकाच्या अखेरीपर्यंत ते पूर्ण होऊ शकेल."

केव्हाही पूर्ण होवो; पण खरोखरच ही भव्य कल्पना ज्या पाटबंधारे-शास्त्रज्ञाला प्रथम सुचली असेल त्याला धन्यवाद ! भगीरथाने स्वर्गातील गंगा भूलोकावर आणली ही घटना जेवढी रोमहर्षक, तितकीच हीही कल्पना प्रत्यक्षात उतरल्यावर रोमहर्षक ठरेल. बहुसंख्य भारतीयांची इच्छा असते की, एकदा तरी त्या पवित्र भागीरथीत स्नान घडावे; किमानपक्षी, अंतिमक्षणी तरी गंगेचे पाणी मुखात पडावे. 'शंकर शंकर' असा पुण्यघोष करीत जिच्या जल-लहरी अहर्निश तांडव करतात; जिच्या उदकाचा नुसता स्पर्श झाला तरी पातकांच्या राशी नाश पावतात; जिच्या पवित्र पाण्याच्या नुसत्या दर्शनानेही पुण्याईचे संभार जमा होतात, ती पातकभंगा गंगा कोट्यवधी भारतीयांच्या भक्तिभावाचा विषय

आहे ! आणि ह्या भक्तिभावनेच, आपापल्या मुलखांतील अनेक लहान-मोठ्या नद्यांना त्या गंगेचा महिमा अर्पण केला आहे ! ह्या भक्तिभावनेच गोदावरीला दक्षिण गंगा म्हटले ! पंढरपूरच्या भीमा आणि चंद्रभागा ह्यादेखील पांडुरंगाच्या चरणीच्या गंगाच ! 'वैनगंगा', 'पंचगंगा' इत्यादी नद्याही भागीरथीच्याच प्रतिमूर्ती ! फार काय सांगावे, राजापूरला बारा वर्षांनी प्रकट होणारी निर्झरिणी म्हणजेही 'गंगाच' !...

असा त्या भागीरथीचा, जन्हु-नंदिनीचा महिमा थोर ! तिच्या पाण्याला तर ओढ आहेच, पण तिच्या पाण्याचीही ओढ भारतीय मनाला अनिवार आहे ! जगन्नाथ पंडितांपासून तो इक्बालपर्यंत अनेक महान कवींनी तिला काव्य-फुले वाहिली ती उगाच नव्हे. भागीरथीविना भारताची कल्पनाही करता येणे अशक्य, इतकी ती आमच्या भाव-विश्वाशी निगडित झाली आहे. अशा या अमृत-वाहिनीचे पवित्र जल भारतातल्या सर्व नद्यांतून प्रवाहित करण्याची सरकारची योजना इतकी काही मनोवेधक आहे की, ती अमलात येताच भाविक भारतीय म्हणतील, "आता सरकारला सर्व गुन्हे माफ ! सर्व खून माफ ! ज्या सरकारने गंगेची 'जगदाधारा जलधारा' आमच्या दाराशी आणली, त्याला आम्ही आमची सर्व पुण्याई बहाल करण्यास तयार आहोत !"...

सरकारला हा असा दुवा जरूर मिळेल. पण कोणी कदाचित असेही म्हणतील की, गंगेला इतर नद्या जोडण्याहून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या गंगेस भिन्न भिन्न समाजगंगा जोडणे अधिक महत्त्वाचे, अधिक जरुरीचे नि अधिक अवघड आहे ! तुम्ही कालव्यांच्या आधाराने नद्या एकमेकींना जोडाल; अनेक मैल लांबीचा झुलता पूल टाकून उरण बेट मुंबईशी जोडू शकाल. अशा प्रकारचे भौगोलिक जोडकाम पुष्कळच करता येईल. पण या खंडप्राय देशातील भिन्न-भिन्न जाति-जमातींच्या नि भाषांच्या जनसमूहांना एक-राष्ट्रीयत्वाच्या सूत्रात गुंफणे अत्यंत बिकट पण अत्यंत आवश्यक नाही काय? भाषिक, प्रांतीय नि जातीय वादांचे खतरनाक खंदक जागोजागी पडले आहेत. फुटीरता बोकाळली आहे. राष्ट्रीय एकात्मतेला ठायी ठायी सुरुंग लागले आहेत. अशा वेळी भारतातील सर्व प्रदेशांतील भिन्न भिन्न संस्कृतीच्या सरितांतून वस्तुतः एकाच भारतीय संस्कृतीचे गंगाजल वाहत आहे, हा साक्षात्कार जे कोणी घडवू शकतील त्यांची थोरवी इतिहासात सुवर्णाक्षरांनीच नोंदवावी लागेल !

□

॥ ३५ ॥

# जय गंगे भागीरथी !

*४ डिसेंबर १९८३*

खरोखरच, विधात्याने हिंदभूमीला नद-नद्यांच्या नि निर्झर-सरोवरांच्या नानाविध अलंकारांनी नटवले आहे. पण ह्या सर्व अलंकारांत सर्वाधिक मनोवेधक, सर्वाधिक मंगल– सर्वाधिक तेजस्वी– अलंकार कोणता ? तिच्या गळ्यात शोभणारे गंगेचे मंगलसूत्र !. . . बस्स, ह्या एकाच ठसठशीत अलंकारावर महाकवींचे सारे अलंकारशास्त्र कुर्बान झाले असून, त्यांच्या मुखांतून उद्‌गार निघाला आहे– 'जय गंगे भागीरथी ! हर-गंगे भागीरथी ! हे पुण्य-पियूष-मयी भागीरथी ! हे धवलतरंगे, तिन्ही लोकांना पवित्र करणाऱ्या त्रिपथगे, हे सकल-पातक-भंगे, तुझा विजय असो ! भारतीय जनतेला एकात्मतेच्या सूत्रात बांधणाऱ्या जननी, तुझा विजय असो !. . . भरतभूमीच्या निरभ्रनील गगनात लुकलुकणारे तारे, तुझ्या साहचर्याने पावन झालेले सुखशीतल वारे, तुझ्या तीरावरील पवित्र मंदिरे, हिंदभूमीची सुंदर सुंदर उद्याने आणि घनदाट हिरवी कांतारे, या देशाची उत्तुंग शैल-शिखरे आणि हजारो नगरे तुझाच जयजयकार करताहेत– 'जय गंगे भागीरथी !'. . . हा काही राजकारणाच्या मलिन क्षेत्रातील भाडोत्री 'निष्ठावंतां'नी केलेला मतलबी झिंदाबाद नव्हे ! ज्यांना तुझ्या मनःशांति-दायक सामर्थ्याचा प्रत्यय आला, ज्यांना तुझ्यातील देवत्वाचा दिलासा लाभला– ज्यांना तुझ्या निरपेक्ष उपकाराचा अनुभव मिळाला– ज्यांना तुझ्या प्रसन्न सौंदर्याचा साक्षात्कार झाला– त्या सर्वांनी केलेला हा जयघोष आहे !. . . 'गमयति भगवत्पदम्' म्हणजे जी भगवत्पदांकडे भाविकांना घेऊन जाते, जी अखंड सेवेचा नि त्यागाचा धडा स्वतःच्या आचरणाने शिकविते, तीच गंगा अशी ज्यांची जिवंत

श्रद्धा आहे, अशा श्रद्धावंतांनी केलेला हा जयजयकार आहे– 'जय गंगे भागीरथी !'

'जय गंगे भागीरथी,' ह्या पुण्यघोषात त्या श्रेष्ठ प्रयत्नवादी भगीरथाचाही जयजयकार गुंफला गेल्याचे दिसून येते. . . गंगे, तुझा तो महान तपस्वी भक्त भगीरथ ! आपल्या ६० हजार भस्मीभूत पूर्वजांच्या उद्धारासाठी आणि त्या निमित्ताने भारतभूमी सुजलासुफला करण्यासाठी ज्याने घोर तपाचरण केले तो दिलीपपुत्र भगीरथ– तो अंशुमान राजाचा नातू भगीरथ– सगरकुलदीपक भगीरथ ! त्याच्याच पुण्याईवर प्रसन्न होऊन, हे पुण्यवती, तू स्वर्गाच्या उत्तुंग मनोऱ्यावरून पृथ्वीतलावर प्रचंड वेगाने झेप घेतलीस आणि तुझे ते कल्याणकारी अवतरण वाया जाऊ नये म्हणून श्रीशंकराने तुला प्रथमतः जटाजुटांत बद्ध करून, नंतर सप्त धारांनी खाली सोडले. त्याच शुभ दिवसापासून श्रीशंकर गंगाधर झाले आणि तुला भागीरथी हे नामाभिधान प्राप्त झाले ! तू मूळची स्वर्गातील देवनदी– मंदाकिनी. पण जनहितासाठी जशी भागीरथी बनलीस, तशीच जन्हुनंदिनी जान्हवीदेखील झालीस ! सारे स्वर्गसुख मागे सारून केवळ सामान्य जनांच्या कल्याणासाठी ह्या मर्त्यलोकात आलेल्या महोदार माते, तुझा महिमा व्यास-वाल्मिकी-कालिदास-जगन्नाथ इत्यादी महाकवींनादेखील यथार्थपणे वर्णन करता येईल काय? माते, तुझा महिमा अपार आहे. "तुझ्यापासून शतयोजने दूर असलेला मानव जर शुद्ध भक्तीने 'जय गंगे, हर गंगे' असा जप करील, तर तो सर्व पापांतून मुक्त होऊन विष्णु-लोकात प्रवेश मिळवील," ही या देशातील कोटी-कोटी लोकांची श्रद्धाच, तुझा महिमा पटविण्यास पुरेशी आहे. ह्या देशाच्या आद्य शंकराचार्यांपासून तो सामान्य शंकर आचाऱ्यापर्यन्त सर्व थरांत रुजलेली ही श्रद्धाच ह्या देशाच्या एकात्मतेचा एक भक्कम आधार बनली. इतकी की नुसत्या तुझ्या जलाच्या प्राशनानेही आधि-व्याधींचा परिहार होतो– 'औषधी जान्हवी तोयम्'– अशी ह्या भारतातील असंख्य लोकांची भावना झाली. अंत्यकाळी तुझ्या पवित्र पाण्याचे दोन बिंदू तरी मुखात पडावेत, अशी प्यास कोट्यवधी मनात निर्माण झाली ! आजच्या कैक 'सेक्यूलरवाद्यां'ना हा इतिहास ठाऊकही नसेल की, कैक मुस्लीम राज्यकर्त्यांनीही तुला 'मैय्या' मानले, तुझे जल रोग-निवारक असल्याची श्रद्धा बाळगली ! महंमद तघलख तुझे पाणी नेमाने पीत असे, औरंगजेबही जेवताना तुझे जल प्राशन करीत असे आणि अक्बर तर गंगोदकाला अमृतासमान मानीत असे !. . .

तुझे जल हे असे दिव्य रसायन आहे की, त्यात त्रिविध ताप विझून जातात, कृत्रिम भेद विरघळून जातात, क्षुद्रता वाहून जाते आणि शैव-वैष्णव, वैदिक-अवैदिक इत्यादी साऱ्या मतभेदांना जलसमाधी मिळते !

जो जो भारतात जन्मला, त्याची त्याची तू माता– तू देवता. तुझ्यापाशी आप-परभाव नाही. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत थोडा फरक करून म्हणता येईल–

*हिंदूंची तृषा हरूं ।*
*मुस्लीमांते विष होऊन्न मारूं ।*
*हे नेणेची गा करूं ।*
*गंगामाई ॥*

सर्व जातींचे, सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे, सर्व थरांचे लोक तुझ्या पाण्यावर पिढ्यान् पिढ्या पोसले गेले आहेत. शेती रावाची असो वा रंकाची, ती तुझ्या पाण्यावर तरारली आहे ! आणि म्हणूनच सर्वांच्या कंठांतून तुझा जयजयकार शतकानुशतके प्रकटला आहे– "जय गंगे भागीरथी !"... जसे तुझे औदार्य अतुलनीय तसेच तुझे सौंदर्यदेखील अतुल्य. कोण्या कवीने म्हटले आहे ते खरेच आहे की–

*राजराजेश्वरी*
*रूप तव पाहुनी*
*हर-शिरी चंद्रमा*
*जाय कृश होउनी*
*शैलजा-मत्सरां*
*हरही अवमानुनी*
*तुजसी सन्मानितो*
*निज शिरी घेऊनी !*

सकाळी सूर्योदयाच्या वेळी धुक्याचे पांढरेशुभ्र तलम वस्त्र परिधान करून, त्यातील अरुण-किरणांची जरतार चमकावीत आणि झगमगत्या तुषारांचे हिरे-मोती उधळीत तू जेव्हा हरद्वारच्या उंचवट्यावरून वाराणसीकडे येतेस, तेव्हा वाटते की मूर्तिमंत देवदयाच राजस रूप धारण करून, दुःखितांचे दैन्य-दारिद्र्य दूर करण्यासाठीच स्वर्गाच्या राजमंदिरातून भूतलावर आली आहे !... अथवा असेही म्हणता येईल की–

*हिंद-भू-वेदना*
*ऐकुनी पाहुनी*
*दाटली जी दया*
*शंकराच्या मनीं*
*तीच ओसंडूनी*
*वाहते भारतीं*
*दुग्ध-धारा जणू*
*भक्त-जन-धारिणी !*

*धन्य भागीरथी*
*जननि वरदायिनी !*

तुझा असा गुण-गौरव तरी किती करावा ? तुझा तो परमभक्त पंडितराज जगन्नाथ— (सुप्रसिद्ध 'गंगालहरी'चा कर्ता)— जे म्हणाला तेच त्रिवार सत्य आहे— "सर्व तीर्थांमध्ये तूच प्रधान, सकल धर्मांचे तूच निधान, आणि बुद्धीचे सात्त्विक समाधान तूच ! अशा तुझ्या ललित लहरींचा मंजुळ ध्वनी ज्या कानी पडला नाही त्यांचा धिक्कार असो आणि तुझे रमणीय रूप ज्यांना पहावयास मिळाले नाही ते नेत्र, विशाल असले तरी, व्यर्थच होत—

*विशालाभ्यां आभ्यां किमिह*
*नयनाभ्यां खलु फलम्*
*न याभ्यां आलीढा*
*परम रमणीया तव तनुः ?"*

— तथापि, तुझ्या रम्य रूपाचे दर्शन आणि तुझ्या नादमधुर लहरींचे श्रवण, दूरस्थ भक्तांना होऊ शकत नाही, हे त्या जगन्नाथ पंडिताने जरी लक्षात घेतले नाही, तरी 'विश्व हिंदू-परिषदे'ने लक्षात घेतलेले दिसते ! १६ नोव्हेंबर १९८३ रोजी हरिद्वार नि गंगासागर येथून जलकुंभ घेऊन निघालेली परिषदेची 'एकात्मता यात्रा' आता महाराष्ट्रात प्रवेशली आहे. इतकेच नव्हे, तर ती येत्या ७ तारखेस मुंबईत येत आहे. ह्या वेळी कोणतेही पक्षीय-जातीय-पंथीय किल्मिष मनात न बाळगता, मुंबईचे नागरिक तुझ्या जल-कलश-यात्रेत सामील होऊन 'जय गंगे भागीरथी' हा पुण्यघोष करतील, तुझे ते मंगल कलश प्रीतीने-भक्तीने स्वीकारतील ह्यात शंका नाही. जननि गंगे ! ह्या उपक्रमाला आशीर्वाद दे, समाजात एकात्मता निर्मिणारा तुझा जयजयकार सर्वत्र दुमदुमू दे— 'जय गंगे भागीरथी !'

□

॥ ३६ ॥

# कौटुंबिक सुख-दुःख !

*१९ फेब्रुवारी १९८४*

एकाकी जीवन कोणताही प्राणी जगू शकत नाही— मानव तर नाहीच नाही ! जिथे पशूही कळप करून जीवन जगतात, पक्षीही घरटी बांधतात, नर-मादी परस्परांवर उत्कट प्रेम करतात, अपत्यांवर वात्सल्य वर्षतात, तिथे मानवांची कथा काय? मानवसंघांचे समाज बनतात आणि हे समाज परस्पर-सहकार्य नि स्नेह ह्यांच्या बळावरच चालतात.

म्हणूनच—

*"यह जिंदगी उसीकी है*
*जो किसीका हो गया,*
*प्यारमेंही खो गया"*

हीच समाजशील मानवाची धारणा होते ! 'जो एकट्यानेच खातो तो पाप खातो. सहनौ भुनक्तु !' हा उपनिषदांतील विचार मानवाच्या सामाजिकतेचाच द्योतक आहे. ही सामाजिकता, इतरांवर प्रेम करण्याची ही वृत्ती, Love Thy Neighbour ही शिकवण, माणूस प्रथमतः कोठे शिकला? 'इश्कसे तबीयतने जीस्त का मजा पाया (प्रेमामुळेच जीवनाचा आनंद मिळाला)' हा अनुभव मानवाला प्रथमतः कोठे मिळाला?— घरात ! कुटुंबनामक संस्थेत ! ही कुटुंब-संस्था गृहात नि गृहस्थाश्रमातच सफळ होते. म्हणूनच आपल्या संस्कृतीत गृहस्थाश्रमाचे— गृहस्थी जीवनाचे— महत्त्व सर्वांत जास्त आहे. सुखी समाधानी गृहस्थी जीवनाची— कौटुंबिक जीवनाची— किती बहारदार नि आदर्श वर्णने आपल्या महाकवींनी केली आहेत ! परस्परांवर निरतिशय नि निःस्वार्थ प्रेम करणारे पिता-पुत्र, माता-पुत्र, बंधू-बंधू, इत्यादींच्या चित्रणानेच रामायण हा ग्रंथराज

अमृत-मधुर बनला आहे. रामायणाने रेखाटलेल्या कुटुंबांत स्पर्धा आहे ती त्यागाची. भोगाची नव्हे ! किंबहुना परस्पर-प्रेमापोटी जन्मलेला त्याग हाच येथला भोग !. . .

गृहस्थी जीवनाचे रामायणकालीन सुंदर चित्र आजही आपल्या समाजाने आदर्श मानले आहे. ते ह्या बकाल यंत्रयुगामुळे प्रत्यक्षात उतरविणे फार कठीण झाले आहे खरे. पण त्याची अभिलाषा ओसरलेली नाही. कुटुंबाच्या पालनपोषणाची सारी जबाबदारी शिरावर घेतलेला गृहस्थ आणि त्याची जणू शिवशक्तीच बनलेली गृहिणी ! ही गृहिणी कशी ? तर—'कार्येषु मंत्री, करणेषु दासी, भोज्येषु माता, शयनेषु रंभा' अशी ! पतीच्या सुखदुःखाशी समरस झालेली ! अशी गृहिणी लाभल्यावर पतीच्या मुखातून सहजच धन्योद्गार बाहेर पडतात—

*-हसतमुख जी सदा कामकाजी रमे*
*पसरवी मोहिनी रम्य मधु-विभ्रमे*
*धन्य संसार तत्-संगमी रंगला*
*धन्य मी आणि ती धन्य वरमंगला !*

अशा दांपत्याला होणारे अपत्य म्हणजे घराला भूषविणारे प्रीतीचे रत्न, घर सुगंधित करणारे मदनवृक्षाचे फूल, रति-देवतेचा पुण्यप्रसाद आणि पति-पत्नींच्या हृदयवस्त्रांना एकत्र बांधणारी अतूट स्नेह-ग्रंथी ! अशा गृहात अतिथींचे स्वागत होते, धर्म-कर्तव्यांचे पालन होते, मुलाबाळांवर उत्तम संस्कार होतात. सारांश, गृहस्थाश्रम धन्यता पावतो !. . . पण कित्येकांच्या नशिबी असा सुखी गृहस्थाश्रम विधात्याने लिहिलेला नसतो. तेथे घर असले तरी घरपणा नसतो ! कोण्या प्राचीन कवीने अशा घराचे — कुटुंबाचे— चित्र रेखाटताना म्हटले आहे—

'घरातील कारटी रडताहेत—ओरडताहेत, घर गळत आहे, अंगणात चिखल आहे. शय्या-सुख कोठले ? अंथरुणात ढेकूण आहेत ! खायला कदान्न असून ते वाढणारी बायको आहे डोके खाणारी कर्कशा ! आणि म्हणूनच कुटुंबप्रमुख म्हणत आहे की धिक्कार असो या गृहस्थाश्रमाचा—धिग धिग् गृहस्थामः !'

हे चित्रण झाले दारिद्र्यपीडित गृहस्थाच्या कौटुंबिक जीवनाचे. पण जेथे श्रीमंती नांदते आहे तेथे कौटुंबिक सुख नांदतेच असे नाही. ऋणानुबंधाच्या गाठी दैवयोगाने सुरेख जुळल्या तर गरिबीतही गृहस्थाश्रम फुलतो, अन्यथा श्रीमंतीतही कोलमडून पडतो ! परळच्या कळकट चाळीतील दोन खोल्यांतदेखील जे कुटुंब-सुख दिसून येते, ते कधी कधी पेडर रोडवरील पॉश फ्लॅटांतही आढळत नाही ! कुटुंबांतील व्यक्तींमधील स्नेह नि सामंजस्य ह्यावरच हे सौख्य अवलंबून असते. पण हाय ! असे सुख-समाधान न लाभले तर कर्तबगार माणसांनादेखील जीवन नकोनकोसे होते.

घरदार-जमीन-जुमला-बाग-बगीचा-बँक बॅलन्स इत्यादी ऐहिक वैभवात काहीच अर्थ नाही, असे त्यांना वाटू लागते. कोणी विचारतील, 'कौटुंबिक सुखाविना श्रीमंत माणूस कासावीस होणे साहजिक आहे. पण कीर्तिमंत माणसाचे काय? शेकडो-हजारो लोकांनी केलेल्या कौतुकाच्या कैफात तो गृहशल्य विसरू शकणार नाही काय?' विसरू शकेलच, असे निश्चयाने म्हणता येणार नाही. निकटवर्तियांच्या प्रेमाचीच भूक असलेली काही माणसे तीव्र निराशेने म्हणतात—

*"काय तुझ्यावीण मला*
*हो प्रिय ही कीर्ति बरे?*
*कीर्ति नको, काय करू*
*घेऊन मी हार-तुरे?"*

—राष्ट्रपति-पदक संपादन केलेले, केन्द्रीय रेव्हेन्यू इन्टेलिजन्स डायरेक्टोरेट विभागाचे एक कर्तबगार अधिकारी श्री. मोहन गिरिधारीदास देवराय यांनी स्वतःवर गोळया झाडून जी आत्महत्या केली, ती वरील सत्याचीच निदर्शक असावी. 'मी कौटुंबिक समस्येमुळे आयुष्याची अखेर करून घेत आहे', असे त्यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले होते, असे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. मोठमोठ्या सार्वजनिक समस्या सहज सोडवू शकणारी कीर्तिवंत माणसे, कधी कधी कौटुंबिक समस्येची शिकार होतात, हे केवढे दुर्भाग्य!

□

॥ ३७ ॥

## ताजमहालांना धोका

*२४ ऑगस्ट १९८०*

जिच्याविषयी अनेक अद्भुत आख्यायिका नि दिलखेचक दंतकथा निर्माण व्हाव्यात, अशी एक सुन्दर सफेत वास्तू यमुनेच्या काठी उभी आहे. भारताला भूषणावह होणारी नि जगातील सात आश्चर्यांत जिची गणना होते अशी ही संगमरवरी भव्य वास्तू– अर्थात 'ताजमहाल' (की अग्रेश्वर महादेवाचा तेजोमहाल?) प्रीतिदेवतेने ढाळलेले पवित्र अश्रू घनीभूत होऊन हा महाल बनला की सुरांगनांचे धवल हास्य घनीभूत होऊन हे महालय घडले, की भारतवर्षाच्या अभिजात सौंदर्य-लालसेनेच हे शुभ्र संगमरवरी रूप धारण केले, असे प्रश्न कविमनाला सहज स्पर्शून जावेत, इतकी ही वास्तू प्रेक्षणीय आहे. चांदण्यारात्री तर तिची शोभा काही अपूर्वच असते. आपल्या गोऱ्यापान देखण्या प्रेयसीचे वर्णन करताना कोणी शायर तिला ह्या राजस इमारतीची उपमा सहज देऊन जातो. तो म्हणतो–

***देखके मर्मरसा वो शफ्फाक बदन***
***लोग उसको 'ताजमहल' कहते है !***

अनेक कविजनांची, चित्रकारांची, छाया-चित्रकारांची प्रतिभा ह्या शुभ्र वास्तूच्या दर्शनाने उजळली आहे. . . पण आता? आता तीच जगप्रसिद्ध वास्तू जर हवेच्या प्रदूषणाने काळवंडू लागली, तर प्रज्ञावंतांची प्रतिभा उजळणार कशी? 'ताजमहाल'बरोबरच तीही काळवंडणार नाही काय? आणि वायुप्रदूषणाने जर ह्या विलोभनीय वास्तूच्या प्रत्येक पाषाणाला 'कॅन्सर' जडला, तर ती टिकणार तरी कशी अन् किती काळ? मग ही वास्तू म्हणजे शाहजहानने आपल्या लाडक्या मुमताज बेगमेच्या स्मृतिगौरवासाठी बांधलेला 'ताजमहाल' आहे की राजपूत राजसिंहाने भक्तिभावाने

उभारलेले अग्रेश्वर शंकराचे ‘तेजोमहालय’ आहे, हा पु. ना. ओकांच्या संशोधनाने उपस्थित केलेला वादविवाद तरी कसा टिकेल ?. . .

## प्रदूषण वाढते आहे

ताजमहालापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर जेव्हा ‘मथुरा-रिफायनरी’चे बांधकाम सुरू झाले, तेव्हाच (१९७६ साली) ह्या प्रदूषणाच्या धोक्याचा इशारा जाणकारांनी शासनाला दिला होता. ह्या तेलशुद्धीकरण कारखान्याची जागा बदलावी असे सुचविले होते. पण ह्या देशात तज्ज्ञांच्या इशाऱ्याकडे क्वचितच लक्ष दिले जाते, हा अनुभव येथेही आला ! ही सावधानतेची सूचना करण्यास कोण्या तज्ज्ञांचीही वस्तुतः जरुरी नव्हती. कारण आग्रा येथील सुमारे २५० फाऊन्ड्र्या, २ विद्युत-निर्माण-केन्द्रे आणि धूर ओकत्या रेल्वे-इंजिनांचे यार्ड ह्यांच्यापायी जे प्रदूषण होते, त्यामुळे केवळ ताजमहालवरच नव्हे, तर अन्य सुन्दर वास्तूंवरही काळिमा पसरू लागला आहे, हे उघडच दिसत होते. ह्या प्रचलित प्रदूषणात आता मथुरा-रिफायनरी-जन्य प्रदूषणाची भर पडेल, तेथील हवेतील ‘सल्फर डायऑक्साइड’चे प्रमाण सध्यापेक्षा सुमारे २० टक्क्यांनी वाढेल.

हा धोका कसा टाळावा ? आता जवळजवळ पूर्ण होत आलेली मथुरा रिफायनरी तर अन्यत्र हलविता येणे शक्य नाही. पण तरीही तिच्या धुराड्यांची उंची भरपूर वाढवून आणि गंधकाचे प्रमाण कमी असलेले डिझेल वापरून, हा धोका अंशतः तरी कमी करता येईल. (तसे करण्याचे ‘इंडियन ऑइल कार्पोरेशन’ने मान्य केले आहे, हेही नसे थोडके !) ज्यांत हलक्या जातीचा कोळसा वापरण्यात येतो ते आग्र्यातील लहान कारखाने अन्यत्र हलवूनही, ताजमहालची हानी काही प्रमाणात रोखता येईल. . . तथापि, ह्या साऱ्या उपायांनी ताजमहाल पूर्णतः संकट-मुक्त होईलच, अशी हमी देता येणे मुश्कील आहे !

## साऱ्यांचे उत्तर एकच !

ताजमहाल सुन्दर खराच, पण त्याहूनही सुन्दर काय आहे ? मानवी जीवन ! ताजमहाल टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न झालाच पाहिजे. पण त्याहून अधिक टिकविण्यालायक काय आहे ? मानवी अंतःकरण ! कोणी कविराज उद्गारला आहे— “अगदी गरजच पडली तर एक वेळ मंदिर तोडा, मशीद फोडा. पण मानवी मन शाबूत ठेवा. कारण, परमेश्वराचे खरे घर तेच आहे !

*मंदिर को तोडिये,*
*मस्जिद को ढाइये, ।*

*दिल को न तोडिये*

*वो खुदाका मकान है ! ॥"*

हाय हाय ! पण आज भारतात मानवी मनांचे कोट्यवधी ताजमहालच नानापरींच्या प्रदूषणांमुळे धोक्यात आले आहेत. त्याचे काय? वायु-प्रदूषण, जलप्रदूषण, अन्नप्रदूषण ह्यांनी भारतातील नागरिकांचे शारीरिक आरोग्य तर बिघडत आहेच, पण त्याहूनही वैचारिक प्रदूषणांमुळे उडालेला हाहाकार भयानक आहे. मुरादाबाद ते अहमदाबाद, साऱ्या देशांत ठिकठिकाणी जे हिंसाचार गेल्या काही दिवसांत उद्भवले ते काय दर्शवितात? जातीयवाद्यांचे बेछूट जमाव पोलिसांवरही हत्यार चालविण्याची हिंमत दाखवतात, हे कशाचे निदर्शक? अधूनमधून आमच्या विधानसभांना नि लोकसभेलाही, जे बेशिस्त बाजाराचे स्वरूप प्राप्त होते, ते कशाचे लक्षण? एवढ्या तेवढ्या निमित्ताने कायदा-सुव्यवस्था कोठे कोठे पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळावी, हे कशाचे चिन्ह? सामान्य जनतेच्या असंतोषाच्या चितेवर आपापल्या राजकीय स्वार्थाचे परोठे भाजले जातात, हे कशाचे द्योतक?

—ह्या साऱ्या प्रश्नांचे उत्तर एकच.

—संकुचित स्वार्थी विचारांनी कोटी कोटी भारतीयांच्या दिलांचे देखणे ताजमहाल प्रदूषण-ग्रस्त केले आहेत ! ह्या दिलांची सफेत सच्चाई काळवंडली आहे, स्फटिक-धवल दानत ढासळली आहे. म्हणूनच, यमुनातटावरील त्या संगमर्मरी वास्तूच्या रक्षणाहून, ह्या मनोमंदिराचे संरक्षण कसे होईल, ह्याचाच विचार समाज-धुरीणांनी आधी केला पाहिजे !

□

॥ ३८ ॥

## उडत्या हत्तीचा प्रश्न !

*४ मार्च १९८४*

'मानव-मानव सर्व समान' हे उदात्त वचन तत्त्वतः खरे आणि ध्येय म्हणून उत्कृष्ट असले, तरी व्यवहारात मात्र असे दिसून येते की, सर्व मानवांची प्रकृती-प्रवृत्ती सारखी नसते. शक्ती-युक्ती-मती-गती आणि आसक्ती समान नसते. ह्या अपूर्ण जगतात, विषम जगतात, जे एखाद्याचे मिष्टान्न, तेच दुसऱ्याचे विष होऊ शकते ! एखाद्याच्या बाबतीत जहरही अमृत-मधुर बनू शकते ! गाईचे दूध म्हणजे भूलोकीचे अमृत. पण तेदेखील सर्वांना सारखेच पुष्टिदायक होईल असे नाही. ज्ञानेश्वर महाराज तर सांगूनच गेले आहेत की, 'विषमज्वर झालेल्या माणसाला जर गो-क्षीर दिले तर ते विषवत ठरते !. . . कोणाला काय रुचेल ह्याचा जसा निश्चित नेम नाही, तसेच काय पचेल ह्याचाही नेम नाही. मानवांची रुची जशी भिन्न भिन्न, तशीच शक्तीही भिन्न भिन्न. नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या 'शारदा' नाटकातील भुजंगनाथ म्हणतो, ते ठीकच आहे—

*मंथन-विष जग जाळित सुटले*
*विष्णु न घे, विधि तोही न घे !*
*शिव सहजी पचवि ते*
*– बळ ज्याचे त्यास ते !*

प्रत्येकाचे बलाबल वेगळे— 'स्ट्रॉंग पॉइन्ट' वेगळा, 'विक पॉईन्ट'ही वेगळा. श्रीशंकरच हालाहल प्राशन करू शकले, इतर देवांना ते खडतर काम जमले नाही. प्रभू रामचंद्रच शिवधनुष्य लीलया उचलू शकले, इतर राजे-महाराजे ते साहस-कर्म करताना उताणे पडले ! आपल्या करंगळीवर श्रीकृष्णच गोवर्धन-पर्वत सहज तोलू शकले, इतरांना

हे कार्य अशक्यच झाले असते !

परंतु, ही देवादिकांची पुरातन उदाहरणे कशाला? मानवांच्या दैनंदिन जीवनातदेखील काय दिसते? ५-२५ माणसांचा पुरणा-वरणाचा स्वयंपाक खेड्यातली पाटलाची पोर सहज करते, पण टीचभर 'प्रेशर कुकर' मध्ये सारे पाकशास्त्र 'सायंटिफिक्ली' उकडून काढणाऱ्या मॉडर्न मैनेचे हे काम नव्हे! उलटपक्षी, सिने-नट्यांनाही लाजवील अशा माधुक मुखमंडनासह पॉश पार्ट्यांत शिरून, आपले काजळलेले नेत्र पुरुषनेत्रांना भिडवून, हुंडाबळीपासून गुंडागर्दीपर्यन्त साऱ्या विषयावर धिटाईने वचवचा बोलणे, हसणे-खिदळणे हे आधुनिक पुरंध्रींना सहज अवगत असले तरी, एरव्ही बिबळ्या वाघालाही कोयत्याने ठार मारणारी ग्रामीण सुंदरी अशा पार्ट्यांत लाजून गोंधळून घामाघूम झाल्याविना राहणार नाही!. . . 'इश्क' नामक सर्वप्रिय विषयातदेखील असेच आहे. 'इष्क' सर्वांना आवडणारा असला, तरी परवडणारा नाही. लैला-मजनूच्या अथवा बाजीराव-मस्तानीच्या प्रणय-कथा आपण आवडीने वाचतो-ऐकतो. पण तसा 'इश्क' करणे कितीजणांना जुळेल? कोण्या शायराने जे म्हटले आहे ते रास्तच आहे—

> ***मुहब्बत के लिये कुछ खास***
> ***दिल मखसस होते हे ।***
> ***यह वो नग्मा हे, जो हर साज पे***
> ***गाया नहीं जाता ।***

विधात्याने इश्कासाठी काही खास वैशिष्ट्यपूर्ण हृदये तयार केली आहेत. कोणत्याही वाद्यावर वाजवता नि गाता येईल असे हे प्रणय नामक गीत नाही'. . . जसा इश्काचा मुश्किल मेवा सर्वांना पचत नाही, तसाच राजसत्तेचा वैभवशाली गोडवा हरेक आमदाराला वा नामदाराला चाखता येईलच असे नाही. एकंदरीने पाहता राजसत्तेच्या वैभवाची मिठाई धिटाईने खावी तर ती इंदिरा काँग्रेसवाल्यांनीच! इतर पक्षाच्या सत्ताधीशांना हे काम चोख जमत नाही. ते जेव्हा बन्सीलाल-भजनलाल-अंतुले-गुंडूराव इत्यादी इंदिरा काँग्रेस बहाद्दरांची शिकवणी ठेवतील, तेव्हाच सत्तेचे सुख कसे पेलावे, पांढरे हत्ती कसे पोसावेत, हे शास्त्र त्यांना थोडेबहुत अवगत होईल. सध्या ते या कामी बरेच कच्चे आहेत. उदाहरणार्थ, 'बळ ज्याचे त्यास ते' ह्या न्यायाने कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आर. गुंडूराव नि आजी जनता-पक्षीय मुख्यमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे ह्यांची तुलना करा म्हणजे झाले.

अरे अरे अरे, गांधीवादी साधेपणाच्या सावटाखाली वावरणाऱ्या हेगडे महाशयांना 'राज्यकर्ते' म्हणून तरी कसे संबोधावे? गुंडुरावांच्या कारकीर्दीतील एक हेलीकॉप्टर-

नामक उडता हत्तीदेखील ह्या जनता-मुख्यमंत्र्यांना नि त्यांच्या सरकारला 'प्रॉब्लेम' होऊन बसावा ना? परदेशीय चकचकीत गाड्या, मोटारसायकलींचा ताफा, पोलिस व्हॅन्सचा तांडा हा सारा लवाजमा कमी झाला म्हणून की काय, ग्रेट गुंडूराव सरकारने रु. ८६ लाखांना एक हेलिकॉप्टर विकत घेतले. आणि गुंडूरावांनी हा उडता सफेत हत्ती यथेच्छ ताबडला. . . 'ही सरकारी पैशांची अक्षरशः 'उड्डाण'टप्पू उधळण होय', ह्या जननिंदेची वा टीकाकारांची त्यांनी बिलकूल पर्वा केली नाही.

*वरं निज-हितं ध्येयम्*
*केवला न जन-स्तुतिः'*

हे त्या कर्नाटक-कुंजरांचे ध्येय होते. गरज असो वा नसो, त्यांनी हे महागडे वाहन-रत्न साऱ्या कर्नाटकात मिरवले !. . . पण नंतर? गुंडूराव पडले, जनतासरकार आले, पण हे वाहनरत्न हे गुंडूजींचे 'पुष्पक-विमान'— हे हेलिकॉप्टर तसेच पडून राहिले !. . . नवीन सोवळे जनता-सरकार त्याला हात लावीना. म्हणूनच, कर्नाटकचेच बांधकाम मंत्री श्री. देवे गौडा ह्यांनी विधानसभेत नुकतीच शिकायत केली की 'ह्या उडत्या हत्तीचे काय करायचे? त्याची देखभाल-साफसफाई -इन्शूरन्स इत्यादींचा खर्च दरमहा १ लक्ष १९ हजार रुपये येतो. बरे, हे खर्चिक हेलिकॉप्टर विकून टाकावे म्हटले तर त्याला कोणी गिऱ्हाईक मिळत नाही.' कॅबिनेट-मंत्र्यांना खास प्रसंगी त्याचा वापर करण्यास आता परवानगी देण्यात आली आहे. पण जन-निंदेचा धसका घेतलेले जनता-मंत्री हे महागडे वाहन वापरण्याची टाळाटाळ करतात !. . .

— काय म्हणावे ह्या डरपोक मंडळींना? राज्यकर्त्यांनी कसे बेडर असावे हे इंदिरा काँग्रेस धुरीणांपासून शिकावे. अथवा हे हेलिकॉप्टर कोणत्याही इंदिरा काँग्रेस- सरकारला विकून टाकावे. जे खर्चाला घाबरतात ते राज्यकर्ते कसले? सत्ता-संपत्ती-सुरा नि सुंदरी हे हिंमतबाजाचे विषय आहेत ! !

□

॥ ३९ ॥

# भविष्य-शौकिन देश !

*२४ डिसेंबर १९७२*

आपल्या भारताचे भविष्य कसेही असो; त्याच्या नशिबी दारुण दुष्काळ असो की सुबत्तेचा सुकाळ असो; भविष्य-कथनाविषयीची त्याची 'कीर्ती' अभंगच राहील ! अगदी प्राचीन काळापासून सारी दुनिया या देशाला 'भविष्य-भूषणांचा, होरा-रत्नांचा ज्योतिष्य-पटूंचा देश' म्हणून ओळखते. जगज्जेत्या अलेक्झांडरने या देशातील एका साधूला आपल्या दिग्विजयाचे भविष्य विचारले होते; आणि त्या साधूनेही ते बिनचूक वर्तविले होते, असे ग्रीक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. प्राचीन काळी भारतातील प्रत्येक राजाच्या पदरी एक तरी राज-ज्योतिषी असायचाच ! कैक चतुरंग-बळधारी राजांचे पान 'पंचांग' बळधारी ज्योतिर्भूषणाविना हलत नसे. राजेरजवाड्यांची गोष्ट सोडाच, ह्या देशातील अडला-नडला दरिद्र-नारायणदेखील वारंवार कुडबुड्या ज्योतिषांकडे धाव घेत असतो ! प्रतिष्ठित वृत्तपत्रे तर दररोज 'शुभराशी' वा 'राशिभविष्य' छापतातच; पण शहरांतील अनेक रस्तेही शुभराशींना आपल्या कडेवर घेतात !

### जनतेचे भविष्य

जनता रस्त्यावर येण्याची भाषा पुढारी अधूनमधून बोलतात, ते साहजिकच आहे. कारण जनतेचे भविष्य केव्हाच रस्त्यावर आले आहे ! या महान भारत देशात मटका खेळणाऱ्या मवाल्यांपासून तो निवडणुकांचा जुगार खेळणाऱ्या मिनिस्टरापर्यंत; दक्षिणेवर नजर ठेवणाऱ्या भटापासून तो 'नाइट'वर नजर ठेवणाऱ्या नटापर्यंत; सट्टेबाज अर्थकारणापासून सत्ताबाज राजकारणापर्यंत सर्वत्र भविष्यवेत्त्या ज्योतिषांचे अधिराज्य

पसरलेले दिसेल. इथे पंचवार्षिक योजनांची गणिते चुकतील; भाव-वाढ रोखण्याची गणिते चुकतील; पण ग्रह-गणित कधीच चुकणार नाही ! हा भविष्यवेत्त्यांचा देश नुसते ग्रह-गणितच मांडत नाही, तर गुंड-पुंड ग्रहांना कसे संतुष्ट ठेवावे, कोणती लाच देऊन प्रसन्न करावे, ह्याचे शास्त्रही सांगतो; 'अनिष्ट ग्रहशांती'चे उपाय सुचवितो !'

### ग्रहमयी प्रियतमा

अशा या ज्योतिष-शौकिन भरतभूमीत इष्कालादेखील ग्रहगणिताची नि भविष्यजिज्ञासेची बाधा झाली, तर नवल कसले ? इथले कविजन नि प्रेमीजन सुंदरींच्या लालचुटुक ओठात 'मंगळ' नि तेजस्वी नेत्रांत 'शुक्र' पाहतात ! एक संस्कृत पंडित तर आपल्या प्रियतमेचे वर्णन करताना म्हणतो–

*गुरुणा स्तन-भारेण*
*मुखचंद्रेण भास्वता !*
*शनैश्चराभ्यां पादाभ्यां*
*रेजे ग्रहमयीव सा ॥*

तिचा स्तनभार 'गुरू' म्हणजे मोठा; तिचे कांतिमान मुख म्हणजे चंद्र, अन् तिची पाऊले 'शनैश्चर' (हळूहळू चालणारी) अशी ती मंदगामिनी ग्रहमयीप्रमाणेच शोभली !

### इष्कफेरा जब्बरच !

प्रेयसीचा 'ग्रहमयी' म्हणून गुणगौरव करणारे येथील प्रेमी जीव तर भविष्याचे फारच जिज्ञासू. कारण इष्काच्या आपत्तीचा फेरा शनीच्या साडेसातीहून जब्बर ! साहजिकच बिचारे ग्रह-नक्षत्रांच्या मेहरबानीची वाट पाहत बसतात. मिर्झा गालिबसारखा कवीही स्वतःच्या दिलाला दिलासा देण्यासाठी उद्गारतो–

*देखिये, पाते है उशशाक*
*बुतोंसे क्या फैज ।*
*इक ब्रह्मन्‌ने कहा है*
*कि यह साल अच्छा है ॥*

(पाहू या, आमच्यासारख्या प्रेमीजनांवर सुंदरींच्या कृपेची नि दिलदारीची कितपत वृष्टी होते ते ! एका ब्राह्मणाने तर भविष्य सांगितले आहे की, हे वर्ष चांगले आहे !)

### यशवंत भविष्य

जेथील जनता ही इतकी भविष्यशौकिन, तेथले नेतही 'भविष्य' नादी असल्यास मुळीच आश्चर्य वाटावयास नको. आमचे कैक पुढारी बुद्धिप्रामाण्यवादाचा कितीही आव

आणत असले, तरी भविष्य जाणून घेण्यासाठी ज्योतिषांच्या हाती कुंडली नि सामुद्रिकाच्या हाती हात देण्यास भरपूर उत्सुक असतात. . . परंतु आपल्या यशवंतराव चव्हाणांनी याही पुढचा टप्पा गाठला आहे. ते नुसते भविष्य-जिज्ञासूच उरले नाहीत, तर आता भविष्य-उद्‌गातेही बनले आहेत. त्यांनी गेल्याच सप्ताहात औरंगाबाद मुक्कामी भविष्य वर्तविले — 'पुढील वर्षी महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडेल व भरपूर पीक येईल !. . . मृग नक्षत्राची कुंडली बदलली आहे. म्हणूनच मृगाच्या सुरुवातीला जरी पाऊस आला नाही तरी जूनच्या अखेरीस तो नक्की कोसळणार आहे !'. . . यशवंतरावांची बरीच राजकीय भाकिते खरी ठरली आहेत. तसेच हे पर्जन्य-भाकीतही खरे ठरो, हीच वरुणराजाला प्रार्थना !

□

॥ ४० ॥

## काय म्हणावे या वेड्याला ?

२३ जून १९७४

ही विलक्षण कहाणी 'जपान' मधली आहे. गेल्या महायुद्धात ज्याच्या हिरोशिमा-नागासाकी बेटांवर अणुबॉम्बने प्रचंड हाहाकार उडविला; ज्याची जबरदस्त मनुष्यहानी नि वित्तहानी झाली; आणि तरीही ज्याने हिंमत न हारता पुनश्च सुबत्तेचे शिखर गाठले; विज्ञानात नि व्यापार-उदिमात आश्चर्यजनक प्रगती केली त्या देशांतील ही विस्मयकारक कहाणी आहे ! ('सत्यमेव जयते' असा उदघोष करीत पदोपदी असत्याची पूजा करणाऱ्या देशातील नव्हे !)

कहाणी थोडक्यात अशी–

गुरु. दि. १३ जून रोजी 'इचिन्रोमिया' नामक एका पंथाच्या धर्मगुरूंनी– कातसुइची मोतोगी ह्यांनी– असे भाकीत केले की, मंगळ. दि. १८ जून रोजी सकाळी ८ वाजता जपानच्या ओसाका-विभागाला भूकंपाचा प्रचंड धक्का बसणार आहे. 'आतल्या आवाजा'च्या बळावर केलेले हे भाकीत ! त्याविषयी मोतोगी ह्यांना इतका विश्वास वाटत होता की त्यांनी, भयंकर सनसनाटी निर्माण करणाऱ्या ह्या भाकिताच्या सुमारे २ लक्ष हस्तपत्रिका ओसाका-कोबे इत्यादी टापूत वाटल्या– जनतेला सावध करण्याच्या सदहेतूने ! पण हे भाकीत खरे ठरले नाही. भूकंपाचा लहानसाही धक्का बसला नाही. पण त्याहून नवलाईचा जबर धक्का बसला तो मोतोगी ह्यांच्या हाराकिरीचा ! ८ वाजता आपली भविष्यवाणी खोटी ठरलेली पाहताच त्या शुचिर्भूत नि प्रामाणिक धर्मगुरूने हाराकिरी करून जीव देण्याचा प्रयत्न केला. त्यांची स्थिती चिंताजनक आहे. त्यांनी हाराकिरी करण्यापूर्वी लिहून ठेवलेली चिठी पोलिसांना मिळाली. तीत लिहिले होते–

'माझे भाकीत असत्य ठरले. त्यापायी झालेल्या क्लेशांचे प्रायश्चित्त म्हणून मी प्राणत्याग करीत आहे !'

काय म्हणावे या वेड्याला?

अरे, भाकीत खोटे ठरले तर ठरले ! त्यासाठी प्रायश्चित्त म्हणून आपला बहुमोल जान कुर्बान करायचा? 'वेळ प्रसंगी धन-दौलत द्यावी, बायको द्यावी, लाज-लज्जा सोडावी पण आपला जीव वाचवावा'(आत्मानं सततं रक्षेत दारैरपि धनैरपि।) हे व्यवहारवादी सुभाषित वेड्या मोतोगींना ठाऊक नव्हते काय? एकदा वर्तविलेले भाकीत खोटे ठरले तर पुन्हा दुसरे भाकीत वर्तविता येते; एकदा दिलेले वचन असत्य ठरले तर ते पुन्हा देता येते; पण एकदा दिलेला प्राण पुन्हा देता येत नाही, हे त्या वेडपट धर्मगुरूला कळू नये ना? त्याने आमच्या भारताकडे— कोण एके काळी स्वप्नात दिलेले वचन पाळणारा हरिश्चंद्र नि 'प्राण जाय पर वचन न जाई' असे ब्रीद पाळणारा रघुवंश ह्यांच्याविषयी विख्यात असलेल्या प्राचीन भारताच्या अर्वाचीन औलादींकडे पाहावयाचे होते ! शब्दांच्या सच्चेपणाविषयी जागरूक असलेल्या त्या जुन्या काळच्या परंपरा तोडून, 'स्वहिताचा धंदा' साधण्यासाठी कोणताही विधिनिषेध न पाळणाऱ्या आधुनिक भारतीयांकडे मोतोगींनी आदर्श म्हणून पाहिले असते, तर हाराकिरीचा खटाटोप करण्याचे त्यांच्या स्वप्नातही आले नसते ! या देशात शेकडो होराभूषण, शेकडो ज्योतिष भास्कर, शेकडो भविष्य-रत्नाकर, नानाविध भविष्ये वर्तवितात; पण ती खोटी ठरली तर मनाला लावून घेत नाहीत. आणि त्यात गैर काय आहे? मानवाचे पाय चंद्राला लागल्यापासून चंद्र दूषित झालाय आणि मानव-निर्मित उपग्रह अंतराळात घिरट्या घालू लागल्यापासून सारे ख-चक्रच 'आऊट ऑफ ऑर्डर' झाले आहे. मग दरवेळी भविष्य बिनचूक कसे येणार?

आणि भारतीय पुढारी?— त्यांच्यासारखे भाकीत-बहाद्दर नि आश्वासन-दाते दुनियेत कोणी नसतील. 'पाच वर्षांत भारत अन्नधान्यात स्वावलंबी होईल'; 'अमुक अमुक पाणी-पुरवठा योजनेनंतर 'उदंड झाले पाणी' असे होऊन जाईल'; 'पाच वर्षांत नवी रोशनी येऊन गरिबी पूर्णतः हटेल'; 'काळा बाजारवाल्यांना भर चौकात फाशी देण्यात येईल'; 'घराघरांत वीज नि शेताशेतांत पंप, असे होऊन जाईल'; 'हरित क्रांतीने सारा देश हिरवागार बनेल' या ढंगाची अनेक भाकीते नि वचने या देशात वारंवार निनादतात. पण ती खोटी ठरली तर कोणी प्राण दिल्याचे ऐकिवात नाही ! पुढारीपणाचा बिनभांडवली धंदा तर भरघोस वचने आणि द्रष्ट्याचा आव आणून उच्चारलेली भाकीते ह्यांवरच बहुतांश अवलंबून असतो. वचन खोटे ठरेल तेव्हा ठरेल; तात्पुरता कार्यभाग तर व्यवस्थित साधतो ! आणि भविष्यवाणी खोटी ठरली तरी ती भविष्यकाळात; आज तर

'पब्लिक' झुलवता येते ! तोच खरा भविष्यवेत्ता, की जो 'भविष्या' ची पर्वा न करता,

*Unborn tomorrow*
*and dead Yesterday*
*Why fret about them*
*if to-day be sweet?*

(मृत होय 'काल' अन् 'उद्या' अजून अजात !
जर 'आज' गोड किती त्यांची क्षिती करशील ? ॥)

ह्या वृत्तीने भविष्य-कथनाचा उपयोग'आज' गोड करण्यासाठी करतो !

— परंतु जपानमधील त्या पागल पुरोहिताला हा व्यवहारवाद ठाऊक नव्हता, असे दिसते !

□

॥ ४१ ॥

# होराभूषण हादरले !

*१३ जानेवारी १९८०*

ह्या विसाव्या शतकात विज्ञानाने आश्चर्यकारक प्रगती केली असली, तरी विद्याविभूषित 'मॉडर्न' माणसेही, फारच थोड्या प्रमाणात बुद्धि-प्रामाण्यवादी आढळतात ! स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विज्ञान-निष्ठ समाजसुधारक निबंधांची पोपटपंची करणारे कैक 'अद्ययावत्' महाभाग— 'शनि-मंगळादी ग्रह म्हणजे आकाशगंगेतील लखलखीत दगड ! आकाश-नगरपालिकेच्या मार्गावरील कंदील !' असे तोंडाने म्हणतात खरे; पण विवाहप्रसंगी पत्रिका पाहतात, मंगळ पाहतात. आपली 'साडेसाती संपत आली,' 'स्टार्स पॉवरफूल आहेत' इत्यादी उद्गार त्यांच्या मुखातून सहज प्रकटतात. 'फलज्योतिषावर आपला विश्वास नाही,' असे म्हणणारी कैक माणसे कोटाच्या आतल्या खिशात आपली जन्मकुंडली सुरक्षित ठेवीत असतात; आपला हात सामुद्रिकाला दाखवीत असतात. फार काय सांगावे— शनीला ते नित्यनेमाने तेल घालतात, 'शनिमाहात्म्य'ही वाचतात ! सारांश, ह्या देशात, बुद्धिप्रामाण्याचा मुखवटा चढवून अंध-विश्वास राजरोस वावरतो आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या हंगामात नवग्रहांना ज्योतिषी लोकांसह उच्चीचे दिवस लाभले होते. कारण व्यासपीठावर पुरोगामित्व मिरविणारे कैक लीडर्सदेखील खाजगीत होराभूषणांना आपले भवितव्य विचारीत होते; होरारत्नांनी सांगितलेली ग्रहशांती गुपचूप करीत होते ! काही महाभागांनी तर शतचंडीयज्ञ, लघुरुद्र-महारुद्र इत्यादी कर्मकांडेही यथासांग (पण गुपचूप—) पार पाडल्याची बोलवा आहे. अशा स्थितीत, काही वृत्तपत्रांतून ('लोकसत्ते'तून नव्हे) काही प्रसिद्धीलोलुप ज्योतिषाचार्यांची 'राजकीय भविष्ये' ही झळकू लागल्यास नवल नाही. तो काळच मुळी

अस्थिरतेचा, अनिश्चितपणाचा, साशंकतेचा होता. केवळ मतदारसंघाच्याच पाहणीचा (सर्व्हेचा) नव्हे, तर तारा-मंडळाच्याही पाहणीचा होता ! बड्या-बड्या मातब्बर धेंडांनाही ग्रह-नक्षत्रांचे भरपूर पाठबळ हवेहवेसे वाटत होते. त्या वेळी सुप्रसिद्ध ज्योतिर्विद उमर खय्याम ह्याचे अनुभवाचे परखड बोलही कुणाला मानवले नसते. खय्याम एका रूबाईत म्हणाला होता–

*"And that inverted Bowl*
*they call the sky,*
*Where-under crawling*
*coop'd we live and die,*
*Lift not your hand to it for help–*
*For it as impotently moves as you or I.*

हे आकाश म्हणजे एक उपडा प्याला. त्याच्या खाली आपण फरफटत जिंदगी जगतो, मरतो ! त्या आकाशांतील तारा-मंडळांचे साहाय्य मागण्यासाठी उगाच हात उंचावू नकोस. कारण ते तुझ्या-माझ्याप्रमाणेच अगतिक षंढत्वाने फिरते आहे." पण उमर खय्यामचे हे बुद्धिप्रामाण्यवादी बोल ऐकण्याच्या मनःस्थितीत त्या वेळी आपले उमेदवार नव्हते, मतदार नव्हते, आणि त्या अगतिक आकाश-कंदिलांचे फलादेश सांगण्यावरच उपजीविका करणारे होरारत्न तर नव्हतेच नव्हते ! डझनावारी होरारत्नांनी त्या काळात, अगदी छातीला हात लावून, धडाकेबाज राजकीय भविष्य वर्तविले. एखाददुसरा अपवाद वगळता सर्वांचे भाकीत होते की इंदिराजींचा प्रभाव पडणार नाही, त्या सत्तेवर येणार नाहीत; सत्तेवर जनता पक्षच येईल. निर्विवाद बहुमत मिळाले नाही, तरी मित्र पक्षांच्या साहाय्याने 'जनतापक्ष'च अधिकारारूढ होईल !

पण निवडणुकांचे निकाल जाहीर होताच जसे कैक राजकीय नेते, खास राजकीय निरीक्षक, निवडणूक-अंदाजपटू हादरले, त्याचप्रमाणे आमचे कित्येक ज्योतिर्भूषणही त्यांच्या ग्रह-गणितासह गडगडले ! गेल्या वेळी १९७७ साली अनेक ज्योतिषीबुवांची अशीच पंचाईत झाली होती. इंदिरा गांधी नि काँग्रेस ह्यांचे पानिपत होईल, असे त्यांच्यापैकी कोणीच म्हटले नव्हते. पण त्या वेळी ह्या भाकीतबहाद्दरांना एक सबब होती. ती ही की 'आम्ही खरेखुरे भाकीत सांगितले तर आम्हास ती बया तुरुंगात पाठवील, आमचा छळ करील, अशी भीती आम्हास वाटत होती. म्हणूनच आम्ही खाजगीत खरे भाकीत केले आणि सार्वजनिक भाकीते 'जरा मुरड घालून वर्तविली !' पण ह्या वेळी तर, हीही सबब नव्हती आणि तरीही गेल्या खेपेपेक्षाही ह्या खेपेस बहुसंख्य ज्योतिषांचे बोल फोल ठरले. आकाशातील ग्रहांपेक्षा ह्या देशांतील अफाट पब्लिकचा पूर्वग्रह (प्रेज्यूडिस)

हाच अधिक बलवत्तर असतो आणि सहजासहजी नजरेस पडणारा नसतो, हे सिद्ध झाले !

आमच्या ज्योतिषी बंधूंनाच का दोष द्या? जिथे मोठमोठाल्या राजकीय-पंडितांची कल्पनाशक्ती गुंग झाली, तथाकथित मास-बेस असलेल्या पुढाऱ्यांचेही अंदाज त्यांच्या यशासह कोसळले, तेथे बिचाऱ्या ज्योतिषीबुवांचा काय पाड? तथापि, आमचा समाज मोठा ढोंगी आहे. लहानसहान बाबतींतही त्याला ज्योतिषांकडे धाव घ्यावीशी वाटते. मामुली कार्यासाठीही हा समाज 'मुहूर्त' पाहतो आणि त्यासाठी ज्योतिषी लोकांचे साहाय्य मागतो. पण भले झाले, भरपूर लाभ झाला, तर होरारत्नांना दुप्पट फी देणारे महाभाग अगदी विरळा. भविष्य खोटे ठरले तर त्यांची टवाळी करणारेच जास्त ! ज्योतिषीबुवांची टिंगल करणारा हा कविवर्य बिहारीचा चावट दोहा पहा :

*चित पितुमारक-जोग गुनी*
*भयो भये सुत सोग।*
*फिर हुलस्यो, जिय जोयसो*
*समुझ्यो जारज-जोग ॥*

एका ज्योतिषाचार्यांना फार दिवसांनंतर पुत्र-रत्न झाले. साहजिकच त्यांनी आनंदाने मुलाची कुंडली मांडली; तिचे निरीक्षण केले. पण 'पितृमारक-योग' दृष्टीस पडल्यामुळे त्यांना फार दुःख झाले ! 'अरेरे, कारटा जन्मदात्याचा घात करणारा निपजला' असा आक्रोश ते करू लागले. पण नंतर थोड्या वेळाने त्यांनी पुनश्च त्या जन्मपत्रिकेचे सूक्ष्म निरीक्षण केले. त्यासरशी त्यांना खूपच उल्हास वाटला. कारण? कारण त्याच कुंडलीत त्यांना 'जारज-योग' आढळून आला होता ! 'प्रस्तुत पुत्र जारापासून जन्मलेला आहे, तेव्हा तो हलकट जन्मदाता जार मरणार, आपण नाही,' ह्या कल्पनेने ज्योतिषीबुवा हर्षनिर्भर झाले ! !

□

॥ ४२ ॥

# वचन-पूर्ती

*२२ नोव्हेंबर १९७०*

संशय-कल्लोळ नाटकातील सुशील गणिका-कन्या रेवती म्हणते, "तनुविक्रय पाप महा। पापांच्या बसले कळसी" ! पण खरे विचाराल तर, शरीर विकण्याहूनही मोठे पाप आहे वचनभंग ! दिलेला शब्द मोडणे म्हणजे पातकांचा कळस ! एरव्ही माणूस कितीही मोठा असो, गुणवान, धनवान असो; त्याला जर दिलेल्या शब्दाची काहीच किंमत वाटत नसेल तर त्या नरपुंगवाची किंमत तत्त्वतः शून्य ! कोणत्याही सुसंस्कृत सभ्य समाजात दिलेले वचन पाळणे हे सर्वांत मोठे नैतिक मूल्य मानले जाते. श्रीरामाचा सर्वश्रेष्ठ गुण कोणता ? दिलेले वचन पाळण्याचा !

परंतु, दुर्दैवाची गोष्ट ही की, पित्याच्या वचनपूर्तीसाठी हसतमुखाने वनवास स्वीकारणारा राम नि स्वप्नात दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी अनंत हालअपेष्टा नि मानहानी भोगणारा हरिश्चंद्र यांचा हा देश एकंदरीत ही 'रघुकुलरीति' विसरला आहे ! विशेषतः या देशांतील लीडर-मंडळींना वचन-भंगाची डर मुळीच वाटेनाशी झाली आहे. या दानत-दरिद्री मंडळींचे आवडते धोरण आहे 'वचने किं दरिद्रता ?' दीनदुःखी जनतेचे मन तात्पुरते जिंकून, सत्ताधीश होण्यासाठी वचनांची व आश्वासनांची बेफाम खैरात करून, पुढारीपणाची वरात सजविण्यामध्ये त्यांचा हातखंडा !. . .

लोकांची स्मरणशक्ती क्षणजीवी असते हे माहीत असल्याने, वचने देण्यासाठी असतात, पाळण्यासाठी नव्हे, हा त्यांचा समयसाधू सिद्धांत ! त्यांची तुलना फक्त उर्दू शायरीतील 'वायदा-फरामोश' कुटिल कामिनींशीच करता येईल !

वायदा-फरामोश कामिनी ? म्हणजे ? दिलेल्या वचनाला सहज हरताळ फासणारी

लबाड कामिनी. अभिजात उर्दू काव्यांत या संगदिल सुंदरीच्या वचन-भंगांच्या अनेक करामती आढळतात. ती मीलनरात्रीचे वचन देते, पण कधीच उभ्याउभ्याही भेटायला येत नाही. त्यामुळे बिचाऱ्या आशिकाला रात्रभर वाट पाहत, उसासे टाकत तडफडावे लागते. एक शायर म्हणतो, 'तिची रात्रभर वाट पाहत बसल्याने नींद हराम झाली ! आणि झोपच नाही, तर स्वप्न कोठले ? अन् स्वप्नच नाही, तर स्वप्नातील मीलन तरी कसे होणार ?' कबूल करूनही जी ओझरतीही भेट देत नाही, अन् निद्रानाशाचा विकार मात्र जडविते, अशा वचनभंगी बिलंदर बयेला एक प्रेमिक वैतागून बजावतो—

*साफ कह दीजिये,*
*'वायदा ही किया था किसने ?'*
*उज्र क्या चाहिये*
*झूठोंको मुकरनेके लिये ?. . .*

अशा या घटकोघटकी शब्द मोडणाऱ्या वा फिरविणाऱ्या हरजाई हसिनांनाही लाज वाटेल इतके वचन-भंग-पटुत्व आमच्या लीडर-मंडळींनी आत्मसात केले आहे ! आणि मग 'यथा नेता तथा जनता' या न्यायाने, सामान्य लोकांतही दिलेला शब्द पाळण्याची दानत संपुष्टात येत चालली आहे.

अशा परिस्थितीत म्हैसूर राज्यातील मुटुबिदरी गावच्या देवप्पा गौड-नामक २७ वर्षांच्या किसानाने दाखविलेली दानत खरोखरच कौतुकास्पद आहे. देवप्पाला २ ॥ लाख रुपये लॉटरीत मिळाले. निकालापूर्वीच त्याने आपल्या वीरप्पा गौड नामक मित्राला वचन दिले होते की, 'मित्रा, मला लॉटरीत पहिल्या नंबरचे बक्षीस मिळाले, तर मी तुला एक लाख रुपये देईन !' आणि नवल हे की, हे तोंडी वचन देवप्पाने तंतोतंत पाळले. पुरस्कारसमारंभात देवप्पा आपल्या दोस्ताला घेऊन गेला आणि त्याने अधिकाऱ्यांना स्वतः विनंती करून १ लाख रुपयांचा चेक वीरप्पाला रीतसर देवविला. भांगेच्या बनातही असा एखादा सत्त्वशील तुलसीवृक्ष उगवतो तर !

□

॥ ४३ ॥

# जगन्नाथ नि जॅक पॉट

*२२ डिसेंबर १९६८*

सर्वशक्तिमान परमेश्वराच्या कोपाला काय अथवा कृपेला काय सीमा नाही. तो प्रसन्न झाला की एका क्षणात दुःस्थितीच्या सप्त पाताळात गाडला गेलेला माणूस वैभवाच्या गौरीशंकर-शिखरावर आरूढ होतो! त्याने कृपेच्या अमृताचा शिडकाव करताच रखरखीत वाळवंटाचे बहरलेल्या नंदनवनात रूपांतर होते; एका क्षणात भिक्षाधीशाचा लक्षाधीश होतो; रंकाचा राव होतो; फार काय सांगावे, नरजंतूचा साक्षात नारायण होतो! मानवी कर्तृत्वाला जरूर किंमत आहे. पण परमेश्वरी कृपेविना मानवी कर्तबगारी वांझ ठरते. म्हणूनच 'यत्न तो देव जाणावा' असे म्हणणाऱ्या व 'चळवळीचे सामर्थ्य' प्रतिपादन करणाऱ्या समर्थांनादेखील 'परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' असे म्हणावे लागले. भगवत् कृपेचे अधिष्ठान नसेल तर मोठमोठ्या पुरुषसिंहाचे प्रयत्नही कवडीमोल होतात.

प्रयत्नवादी पुरुषोत्तमांनादेखील देवाचे नि दैवाचे हे अद्भुत सामर्थ्य जेथे मान्य करावे लागले, त्यापुढे नतमस्तक व्हावे लागले, तेथे जुगारी जिवांची कथा काय? म्हणूनच गुड्डापा येथील पाच रेस-रसिकांच्या जुगार-कथेचे नवल वाटण्याचे वस्तुतः कारण नाही. कसली जुगार कथा? कथा अशी की, गुड्डापा येथील पाच रेसशौकिन मित्र तिरुपती येथे गेले आणि त्यांनी नवस गेला की, 'देवा, रेसमध्ये आम्हाला यश आले तर तुलाही आम्ही योग्य ती भागी देऊ!' मग ते देवावरी सारा भार टाकून रेसच्या भोगासी सादर झाले! ते मद्रासला गेले आणि त्यांनी संयुक्तपणे ३२० रुपयांची 'जॅक पॉट'ची एकूण ३२ तिकिटे, 'तिरुपती'चे नाव घेऊन, खरेदी केली. आणि अहो भाग्यम्! अहो तिरुपति-वरदानम्! त्या ३२ तिकिटांतील २ तिकिटांना तिरुपति-कृपेने सुवर्णस्पर्श करताच, ४ लक्ष ८ हजार

रुपयांचा 'जॅकपॉट-योग' घडून आला. त्यासरशी अत्यानंदाच्या लहरी त्यांच्या अंतःकरणात उसळल्या. पण त्या लहरींच्या बहरातही ते श्रीहरीला—तिरुपतीला—विसरले नाहीत. उलटपक्षी ते ताबडतोब तिरुपतीला आले आणि त्यांनी तेथील देवमूर्तीला दंडवत घातले ! सद्‌गदित कंठाने ते तेथील देवस्थानाधिकाऱ्यांना म्हणाले, 'ही सारी देवाची दया; देवाची कृपा. तो आमच्या नवसाला पावला. आम्ही कबूल केल्याप्रमाणे देवाचा वाटा— रु. ६०,००० त्याला ताबडतोब रोख देऊन टाकू आणि उरलेल्या पैशाचाही सत्कार्यासाठीच उपयोग करू. . .'

जुगारी असूनही ही दानत? गडगंज पैसा हाती येऊनही परमेश्वराचे स्मरण? सत्कार्याची आठवण? शाब्बास, जुगाऱ्यांनो, रेसशौकिनांनो, परमेश्वराने योग्य स्थानीच कृपा केली म्हणावयाची ! पण हे परमेश्वरावरील भक्तीचे नि श्रद्धेचे फळ असेल काय? तो निष्काम तिरुपती या सकाम भक्तीवर खूष होऊनच त्याने त्या जुगारी जवानांना जॅकपॉट बहाल केला असेल काय?. . . छे, आमचे अश्रद्ध नाठाळ मन म्हणते परमेश्वराला ते जुगारपंचक समानधर्मीय वाटल्यामुळेच त्याने कृपेची एवढी बरसात त्यावर केली असेल ! ते जुगार पंचक त्या जगन्नाथाला समानधर्मी वाटले? म्हणजे? म्हणजे असे की, परमेश्वर हाच सर्वश्रेष्ठ जुगारी असल्यामुळे त्याला आपल्या जुगारी लेकरांविषयी विशेष ममत्व वाटले असावे. आपल्याला समानशील भक्त मिळाल्याचा आनंद झाला असावा. आणि म्हणूनच त्याने त्या रेसबहाद्दर भक्तांना 'जॅकपॉट' मिळवून दिला असावा !

परमेश्वर हा सर्वश्रेष्ठ जुगारी होय, याबाबत दुमत होण्याचे कारणच नाही. तो एक-दोन नव्हे तर कोट्यवधी सारीपाट मांडतो, एक-दोनच नव्हे, तर लक्षावधी रेसेस या जगात सुरू करतो- केवळ घोड्यांच्याच नव्हे, तर मानवांच्यादेखील ! विद्यार्थ्यांच्या रेसेसना परीक्षा म्हणतात, तर सत्तेच्या शर्यतीला राजकारण म्हणतात ! नावे काहीही द्या, पण लक्षावधी क्षेत्रांत लक्षावधी शर्यतींत लक्षावधी मानवांना घोड्यांहून अधिक जोशांत धावपळ करावयास लावणारा तो परमेश्वर अखिल जुगाऱ्यांचा मेरुमणीच नव्हे काय? कोठे इराणातील उमरखय्याम आणि कोठे भारतातील भर्तृहरी ! पण दोघांचेही मतैक्य आहे की—

*श्रेष्ठ जुगारी तो परमेश्वर*
*नक्षत्रांचे करूनी फासे*
*जगदंबेसह जगत्पटावर*
*तुम्हां-आम्हासी करूनि सोंगट्या*
*जुगार खेळे तो विश्वंभर !*

अशा ह्या जगन्नाथाने त्या जुगारी भक्तांना जॅकपॉट जिंकून दिला, तर त्यात नवल ते कोणते?

□

॥ ४४ ॥

## पुणेरी पगडी झिंदाबाद !

*२६ ऑक्टोबर १९६९*

गेल्या सोमवारी साहित्य संघ मंदिरात वैदिक पंडितांचा सत्कार-समारंभ झाला. त्या वेळी पुणेरी पगडीचे नशीब अधिकच उजळले ! पुणेरी पगडी ! कोल्हापुरी शेमला, मावळचे मुंडासे, याचप्रमाणे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्यपूर्ण शिरोभूषण म्हणजे पुणेरी पगडी ! लोकमान्य टिळक, नामदार गोखले, सुधारकाग्रणी आगरकर, रँग्लर परांजपे यांच्यापासून तो म. म. काणे, दत्तोपंत पोतदार नि वा. वि. मिराशी यांच्यासारख्या पंडितांपर्यंत अनेक कर्तबगार महाराष्ट्रीय विद्वानांच्या मस्तकी जी मिरवली (आणि म्हणूनच प्रतिष्ठा पावली !) ती पुण्यपत्तनाची पगडी, आता केवळ 'लोकमान्य'च नव्हे, तर राजमान्यही झाली— प्रतिष्ठेची आणखी एक झिळमिळी तिला लगटली ! कारण, गेल्या सोमवारच्या त्या समारंभात वेदपारंगत ब्रह्मवृन्दांच्या मेळाव्यात महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. पी. व्ही. चेरियन यांनी ती अत्यादरे मस्तकी चढवली. आणि जेहेत्ते कालाचे ठायी ते म्हणाले, 'बापहो, आज मी पक्का महाराष्ट्रीय झालो; खराखुरा महाराष्ट्रीय झालो.'. . . शिक्षणखात्यातील एका कर्तव्यतत्पर कर्मचारिणीने, राज्यपालिका बाईंनाही पक्क्या महाराष्ट्रीय करण्यासाठी नऊवारी साडीचा अहेर करून शिवाय खणानारळाने त्यांची ओटी भरली !

राज्यपाल चेरियन नि त्यांच्या सौभाग्यवती ताराबाई यांनी अनुक्रमे पुणेरी पगडी नि नऊवारी साडी यांचा अंगिकार करून, परिपक्व महाराष्ट्रीय होण्याचा जो सुलभ मार्ग दाखवून दिला, त्याचा अवलंब आमचे मंत्री आणि मंत्रिणी करतील काय? हो, काय हरकत आहे? संत ज्ञानोबांपासून तो विनोबांपर्यंत अनेक थोर थोर मराठी महापुरुषांनी

सांगितलेला त्यागाधिष्ठित महाराष्ट्र धर्म मनात नि मस्तकात बाळगण्यापेक्षा हा उपाय किती सुलभ आहे ! या उपायाने पक्के महाराष्ट्रीयत्व नक्कीच वाढीला लागेल. शिवाजी महाराजांप्रमाणे एकेक किल्ला, एकेक रणमैदान प्राणपणाने लढवायला नको; थोरल्या बाजीरावांप्रमाणे उत्तर भारतात धडक मारणे नको; राघो भरारीप्रमाणे अटकेवर झेंडा रोवणे नको; वासुदेव बळवंत फडके- चाफेकर इत्यादींप्रमाणे दिव्यदाहक हौतात्म्य नको; टिळकांप्रमाणे मंडालेचा कारावास भोगणे नलगे; सावरकरांप्रमाणे अंदमानच्या अंधेरीत खितपत पडणे नलगे; महात्मा फुले-आगरकर-आंबेडकर-अण्णासाहेब कर्वे इत्यादिकांप्रमाणे उपहास-बहिष्कार-अवमान-हालअपेष्टा यांचे हलाहल पचविण्याचीही आवश्यकता नाही. बस्स—

*एक पुणेरी पगडी आणा*
*आणि मिरवा मऱ्हाटी बाणा !*

आणि तरीही, (राज्यपालांची तळमळ नि सद्‌हेतू यांच्याविषयी आदर बाळगूनही !) कोणी शंकेखोर विचारतील, 'मराठी वेष धारण केल्याने मराठी आवेश संचरेलच असे ठामपणे सांगता येईल काय? पगडीचा पगडा मस्तकावर सहज बसू शकेल. पण त्या पगडीने सूचित होणाऱ्या ध्येयवादी विचारपरंपरेचा पगडा इतक्या सहजासहजी मेंदूवर बसू शकेल काय?. . . केवळ नऊवारी साडी नेसल्याने एखाद्या महिलेत राणी लक्ष्मीबाईचे अथवा अहल्यादेवीचे तेजःपुंज मराठीपण संचरेल काय ?'. . .

'नाही,' हे उत्तर उघड आहे. पण म्हणून काय झाले ? संस्कृतीत पोशाखालाही काही महत्त्व आहेच की नाही ? आंतरिक सुधारणा होईल तेव्हा होवो, बहिरंग-सुधारणा सुरू केल्याबद्दल कौतुक का करू नये ? पुणेरी पगडी नि नऊवारी साडी यांचे पुनरुज्जीवनही निश्चित अभिनंदनीय आहे ! पुणेरी पगडी झिंदाबाद ! नऊवारी साडी अमर रहे !

□

॥ ४५ ॥

## चौकशा आणि चौकशाच !

*२० मे १९७९*

गेल्या बुधवारी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री बनारसी दास ह्यांनी, अलीगढ नि दादरी येथील दुर्घटनांची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी फेटाळून लावली. त्या वेळी ते म्हणाले, "हरेक घटनेची न्यायालयीन चौकशीची मागणी करणे ही जणूकाही एक वेडगळ प्रथाच पडली आहे !". . . बनारसीदासांचे हे म्हणणे चौकशीग्रस्त नागरिकांना पटेल, असेच आहे. कोठे काहीही खुट्ट झाले की अधिकृत वा अनधिकृत चौकशी हा जणू प्राथमिक उपचार (फर्स्ट एड) होऊन बसला आहे ! 'चांभार चौकशा' ह्या मराठी वाक्प्रचाराने बिचारे चर्मकारबंधू निष्कारण बदनाम झाले आहेत. त्यापेक्षा 'सरकारी चौकशा' हा शब्दप्रयोग रूढ व्हायला पाहिजे. गिऱ्हाइकांची पादत्राणे शिवता शिवता, चांभाराने केवळ 'टाइम पास' म्हणून वा विरंगुळा म्हणून, काही चौकसपणा दाखविला, तर त्यात कोणाचे काही नुकसान होते, असे नाही— आर्थिक नुकसान तर अजिबात नाही ! पण ह्या ठिकठिकाणच्या साध्या वा न्यायालयीन सरकारी चौकशा म्हणजे बहुशः वंध्या-मैथुन, वैतागजनक कालापव्यय आणि जनतेच्या पैशाची नासाडी ! चौकशी मंडळांचे वा पाहणी समित्यांचे गलेलठ्ठ अहवाल वर्ष-दोन वर्षांनी (आणि कधी कधी तर ४-५ वर्षांनी) तयार होतात, भरपूर माहिती भरपूर शेऱ्याताशेऱ्यांसह नि शिफारशींसह उपलब्ध होते. पण ह्या शिफारशी अमलात आणण्याचे बंधन सरकारवर नसल्याने आणि तोपर्यंत दुर्घटना बहुतांशी विस्मृतीच्या गर्तेत गेल्यामुळे, जन-कल्याण फारसे साधत नाही. असे असूनही लोकसभेपासून जिल्हा परिषदेपर्यंत विरोधी सदस्य तावातावाने 'चौकशी'ची मागणी करतात आणि सत्ताधारी ती बहुशः धूर्त औदार्याने मान्य करून टाकतात ! फायदा एकच—

असंतोषाची गरम वाफ बरीचशी निघून जाते, लोकभावनेची कदर केल्याचा देखावा निर्माण होतो, निवृत्त न्यायाधीशांना तसेच खासदार-आमदारादी सरकारी मंडळींना काम मिळते, कोऱ्या कागदांची रिमेच्या रिमे कारणी लागतात ! भारतात गेल्या ३० वर्षांत होऊन गेलेल्या नि चालू असलेल्या लक्षावधी चौकशांची कागदपत्रे एकत्र केली, तर पांढराशुभ्र प्रति-हिमालय उभा राहील !

ज्या देशाने हजारो वर्षांपूर्वी (तत्कालीन सरकारांकडून भत्ते न घेतादेखील–) ब्रह्म-मायेच्या घोटाळ्यांची कसून चौकशी केली, ज्ञात जगताचीच नव्हे, तर अज्ञाताचीही चौकशी केली, त्या देशाने आज ठिकठिकाणी चौकशी मंडळांच्या नि समित्यांच्या चक्रव्यूहात ज्वलंत प्रश्नांचा अभिमन्यू केला असला, तर आश्चर्य कसले ? प्रगती ही की, त्या ऋषी-मुनींच्या चौकशा 'निरर्थक' होत्या, तर हल्लीच्या चौकशा 'सार्थ' – (म्हणजे जनतेचा 'अर्थ' कारणी लावणाऱ्या) – असतात ! बोला, कशाची चौकशी ह्या देशात होत नाही ? रेल्वे अपघात घडोत, बस अपघात वाढोत, त्यांची चौकशी होते. कारखान्याचे मालक मॅनेजर्स 'घेराओ'ने घेरले जावोत वा 'गो-स्लो'ने हैराण होवोत, त्यांची परेशानी कमी न झाली तरी चौकशीही होतेच ! संपाने वा मोर्चाने हिंसक वळण घेणे वा न घेणे आपल्या हाती नाही. पण त्याची चौकशी तर आपल्या हाती आहे ? ही तत्परतेने होते. 'जेथे जेथे अग्नी तेथे तेथे धूर' अथवा 'जेथे जेथे लीडर तेथे तेथे लेक्चर' ह्या न्यायाने जेथे जेथे गोळीबार तेथे तेथे न्यायालयीन चौकशी ठेवलेलीच ! एखादा माणूस गतप्राण झाला, तर त्याची धार्मिक उत्तरक्रिया नीट होणार नाही कदाचित. पण 'हा मृत्यू स्वाभाविक की संशयास्पद, हा खून साधा की राजकीय,' असे प्रश्न विचारीत चौकशी नामक खर्चिक मावशी तेथे झटकन हजर राहते !...

या चौकशा अगदीच निरुपयोगी असतात असे म्हणणे अत्युक्ती ठरेल. पण खर्चाच्या नि खटाटोपाच्या मानाने त्यांची उपयुक्तता कमी आहे, एवढीच खंत जनतेला वाटते. ह्यापेक्षा जुन्या जमान्याप्रमाणे बिनखर्चिक नि लाभदायक चौकशा आमचे राज्यकर्ते नि पुढारी करतील तर किती बरे होईल ! बिनखर्चिक पण बहुमोल चौकशी म्हणजे–

*कोऽहम् ? कस्त्वम् ? कुत आयात: ? का मे जननी ? को मे तात: ?*

अशी स्वतःची चौकशी– आत्मपरीक्षण ! मी कोण आहे ? कोठून आलो ? कुठे जाणार ? कशासाठी ? ही चौकशी मानवाला उन्नत करते, जीवन-साफल्य देते, असे आपल्या तत्त्वज्ञ संतांचे सांगणे आहे. पण तेही आचरणात आणता येत नसेल, तर आमच्या लीडरांनी नि सत्ताधीशांनी 'आपल्या विचारात-उच्चारात नि आचारात सुसंगती आहे काय ?' एवढी एकच चौकशी केली तरी त्यांचे नि देशाचे अतिशय कल्याण होईल !

□

## ॥ ४६ ॥ टकल्यांची आत्म-वंचना ?

*१८ फेब्रुवारी १९७९*

इसापनीतीतील 'कोल्हा आणि आंबट द्राक्षे' ही कथा आठवा जरा. मोठी रंजक नि उद्‌बोधक आहे ती. द्राक्ष-वेलीला उंचावर लगटलेले ते रसाळ अंगुराचे घोस पाहून कोल्ह्याच्या तोंडाला पाणी सुटले आणि त्याने शेकडो उड्या मारल्या. पण काही केल्या ती रुचकर द्राक्षे हाती येत नाही, ह्याची खात्री पटल्यावर आपल्या निष्फळ खटाटोपाला कोणी हसू नये म्हणून तो धूर्त जंबुक उद्‌गारला– 'नको, नकोच ही आंबट द्राक्षे ! ती भक्षण करणे आरोग्यविघातक होय. उगाच खोकला व्हायचा !'. . . त्या जंबुकाचा धूर्तपणा मानवाने केव्हाच आत्मसात केलेला नाही काय ? अप्राप्तीचे दुःख टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे अप्राप्तीच सुखाची मानणे; आपत्तीचा जाच दूर करण्याची उत्तम युक्ती म्हणजे आपत्तीलाच 'इष्टापत्ती' समजणे ! आपले दुःखदायक वैगुण्य सुखावह करण्याचा सुलभ इलाज एकच– ते वैगुण्यच गुणसुंदर असल्याच्या गोड गोड भ्रमात राहणे !

मस्तकावर काळ्या कुरळ्या केसांचा किरीट नसण्याचे दुःख ह्याच इलाजाने नाहीसे (अथवा हलके) करण्याचा प्रयत्न मानवाने केला आहे !. . . खरे पुसाल तर रत्नाला जशी कोंदणाशिवाय खुलावट नाही, तशीच मस्तकावरील केशकलापाशिवाय मुखाला शोभा नाही. सामान्य चेहराही या 'कृष्णकिरीटा'ने शोभिवंत होतो, आणि चंद्राननांच्या सौंदर्याला तर खूपच आकर्षकता प्राप्त होते ! शेकडो कविवर्यांची प्रतिभा आणि लक्षावधी प्रेमवीरांची नजर ह्या काळ्या काळ्या 'घुंगूरवाल्या जुल्फां'त लटकून राहिली ती उगाच नव्हे ! चेहरा विद्रूप करणारी केश-वपनाची दुष्ट रूढी आणि पुरुषांनी चमनगोटा करण्याची अरसिक प्रथा झुगारण्यात आली ती व्यर्थ नव्हे ! सारांश, डोईवर केसांचे 'माथेरान' असणे ही

सुखाची गोष्ट, तर सहारा वाळवंट असणे ही दुःखाची दुर्दैवी बात ! म्हणूनच लाख्खो माणसे नाना प्रकारची तेले मस्तकावर चोळून केसांची गळती रोखण्याचा, शर्थीचा प्रयत्न करतात. पण तो असफल झाला तर? तर 'खल्वाट' 'टकल्या' इत्यादी दुःखदायक विशेषणे त्यांच्या वाट्यास येतात. ह्यातून सुटका होण्यासाठी (मघाशीच म्हटल्याप्रमाणे) त्यांनी 'इसापनीती'तील त्या धूर्त जंबुकाची 'पॉलिसी' स्वीकारली आहे ! टक्कल पडल्याचे वैगुण्य नि दुःख झाकण्यासाठीच 'खल्वाटो निर्धनः क्वचित' इत्यादी सुभाषितांच्या टोप्या माणूस मस्तकावर चढवितो !

ह्या दुःख-निवारक वैगुण्य-प्रशंसक आत्मवंचनेचा उच्चांक मोडला आहे 'टकल्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदे'ने ! काय? टक्कलवाल्यांची परिषद? होय. ४ एप्रिल १९७१ ह्या शुभदिनी खल्वाटांची एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाली. तिचे तिसरे अधिवेशन नुकतेच दिल्ली येथे, तुळतुळीत टकलाप्रमाणेच चमकले ! श्री. के. जी. खोसला हे थोर टक्कलवाले तिचे अध्यक्ष आणि उद्घाटक होते. पिढीजात टकले श्री. आय. के. गुजराल- भारताचे रशियामधील वकील ! हे टक्कलधारकांचे अधिवेशन मोठे वैशिष्ट्यपूर्ण झाले यात शंका नाही. टकलांचे प्रतीक असलेला नारळ फोडून श्री. गुजराल ह्यांनी ह्या अधिवेशनाचे उद्‌घाटन केले आणि स्वतःच्या गुळगुळीत डोईवर मोठ्या अभिमानाने हात फिरवूनच त्यांनी टक्कलमाहात्म्य कथन केले. ते म्हणाले, "आपल्या माथ्यावर केस नाहीत ह्याची जराही खंत करू नये. कारण जो जो मानवाची उत्क्रांती होत जाते तो तो त्याचा केसाळपणा (म्हणजे जंगलीपणा) कमी कमी होत जातो, हा शास्त्रीय सिद्धान्त आहे. तेव्हा डोक्यावर केस असणाऱ्यांपेक्षा आपण केस नसलेले टकले अधिक उत्क्रांत म्हणजेच प्रगत आहोत ! तेव्हा बापहो, आपल्या सौंदर्यात उणीव आहे हा न्यूनगंड काढून टाका. टक्कल असणे हे रुबाबदार, प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वाचे लक्षण; परिपक्वतेचे (मॅच्युरिटीचे) लक्षण !"

टक्कलवाली माणसे कामुक असतात; इश्काचा रंगेल विचार त्यांच्या डोक्यात (केसांची आडकाठी नसल्याने) ताबडतोब शिरतो, असा एक समज रूढ आहे ! ह्याबाबत श्री. गुजराल ह्यांनी फार बहारदार विवरण केले. ते म्हणाले, "ज्यांचे केस समोरून गळत जातात ते फार काम-लंपट म्हणजेच 'सेक्सी' असतात; ज्यांचे केस पाठीमागून गळत जातात ते विचारवंत नि विवेकी असतात; आणि ज्यांचे केस दोन्ही बाजूंनी गळाले आहेत असे टकले स्वतःला कामुक समजतात !" ह्याच अधिवेशनात एक विख्यात कविवर्य नटवर्य (आणि टक्कलवर्य-) श्री. एस. चतुर्वेदी हेदेखील मोठे अफलातून भाषण करून गेले. ते म्हणाले, "जे राज्यकर्ते टक्कलवान आहेत ते खूप लोकप्रिय नि यशस्वी होतात. उदाहरणार्थ पंडित नेहरू ! परंतु याउलट, सध्याच्या केन्द्रीय जनता-राज्यकर्त्यांची गत

आहे. पहा मुरारजी भाईंना टक्कल नाही, चरणसिंगांना टक्कल नाही, जगजीवनबाबूंनाही टक्कल नाही. ह्याचा परिणाम? अंतर्गत भांडणे- केशाकेशी-झिंज्या ओढणे-'हेअर-स्प्लिटिंग !"

अर्थात विनोद म्हणून ही सारी टक्कल-प्रशस्ती कितीही ठीक असली, तरी वस्तुस्थितीच्या निकषावर ती टिकणारी नाही. कारण, टक्कल पडल्याने २०-२५ वर्षांचा तरुणही ४०-५० वर्षांचा तात्या दिसू लागतो. मग लग्नाच्या बाजारात त्याचा भाव घसरतो. 'टकल्या नवरा नको ग बाई'अशीच कोणत्याही उपवर मुलीची स्वाभाविक प्रतिक्रिया असते ! 'सुंदरी ! वाच, हा आंतरराष्ट्रीय टकल्यांच्या परिषदेचा वृत्तांत. आणि अस्मादिकांना रुबाबदार, बुद्धिमंत नि भाग्यवंत समजून, तुझ्या प्रीतीचे वरदान दे !' अशी एखाद्या टक्कलवाल्याने याचना केली, तर त्याला प्रेमाचे दान मिळण्याऐवजी टकलावर सणसणीत टपलीच मिळण्याचा संभव अधिक ! टक्कल असणे ही वांच्छनीय, प्रशंसनीय बाब असती, तर केश-वर्धक तेलांचे कारखाने कशाला निघाले असते? 'अमुक अमुक क्रीमने टकलावर केस उगवले; केस गळणे थांबले,' असा पुकारा करणाऱ्या जाहिराती का झळकल्या असत्या? रंगेल टक्कलवाल्यांनी केसांचे टोप (विग्ज) टाळक्यांवर चढवून आपले केशदारिद्र्य नि उतार वय का झाकले असते? आणि केश-वैभव मिरविणाऱ्या फिल्मी हीरोंचा रुबाब का दाखविला असता?

—ह्याचा अर्थ असा नव्हे, की टक्कल पडले म्हणजे साऱ्या जीवनाचेच वाटोळे झाले असे समजून स्त्री-पुरुषांनी रडत बसावे ! रेशमी विपुल केशकलाप हे भगवंताचे देणे असेल, पण तुकतुकीत टक्कल हा भगवंताने दिलेला शाप मानण्याचे कारण नाही. 'आलीया टकलासी असावे सादर' हाच समंजसपणा होय !

□

॥ ४७ ॥

## शपथ-बद्ध चोरांना वंदन !

*८ मे १९७७*

आपल्या पवित्र उपनिषदांत एके ठिकाणी 'चोरांच्या नायकाला वंदन असो (स्तेनानां पतये नमः)' असे का म्हटले असावे, ह्याविषयी काही उलगडा होत नव्हता. परंतु गेल्या शनिवारी (म्हणजे न कर्त्यांच्या वारी?) जसलोक-रुग्णालयाच्या हॉलमध्ये लोकनायक जयप्रकाशांसमोर जकातचोरांचा जो शपथसोहळा संपन्न झाला, त्याचे रोमहर्षक वृत्त वाचून आमची शंका फिटली आणि आमच्या गहिवरलेल्या कंठांतून उद्‌गार निघाला— 'स्मगलर्सना वंदन असो !'. . . फार प्राचीन काळी आमच्या ऋषीमुनींच्या लक्षात हे आले असावे की चोरी करायला चातुर्य, धैर्य, शौर्य इत्यादी गुण लागतात आणि विपुल सुख-वैभव भोगून, विपुल धनसंचय केल्यावर, पश्चात्ताप-पावन व्हायला तर कमालीचे मोठे काळीज लागते ! वसंतदादा पाटील ह्यांना योग्य तोच जुना दाखला आठवला आहे. विख्यात तस्करांची 'स्मगलिंग-बंद'-प्रतिज्ञा ऐकून तेही गहिवरून म्हणाले— 'हे पश्चात्तप्त वाल्याचे वाल्मीकि होणे आहे !'. . . मग आम्हीही का म्हणू नये- 'स्मगलिंगला कायमचा रामराम ठोकणाऱ्या पश्चात्ताप-पटू तस्करांनो, रामराम ! तुम्हास वंदन असो !'

### जगी सर्व-निर्दोष तो कोण आहे

खरोखरच जर आमच्या स्मगलर्स मंडळींना पश्चात्ताप झाला असेल, तर त्यांना आपल्या घरी एकांतात घळघळा अश्रू ढाळून मनोमन प्रतिज्ञा करता आली नसती काय? जसलोकमधील सामूहिक पश्चात्ताप-प्रदर्शनाची वा 'शपथ-कोरस'ची जरुरी

होती काय? — होती. कारण सामान्य माणसे जरी देवांपुढे एकांतात सत्संकल्प सोडतात, तरी अखिल भारतीय कीर्तीच्या असामान्य मंडळींना कोणताही संकल्प वाजत-गाजतच सोडावा लागतो! म्हणूनच स्मगलिंग जरी गुपचूप करण्यात येत असले तरी 'स्मगलिंग-बंद' हा पुकारा उच्चरवाने प्रसिद्धीच्या झोतात करावा लागला! ह्या वेळी २५० जकातचोरांच्या युसूफ पटेल, हाजी मस्तान, सुकूर नारायण बाखिया इत्यादी श्रेष्ठींनी जसलोकी लोकनायकांसमक्ष प्रतिज्ञा केली की, 'आम्ही ईश्वराला वा अल्लाला स्मरून शपथ घेतो की, इतःपर प्रत्यक्षरीत्याच नव्हे, तर अप्रत्यक्षरीत्याही आम्ही स्मगलिंग करणार नाही. इतकेच नव्हे, तर इतर स्मगलरांना ह्या कुकर्मात मदत करणार नाही. उलटपक्षी, आमच्या व्यवसाय-बंधूंना ह्या व्यवसायापासून परावृत्त करण्याची कोशीस करू; 'स्मगलिंग हटाव' मोहिमेत सरकारला साह्य करू. आमच्या हातून जी काही कुकर्मे पूर्वी झाली असतील त्याबद्दल जे काही कायदेशीर शासन असेल ते आम्ही भोगू. त्यात कोणतीही सवलत मागणार नाही!'. . . अहाहा! पश्चात्तापाच्या अग्नीत भाजून निघालेले हे बावन्नकशी प्रतिज्ञा-सुवर्ण (दुबईचे नव्हे, बिस्किट-वाले नव्हे!) पाहून जयप्रकाशांसारखा सात्त्विक साधुपुरुष भारावला असल्यास नवल कसले? ते साशीर्वाद उद्‌गारले— 'जगी सर्व-निर्दोष तो कोण आहे? प्रत्येकाने भूतकाळात काही ना काही चूक केलेलीच असते. पण आपले प्रमाद आपण होऊन मान्य करून, त्याबद्दल शिक्षा भोगण्यास जे सिद्ध असतात, ते धन्यता पावतात. भगवंत ह्या पश्चात्तप्त लोकांना भावी जीवनात सन्मार्ग दाखवो!'. . . ह्याच मंगल प्रसंगी मिनार मशिदीच्या इमामांनी पवित्र कुराण वाचले, तर रामकृष्ण आश्रमाच्या रंगनाथनंदजींनी ह्या स्मगलिंग-नाथांना शुभाशीर्वाद देऊन म्हटले— 'पश्चात्ताप हा हिंदु-तत्त्वज्ञानाचा एक महत्त्वाचा भाग आहे!'

## शंकासुरांच्या कुशंका!

पण ह्या जगात शंकेखोर लोक कमी का आहेत? हे विचारतात, 'हे स्मगलिंग-किंग खरोखरच पश्चात्तापाने पोळले आहेत हे आजच कसे सांगता येईल? खरजेप्रमाणेच पुन्हा ह्यांचा चौर्यकंडू अनुकूल वातावरणात बळावला तर? आजवर भरपूर चौर्य करून, भरपूर माया ठिकठिकाणी दडवून, कोर्टकचेऱ्यांत नैतिक नव्हे, तर कायदेशीर लढती देऊन, (कदाचित कायद्याच्या कचाट्यातून सुटून अथवा प्राप्तीचा काही वाटा दंड म्हणून गमावून—) पुन्हा उजळ माथ्याने सुखाचे आयुष्य व्यतीत करू पाहणाऱ्या ह्या मस्तान-मंडळींचा पश्चात्ताप—

*की हमारे कत्लके बाद*
*उन्होने जफासे तौबा !*
*हाय ! उस जूद पशेमाका*
*पशेमा होना !*

(आमचा सत्यानाश केल्यावर त्यांनी 'तोबा' 'तोबा' म्हणून पश्चात्ताप व्यक्त केला ! अशा अवेळी केलेल्या घाईघाईच्या पश्चात्तापाबद्दल हाय हाय !)

हे वर्णन सार्थ करणारा ठरला तर? दारूड्या सुधाकराने त्या थोर पतिव्रतेपुढे, 'सिंधू ! मी दारू सोडली !' अशी प्रतिज्ञा उच्चारली नव्हती काय? पण तो सत्संकल्प सिद्धीला न जाता सुधाकर अधिकच मद्यपि झाला, तशीच ह्या स्मगलर्सची गत झाली तर?" काय म्हणावे ह्या शंकेखोरांना? "अरे, सुधाकर हा युसूफ-हाजी-बाखिया ह्यांच्यासारख्या बळकट दिलाचा माणूस नव्हता ! तो काळ वेगळा नि हा काळ वेगळा ! त्या पारतंत्र्याच्या काळात लोकांचे 'मोराल' ऊर्फ नैतिक धैर्य आजच्यासारखे मजबूत नव्हते ! शिवाय सुधाकराच्या काळी हृदय-परिवर्तनावर नि प्रार्थना- उपासतापास- शपथा ह्यांच्यावर भर देणारा गांधीवादी पंथ निघाला नव्हता; सर्वोदय-संप्रदाय निघाला नव्हता. माणसे इतकी क्षुद्र होती की सधन शेतकरीही पडीक नापीक जमीन कुण्या संताला दान करत नसत ! तो जमाना एकंदरीत फारच मागासलेला होता. इतका की सुधाकर-तळीरामादी मंडळींनी आर्य मदिरा-मंडळासह दारूबंदीची शपथ घेतली असती, तरी तिचा फारसा गाजावाजा वृत्तपत्रातून झाला नसता. आणि पश्चात्ताप-दग्धांचे शानदार दर्शन घडविण्यासाठी, आपले ग्रेट 'दूर-दर्शन' तर त्या वेळी अस्तित्वातच नव्हते ! !

## बिल्ली हजको गयी ?

अरे शंकासुरांनो, हाजी मस्तान भाईंनी तर 'दूरचित्रवाणी'वर मुलाखत देऊन बजावले, "आमच्याखेरीज अजूनही स्मगलिंगचा धंदा करणारे कैक आहेत. या स्मगलरांवर आम्ही पश्चात्ताप-शुद्ध माजी स्मगलर करडी नजर ठेवून, सरकारला खबर देऊ. मात्र सरकारने योग्य ती कारवाई करून आम्हाला सहकार्य द्यावे, तरच आम्हा शपथबद्धांना समाधान वाटेल !". . . क्या बात है? आता परीक्षा ह्या भूतपूर्व जकातचोरांची नाही, तर विद्यमान सरकारांची आहे ! आमची तर अशी सूचना आहे की, कस्टम-अधिकारी नि पोलिस ह्यांची संख्या आता २५० ने कमी करून, त्यांच्या जागी ह्या पश्चात्तापाच्या भट्टीत भाजून निघालेल्या स्मगलिंग-एक्सपर्टना भरती करावे. म्हणजे माजी चोर आजी चोरांची पावले ठीक ओळखतील आणि 'स्मगलिंगचा कॅन्सर जगातून नाहीसा झाला पाहिजे' ही या मस्तान मंडळींची मनीषा फलद्रूप होईल !. . . ह्या मंडळींना

सरकार सहकार्य करो वा न करो, आपण सर्वसामान्य जनतेने त्यांना सहकार्य केले पाहिजे. 'फॉरेन'चा माल, विदेशी उंची वस्तू, विकत घेण्याच्या हव्यासापायी जनताही स्मगलिंगला उत्तेजन देत आली आहे. पण देशभक्त स्मगलरांचे स्वप्न साकार करण्यासाठी हा देशद्रोही हव्यास जनतेने सोडला पाहिजे !. . . काय ? अजूनही तुमच्या शंकाकुशंका आहेतच का ? शपथ-बद्ध जकात चोरांविषयी अद्यापि संशय आहेच ? काय म्हणता– "ह्या चोरांचा हा पश्चात्ताप खरा नव्हे ! 'सौ चुव्हे खाकर बिल्ली हजको गयी' ह्या जातीचा हा मामला आहे. आता स्मगलिंग करणे फार मुश्कील आहे, ही अगतिकत्वाची भावनाही 'Virtue out of necessity' ह्या न्यायाने सद्गुणाचे रूप घेत आहे. आणीबाणीचे इतर काहीही दोष असोत, ह्या काळात स्मगलरांविरुद्ध जी कडक मोहीम चालविण्यात आली तिजमुळे या स्मगलरांच्या नाड्या आखडल्या गेल्या नि जयप्रकाशांच्या साक्षीने प्रकाशमय सन्मार्ग चोखाळणेच अधिक हितावह, असे प्रस्तुत अंधेर नगरीच्या बादशहांना वाटले असावे !". .

## शपथांचे पेव फुटू द्या !

आता मात्र शर्थ झाली तुमच्या कुत्सित श्रद्धाहीनतेची ! ह्या प्रश्नाचा नीट विचार करा आणि हे शपथ-समारंभाचे अर्थात पतितोद्धाराचे लोण सर्व क्षेत्रांत वेगाने पसरू द्या. 'खोबडी', 'लठ्ठा' इत्यादी नावांनी मशहूर असलेली विषारी दारू गाळणाऱ्या गुंडांनी सामुदायिक शपथा घ्याव्यात– 'ह्यापुढे हातभट्टी बंद !' ह्या हातभट्टीवाल्यांकडून लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी एकसाथ कसम खावी– "ह्यापुढे हप्ते घेणे बंद !" व्यापाऱ्यांनी साठेबाजी व भेसळ न करण्याची; डॉक्टर-वकिलांनी जब्बर फी न उकळण्याची, सिने नट-नट्यांनी 'ऑन मनी' चा काळा पैसा न घेण्याची; राजकारणी पुढाऱ्यांनी 'जनसेवे'ची दक्षणा न उपटण्याची; बेबंद कॉलेजकुमारांनी कॉप्या न करण्याची प्रतिज्ञा करावी ! शपथांचे असे पेव फुटू द्या. पण. . .

—अपवाद एकच. आमच्या पुरोगामी प्रगत लेखकांनी साहेबांच्या वाङ्मयाचे, तसेच आमच्या ग्रेट कलाकारांनी पाश्चात्त्यांच्या कला-वैभवाचे 'स्मगलिंग' खुशाल करावे ! त्यांनी चौर्य न करण्याची शपथ घेतल्यास आपल्या साहित्य-संस्कृतीची भरभराट होणार नाही !

□

॥ ४८ ॥

## चावणारी गुलबक्षी

*१ मे १९७७*

समजा, नियतीच्या एखाद्या निष्ठुर लहरीमुळे या दुनियेतील सारी फुले नष्ट झाली तर? तर तिची निम्म्याहून अधिक सुंदरता खलास होईल. जसे ताऱ्यांशिवाय आकाश, तसेच फुलांशिवाय वसुधातल! पुष्पविहीन जगाची कल्पनाच आपण करू शकत नाही. ह्या दु:खी दुनियेला सुखद सुंदरतेचे दान करण्यासाठीच परमेश्वराने हजारो प्रकारची फुले जन्माला घातली. शत शत रंगांची, शत शत सुगंधांची बरसात वसुंधरेवर अहर्निश करणारी ही नाजुक फुले! 'इतर साऱ्या आयुधांहून फुलांचे बाणच अधिक प्रभावी होत,' हे जाणून तर पुष्पधन्व्या मदनाने आपले पाचही बाण फुलांचे बनविले! आणि ह्या फुलांची नजाकत नि रंगत मनात ठसल्यामुळेच, ह्यांच्याच उपमा-उत्प्रेक्षांचे अलंकार कविजनांनी सुंदरींच्या वर्णनात वापरले! रमणीचे अंग-मार्दव कसे? तर जाई-जुई-चमेली सारखे! ओठ कसे? तर गुलाबाच्या पाकळीसारखे! नेत्र कसे? तर कमल-दलासारखे! कांतिमान वर्ण कसा? तर सोनचाफ्यासारखा! अथवा केतकीच्या दळासारखा! दंत-पंक्ती कशी? तर कुंदकळ्यांसारखी!

सारांश, ललनाच्या सौंदर्याने हे जग नटले असेल, तर ललना-सौंदर्य ठायी ठायी फुलांनी सजले आहे! फुलांना वगळा; उद्याना-उद्यानांवर वार्धक्याची अवकळा पसरेल! फुलांना वगळा; सुगंधाची मजा ओसरेल! फुलांना वगळा; प्रणय-मत्त भुंग्यांचा गुंजारव हरवेल! फुलांचा हा परोपकार लक्षात घेऊनच, सज्जनांच्या हृदयाला सुखदायी फुलांची उपमा देण्यात आली.

अशी ही फुले कधीतरी दु:खदायक होतील काय? गोजिरवाणी मुले

चावतील—अगदी कडकडून चावतील—पण फुले कधीतरी दंश करतील काय ?. . . छे, छे, हे असंभवनीय वाटते. सुंदरीच्या दातांना कुंदकलिकांची उपमा देतात हे खरे; पण फुलांना दात असल्याची वा त्यांनी कोणावर दात धरल्याची, दंतकथाही आम्ही ऐकली नाही. . . पण विश्वास ठेवा अगर ठेवू नका, नुकतीच वृत्तपत्रात वार्ता झळकली की, सुमारे २० लक्ष युरोपियनांना 'पुष्प-दंशा'ची बाधा झाली आहे ! म्हणजे, शास्त्रज्ञांना असे आढळून आले की 'गुले अब्बासी' ऊर्फ गुलबक्षी (अर्थात् 'प्रिम्युला ऑबकॉनिका' ह्या जातीच्या—) फुलांना स्पर्श करताच, दंश झाल्यागत दाह होतो; सर्व अंगावर पुरळ उठतात नि कंड सुटते ! 'गुलबक्षी'च्या ह्या चावण्यावर म्हणण्याजोगते प्रभावी नि गुणकारी मलम आधुनिक वैद्यकालाही गवसले नाही, असे म्हणतात. . . अरेरे, 'गुलबक्षी'सारख्या सुंदर फुलांतही, तिच्यावर प्रेम करणाऱ्या मानवांना दंश करणारी निमकहराम जात निघावी ना ?' 'गुलबक्षी'चाच हा खतरनाक अवगुण अनेक गुलबदन नारींनी उचलला असावा ! गौर गुलाबी रंगांच्या, नाजूक नाजूक अंगांच्या ह्या नारी, मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या आशिकाच्या देहाचा दाह करतात, त्याला इष्काच्या वृश्चिक-दंशवत् वेदना देतात ! आणि वेदनाही अशा की ज्यावर कोणतेही मलम नाही ! बस्स, त्या पीडादायक 'गुलबक्षी'प्रमाणेच, ह्या दुःखदायक गुलजार सुंदरींचाही रंग-ढंग दुरूनच बघावा—नको, त्यांचा तो संगदिल संग नको, तो कंड भडकविणारा अंगसंग नको !

'गुलबक्षींच्या—एका कोमल पुष्पजातीच्या—चावण्याची ही अक्षरशः सत्य कथा झाली. पण लक्षणार्थाने, चावा घेणारी, पीडा देणारी, दाह करणारी फुले प्रेमीजनांना अगदी सुपरिचितच आहेत. 'चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी' ह्या संतांच्या विरहिणीपासून तो 'फूल बने अंगारे' ह्या फिल्मी गीतापर्यंत चावऱ्या दाहक फुलांचे दर्शन आपणास होतेच ! प्राचीन वाङ्मयांत तर अशी फुले खूपच फुललेली आहेत. प्रियकराच्या भेटीसाठी आतुर झालेली कोणी सुंदरा फुलांची शेज चंदनी पलंगावर पसरून वाट पाहते आहे. पण उपयोग काय ?. . .

*"तुमरे लिये यह सेज सजी।*
*तुम सौतन के घर जाय बसे !"*

असे विफल उद्गारच तिला काढावे लागतात. अशा वेळी ती पुष्पशय्या कंटकशय्येप्रमाणे बोचणारच नाही काय? सजणाच्या स्वागतार्थ गुंफलेला हार एखाद्या सर्पाप्रमाणे डसणार नाही काय?. . . जी गत भारतीय विरहणीची तीच उर्दू शायरीतील कमनसीब प्रियकरांची ! उत्फुल्ल गुलाबाचे फूल विरह रात्रींत त्याला दुःखद आठवणींचा डंख करते. एक उर्दू प्रेमवीर गुलाबाची कळी पाहून क्षणमात्र सुखावतो खरा. कारण—

*मुस्कराने का यही अंदाज था।*
*जब कली चटकी*
*तो वह याद आ गए॥*

पण हे सौख्य क्षणभंगुरच ठरते. कारण—कळीचे वा फुलाचे हास्य पाहून त्याला त्या निष्ठुर नारीचे उपहासगर्भ स्मित याद येते ! तो रडू लागतो आणि म्हणतो—

*क्यौं न रोऊं मैं देख खन्दये गुल*
*कि हंसा था वोह बेवफा यूं ही॥*

(फुलाचे हे स्मित पाहून मी का न रडावे ? कारण, अगदी हुबेहूब अशीच ती बेईमान सुंदरी हसली होती !) विरहपीडित, हताश प्रेमी जिवाला फुले ही अशी तापदायक आठवणींनी चावू लागतात. कमलिनीभोवती गुंजारव करीत घिरट्या घालणारा अथवा तिचा मधुर मकरंद चाखणारा भ्रमर दृष्टीस पडताच, आपला 'लकी' प्रतिस्पर्धी नि बेवफा प्रेयसी ह्यांचा निर्लज्ज शृंगार त्याच्या नजरेपुढे उभा राहून त्याला फार वेदना होतात. इतकेच नव्हे, तर चंचल नि लंपट वाऱ्याने विस्कटलेले फूल वा फाटलेली पाकळी पाहून तो घायाळ बुलबुलाप्रमाणेच दुःखी होतो—त्याच्या मनात नाना शंका-कुशंकांचे मोहोळ उठते !. . . सारांश, जी फुले प्रेमसाफल्याच्या मीलनरात्री सुखावह होतात, तीच विरहरात्रीच्या निराशेत काळजाचा चावा घेतात !

□

॥ ४९ ॥

# टोनी ग्रेग बेहद्द खूश

*२० फेब्रुवारी १९७७*

आपली भारतीय जनता कशी आहे ? ती सुखी आहे की दु:खी आहे ? ती जागरूक आहे की निद्रिस्त ? ती अनुशासनबद्ध आहे की बेशिस्त ? इत्यादी अनेक प्रश्नांबाबत मतभेद होऊ शकतील. कोणी तिला मुक्या मेंढरांची उपमा देतील, तर कोणी 'भ्रमाने आहे रे गिरिकुहरि हा निद्रित हरी' असे म्हणतील ! 'जनता-जनता ! बहुजन समाज' हा गिल्ला वारंवार ऐकून वैतागलेले साहित्यसम्राट केळकर म्हणाले होते– 'जनता गाढव आहे.' ह्याच 'गाढव' जनतेला 'जनता-जनार्दन' म्हणूनही गौरविण्यात येते !. . . ही मतेही विवाद्यच आहेत. तथापि 'भारतीय जनता बघेगिरी-पारंगत असून कोठेही गर्दी करण्यात तरबेज आहे.' असे जर कोणी म्हटले तर ते बहुश: निर्विवाद मान्य व्हावे !

कोठेही तुडुंब गर्दी करण्यात भारतीय 'पब्लिक' इतर कोणत्याही देशांतील पब्लिकला हार जाणार नाही. फार प्राचीन काळापासून आपल्या भारतीय 'जन्ते'चे गर्दी-पटुत्व प्रसिद्ध आहे. यतिवेशधारी अर्जुनाच्या दर्शनार्थ कशी झुंबड उडत होती, ह्याचे बहारदार वर्णन 'सौभद्र' नाटकात आले आहे. त्यातील विदूषक वक्रतुंड म्हणतो– "कोणी संतती, कोणी संपत्ती, कोणी आरोग्य अशाविषयी स्वामीस विचारताहेत; कोणी नुसतेच दर्शन घेऊन काही फळफळावळ पुढे ठेवताहेत. . . ज्या गुहेत जायला पूर्वी पाऊलवाटसुद्धा नव्हती, तेथे आता बारा हात रुंदीचा रस्ता जाण्यायेण्याच्या वर्दळीने झाला आहे. . . हे लोक कसे मेंढरासारखे आहेत. पुढच्या एका मेंढराने खळग्यात उडी घातली की मागून सगळी पडलीच; त्याचप्रमाणे हे !". . . त्या पुराणकाळातील साधू वा संधिसाधूंपासून तो आजच्या सत्यश्रीसाईबाबांपर्यंत कोणत्याही भारतीय बुवाला कधीही

गर्दींची उणीव इथल्या जनतेने भासू दिली नाही. जी गोष्ट बुवांची - बाबांची - स्वामींची - महाराजांची तीच देव-देवतांची ! मरीआईपासून महादेवापर्यंत, सर्वांच्या जत्रा कशा धमाल गर्दीत चाललेल्या ! जे देवळातील देवांबद्दल तेच सिनेमातील देव-देवींबद्दल ! देव आनंदपासून अगदी आमच्या रमेश देवांपर्यंत सगळ्या हीरोंना— आणि त्याहूनही हिरॉइन्सना—जवळून पाहण्याचा आमच्या 'पब्लिक'ला केवढा जबरदस्त हव्यास ! गरीब बिचारे फिल्मीफर्जन्द पब्लिकचा त्रास होऊ नये म्हणून शानदार मोटारीतून फिरतात. पण छे, त्यांची मोहनी मूरत नि सुंदर सूरत बघून नेत्रांचे सार्थक व्हावे म्हणून येथील पब्लिक त्या मोटारींनाच घेरावा घालते ! डोंबाऱ्याच्या खेळापासून नाटकाच्या खेळापर्यंत, कुठेही गर्दी करणे हा आमच्या मायबाप जनतेचा जणू स्वभावधर्मच झालेला दिसतो.

अशा या गर्दी-पटु पब्लिकने नुकत्याच झालेल्या पाचही क्रिकेट सामन्यांना चिकार गर्दी केली नसती, तरच नवल होते. कोणत्याही स्टेडियममध्ये ५० हजारांहून कमी गर्दी नाही. कलकत्याला तर ८० हजार प्रेक्षकांची दाटी झाली होती ! आणि ही गर्दीही अशी तशी नाही— अतिशय बहुरंगी बहुढंगी ! शेंबड्या पोरापासून जख्खड म्हाताऱ्यांपर्यंत, रावापासून रंकापर्यंत, सारेजण 'स्टेडियम'वर १० वाजता हजर. शाळा-कॉलेजला उशिरा जाणाऱ्या अथवा दांड्या मारणाऱ्या पोरापोरींची अथवा 'अनुशासनपर्वा'तही सरकारी कचेऱ्यांना गुंगारा देणाऱ्या तात्या मंडळींची उपस्थिती तेथे अगदी वक्तशीर ! ज्यांना क्रिकेटमधले 'ओ' की 'ठो' कळत नाही असे श्रीमंत, (आणि त्यांचा झुळझुळीत रेशमी कपड्यांतला रंगीबेरंगी-नटरंगी जनानखाना) 'टेस्ट'ची टेस्ट घेण्यासाठी बड्या दराची तिकिटे काढणार, तर सामान्य जनता 'ईस्ट स्टँड' गच्च भरून सोडणार ! क्रिकेट मॅचला ही आमची जनता एखाद्या जत्रेचेच स्वरूप आणते. जत्रा जशी देवाच्या जयघोषांनी तशीच क्रिकेट मॅचही पब्लिकच्या टाळयांच्या कडकडाटांनी नि विविध घोषणांनी दुमदुमते— "वुई वॉन्ट ग्रेग !". . . "वुई वॉन्ट सिक्सर". . . "हाय हाय अंपायर" इत्यादी ! अशा ह्या 'दाददीलदार 'रिस्पॉन्सिव्ह' जनतेवर इंग्लंडच्या क्रिकेट-संघाचा कप्तान टोनी ग्रेग बेहद्द खूश झाल्यास आश्चर्य ते कोणते? टोनी असे उद्गारल्याचे जाहीर झाले आहे की, "भारतातील क्रिकेट-सामना ही किती रंगतदार चीज आहे ह्याची अन्य देशांना कल्पनाच नाही. आमच्या देशात लहान लहान प्रेक्षक वर्गापुढे खेळणारे आम्ही, भारतातील क्रिकेटशौकिनांची अलोट गर्दी पाहून अगदी थक्क झालो. "Oh! these fantastic crowds!"

आपल्या राजकीय क्षेत्रातील 'टोनी' (की टोणगे) देखील, अशीच अलोट गर्दी सभांना झाली की, स्वतःवर नि पब्लिकवर खूश होतात. सध्या निवडणुकीचा मौसम आहे; आमची गर्दी-प्रवीण पब्लिक हरेक सभेला हजारोंच्या संख्येत हजर राहून, टाळ्या

वाजवून, 'झिंदाबाद-मुर्दाबाद' ओरडून पुढाऱ्यांना खूश करण्यात मग्न झाली आहे. क्रिकेट-सामना असो की निवडणूक सामना असो; सभा कुणाचीही असो– जयप्रकाशांची असो की इंदिरादेवींची असो– येथे गर्दीची कमतरता नाही ! उखाळ्यापाखाळ्या, टोमणे-प्रतिटोमणे ह्या प्रचंड सभांत फुक्टात ऐकायला मिळतात; शिवाय लीडर लोकांचे प्रत्यक्ष दर्शन घडते. मग ही मोफत करमणूक आमची जनता का सोडील ? कधी कधी तर ह्या सभांना हजर राहण्यासाठी दक्षिणा मिळते नि ट्रक्समधून फुक्ट प्रवासही घडतो म्हणतात ! मग काय विचारता ? कोणी सभा-संमेलन-शौकीन प्रेक्षक उद्गारतो–

*शिवतीर्था जातो मी*
*आज सत्वरा ।*
*'मीटिंग' बहु थोर होत,*
*'लीडर' येतील अमित*
*न मिळे अशी मौज पुन्हा*
*पाहण्या नरा !*

–परंतु, सर्वच सभांना गर्दी करणारे हे बहाद्दर शांत मतदानाला येतीलच याचा भरोसा नाही, आणि कोणाला मत देतील ह्याचाही भरवसा देता येत नाही ! हा गर्दीपारंगत जनता-जनार्दन अगम्य आहे !

□

॥ ५० ॥

## आंतरिक उमाळा हवा

*२२ ऑगस्ट १९७६*

मतलबी व्यवहार म्हणतो– 'दुनिया खऱ्यांची नाही, मग खरे बोलाच कशाला? नाइलाजच झाला तर सत्य सांगावे; पण 'न ब्रूयात सत्यमप्रियम्'– अप्रिय असलेले सत्य बोलू नये– हे धोरण सांभाळावे!' तथापि, व्यक्तीच्या काय अथवा राष्ट्राच्या काय, जीवनात अशी आणीबाणी येते की, जेव्हा कठोर आत्म-परीक्षणाची नि कटू सत्य बोलण्याची नितांत आवश्यकता असते. म्हणूनच, कल्याण येथे कामगार-विमा-योजना-रुग्णालयाचे उद्‌घाटन करताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री परखडपणे म्हणाले, "अंतःकरणात गरिबांविषयी जातिवंत तळमळ नि कणव असेल, तरच गरिबी दूर करता येईल. पंतप्रधानांना अथवा मुख्यमंत्र्यांना प्रसन्न करण्याच्या उद्देशाने नव्हे, तर गरीब बंधूंचे दुःख दूर करण्याच्या तळमळीनेच काम झाले पाहिजे. जो कष्ट उपसून इमारती बांधतो, त्या कामगाराला किमान एका खोलीचे तरी, घर मिळाले पाहिजे. हे काम होत आहे. उत्पादन वाढत आहे. त्यांत अडथळे आणण्याचा जो प्रयत्न करील (तो कामगार असो, कामगार पुढारी असो वा मालक असो) देश-शत्रूच होय"... सारांश, जाळावाचून कढ नाही नि अंतःकरणाच्या उमाळ्यावाचून समाज-कार्यात वाढ नाही, हेच सनातन तत्त्व शंकररावांनी सांगितले. आंतरिक तळमळीवाचून जशी देवभक्ती अशक्य, तशीच देशभक्तीही अशक्य! केवळ सत्ताधीशांचा दिल खूश करण्यासाठी अथवा भावी काळात 'निवडणुकीचे तिकीट' मिळविण्यासाठी किंवा आपली सामाजिक पापे झाकण्यासाठी केलेली नारायणाची वा दरिद्री-नारायणाची सेवा, आणि अंतरीच्या जिव्हाळ्याने केलेली सेवा ह्यात महदंतर आहे. कोणतीही सेवा, कोणतीही भक्ती निर्हेतुक-निष्काम असली

पाहिजे, अशीच आपल्या धर्माची शिकवण आहे. स्वर्गातील इंद्राचे आसन मिळवण्याच्या अभिलाषेने केलेले यज्ञकर्मही जेथे हिणकस ठरते, तेथे ऐहिक फायद्यांच्या कामनेने केलेले कार्य किती हिणकस ठरेल ! हे कार्य बाह्यतः कितीही प्रचंड दिसले तरीही ते 'हेतुकपणे' कवडीमोल होते. श्री ज्ञानेश्वरांनी ह्या सकाम कर्माचा फोलपणा सांगताना बहारीचा दृष्टान्त दिला आहे.

*जैसा कपूराचा राशि कीजे*
*मग अग्नि लावून दिजे ।*
*का मिष्टान्नीं संचरविजे ।*
*कालकूट ॥*

## शंकररावांचा इशारा

सत्ताधीशांना खूश करण्यासाठी नव्हे, तर जनता-जनार्दनाच्या विषयीच्या आंतरिक तळमळीने— निरपेक्ष बुद्धीने— कार्य करण्याचा उपदेश करूनच शंकरराव थांबले नाहीत, तर ठाणे जिल्ह्यात काही जणांनी आदिवासींच्या जमिनी परत देण्यात जी दिरंगाई चालविली आहे, तिचा उल्लेख करून त्यांनी कडक इशारा दिला की, "हे आम्ही चालू देणार नाही. सफेत टोपी नि खादीचे कपडे घातले तरी, गरिबांची कामे न करणाऱ्या अशा महाभागांना मी खरे कार्यकर्ते मानणार नाही."... पांढरी टोपी नि खादीचे कपडे; 'मुखात २४ कलमांचा घोष (आणि मनात स्वार्थाचा जल्लोष !); मुखी इंदिराजींचा जयजयकार (नि गल्लोगल्ली स्वतःचा सत्कार !) अशा बाहेरच्या सोंगाला आपण फसणार नाही, हा इशारा खरोखरच महत्त्वाचा आहे; आमच्या महाराष्ट्र-धर्माला धरून आहे. महाराष्ट्राच्या साधुसंतांनी २-३ शतकांपूर्वी धार्मिक क्षेत्रात बहिरंग-देखाव्यावर कडक टीका करून- 'काय भुललासी वरलिया रंगा ?' असा रोकडा सवाल विचारला होता. केवळ भगवी कफनी घालून धार्मिकता मिरविणाऱ्यांची हजेरी घेताना तुकोबाराय म्हणाले होते, 'भगवे तरी श्वान सहजवेष त्याचा !' स्वाभाविकपणेच कुत्र्याचा रंग पुष्कळदा भगवा आढळतो; म्हणून त्याला कोणी जोगी-संन्यासी मानावे काय ? 'टिळे-टोपी-माळा' घालून भक्तीचा बहिरंग-सोहळा साजरा करणाऱ्या त्या धार्मिक दंभाचा कडक समाचार जसा संतांनी घेतला, तसाच समाचार आज राजकीय-सामाजिक क्षेत्रांत घेण्याची, आणि—

*उप्परके टामटूमसे न होगा काम ।*
*हमे चाहिये अंदरका राम ॥*

असे सांगण्याची वेळ खचित आली आहे ! खादीचे कपडे, शुभ्र गांधी टोपी, गुळगुळीत रंगीत भित्ति-पत्रके, येता जाता घोषणाबाजी, श्रेष्ठींचा जयजयकार ही उप्परकी टामटूम

आता फारशी परिणामकारक नाही; उलटपक्षी ती हानिकारकच आहे.

## बाह्य अवडंबर नको

इष्क– (मग तो समाजसेवेचा असो वा साजणीच्या सेवेचा असो)– बहिरंगावर अवलंबून नाही. वैयक्तिक प्रेमातही अंतरंगच अधिक महत्त्वाचे असते. तसे नसते तर 'हाय हाय रे मेरा दिल' असे म्हणून छाती बडवीत प्रेम-प्रदर्शन करणारा, दरदिवशी गुलाबी कागदावर अलंकारिक फिल्मीभाषेत इष्कनामा खरडणारा, कॉलेजातील प्रत्येक पोरीला कधी गुलाबाचे फूल, कधी सेंटची बाटली तर कधी चॉकलेटची वडी देणारा, कोणताही कॉलेजकुमार मजनू अथवा रोमिओ बनला असता ! आणि येता जाता डोळे मोडणारी, हातात हात घालून हसत-खिदळत जाणारी प्रत्येक छटेल कारटी लैला ठरली असती, ज्युलिएट बनली असती ! पण वैयक्तिक शुद्ध प्रेमालाही बाह्य अवडंबर बिलकुल खपत नाही, ऐहिक सुखवैभवाची-मोबदल्याची-लोभाची थोडीही अपेक्षा मानवत नाही. केवळ आंतरिक उमाळ्यांतून जन्मलेला निरपेक्ष त्यागच व्यक्तिगत इष्कालाही मंजूर आहे. . . हेच तत्त्व सामाजिक 'इष्का'च्या बाबतीतही खरे मानून कार्यकर्त्यांनी लोकसेवा करायला पाहिजे.

□

॥ ५१ ॥

## धिक्कार मन साहिना !...

*१ ऑगस्ट १९७६*

कोणे एके काळी सर्वशक्तिमान परमतत्त्वाला 'मी एकच आहे, पण बहुविध सृष्टीचा पसारा मांडावा' (एकोऽहम्, बहुस्यां प्रजायेय ।) अशी हुक्की आली, विश्वाचे नाटक उभारण्याची लहर लागली, आणि ह्यातूनच मानवाचा अवतार झाला ! 'आपण कोण ? कुठून आलो ? केव्हा नि कुठे जाणार ?' ह्याचे ज्ञान आपणास न देताच त्याने ह्या बहुरंगी दुनियेच्या रंगमंचावर मायानटीसह आपल्याला ढकलून दिले, तिच्या तालावर आपणास नाचविले ! त्या समर्थ सूत्रधाराच्या क्रीडासुखाची कंड भागविण्यासाठी आपण त्याची खेळणी झालो ! खरे पुसाल तर, आम्हा बुद्धिमान मानवाचा हा पहिला अपमान ! नवल नव्हे की अशा या मानवाच्या नशिबी जीवननाट्यात सन्मान थोडा, आणि अपमानच अधिक आहे. परिस्थितीशी पदोपदी अपमानकारक तडजोड करीतच, मानव सन्मानाचे शिखर गाठू शकतो. या जगताच्या विशाल पाठशाळेत कटू अनुभवाच्या अपमानास्पद छड्या छमछम् खाल्ल्याशिवाय त्याला घम् घम् विद्या प्राप्तच होत नाही. आम्ही त्याची 'लाडकी लेकरे' म्हणवितो, अन् ठायी ठायी हरेक क्षेत्रांत संकटांचे लत्ता-प्रहार मस्तकी झेलतो, अनिश्चित अंतिम सन्मानासाठी वारंवार अपमानाच्या लाथा खातो !

राजकारणाचे, अर्थकारणाचे एक वेळ असू द्या, प्रणयाच्या मधुर मुलायम मुलखातही निष्ठावंत मानवाच्या नशिबी वारंवार मानभंग यावा ना ? अल्लड भामिनीनेदेखील 'धनि मी, कशि वरिन अधना' असे म्हणून समर-धुरंधर धैर्यधराचा पहिल्या भेटीतच अपमान करावा ना ? तुकारामासारख्या संतावर देखील 'तुका झाला सांडा । विटंबिती पोरे रांडा ।' अशी अपमान-गाथा सांगण्याचा प्रसंग यावा ना ?. . . निष्ठावंत नरोत्तमांच्या इरसाल

अपमानाचे नमुने उर्दू शायरीत तर पानोपानी विखुरलेले आहेत. उर्दू प्रेयसीच्या गल्लीत प्रवेश मिळवितानाच अपमानाच्या अनेक ठेचा लागतात. मग तिच्या 'दरबाना'च्या (द्वारपाळाच्या) इरसाल शिव्यांतून अपमानाचे धोंडे मस्तकी आदळतात. दरबानाच्या पाया पडूनही तिच्या महालात एकदम 'ॲडमिशन' मिळत नाही. उंबरठ्यावर पन्नासदा डोके घासावे लागते— कपाळाला घट्टा येईपर्यंत ! आणि एवढे करून तिच्या मिजासखोर मैफलीत सन्मान होण्याची शक्यता कमीच. भर मैफलीत ती निष्ठाशून्य प्रतिस्पर्ध्याची चुंबने घेऊन, निष्ठावंतांच्या जखमेवर मीठ चोळतेच. आणि—

*गैर ले महेफिलमें बोसे जामके*
*हम रहे यौं तिश्ना लब पैगामके*

असे निराश अवमानित उद्गार त्याला काढावे लागतात. ती वफ़ादार प्रेमिकांचा वचनभंग करते, मानभंग करते. चुकून स्वप्नात आलीच तरी प्रतिस्पर्ध्याच्या हातात हात नि गळ्यात गळा घालूनच ! आणि ह्या अपमानाबाबत मैफलीत तक्रार करण्याचीही सोय नाही. तक्रार केलीच तर ती हकालपट्टी करून—

*'बहोत बे-आबरू होकर*
*तेरे कूचेसे हम निकले'*

असे आक्रंदन करण्याचा प्रसंग त्या बिचाऱ्यावर आणते ! अपमानांची अशी शेकडो शल्ये हृदयात ठेवून त्या इमानदार प्रियकराला मृत्यू आला तरी, तिचा छळवाद संपत नाही, अपमानाच्या डागण्या देण्याचा खेळ थांबत नाही. एक अत्यंत अवमानित आशिक विचारतो—

*यह भी अहसाँ ? सुबह होते*
*आये तुरबतपर मेरी*
*कुछ गुले पजमुर्दा लेकर*
*गैर के बिस्तरसे आप*

'हाही उपकारच मानू काय ? की आपण काल रात्री प्रतिस्पर्ध्याच्या पुष्पशय्येवर मौजमजा करून, आज सकाळी माझ्या थडग्यावर फुले वाहण्यास आलात ! आणि फुले तरी कोणती ? तर तुमच्या विलास-शय्येवर चुरगळलेली-कोमेजलेली !"

परंतु, मध्ययुगीन उर्दू शायरीतील प्रियकरांप्रमाणे, सर्वच माणसे इतकी पराकाष्ठेची सहनशील नसतात. प्रेमाइतकीच स्वाभिमानालाच किंमत देणारी माणसे, 'अपमानशल्य ते विषसमचि जीवना' असे मानून 'धिक्कार, मन साहिना मानापमाना' अशी गर्जना करतात ! बोलून चालून जे शत्रू त्यांनी अपमान केला, शिव्याशाप दिले, तर एकवेळ त्याकडे थोर पुरुष दुर्लक्ष करू शकतात. 'सिंह मेघगर्जनेला जबाब देतो, कोल्हेकुईला नव्हे' या न्यायाने श्रीकृष्ण शिशुपालाचे शिव्याशाप एक वेळ हसण्यावारी घालवू शकला ! पण राधेने वा

रुक्मिणीने त्याचा अपमान केला असता, तर तो त्या स्थितप्रज्ञाच्याही केवढा जिव्हारी झोंबला असता ! ज्यांच्यावर अगदी मनापासून उत्कट प्रेम आपण केलेले असते, त्यांच्याकडून झालेला राईएवढा अपमानही पर्वतप्राय वाटावा, इतका तो मनाला लागतो. त्याची प्रतिक्रिया कधी कधी अत्यंत दारुण होते. कधी कधी प्रेमी मन प्रिय व्यक्तीकडून घडलेल्या मानभंगाचे जहर श्रीशंकराच्या मनोधैर्याने नि सहनशीलतेने पचवू शकते, पण कधी कधी त्याच मानभंगाच्या एका विषबिंदूनेही त्याला इतक्या तीव्र वेदना होतात की, तो मरणाचीच थंडगार औषधी जवळ करतो !

या दुसऱ्या प्रकाराचीच घटना नुकतीच युगांडा येथे घडली. इष्काच्या रंगमहालात नव्हे, तर सर्कशीच्या परिसरात ! येथे दौऱ्यावर आलेल्या एका भारतीय सर्कशीतील वाघ-सिंहांचे निष्णात शिक्षक श्री. अनंत राव ह्यांनी, अपमान असह्य झाल्याने, त्यांच्या राहुटीतच गळफास लावून आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्येचे कारण एका चिठ्ठीत लिहून ठेवले होते– 'ज्याला मी अत्यंत प्रेमाने वाढविले, शिक्षण दिले, आई-बापाहून अधिक मायेने जपले, त्या माझ्या लाडक्या वाघाने सर्कशीच्या रिंगणात माझा हुकूम मोडला, इतकेच नव्हे, तर तो गुरगुरत माझ्या अंगावर आला, हे मला अतिशय लज्जास्पद वाटले. हा अपमान अगदी असह्य झाल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे. माझे सहकारी माझ्या त्या लाडक्या विद्यार्थ्याची उत्तम देखभाल करोत !'

कुणी व्यवहार-पंडित त्या व्याघ्रगुरूला खुशाल वेडा म्हणोत, त्याचे उत्कट प्रेम नि त्यातूनच प्रकटलेला अभिमान जिवाला वेड लावून जातो, यात शंका नाही. आमच्या शिक्षण-क्षेत्रातील नि कला-क्षेत्रातील अध्यापक-प्राध्यापकांनी, गुरुवर्यांनी नि उस्तादांनी मानभंगापायी अशी आत्महत्या करू नये,– पण त्या सर्कशीतील व्याघ्रगुरूची उत्कटता अनुसरण्यास काय हरकत आहे ?. . . हरकत आहे तर ! कारण, शिष्याबाबत इतके प्रेम नि स्वतःबाबत इतका अभिमान बाळगणे ह्या व्यापारयुगात शहाणपणाचे नाही. अहो, येथे गुरुदक्षिणेवर नजर ठेवून गुरुपौर्णिमा प्रकाशते, आणि शिष्यांना गंडा घालण्याकरिताच 'गंडा बंधन' साजरे होते ! येथे विद्यार्थ्यांनी द्यावयाच्या मानापेक्षा त्यांनी भरावयाची 'फी' अधिक 'अर्थ'युक्त असते, आणि प्रियजनांवर फारसे प्रेम करावयाचेच नसते. कारण त्यामुळे त्यांनी केलेली मानखंडना फारशी बोचक होत नाही !

□

॥ ५२ ॥

# नकली जीभ !

*८ फेब्रुवारी १९७६*

घाबरू नका. पान-तंबाखूच्या बेफाम व्यसनामुळे, अथवा मुखशुद्धी न राखल्याने, तुम्हास जिभेचा 'कॅन्सर' झाला आहे काय ? झाला असला तर निराश होण्याचे कारण नाही. तुमची जीभ संपूर्ण काढून टाकून, नवी कृत्रिम जीभ बसविता येते. कृत्रिम जीभ तोंडात फिट्ट बसविण्याची ही शस्त्रक्रिया डॉ. एल. जे. डिसोझा (टाटा मेमोरियल हॉस्पिटल) व ओ. जे. मार्टिन्स (बॉम्बे हॉस्पिटलचा दंतविभाग) ह्यांनी प्रथमतः केली, असा आभास निर्मिणारे वृत्त प्रसिद्ध होताच मुंबईच्या वैद्यकीय क्षेत्रात मोठे वादळ उठले. साहजिकच आहे. कारण, कृत्रिम जिव्हा बसविण्याबाबतचे यशस्वी कार्य करण्याचा पहिला मान आहे, मस्तक नि मान ह्यांच्याबाबतच्या शस्त्रक्रियेतील तज्ज्ञ— ऑनररी व्हिजिटिंग कन्सलटंट— डॉ. प्रमोद एम. कोठारी ह्यांचा. कृत्रिम जिभेच्या प्रश्नावर ते १९६७ पासून संशोधन करीत आले आहेत आणि ह्या कामी त्यांना 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फन्डामेंटल रिसर्च'चे डॉ. फली मेहता, डॉ. पी. व्ही. राव, डॉ. टी. मेनन नि डॉ. बिंदूरकर ह्यांनी यशस्वी सहकार्य केले आहे. डॉ. प्रमोद कोठारी ह्यांनीच हे प्रथमतः सप्रमाण सिद्ध केले की, कॅन्सरग्रस्त जीभ काढून टाकून, तिच्या जागी व्यवस्थित अन्न गिळू शकणारी नि बोलू शकणारी नकली जीभ बसविता येते.

परंतु जिभेला केवळ कॅन्सरचीच व्याधी जडू शकते असे नाही. एखाद्या जिभेला अहंभावापायी तुसडे बोलण्याची वा अबोला धरण्याची आदत जडलेली असते ! एखाद्या जिभेला, फार तर नव-नाट्यांतच शोभणाऱ्या इरसाल शिव्या देण्याची खोड जडलेली असते ! अशा प्रकारच्या नाना जिव्हा-रोगांचे उच्चाटन करण्यासाठीही, नकली जिभेची

युक्ती योजता येईल की नाही याबाबतही आमचे डॉ. कोठारी प्रभृती शल्यविशारद यशस्वी संशोधन करू शकतील काय ? होय, विज्ञानाला काय अशक्य आहे ?

अर्थात तोपर्यंत केवळ खतरनाक जिभेला सदुपदेश करण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे ? परमेश्वराने तोंडाच्या कैदखान्यात ठेवलेली एवढीशी जीभ ! पण तिचे सामर्थ्य अचाट आहे. व्यास-वाल्मीकी-कालिदास-शेक्सपियर इत्यादींच्या जिव्हाग्रावर सरस्वती नाचताना पाहून, येशू ख्रिस्त, बुद्ध, ज्ञानेश्वर इत्यादींच्या जिभेतून 'अमृतातेही पैजा जिंकणारी' रसवंती बाहेर पडलेली ऐकून, सारी मानवता धन्योद्गारांत मश्गुल झाली आहे. पण. . . पण. . . ज्या मानवी जिभेवर सरस्वती नृत्य करू शकते, तिच्यावरच सैतानाचा नंगा नाचही घडू शकतो ! ज्या जिभेतून अमृत पाझरते, त्याच जिभेतून सर्प-विषाचा गर्व हरणारे हलाहलही ठिबकू शकते ! कोण्या सुभाषितकाराने म्हटलेच आहे की, दुष्ट मानवाची जीभ सर्प-जिव्हेहूनही खतरनाक ! कारण ही एकाच्या कानाला चावून, दुसऱ्याला बरबाद करू शकते !— आणि दुष्टांना जिभा तरी किती ?— दिसायला एक पण न दिसणाऱ्या कोट्यवधी ! वरवर गोड बोलणारी एक नि चहाड्या-चुगल्या करणाऱ्या, सुखी संसारांना आगी लावणाऱ्या ज़हर ओकणाऱ्या असंख्य ! कोण्या संस्कृत कवीने म्हटलेच आहे— सज्जन माणसाला जीभ एकच असते, पण सर्पाला दोन, ब्रह्मदेवाला चार, कार्तिकेयाला सहा, रावणाला दहा, शेषाला हजार आणि दुर्जनांना किती ह्याचा नियमच नाही ! शतकोटीही असू शकतात.

*'जिव्हा लक्ष-शतैक-कोटि,*
*नियमो नो दुर्जनानां मुखे ।'*

अशा जिभांचे उच्छेदन करून तेथे सज्जन जिभांचे आरोपण शल्य-विज्ञानाने केले तर केवढी बहार येईल !

इश्काच्या मुलखात तर सुखदायी वा समर्थ नकली जिभांची भारीच जरुरी आहे. येता जाता असमंजस कटू कटकट करणाऱ्या प्रेयसीच्या जिभेच्या फटकाऱ्याने घायाळ झालेला गालिब दोन्ही शस्त्रक्रियांची— (हृदयारोपण नि जिव्हारोपण यांची) अपेक्षा एकाच वेळी करतो. कशी ? ऐका—

***या रब ! वो न समझे है,***
***न समझेंगे मेरी बात ।***
***दे और दिल उनको,***
***जो न दे, मुझको जबाँ और ॥***

(परमेश्वरा, तिला माझे म्हणणे समजतच नाही, समजणारही नाही. तेव्हा, एक तर तिला दुसरे हृदय दे अथवा मला दुसरी सामर्थ्यशाली जीभ तरी दे !)

दुसऱ्या एका ठिकाणी तो निष्ठुर, बेपर्वा नि अबोल प्रियतमेला विनवितो—

*हम भी मुंहमें जबाँ रखते है*
*काश ! पूछो के मुद्दुवा क्या है ?*

अहो, आमच्या मुखातही जीभ आहेच ! पण विचाराल तर ना ? विचारा— 'तुझी अभिलाषा काय आहे ? नुसत्या गोड बोलण्याची ? की दिलाला गुदगुल्या करणाऱ्या गोड जिव्हा-चुंबनाची ?—' हाय ! पण अशी गोड पृच्छा करणाऱ्या जिभा निष्ठुर नारींना देवाने दिल्याच आहेत कोठे ! एक तर त्या गप्प राहून प्रियकराचा जीव घेतील, नाहीतर जिभेच्या धारदार तलवारीने नकाराचा वार करून त्याचा मुडदा पाडतील !— म्हणूनच शल्य-विशारदांना विनंती की, शुद्ध निष्ठावंत मुहब्बतीला मधुर दाद देणाऱ्या नकली जिभा त्यांनी तयार कराव्यात !

आणि दुसरी विनंती ही की, सत्तालोलुप सत्तांध राजकारणी लोकांची विनंती मात्र त्यांनी कधीही मनावर घेऊ नये ! सत्ताबाजांची विनंती ? कसली ? 'परखड सत्य बोलणाऱ्या जिभा काढून टाकून, खुशामतीचे मधुर बोल बोलणाऱ्या नकली जिभा बसविण्याची !' हुकूमशहांनी कितीही प्रलोभने दाखविली अथवा दडपणे आणली, तरी काही निर्भय रामशास्त्री बाण्याचे 'वेडेपीर' त्यांना कडवट सत्य तिखट शब्दांत सांगण्यास मागे-पुढे पाहत नाहीत. त्यांच्या स्पष्टवक्त्या जिभांचे फटके त्यांना असह्य होतात. म्हणूनच, त्यांच्या जागी चकमशास्त्री नमकशास्त्रीबाण्याच्या स्तुतिपाठक जिभा बसविण्याची शक्कल सत्तालंपट हुकूमशहांना सुचणे अगदी शक्य आहे. त्यांची विनंती शल्य-विशारदांनी यशस्वी केली तर ?

मग कुठले उच्चार-स्वातंत्र्य नि कुठले काय ? ह्या नकली स्तुतिपाठ-प्रवीण जिभा हुकूमशहांच्या बुलंद जयजयकाराने सारे विश्व दणाणून सोडतील !. . . नको नको, अशा प्रकारच्या खुशामतखोर जिभा आमच्या शास्त्रज्ञांनी कधीही निर्माण करणे नको ! उलटपक्षी, मानवतेच्या प्रगतीसाठी, मांगल्यासाठी आज रोखठोक सत्य बोलणाऱ्या निर्भीड जिभांचीच अत्यंत जरुरी आहे. (सत्ताधीशांचे पायपोस चाटण्यासाठी उतावीळ असलेल्या नि मतलबीपणाच्या मधाने माखलेल्या जिभांचा तुटवडा नाही !) म्हणूनच, ह्या प्रज्ञावंत शल्यपटूंना शक्यच असेल, तर त्यांनी स्वार्थी, भेकड, लाचार नि लाळघोट्या जिभा उपटून टाकून, त्यांच्या जागी, प्राण गेला तरी असत्य न बोलणाऱ्या निर्भय नि शुद्ध जिभांची स्थापना करावी !— पण हे शक्य आहे काय ?

□

॥ ५३ ॥

# ह्या शोधावर बंदी घाला !

*२१ डिसेंबर १९७५*

विज्ञानाचा दर्या अस्मानापर्यंत उचंबळला असून, त्याला आता स्वर्ग अक्षरशः दोन बोटे उरला आहे ! विज्ञानाचा शक्तिमान रथ आता सुसाट वादळी वेगाने इतका भरधाव चालला आहे की, त्याची गतिमानता पाहून गति-तत्त्वालादेखील भोवळ यावी ! या विज्ञान-रथाचे एक चाक चंद्रावर तर दुसरे मंगळावर—जणू काही सूर्यमंडळाचा भेद करून अनंताची भेट घेण्यास तो निघाला आहे ! सामान्यजनांना अवाक करणारे एकाहून एक आश्चर्यजनक शोध, विज्ञान-क्षेत्रात लागोपाठ निपजत आहेत. त्यांतलाच एक नवलपरीचा शोध तामिळनाडूचे राज्यपाल के. के. शहा ह्यांनी बडोदे येथे 'वेदरक्षण-निधी'च्या समारोहात निवेदन केला. ते म्हणाले, "पाच हजार वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्यांच्यात जो संवाद कुरुक्षेत्रावर झाला, तो आज ना उद्या जर्मन शास्त्रज्ञ ध्वनिमुद्रित करू शकतील. कारण त्यांनी पाचशे वर्षांपूर्वीची काही ऐतिहासिक संभाषणे ध्वनिमुद्रित केली आहेत. शब्द कधीही मरत नाहीत. ते अंतराळात गोठून राहतात. आणि विशिष्ट उपकरणांच्या साहाय्याने विशिष्ट ध्वनि-लहरींवर ऐकता येतात, हे आता त्या वैज्ञानिकांनी सिद्ध केले आहे."

## लख्ख प्रकाश पडेल

खरोखरच, ह्या वैज्ञानिक युक्तीने इतिहासातील कितीतरी गूढ समस्यांवर, न सापडणाऱ्या दुव्यांवर— मिसिंग लिंक्सवर-व महापुरुषांच्या वास्तव जीवनावर केवढा लख्ख प्रकाश पडेल ! समजा, विशिष्ट ध्वनिलहरी पकडून भूतकालाच्या उदरात गडप

झालेले शब्द पुनश्च ऐकवू शकणारे हे उपकरण कुरुक्षेत्रावर, रायगडावर, फत्तेपूर शिक्रीत, शनिवारवाड्यात. . . आणि तत्सम शेकडो ऐतिहासिक स्थळी त्या जर्मन शास्त्रज्ञांनी बसविले तर? तर काय, ऐन रणांगणावर श्रीकृष्ण-अर्जुनाचा संवाद १८ मिनिटे चालला होता, की ज्ञानयोग-भक्तियोग-कर्मयोग-सांख्य तत्त्वज्ञान, क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार, अद्वैत सिद्धांत इत्यादींच्या गहन अरण्यात शिरून, एखाद्या विद्वत्ज्जड परिसंवादाप्रमाणे (अथवा एखाद्या मंत्रिमहाशयांच्या प्रदीर्घ लेक्चराप्रमाणे) तब्बल १८ अध्याय चालला होता; हा संवाद 'प्रोज' मध्ये घडला की श्लोक-बद्ध झाला; गीतेचे 'ओरिजनल' श्लोक किती आणि त्यांत घुसखोर श्लोकांची खोगीर-भरती किती, इत्यादी शेकडो प्रश्न कायमचे निकालात निघतील. आमच्या त्या रामायण-महाभारतावर विद्वानांची 'इंटरप्रिटेशन्स'- भाष्ये— किती ! आणि ती किती परस्पर-विरोधी ! जनमानसातील हजारो वर्षांच्या प्रतिमांना धक्के देत कोणी म्हणावे पांडव लुच्चे होते; रामाहून रावणच महात्मा होता; द्रौपदी 'अप टु द मार्क' पतिव्रता नव्हती. शकुनीहून कृष्णच अधिक 'अन्स्क्रुपलस्' होता; बिभीषण सत्प्रवृत्त सज्जन नव्हता, तर लंकेतला पंचमस्तंभीय देशद्रोही होता !. . . रामायण-महाभारत-पुराणांबाबतच नव्हे, तर अगदी अलीकडच्या इतिहासाबाबत देखील विद्वानांत कोण खडाजंगी ! कुणी 'भले बुद्धिचे सागर नाना' म्हणून नाना फडणविसाचा गौरव करावा, तर कुणी त्याच नानाला 'पूना-मसाला-पाना'प्रमाणे रंगेल नि 'रासपुटीन' प्रमाणे दुरात्मा म्हणून हिणवावे !. . . अशा हजारो मतमतांतरांचा गलबला, प्रस्तुत संशोधनाने दूर होण्याचा संभव आहे.

### गूढ-रम्यता खलास?

अहो, पण त्यामुळे रजाचा गज नि राईचा पर्वत करू शकणाऱ्या विद्वानांची केवढी गैरसोय होईल ! सबळ पुराव्याच्या अभावी जे गूढ-रम्य वातावरण इतिहासाभोवती आढळते, ते नष्ट होईल. आणि मग 'ज्ञानेश्वर एक की दोन', 'रामदासस्वामी नि शिवाजी महाराज ह्यांची प्रत्यक्ष भेट झाली की नाही', '१८५७ चे समर हे क्रांतियुद्ध की शिपायांची गर्दी,' 'कालिदास कोणत्या नगरीचा' इत्यादी शेकडो प्रश्नांवर इतिहास-संशोधकांत ज्या मारामाऱ्या वर्षानुवर्षे चालू आहेत, त्या ह्या अजब ध्वनिमुद्रणामुळे बिलकुल खामोश होतील ! कदाचित आम्ही ज्यांना 'हीरो' समजत आहोत ते केवळ 'बिग झीरो' आहेत; ज्यांच्या मस्तकावर आम्ही महापुरुषत्वाचा मुकुट चढविला ते कापुरुष आहेत, हे लक्षात येऊन आमच्या शेकडो स्वप्नांचा चक्काचूर होईल !. . . ह्या भूतकाल-ध्वनिमुद्रणामुळे आपणास अकबराच्या दरबारातील गवय्यांचे गाणेही, 'आकाशवाणी'च्या 'विविध भारती'वर ऐकायला मिळेल हा फायदा खरा; पण

तानसेनविषयीच्या शेकडो अद्‌भुतरम्य आख्यायिकांचा प्रत्यक्ष तानसेनच्याच कबुलीजबाबाने खिमा केला तर? ह्या संशोधनामुळे कुरुक्षेत्रावरील कृष्णार्जुन-संवादच काय पण 'रोमियो-ज्यूलियट'च्या बेडरूममधल्या इष्काच्या गुजगोष्टीही जशाच्या तशा ऐकू येतील खऱ्या; पण शेक्सपीयरने त्यांच्या तोंडी घातलेल्या संवादाप्रमाणे त्या गोष्टी काव्यमय नाहीत असे कळले तर?

## लुच्चेश्वरांची पंचाईत!

इतिहास-काळाची बात सोडा. अवकाशात गोठून बसलेले शब्द ध्वनिमुद्रणांत पकडण्याच्या ह्या शोधामुळे, अगदी काल-परवाच्या शेकडो घटना अंधारातून उजेडात येऊन मोठाच हाहाकार माजेल; खाजगीत एक नि सार्वजनिक समारंभात दुसरेच बोलणाऱ्या आमच्या लीडर-मंडळींची ह्या संशोधनाने फारच पंचाईत होईल! कल्पना करा, खाजगी बैठकीत आपल्या भगतगणांपुढे इंदिराजींना शिव्या-शाप देणाऱ्या पण सार्वजनिक ठिकाणी त्यांची तोंड फाटेपर्यंत स्तुती करणाऱ्या एखाद्या दंभाचार्याची, ती प्रायव्हेट निंदाप्रचुर बातचीत ध्वनिमुद्रित झाली तर? अथवा, व्यासपीठावर 'सेक्युलर'वादाचे पीठ मोठ्या उत्साहाने दळणाऱ्या पण अंतरी जातीयवादाचे हलाहल धारण करणाऱ्या एखाद्या लेक्चरपटू लुच्चेश्वराचे खाजगी खलबत ह्या ध्वनिमुद्रणाने अचूक टिपले तर? तर आपले भंगलेले मुखवटे नि चिंधड्या उडालेले बुरखे सांभाळता सांभाळता त्यांच्या नाकी नऊ येतील, ह्यात शंकाच नाही.

## 'इंपोर्ट' होणे अनिष्ट!

छे छे छे छे! मनात एक, जनात दुसरेच; पोटांत एक ओठांत दुसरेच, अशा दुटप्पी, दुतोंडी धोरणाने वागणाऱ्या आमच्या 'माननीय', 'पूजनीय,' 'आदरणीय' वंचनापुरुषोत्तमांना परेशान करणारे हे जर्मनशास्त्रज्ञांचे संशोधन, काही केल्या आपल्या भारतात 'इम्पोर्ट' होणे इष्ट नाही. कारण वैज्ञानिक प्रगती महापुरुषांच्या सुखासाठी आहे, सोयीसाठी आहे; त्यांना हैराण करण्यासाठी नाही! खरे पुसाल तर, जर्मन शास्त्रज्ञांच्या ह्या शोधावर जागतिक बंदीच घालण्यात आली पाहिजे. कारण, ह्या शोधाने केवळ इतिहासातलेच नव्हे, तर वर्तमान काळातलेही हजारो रंगीबेरंगी दिखाऊ डोलारे जमीनदोस्त होण्याचा जबरदस्त धोका आहे!

□

॥ ५४ ॥

## निद्रादेवीची नाराजी का?

*२३ नोव्हेंबर १९७५*

परवाच मुलुंड येथे संत पाचलेगावकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमात 'राष्ट्र धर्म प्रचारक शिबिरा'चा समारोप झाला. अध्यक्ष? अर्थातच अनंत काणेकर होते! त्यांनी सर्वांना पटेल अशी सुखाची गुरुकिल्ली सांगितली. माणसाला शांत नि गाढ झोप येणे हीच ती गुरुकिल्ली! खरेच आहे हे. पूर्वी बहुसंख्य माणसांना निद्रादेवीचा वरदहस्त लाभला होता, म्हणूनच भौतिक सुख-साधनांची विशेष वाढ झाली नसतानाही, झोप न येण्याची तक्रार सहसा ऐकू येत नसे. पण आता जगतात निद्रानाशाच्या विकाराचे प्रमाण फार वाढले आहे. अनंत काणेकर सांगतात, 'लक्षावधी झोपेच्या गोळ्यांपैकी तीन चतुर्थांश गोळ्या अमेरिकेत खपतात. ह्याचा अर्थ, निव्वळ भौतिक समृद्धीने मानवाला सुखप्राप्ती होतेच असे नव्हे!'

भौतिकदृष्ट्या संपन्न असलेल्या समाजावर निद्रेची अशी खपामर्जी का व्हावी? दिवसभर कष्ट करून थकलेल्या माणसांना छान विश्रांती लाभावी म्हणून, दयाळू परमेश्वराने रात्र निर्माण केली. आणि रात्रीच्या शांत शामियान्यात सर्वांच्याच सेवेसाठी निद्रेला पाठविले! श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, सुशिक्षित-अशिक्षित, बाल-वृद्ध असा कोणताही भेदभाव मनात न आणता झोप-नामक सुखाची गुरुकिल्ली त्या दयाघनाने सर्वांनाच उपलब्ध करून दिली. पण असे असूनही ह्या औद्योगिक यंत्रयुगात निद्रा-नाशाचे एवढे वाढते प्रमाण का? 'एअर कंडिशन्ड' शयनागारातही निद्रा-भंग का? झोपेच्या 'पिल्स'चे— गोळ्यांचे— एवढे बेसुमार भक्षण का? संत पाचेलगावकर महाराजांनी त्याच समारंभात ह्याची कारण-मीमांसा केली. ते म्हणाले, "जीवनात उपभोग

हवेतच. पण उपभोगांच्या आहारी माणूस गेला, त्यांचा अतिरेक झाला की झोप बंद !"

खरेच आहे हे. उपभोगांच्या मागे धावणाऱ्यांचे चित्त सदैव अशांत असते. आणि मग 'अशांतस्य कुतो सुखम् ?' ऐहिक सुखांच्या अतिरेकाने वीर्यनाशापासून निद्रानाशापर्यंतचे अनेक विकार उद्‌भवतात. सारांश, भौतिक उपभोगांबाबत संयमाचा 'राम' सुटला की, झोप हराम होते !. . . पण 'ओव्हर' उपभोगांनी झोप उडते, तशीच 'अंडर' उपभोगानेही झोप खलास होते ! गाढ सुखनिद्रा प्राप्त होण्यासाठी मानवाला किमान– मिनिमम– उपभोग मिळालेच पाहिजेत, असे आमच्या शेकडो विरहकाव्यांवरून दिसून येत नाही काय ? उपभोगांच्या बाबतीत अतिरिक्त आहार नि तज्जन्य अपचन जेवढे तापदायक, तेवढेच उपोषणही खतरनाक !

उर्दू शायरीतील नायकांची झोप उपभोगांच्या अतिरेकाने उडण्यापेक्षा, उपभोगांच्या अभावाने– त्यांच्या केवळ प्रतीक्षेने– उडालेली आढळते. एकलेपणाची आग उरात बाळगून बिचाऱ्यांना रात्रभर तळमळत जागावे लागते. त्यांच्या शयनागारात एकीकडे चिराग जळत जळत जागा असतो. अन् दुसरीकडे त्यांचा दिल प्रियेच्या विरहाने जळत राहतो ! 'इन्तजार' म्हणजे 'प्रतीक्षा,' म्हणजेच 'वाट पाहणे' हा उर्दू प्रेमकाव्यात एक अत्यंत महत्त्वाचा विषय. प्रेयसीच्या मीलनाचे ऐहिक सुख नशिबी नसल्याने अशांत झालेले, उदास बसलेले आणि म्हणूनच निद्रासौख्यास पारखे झालेले महाभाग उर्दू गजलांच्या महालांत शेकड्यांनी वास्तव्य करीत आहेत. घटकाभराचे मीलन म्हणजे सुखाचा, उपभोगाचा अतिरेक म्हणता येईल काय ? पण त्याबाबत अगदी निर्जली एकादशी– कडकडीत उपवास घडलेल्या उर्दू प्रियकरांना, वाट पाहत पाहत झोपी जाण्याशिवाय दुसरे काय हाती आहे ?. . . 'वाट पाहत झोपी जाणे ?' छे, अशक्य ! 'वटुली पाहता, शिणले डोळुले' अशी गत झाली, तरी झोपेने डोळे मिटायचे नाहीत !

'तुज स्वप्नि पाहिले रे गोपाळा' म्हणणारी राधा असो की मीरा असो, निदानपक्षी स्वप्न पडण्याइतपत तरी झोप तिच्या नशिबी होती. पण उर्दू शायरीतील प्रणय-वीराशी झोपेने पूर्णतः तलाक घेतल्याची उदाहरणे अनेक आहेत. मिर्झा गालिब एका प्रेमी जीवाचा अनुभव सांगतो-

*तो फिर न इन्तजारमे*
*नींद आये उम्रभर ।*
*आनेका वादा कर गये,*
*आये जो ख्वाब में ।।*

(तिने मला भेटावयास येण्याचे वचन दिले, ते स्वप्नात येऊनच. मी ते स्वप्नातील वचनही खरे मानले आणि तिची रात्रंदिवस प्रतीक्षा करू लागलो. त्या प्रतीक्षेमुळे मला

आयुष्यभर झोपच आली नाही. झोपच नाही, तर स्वप्न कुठले? आणि मग प्रत्यक्षात राहोच, स्वप्नांच्या रंगमहालातही तिची भेट अशक्य ! माझी पुरती फसवणूक झाली. झोप आली नाही, आणि तीही आली नाही ! दुप्पट दुःखात बुडालो !)

सारांश, ऐहिक उपभोगांच्या अभावानेही झोप उडते; निद्रादेवी नाराज होते.

परंतु, ह्यावर असे म्हणता येईल की, प्रत्यक्ष ऐहिक भोगाच्या अतिरेकाप्रमाणेच त्या भोगाची तीव्र आसक्तीही निद्रानाश घडविते. किंबहुना प्रत्यक्ष उपभोगांहूनही त्यांची आसक्तीच अधिक खतरनाक असते ! सध्या ह्या भौतिक सुखाच्या आसक्तीचा अतिरेक अमेरिकेसारख्या धनाढ्य देशांतील धनवंतांमध्ये माजला आहे. म्हणूनच त्या सुखांचा 'इंतजार' ही इतका बेजार करतो, नैसर्गिक निद्रासुखालाही सुरुंग लावतो ! अर्थात भौतिक उपभोगांची तीव्र आसक्ती ही प्रायः धनवत्तर समाजातच निर्माण व्हायची; जिथे दोन वेळच्या पोटभर जेवणाचीही भ्रान्त अशा दरिद्री समाजात नव्हे. आपल्या देशातील बहुसंख्य लोकांना शांत झोप लागत नाही, ती ऐहिक उपभोगांच्या लालसेने नव्हे, तर नानाविध चिंतांच्या चितांचे चटचटा चटके बसल्यानेच ! 'आजचा दिवस कसाबसा निभावला, उद्याचे काय?' असे प्रश्नचिन्ह ह्या देशातील कोट्यवधी लोकांच्या नजरेपुढे एखाद्या टांगत्या तलवारीसारखे उभे असते. अन्न, वस्त्र नि निवारा ह्या प्राथमिक गरजा भागविता भागविताच येथे ९० टक्के लोकांच्या नाकी नऊ येत असतात. मग त्यांना सुखाची झोप कोठली? त्यांचा दिवस कष्टांसाठी असतो आणि रात्र उद्याची चिंता करण्यासाठी ! आणि अशा गरिबांना जडलेला निद्रानाशाचा विकारही त्यांच्या इतर अनेक दुःखांप्रमाणे जगताच्या निदर्शनाला येत नाही. झोपेच्या गोळ्या नव्हे, तर अखेरची झोप हाच त्यांच्या सर्व व्याधींवरचा उपाय असतो. आणि तिचीच ते वाट पाहत असतात !

□

॥ ५५ ॥

# ओ रिन्द, छुप ना जाना !

*१२ ऑक्टोबर १९७५*

ह्या जगाच्या विशाल पसाऱ्यात जगदीश्वरच लपून बसला आहे ! निर्गुण निराकार परब्रह्म मायेच्या विश्वव्यापक जंजाळात कुठे तरी दडून बसले आहे; आणि ते शोधून काढून त्याचा साक्षात्कार घडविणे हे अत्यंत अवघड काम संत-महंतांना करावे लागत आहे ! सामान्य जनांना, इतकेच नव्हे, तर बड्या बड्या विचारवंतांनाही 'तो' सहजासहजी गवसत नाही. परंतु, एक परमेश्वराचा अपवाद वगळता, दुनियेच्या ह्या खुल्या बाजारात काहीही लपून राहू शकत नाही. लपवितो म्हटले तरी लपविता येत नाही. आज ना उद्या कोणतीही गोष्ट प्रकट होतेच ! अत्यंत धूर्ततेने रचलेले गुप्त कटही जेथे प्रकट होतात, निर्जन रानावनांतील गुन्ह्यांनादेखील जिथे केव्हाना केव्हा वाचा फुटतेच, तेथे गोपनीय नि गुप्त असे काय आहे ? मोगल सम्राट अकबराच्या काळी 'गंग' नावाचा एक स्पष्टवक्ता कवी होऊन गेला. त्याने अकबराला हाच सिद्धांत सांगितला की, कुटील राज्यकर्त्यांची गुप्त कर्मेही कधी छपविता येणार नाहीत-अगदी 'पोलादी पडदा' (Iron curtain) देखील केव्हा ना केव्हा फाटतोच आणि त्याच्या आड दडलेल्या गोष्टी उजेडात येतातच ! हे सत्य सांगताना गंग म्हणतो–

*तारा की ज्योति में चंद्र छिपे नहि*
*सूर्य छिपे नहि बादर छाये ।*
*रत्न चढे रजपूत छिपे नहि*
*दाता छिपे नहि, मांगन आये !*
*चंचल नारीके नैन छिपे नहि*

*प्रीत छिपे नहि पीठ दिखाये !*
*'गंग' कहे सुन शाह अकब्बर*
*कर्म छिपे न बभूत लगाये !*

'बभूत' म्हणजे विभूति-भस्म ! एखाद्या बदकर्माला समर्थनपर फसव्या युक्तिवादाचे 'भस्म' कितीही फासले; 'तात्त्विक' मुलामा कितीही दिला; तरी त्याचे मूळ स्वरूप दुनियेच्या न्यायालयात उघड होतेच ! म्हाताऱ्या माणसाचा खोकला, तरुण माणसाचे इष्काचे रंगढंग आणि मद्यप्याचे मदिरापान तर अजिबात झाकले जाऊ शकत नाही !

## चेहरा कसा लपवाल ?

काय ? मदिरा-पान छपवून ठेवणे इतके अवघड आहे ? होय. एखाद्या पाताळातील पानगृहात २-४ पेग चढवून वर आलात, तरी तुम्ही वारुणीचे चुंबन घेतले आहे, हे लक्षात यायला उशीर लागत नाही. बडीशेपेचा तोबरा भरा, नाहीतर सुगंधी मसाला-पान चघळा, - कधीकधी श्वासोच्छ्वासातून बाहेर येणारा सुरागंध त्या सुगंधावरही मात करतो ! तळीरामाने बिनवासाच्या दारूची फर्माईश करून ५५ वर्षे लोटली, तरी अद्यापि शंभरटक्के वासरहित दारू निघालेली नाही !. . . बरे, एक वेळ मद्याचा घपकारा सुगंधाच्या भडिमाराने कसाबसा गारद कराल; पण उजळलेला चेहरा कसा लपवाल ? मदिरेचा कैफ घेणाराच्या लक्षात आला नाही, तरी पाहणाराच्या नजरेत पटकन भरतो ! त्यातही स्त्रीने केलेले मदिरापान तर तिच्या नेत्रांत नि गात्रागात्रांत फारच त्वरेने नि स्पष्टपणे प्रकटते. अशा नेत्रवेधक 'मदश्री'ची सुंदर वर्णने प्राचीन वाङ्मयात आहेत. उदाहरणार्थ, तत्कालीन एका 'मॉडर्न मदिरा-मंडळा'तील तरुणींची ही मदीर शोभा पहा—

*राग-कान्त-नयनेषु नितान्तं*
*विद्रुमारुण-कपोल-तलेषु ।*
*सर्वगापि ददृशे वनितानां*
*दर्पणेष्विव मुखेषु मदश्री*

(त्या रमणींच्या आरक्त नयनांत; पोवळ्याप्रमाणे आरक्त असलेल्या कोवळ्या कपोल प्रांतात; आरशासारख्या स्वच्छ कान्तिमान मुखांवर सर्वगामी मदश्री प्रतिबिंबित झालेली दिसली !) सारांश, कल्पक माणसे फार तर मदिरेचा गंध गारद करू शकतील, पण तिची नेत्रांतील गुलाबी छटा नि गालांवरील लाली कशी दडवून ठेवणार ? मदिरेने उत्तेजित झालेल्या व्यक्तींचे कधी हास्यास्पद तर कधी आल्हादक नि आकर्षक होणारे विभ्रम कसे झाकणार ? . . . आकर्षक विभ्रम ?. . . हो हो; कधी कधी मदिरासेवनाने सुंदरीच्या हालचालींना अधिकच सौंदर्य प्राप्त होते. . . हे असे—

*अंगडाई उसने नशेमे ली*
*जब उठाके हाथ।*
*दरिया-ए-हुस्न और भी*
*दो हाथ बढ गया॥*

## आनंदाची गोष्ट

मदिरा-पान हे असे चटकन लक्षात येणारे असूनही, कैक मद्यासक्त सारथ्यांना, ड्रायव्हर्सना गुन्हेगार ठरविणे मुश्किल होऊन बसते. 'दारू पिणे वाईट अन् दारू ढोसून वाहन चालविणे फारच खतरनाक' हा उपदेश धाब्यावर बसवून बस-गाड्या, ट्रक्स नि टॅक्सीज भरधाव सोडून अपघातास कारण होणारे हे महाभाग अनेकदा सही-सलामत सुटतात. कारण, संशयित मद्यपि ड्रायव्हर्सची वैद्यकीय तपासणी करूनच, त्यांनी नियमभंग केला की नाही हे ठरवावे लागते– आणि पुष्कळदा अशी तपासणी करणे पटकन नि वेळच्या वेळी शक्यही होत नाही. . . परंतु, आनंदाची गोष्ट ही की, मद्यप्राशनाचा गुन्हा चटकन सिद्ध करणारे उपकरण आता शोधून काढण्यात आले आहे. परवाच त्याचे प्रात्यक्षिक येथे करून दाखविण्यात आले. प्रस्तुत उपकरणाला 'अल्कोटेस्ट' असे म्हणतात. जगातील अनेक प्रगत देशांत ते सर्रास वापरले जाते. ह्या उपकरणाने मद्यप्याच्या श्वासोच्छवासाची चाचणी होते आणि त्याला जोडलेल्या बाटलीतील द्रव पदार्थाचा रंग (त्याने मदिरापान केले असेल तर) ताबडतोब बदलतो.

## अंमलबजावणी सुलभ

सध्या हे 'मद्यपान-चाचणी-उपकरण' आपल्या देशात निर्माण होत नाही. म्हणूनच ते आयात करावे लागले. परंतु 'ते भारतात तयार करता येईल काय?' अशी पृच्छा पोलिसखात्याने 'नॅशनल केमिकल लॅबोरेटरी'कडे केली आहे. आमची खात्री आहे की, आपले शास्त्रज्ञ नि तंत्रज्ञ हे उपकरण सहज बनवून देऊ शकतील. तसे झाले तर त्याचा वापर खेड्यापाड्यांपर्यंत करता येईल आणि आता, सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्यास वा दारू पिऊन धिंगाणा घालण्यास जी सक्त मनाई करण्यात आली आहे, तिची अंमलबजावणी करणे पोलिसांना सुलभ होईल.

—बेजबाबदार मद्य-शौकिनांनो सांभाळा ! दारू 'टेस्ट' करण्यापूर्वीच 'अल्कोटेस्ट'चा विचार करा ! हे यंत्र 'ओ रिन्द (मद्यपि) छुप ना जाना,' असा इशारा देत सर्वत्र संचार करणार आहे !

□

॥ ५६ ॥

# एकेकीचे नशीब !

*१० ऑगस्ट १९७५*

तुम्ही कितीही प्रयत्नवादी असा, दैव-योग तुम्हाला मानावाच लागतो. तसे नसते तर एकाच आई-बापाच्या पोटी, एकाच कुटुंबात, एकाच परिस्थितीत जन्मलेल्या मुलांचे भवितव्य अगदी भिन्नभिन्न झाले नसते; रावण रामाचा कट्टर शत्रू, तर बिभीषण कट्टर मित्र निपजला नसता ! एकाच मातेचे दोन पुत्र; पण एक कुलांगार होतो तर दुसरा कुलदीपक ! एकाच वेलीवरची दोन फुले. पण एक सुंदरीच्या अथवा सुंदर देवमूर्तीच्या मस्तकी मिरविते, तर दुसरे 'फुटके नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारते !' एकाच सह्याद्री कुळात जन्मलेल्या त्या सरिता ! पण त्यांतील सर्वजणी जवळच्याच पश्चिम सागराला– सिंधु-सागराला– वरतात; तर एकटी गोदावरी मात्र जवळच्या सिंधुसागराकडे पाठ वळवून दूरच्या पूर्व समुद्राकडे लगबगा धावत जाते !

त्या दोघींच्या बाबतीतही असेच काही घडले. एकाच नगरीत, किंबहुना एकाच वस्तीत, त्या दोघी साधारणतः वर्ष-दोन वर्षांच्या अंतराने जन्मल्या, मोठ्या उमेदीने उभ्या राहिल्या ! पण एक गोरगरिबांची सेवा करण्यासाठी झिजत होती, गरीब नि सोशिक 'चाळकरी' बनली होती; तर दुसरी मोठ्या दिमाखाने 'बंगलेवाली' झाली होती ! एक आपले शरीर दारिद्र्य-नारायणाच्या सेवेसाठीच आहे असे मानत होती, तर दुसरी नवकोट-नारायणाच्या विलासमंदिराची शोभा वृद्धिंगत करत होती ! दोघीही अगदी आमने-सामने आपापले जीवित-कार्य करीत होत्या. तथापि हळूहळू 'चाळवाली' जराजीर्ण होत चालली, वर्षानुवर्षांच्या उपेक्षेने ढेपाळू लागली, काळवंडू लागली; पण 'बंगलेवाली'ची गुलाबी रंगरंगोटी नि प्रकृती 'अभी भी मै जवान हूं' असा अहंकार

मिरवीत होती ! 'आपले आयुष्य संपले तर आपल्या आधाराने जगणाऱ्या गरिबांचा संसार उघड्यावर पडेल' ह्या चिंतेने 'चाळवाली' खचत चालली आहे, असा भास होत होता; तर बंगलेवाली, अगदी बेफिकीर दिसत होती. कारण तिच्या घराचा श्रीमंत धनी तिची काळजी वाहण्यास समर्थ होता– तिचे हर प्रकारे लाड पुरवीत होता; नुसत्या तिच्या 'मेकप'साठी दरवर्षी हजारो रुपये उधळत होता. माजोर बंगलेवालीची काया इतकी गुळगुळीत नि तुकतुकीत की, जणू ती संगमर्मराचीच घडली आहेसे वाटावे ! त्या तुकतुकीत अंगाच्या बयेने आपल्या धन्याची कैक पापकर्मे अगदी जवळून पाहिली, तरी त्यांबाबत एक अवाक्षरही कधी उच्चारले नाही. 'स्मगलिंग'चे अनेक मनसुबे हिच्या डोळ्यांदेखत घडले, पण त्यांची खबर हिने पोलिसांना कधीच दिली नाही. उलटपक्षी, काळा पैसा दडवून ठेवण्याच्या कामी हिने फारच मोठी मदत आपल्या त्या समाजद्रोही श्रीमंत मालकाला केली !

बंगलेवालीची पाप-सेवा अशी जोरात चालली असतानाच, चाळवाली गेल्या ४ दिवसांच्या संतत पावसात ओलीचिंब होऊन धाडकन कोसळली, जमीनदोस्त झाली ! अर्थात ही 'चाळवाली' म्हणजे चाळीची खचलेली भिंत ! चाळीतील गरीब रहिवाशांची निरपेक्ष सेवा करीत वर्षानुवर्षे उभी असलेली सेविका !. . . आणि चाळीच्या ह्या कोसळलेल्या भिंतीकडे उपहासाने पाहत असलेली 'बंगलेवाली'– म्हणजे आलिशान बंगल्याची ऑईलपेन्टने रंगलेली तुकतुकीत भिंत. काय दैवाची करणी पहा. ती कोसळली नाही. पण मरणाहून दुःखदायक बदनामी तिच्या नशिबी आली ! वृत्तपत्रात काल-परवाच प्रसिद्ध झालेली ही बातमी वाचा– 'येथील एका 'स्टॉकिस्टा'च्या बंगल्याची प्राप्तिकर अधिकारी कसून तपासणी करीत असताना त्यांना त्याच्या बेडरूमच्या भिंतीत गुप्त तिजोरी आढळून आली ! भिंत ठोकून पाहिली असता जो पोकळ आवाज आला, त्यावरून भिंतीतील ह्या तिजोरीचा शोध लागला. तिजोरीची किल्ली न मिळाल्याने अधिकाऱ्यांनी ती भिंत फोडली आणि तिच्यातून ५ लाख रुपये बाहेर काढले !'

चाळीची समाज-सेवा-तत्पर भिंत आणि बंगल्याची समाजद्रोहाला मदत करणारी भिंत ! दोन्ही विटांच्या नि सिमेंटच्याच भिंती; पण दोघींची नशिबे भिन्न ! चाळीच्या भिंतीच्या नशिबी अखंड सेवाव्रत नि गौरवशाली मृत्यू होता, तर बंगल्याच्या त्या गुलाबी भिंतीच्या नशिबी अखेर काळा पैसा दडवून ठेवल्याचा कृष्ण-कलंक होता !. . .

□

॥ ५७ ॥

## झटपट जमाना !

*२८ जुलै १९७४*

ह्या युगाला काय म्हणावे ? हे युग संघर्षमय आहे म्हणून ह्याला 'झटपट युग' म्हणावे की बिगर-फुरसतीचे, धावपळीचे आहे म्हणून ह्याला 'झटपट युग' ह्या नावे संबोधावे ? तसे पाहिल्यास, मानवी जीवन तर अनादि कालापासून संघर्षमयच आहे; प्राचीन काळीही मानवाला खडतर जीवन-कलहाला तोंड द्यावेच लागत होते. पण आता जीवन-संग्रामही वेगवान, गतिमान बनला आहे ! कोणतीही झटापट, कोणताही लढा झटापटीशिवाय यशस्वी होत नाही ! तेव्हा हा जमाना, 'झटपट-जमाना' म्हणूनच ओळखला जावा. सांगा, ह्या जमान्यात जीवनाची संथ, शांत लय कुठे नि कितपत आढळते ? अहो, संगीतातदेखील 'ठाय लय' झपाट्याने लय पावत आहे ! उडत्या-धावत्या चालींच्या सिनेगीतांची अफाट लोकप्रियता हेच सूचित करते आहे. संथ भारदस्त 'ख्याला'च्या नशिबी आता ख्यालीखुशाली नाही;— द्रुतगतीच्या पॉप-मॉड-बिटल्-संगीताचा विलायती जल्लोष जनमनाची जोरात पकड घेत आहे. नृत्यातही तेच. जलद गतीच्या कसरतींवरच पब्लिक अधिक खूष ! चित्रपट-नाटकांतही कथानक केवळ जलद गतीनेच नव्हे, तर उड्या मारीतही पुढे जाते. अभिजात नाटकांतील तो क्रमशः नि सावकाश होणारा रस-परिपोष आता नीरस वाटू लागला आहे !

आणि हे साहजिकच नव्हे काय ? सारे जीवनच धकाधकीचे नि धावपळीचे. काही निमकहरामांनाच काय तो आराम ! इतरेजनांच्या नशिबी ९-९ ची फास्ट लोकल ! 'गृहिणी'ने रुचकर स्वयंपाक केला, तरी त्याचा आरामशीर आस्वाद ललाटी नाही. 'लंचटाइम'ला डब्यातून येणारे थंडगार अन्न झटपट पोटात कोंबावे लागते. 'भोज्येषु

माता' अन् 'शयनेषु रंभा' अशी पत्नी लाभली तरी काय उपयोग? मधुचंद्रदेखील चार दिवसांच्या 'कॅज्युअल'-रजेत 'कॅज्युअली'च उपभोगणे कैक कारकून-मजनूंच्या प्राक्तनात ह्या युगाने लिहिले आहे! 'ओव्हर टाईम' करून घरी उशिरा यावयाचे नि सकाळची पहिली लोकल गाठण्याच्या विवंचनेत बिछान्यावर, (उशाशी 'अलार्म वॉच' ठेवून) निजायचे! अशा धावपळीच्या जीवनात शयन-सौख्य कोठले? उत्तररात्री क्वचित कोठे रंग भरतो न् भरतो तोच घड्याळाचा गजर वा दूधवाला भय्या झटपट युगाची जाणीव करून देणार! आणि मग साहजिकच मिर्जा दागचा शेर मॉडर्न रूप धारण करून वैतागलेल्या कंठातून बाहेर पडणार—

*दी 'अलार्म वॉच'ने शबे-वस्ल*
*'अलार्म' पिछली रात।*
*हाय! कंबख्त को किस वक्त*
*'टैम' याद आया!*

जमानाच असा— घड्याळाची गुलामी माथी मारणारा;— घड्याळाच्या काट्यांप्रमाणेच सारखा भ्रमण करावयास लावणारा! म्हणूनच सारे काही झटपट. निजणे झटपट, उठणे झटपट, स्नान झटपट, भोजन झटपट, लेखन झटपट, वाचन झटपट! चिंतनाला वेळ नाही, मननाला फुरसत नाही; रियाझाला फुरसत नाही; वर्षानुवर्षे तपश्चर्या करण्याचे नावच नको!... म्हणूनच झटपट-संगीत विद्यालयात दोन-तीन वर्षांत 'सूरगंगा' नि 'सूर-हिमालय' पैदा होताहेत! साहित्य क्षेत्रात झटपट नवीन लाट येत आहे— झटपट ओसरते आहे.

अशा या द्रुतलयीच्या जमान्यात मंदाग्नीवर सावकाश रुचकर स्वयंपाक करण्यास आमच्या मॉडर्न गृहलक्ष्मींना फुरसत आहे कोठे? अर्ध्या सेकंदात भडकत्या गॅसवर नि रटरटत्या कुकरवर झटपट स्वयंपाक उरकावा लागतो! स्वयंपाकाचे जाऊ द्या— निदान साडी तरी सावकाश चोपूनचापून नेसावी? छे बाई, त्यालाही मेली फुरसत नाही! म्हणून तर वेळखाऊ सकच्छ नऊवारी नको; विकच्छ पाचवारीच झटपट गुंडाळणे बरे!... पण ती नेसण्यातही वेळ जाऊ नये, थोडीही तकलीफ पडू नये, म्हणून गुजरातेतील 'डीसा'नामक शहरातील एका 'दर्जी-बहाद्दरा'ने (म्हणजे बहाद्दर शिंप्याने) 'बांधील' साडी बनविली आहे. ही साडी परिधान करण्यास दोन मिनिटांहून अधिक वेळ लागणार नाही आणि तरीही ती नेहमीच्या पद्धतीने नेसलेल्या साडीसारखीच दिसेल, 'टेलर मेड' अजिबात वाटणार नाही, असा ह्या 'बंधी बंधाई'-साडीच्या निर्मात्याचा दावा आहे. यामुळे पाश्चात्त्य देशांत साड्यांची भरपूर निर्यात होऊ शकेल. कारण झगेवाल्या मडमांनाही भारतीय साड्या खूप आवडतात; पण त्या नेसता येत नाहीत. आता ह्या शिवलेल्या

रेडिमेड साड्यांनी त्यांची अडचण दूर झाली आहे !

नऊवारी साडी व्यवस्थित नेसणे तर पाचवारी नेसण्याहून अवघड. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्र-महिला फार तर सणासमारंभालाच नऊवारीकडे मेहरनजर वळवितात ! मराठी नाटकांतील अनेक नट्यांनाही नऊवारी नेसविण्यासाठी एखादी जुन्या वळणाची बाई ठेवावी लागते. पण जर का त्या गुजराती शिंपी-भूषणाने शिवलेली 'बांधील' नऊवारी तयार केली तर ?- तर पुनश्च महाराष्ट्राची ही वैशिष्ट्यपूर्ण साडी सहज प्रसारात येईल. 'एक नूर सुंदरी तो दसनूर नऊवारी' ही म्हण सार्थ करणारी; केरळ चित्र-सम्राटाला— राजा रविवर्म्यालाही— मोह पाडणारी; नारीच्या देहयष्टीला अधिकच डौल नि शोभा देणारी ती पाचवारीची वडील बहीण पुनश्च फॉर्मात येईल !

—पण ती झटपट नीट नेसण्याचे जे कौशल्य, ते अस्तंगत होईल ! आणि 'तूं शालू नेसतानाच अधिक सुंदर दिसतेस' ह्या खाडिलकरी वाक्याच्या रसिकतेचा प्रत्यक्ष प्रत्ययही फार कमी होईल !

□

॥ ५८ ॥

## प्रसाधनांवर कराघात !

*१० मार्च १९७४*

तो जमाना— तो राम-राज्याचा जमाना— केव्हाच नष्ट झाला. ज्या काळी राज्यकर्ते प्रजेवर करांचे ओझे लादत नसत (अथवा फारच कमी कर-प्रहार करीत असत) तो काळ आता केवळ प्राचीन वाङ्मयांतच काय तो शिल्लक उरलाय. बाणभट्टाने 'कादंबरी'त वर्णन केल्याप्रमाणे त्या सुवर्णयुगात-'कराहतिः मुरजेषु'-करांचा आघात केवळ मृदंगांवरच होत असे ! 'कर' देणे वा 'कर' घेणे हे केवळ प्रणय-प्रसंगांतच चालत असे ! 'कर हा करी धरिला शुभांगी' हे 'संशयकल्लोळा'तील सुखदायक कर-ग्रहण कुठे आणि महागाई-टंचाईच्या हलकल्लोळातील सध्याचे कोट्यवधी रुपयांचे तापदायक सरकारी करग्रहण कोठे !. . . पण आता या गतेतिहासातील गोड गोड गाथा आठवून हळहळण्यात काय अर्थ आहे ? कर बसविणे अन् ते वसूल करणे हे आधुनिक सरकारांचे एक महत्त्वाचे कर्तव्यच झाले आहे. इतके की, शासनाला 'सरकार' म्हणण्याऐवजी 'करकार' म्हणावे !

सध्या केन्द्र सरकारच्या नि महाराष्ट्र-शासनाच्या नव्या अर्थसंकल्पावर— विशेषतः त्यात निर्देशिलेल्या करांवर— विद्वज्जनांत खूपच वादावादी चालू आहे. 'प्राप्त परिस्थितीत गरिबांवर कमीत कमी बोजा ठेवणारा अर्थसंकल्प' असे महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे कौतुक काही जण करीत आहेत, तर 'सामान्य जनतेला नाडणारा अर्थसंकल्प' अशी संभावना विरोधी पक्षीय विद्वान करीत आहेत ! प्रस्तुत विषयावर आम्ही आमचा अभिप्राय ह्यापूर्वीच एका अग्रलेखातून सविस्तर व्यक्त केला असल्यामुळे आज येथे करांबाबत चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. पण ५-६ दिवसांपूर्वी विधान-परिषदेत आमचे समाजवादी मित्र आमदार दत्ता ताम्हाणे ह्यांनी जो एक सवाल केला, त्याला यथामति जवाब देण्याचे

आम्ही योजिले आहे. दत्ता ताम्हाणे वैतागाने उद्गारले "अर्थमंत्र्यांचा सौंदर्य-प्रसाधनांवर एवढा राग का ?"

आमच्या मते, आमच्या सौजन्यशील अर्थमंत्र्यांचा— मधुकरराव चौधरी ह्यांचा— कुणावरच राग नाही. कारण साने गुरुजींसारख्या संताचा संस्कार लाभलेले मधुकरराव 'मन्मति-दरीत न शिरे कोप-मतंगज' हा बाणा मिरविणारे आहेत ! ललनांचा चेहरामोहरा उजळणाऱ्या सेवाभावी प्रसाधनांवर तर, चौधरींचा राग असणेच शक्य नाही. 'मना चंदनाचे परी त्वा झिजावे' हा समर्थ संदेश स्तुत्य असेल तर— नारींच्या भुवयांना धनुष्याकृती लढाऊ बाणा अर्पण करण्यासाठी झिजणाऱ्या 'आयब्रो-पेन्सिलीं'वर चौधरीजी का रागावतील ? फिक्ट ओठांना क्रांतीचा लाल रंग बहाल करण्यासाठी झिजणाऱ्या 'लिपस्टिक्स'वर का काठी उगारतील ? आणि दुसऱ्यांची उन्नती करणे हे जर साधुत्वाचे गमक असेल, तर उरोजांना उन्नत करणाऱ्या 'ब्रेसियर्स'वर ते का रुष्ट होतील ?

आणि तरीही त्यांनी ह्या प्रसाधनांवर जबर कर बसविला. ह्याचे उद्देश दोन : (१) सौंदर्यविश्वातील नकली नाण्यांना हद्दपार करून खऱ्या चलनाची प्रतिष्ठा वाढविणे, (२) स्त्री-सौंदर्याचा साचेबंदपणा मोडून काढणे. . . हल्लीच्या पुरुषांत 'वरलिया रंगा'त दंग होण्याची प्रवृत्ती वाढते आहे. त्यामुळे उच्चभ्रू वर्गातील कृत्रिम-सौंदर्यवतींच्या प्रसाधनपटू नखऱ्यांपुढे, गरीब-मध्यम कनिष्ठ वर्गातील 'जातीच्या सुंदरी' हतप्रभ होऊ लागल्या आहेत. ही स्थिती पालटण्यासाठी सौंदर्य-प्रसाधनांवर कराघात करणे भाग पडले असावे. पूर्वी ही आवश्यकता पडत नव्हती. कारण, सौंदर्य-प्रसाधनांच्या आधारे तकलुपी लावण्य मिरवणाऱ्या राण्यांपेक्षा, दुष्यन्तासारख्या रसिकांना, प्रसाधन-विरहित आश्रमकन्या नि सहजसुंदर वनबाला अधिक पसंत पडत असतात आणि ते उद्गारतात— 'दूरीकृता खलु उद्यानलता वनलताभिः' त्या जमान्यात, कृत्रिम रंगरंगोटीने कुणाचीही सहसा फसगत होत नसे ! 'सुलोचना जीर्ण पटेन शोभते' ही धारणा असलेल्या त्या युगात, सुंदरीने डोळ्यांत सुरम्याची कांडी फिरवलीच पाहिजे ही अपेक्षा नव्हती. उलटपक्षी

*साधाही नयन-बाण*
*विंधितसे काळजास !*
*मग त्याला का उगाच*
*कालकूट माखतेस ?*

असा प्रसाधन-विरोधी प्रश्न रसिक पंडितराज आपल्या प्रियतमेला विचारीत असत ! पण आता एवढी मर्मग्राही दृष्टी उरली नसल्यामुळे, सौंदर्यप्रसाधनांना वाजवीहून अधिक महत्त्व येऊ लागले. आणि अनलंकृत निसर्गदत्त सौंदर्याचा अवमान होऊ लागला. म्हणूनच सौंदर्य-प्रसाधनांवर करप्रहार !

या सौंदर्यप्रसाधनामुळे— त्यांच्या बेसुमार वापरामुळे— आणखी एक आफत उद्भवली आहे. आणि ती म्हणजे साचेबंदपणा ! पहा— फोर्ट विभागात इतस्ततः हिंडणाऱ्या फॅशनेबल पऱ्यांचा प्रसाधन-प्रवीण-घोळका पहा. सर्वच तरुणींचे चेहरे (फौंडेशन क्रीम नि कॉम्पॅक्ट पावडर ह्यांच्या कृपेने-) सारखेच उजळ नि तुकतुकीत ! सर्वजणी (लिपस्टिकच्या सौजन्याने) मधुरा बिंबाधरा ! धनुष्याकृती भुवयांचे वरदान सर्वजणींच्या कज्जल-पूरित नेत्रांवर विराजमान ! लांब पापण्यांचे खंजीर हीही आता दुर्मिळ चीज़ राहिली नाही !. . . सौंदर्य-प्रसाधनांनी 'स्टँडर्ड सौंदर्य' इतके काही स्वस्त केले आहे की, चित्रपट गृहांतील पडद्यावर एखादीच 'डिंपल' झळकत असेल, तर पडद्यासमोर शे-दोनशे 'डिंपल' उपस्थित असतात !

□

शिक्षक
पत्रकार
संगीत नाटककार
अनेक भाषांचा जाणकार
ललित लेखक
सामाजिक कार्यकर्ता
राजकीय विचारवंत
ओजस्वी वक्ता

- असं महाराष्ट्राला घडलेलं
श्री. विद्याधर गोखले यांचं 'अष्टपैलू' दर्शन.
त्यापैकी पत्रकारितेच्या क्षेत्रातील
कामगिरीचं संस्कृतिविषयक दर्शन घडवणारा
हा एक साहित्यिक खंड.

मानसन्मान प्रकाशन